


REFBK-0015147

# जुनें वाङ्मय : नवें संशोधन

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, पुणे विद्यापीठ आणि कर्नाटक विश्वविद्यालय यांजकडून अनुदान मिळालेला संशोधनपर लेखांचा संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्र. ३५७९८ दि. 1/10/७६
१५५८

# जुनें वाङ्मय : नवें संशोधन

REFBK-0015147

डॉ. पण्डित आवळीकर,
एम्. ए., पीएच्. डी.
प्रमुख, मराठी विभाग, कर्नाटक आर्ट्स् कॉलेज, धारवाड.

सप्टेंबर :: १९६४

प्रकाशक :

डॉ. पण्डित आवळीकर,

कर्नाटक आर्ट्स् कॉलेज,

धारवाड.

सर्वाधिकार लेखकाच्या स्वाधीन.

मूल्य : रु. १०

मुद्रक :

म. अ. कामत, बी. अेस्सी.

जयहिन्द आर्ट प्रेस,

धारवाड.

सात नोव्हेंबर अेकोणीसशे छप्पनला कर्नाटक कॉलेजमध्यें—कर्नाटकामध्यें—मी पाऊल टाकलें. तेव्हांपासून मुख्यतः कर्नाटकांतील मराठी वाङ्मयाचा शोध घेत असतांना जें वाङ्मय व जी नवी माहिती माझ्या हातीं आली त्यांच्या आधारें मी महाराष्ट्र साहित्य पत्रिका, नवभारत, प्रतिष्ठान, लोकसत्ता, अिंद्रायणी अि. नियतकालिकांतून कांहीं संशोधनपर लेख लिहिले. त्यांतील कांहींचा हा संग्रह. निदान असे आणखी दोन संग्रह निघावेत अेवढें लेखन आज जवळ आहे. तें प्रसिद्ध होण्याचा योग केव्हां येअील तो येवो.

हस्तलिखितें मिळविण्यांत अनेकांचें अनेक परींनीं साह्य झालें. प्रारंभीं प्रसिद्ध कन्नड साहित्यिक श्री. बेटगेरी कृष्णशर्मा व कविवर्य द. रा. बेंद्रे यांनीं कोठें काय मिळेल हें 'मार्ग' दर्शन केलें. पुढें अनेकांना 'वाट पुसत' वाट-चाल करीत राहिलों. पुष्कळ फिरलों. या भ्रमंतींत श्री. शिवभट जोशी श्री. कल्मेषबोध श्रीपादबोध स्वामी, श्री. अण्णप्पय्या वेंकप्पय्या काखंडकी, श्री. गणेश चिदंबर (दीक्षित) अिनामदार, श्री. दत्ताप्पा जाधव, श्री. शं. ना. मोहोळकर, श्री. धनपाल टिके यांसारख्या सज्जनांच्या भेटी झाल्या आणि त्यांनीं आपल्याकडील साहित्य-धन माझ्या हातीं ठेवलें. या सर्वांना धन्यवाद.

जयहिंद आर्ट प्रेस्चें धनी व माझे मित्र श्री. मधुकरपंत कामत यांनीं माझ्यासाठीं घेतलेल्या परिश्रमांबद्दल काय म्हणूं! त्यांच्या स्नेहभावाला आभाराचा औपचारिकपणा मानवण्यासारखा नाहीं.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळानें प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशना-साठीं साडेआठशे रुपयांचें अनुदान दिलें. त्याबद्दल मंडळाचा मी ऋणी आहे. त्याचप्रमाणें पुणें विद्यापीठानें प्रकाशनासाठीं अनुदान दिलें. त्यासाठीं पुणें विद्यापीठाचा मी फार आभारी आहे. कर्नाटक विश्वविद्यालयानें दिलेल्या अनुदानाबद्दल कर्नाटक विश्वविद्यालयाचा मी ऋणी आहे.

—पण्डित आवळीकर

# अनुक्रमणिका


कवि अज्ञानसिद्ध : १

विष्णुदास नाम्याचें 'हरिश्चंद्रोपाख्यान' : १५

महानुभाव कवि नवरस नारायण : ३१

अेक 'चंद्रहास्याख्यान' : ४७

'भावार्थ रामायणा'चें युद्धकांड : ५८

मुक्तेश्वरावर प्रकाश : ९०

विप्रनारायण : १०५

'देशिक—चरित्र : ११६

'रंगबोधिनी' : अेक अध्याय : १३४

रंगबोधस्वामीकृत 'योगवासिष्ठटीका' : १५४

अद्वयबोधांची कविता : १७२

चंद्रात्मज रुद्र : १८४

'श्रीमच्चरित्र' : अैतिहासिक अंग : २००

विठाबाअीचे अभंग : २१८

'गुरुमाळिका' : अेक अध्याय : २३३

कवि अलमखान : थोडी चरित्रपर माहिती : २५१

'सुक्तमुक्तावळी' : अेक जैन ग्रंथ : २६१

'सिंहासनबत्तिशी'ची अेक प्रत : २७१

त्र्यंबककृत 'प्रल्हाद—चरित्र' : २८५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३८५५६ वि: ...
१५५... नो: दि. १९/८/६५
१५१४५

# कवि अज्ञानसिद्ध

ज्या अनेक चांगल्या कवींकडे आपलें अक्षम्य दुर्लक्ष झालें आहे, त्यांतील अज्ञानसिद्ध हे एक होत. अज्ञानसिद्धांचें चरित्र व काव्य यांची फार थोडी माहिती आपल्या वाङ्मयेतिहासांत दिलेली आढळते.

'महाराष्ट्र–सारस्वत'कार भाव्यांनीं त्यांचा नामनिर्देशहि केलेला नाहीं. 'पुरवणि'मध्यें मात्र डॉ. तुळपुळे लिहितात : "या शतकांत ( म्हणजे चौदाव्या शतकांत ) एक वडवाळसिद्ध नागेश व दुसरे अज्ञानसिद्ध नागेश असे दोन कवि ऐकूं येतात. पैकी शके १३१३ मध्यें ग्रंथरचना करणाऱ्या पहिल्याचा उल्लेख सारस्वतकारांनीं केलाच आहे. मात्र ते म्हणतात त्याप्रमाणें नागेश हें नांव या कवीचें नसून तें त्याच्या गुरूचें असावें. कवीचें नांव वडवाळ. त्याचा काळ संतकविकाव्यसूचिकार शके १२९० ते १३४० असा देतात. दुसरा कवि स्वतःचा उल्लेख अज्ञानसिद्ध नागेश किंवा वरद नागेश या नांवानें करीत असून तोहि वरील नागेशाचाच शिष्य दिसतो. आपल्या गुरूचें नांव नागनाथ असें त्यानें स्पष्टपणें म्हटलें आहे. या अज्ञानसिद्ध नागेशाच्या नांवावर गुरुशिष्यसंवाद, कालज्ञान व पंचीकरणप्रमेय इतके ग्रंथ आढळतात. पैकी अखेरचा ग्रंथ अविंध भाषेंत असल्यानें त्यावरून या कवीचा काळ १४ व्या शतकाच्या अखेरीस यावा

असा 'सूचि' कारांचा तर्क आहे. एवढें मात्र खरें की, या दोन कवींविषयीं विश्वसनीय असा तपशील अद्यापि तरी उपलब्ध झालेला नाहीं......"[१]

डॉ. तुळपुळ्यांनीं दिलेल्या माहितीची तपासणी करण्यापूर्वीं भाव्यांनीं केलेला उल्लेख कोणाचा व तो बरोबर आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. चौदाव्या शतकांतील कवींसंबंधीं–त्यांतहि बहिरंभट्टाविषयीं–लिहीत असतांना वडवाळसिद्ध नागेशाची हकीगत भाव्यांनीं दिलेली आहे. नागेश हा बालाघाटाकडील राहणार. होता हें भाव्यांचें मत ( ज्याचा अनुवाद पांगारकरांनींहि केला आहे ) येथें बाजूस ठेवूं. कारण नागेश किंवा नागनाथ हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. भावे लिहितात :

"याचीं कांहीं पदें व थोडेसे अभंग आणि 'संकटहरणी शिवग्रथ' नांवाचें एक लहानसें ( १४१ ओव्यांचें ) प्रकरण एवढीच कृति उपलब्ध आहे. याच्या कालासंबंधींहि नक्की माहिती सांगण्यासारखें साधन उपलब्ध नाहीं. हा ज्ञानेश्वरांचा समकालीन होता, अशी मात्र सर्वत्र समजूत आहे."[२]

भाव्यांनीं 'संकटहरणी' चें कर्तृत्व वडवाळसिद्ध नागेशांना जें बहाल केलें आहे तें कशाच्या आधारावर याचा उलगडा होत नाहीं. वास्तविक ही कृति भावे म्हणतात त्याप्रमाणें वडवाळसिद्ध नागेशांची नसून अज्ञानसिद्ध नागेशांची आहे. शके १८७१ म्हणजे सन १९४९ मध्यें सोलापूरच्या श्री. शंकर नानाबुवा मोहोळकरांनीं ती प्रसिद्धहि केलेली आहे.

'संकटहरणी' हें प्रकरण सात प्रसंगांत विभागलेलें असून त्याची ओवी-संख्या १३८ आहे. ही कृति अज्ञानसिद्धांचीच आहे, हें पुढील अंतर्गत पुराव्यावरून सिद्ध होतें:—

ॐ नमो अनादि आदि **नागेशा** । त्रैलोक्यविलासी महापुरुषा ।
पुरवी **अज्ञान** मनोआशा । प्रार्थना ही निजगणेशा ऐका सहजी ॥१–१॥
या **श्रीगुरु नागनाथ** योगी । हेचि संकट हरण प्रसंगी.... ॥ ५–२६ ॥

---

१. महाराष्ट्र–सारस्वत, पुरवणी, पृ. ९२०–२१.
२. महाराष्ट्र–सारस्वत, पृ. २४४.

**अज्ञानसिद्ध** स्वामी ज्ञान । श्रोतया विनवी सावधान ॥....७–२५ ॥
**श्रीनागनाथ वरदे** ग्रंथ । **अज्ञान** भावे अर्पिला ॥ ७–२७ ॥

कालनिश्चितीचें साधन उपलब्ध नाहीं असें म्हणून भाव्यांनींच या ग्रंथांतील म्हणून पुढील ओवी* दिलेली आहे:—

" मिती मार्गेश्वर वद्य बीज । गुरुवारीं लिहिला सहज ।
लिहितां स्वात्मकार्य माझें । करी अज्ञाना ज्ञानसिद्धी ॥
शके तेरासे तेरा । ( १३१३ ) "

या ओवींतील कालोल्लेखाकडे व 'अज्ञाना' या कविनामाकडे भाव्यांचें लक्ष कसें गेलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. 'पुरवणी' कारांकडूनहि या गोष्टींची दखल घेणें राहून गेलें आहे. वडवाळ हें कवीचें नांव मानण्याची नवी चूक मात्र झाली आहे. वडवाळ हें कवीचें नांव नसून सोलापूर जिल्ह्यांतील एका गांवाचें नांव आहे. अज्ञानसिद्धांचे गुरु नागेश ऊर्फ नागनाथ हे वडवाळ येथें राहात म्हणून त्यांना वडवाळसिद्ध नागेश म्हणत. ते कवि असल्याचा पुरावा आजतरी उपलब्ध नाहीं. त्यामुळें भाव्यांनीं उल्लेखिलेली 'कांहीं पदें व थोडेसे अभंग' ही रचना वडवाळसिद्ध नागेशांची नसून अज्ञानसिद्धांची ( वा इतर कोणाची ) असण्याचाच जास्त संभव आहे.

भाव्यांना अज्ञानसिद्धांचा पत्ताच नसल्यानें त्यांच्या चरित्राविषयीं त्यांनीं कांहीं लिहिणें शक्य नव्हतें. तर 'विश्वसनीय असा तपशील' उपलब्ध न झाल्यानें डॉ. तुळपुळयांनीं या कवीची माहिती दिलेली नाहीं. "अज्ञानकवि हा नागनाथ ऊर्फ नागेश नामक साधुपुरुषाचा शिष्य होता यापलीकडे कवीची कांहींएक माहिती नाहीं"[३] असें पांगारकरांनीं स. १९३५ मध्यें म्हटलें. त्यानंतर श्री. मोहोळकरांनीं स. १९४९ मध्यें 'संकटहरणी'च्या प्रस्तावनेंत अज्ञानसिद्धांची

---

* हीच ओवी छापील पुस्तकांत अशी आहे:—
शके तेराशे तेरा । मार्गशीर्ष शुद्ध नवमी गुरुवारा ।
प्रकटला नागेश फणीवरा । भक्तशिरी डुल्लत ॥ ७–२६ ॥

३. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, पृ. २६.

चारित्रपर माहिती दिली. परंतु पुढें दोन वर्षांनीं प्रसिद्ध झालेल्या 'पुरवणीं'-तहि तिला स्थान मिळूं शकलें नाहीं. 'विश्वसनीय' न वाटल्यानें असें झालें असणें शक्य आहे. यामुळेंच मिळत असलेली माहिती कितपत ग्राह्य आहे हें ठरविणें आवश्यक झालें आहे.

मोहोळ येथें हेगरस नांवाचे नागनाथांचे एक भक्त राहात असत. उद्धवचिद्घनांनीं या हेगरसांचें चरित्र गाइलेलें आहे. 'नागनाथ आणि त्यांचे शिष्य हेमराज' यांचा निर्देश–उद्धवचिद्घनासंबंधीं लिहितांना भाव्यांनीं केलेला आहे.[४] भाव्यांनीं 'हेमराज' हें चुकीचें नांव दिलेलें असून तें 'हेगरस' असेंच हवें.

हेगरसांना अहिल्या नांवाची एक मुलगी होती. ती 'मसूरग्रामीं दिली होती.' तिला अज्ञानसिद्ध, विदेहासिद्ध व नरेंद्रसिद्ध असे तीन मुलगे होते. त्यांचें गोत्र जमदग्नि. अज्ञानसिद्धांचें वर्णन पुढीलप्रमाणें केलेलें आढळतें.[५] :—

सुतपवल्लीचे मूळ । अनुष्ठानतरूचे पक्क फळ ।
तोचि अज्ञानासिद्ध निर्मळ । वैराग्यसीळ माहात्मिकु ॥ ३ ॥
सत्व गाळो निफजला । की विवेकाते अटोनि जाला ।
की भक्तीभूमीकेत उगवला । कोमळ चांगला ज्ञानकोंब ॥ ४ ॥

अज्ञानसिद्ध लहानपणींहि इतर मुलांहून वेगळेंच वाटत. लहान वयांत त्यांना सिद्धस्थिति प्राप्त झाल्यानें त्यांना 'अज्ञानसिद्ध' असें नांव पडलें. आईनें मुलास नागनाथांना अर्पण करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें वडवाळ येथें येऊन तिनें केलें.

नागनाथांनीं 'साक्षात् दर्शन' देऊन अज्ञानसिद्धावर कृपा केली. वडवाळ येथें कांही काळ गेल्यावर नागनाथांनीं त्यांना आज्ञा केली.[६] :—

....तुवा नरेंद्रपुरी जाऊन । समाधान विचरिजे ॥ ४७ ॥
अलंप्रभू वसे भावे । तेथ तुवाही असावे ।
गुरुअज्ञेचे वचनासवे । सत्वर जावे मानले ॥ ४८ ॥

---

४. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. ६१८.
५. नागेश-लीलामृत, अ. ३४.
६. नागेश-लीलामृत, अ. ३४.

नरेंद्र ऊर्फ नरंदें हें गांव कोल्हापूर जिल्ह्यांत, हातकणंगलें तालुक्यांत आहे. तेथें अज्ञानसिद्ध जाऊन राहिले. अनेकजण त्यांचे भक्त झाले. नरंदें येथेंच अज्ञान-सिद्धांनीं जिवंत समाधि घेतली. त्यांच्या समाधीचा शक मला उपलब्ध झालेला नाहीं. ज्या अर्थीं त्यांनीं 'संकटहरणी'चें लेखन श. १३१३ मध्यें केलें त्या अर्थीं त्यांचा समाधिकाल चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धापलीकडे जाऊं शकत नाहीं.

नागनाथांनीं अज्ञानसिद्धांस नरंदें येथें पाठविण्याचें एक कारण म्हणजे तेथें अलंप्रभूंचा वास होता. हे अलंप्रभू कोण? अलंप्रभूंचा व अज्ञानसिद्धांचा नित्य संवाद होई; दोघेहि एकाच संप्रदायाचे होते; अलंप्रभू हे नागनाथांचे 'सिष्यरत्न' होते; ही 'नागेश-लीलामृतां'तील माहिती निदान नमूद करण्या-इतकी महत्त्वाची आहे.

अलंप्रभू किंवा प्रभुदेव (स. ११६०) हे श्री बसवेश्वरांचे समकालीन होते. कल्याणच्या 'शून्यसिंहासना' वर बसवेश्वरांनीं त्यांची प्रतिष्ठापना केलेली होती. मायेला जिंकणारे म्हणून 'मायाकोलाहल' असें त्यांचें वर्णन केलें जाई. षट्-स्थल-ज्ञान-चारित्र्य, शून्यसंपादनें, मंत्र–गोप्य, सृष्टिय वचन, मंत्र–माहात्म्य आणि कालज्ञानद वचन इत्यादि कन्नड कृती त्यांच्या नांवावर आढळतात.[७]

या अलंप्रभूंच्या व अज्ञानसिद्धांच्या काळांतील अंतर ध्यानांत घेतां बसवे-श्वरांचे समकालीन असणाऱ्या अलंप्रभूंशीं अज्ञानसिद्धांचा संबंध आला असेल हें बुद्धीस पटत नाहीं. परंतु या कथेंत कांहीच अर्थ नाहीं असें नव्हें.

नरंद्याजवळच अळतें येथें अलंप्रभूंचें देवस्थान आहे. त्यासंबंधीं गॅझेटियर-मध्यें माहिती मिळते ती अशी :– "According to local legend, Prabhu was a lingayat Saint who came to Alta from Kalyan in Nizam's territory. Adiling, a disciple of Prabhu who came to seek his teacher followed him as far as Alta. As he could find no further trace of him Adiling thought Prabhu had buried himself alive at

७. A Hand-book of Viras'aivism, p. 28.

Alta. To show respect for his teacher Adiling built the shrine and set up a lamp which is still kept burning and worshipped."[८]

वर दिलेली देखील एक दंतकथा आहे. अलंप्रभू नांवाच्या व्यक्ती एकाहून अधिक झालेल्या असणें व त्यांपैकी कोणाचा तरी अज्ञानसिद्धांशीं संबंध येणें शक्य आहे. प्रसिद्ध अलंप्रभू किंवा प्रभुदेव हे नागनाथांचे शिष्य असणें किंवा अज्ञानसिद्धांचे समकालीन असणें, 'उभय येके संप्रदाई' असणें शक्य नाहीं.

नरंद्याला अज्ञानसिद्धांचे दत्तचैतन्य म्हणून एक मुख्य शिष्य होते. त्यांनींच गुरुंची समाधि बांधली.

दत्तचैतन्य समर्थ थोर । तयांनी करोनी पदपदांतर ।
स्तवनी स्तविला नागेश्वर । पटता पार जन होती[९] ॥ ९३ ॥

अज्ञानसिद्धांची शिष्यपरंपरा पुढीलप्रमाणें :—

अज्ञानसिद्ध

| देषंजय | येकालिंग | कृष्णनाथ | दत्तचैतन्य |
|---|---|---|---|
| संगमेश्वर | मैराळ | हरिनाथ | |
| सिद्धरामेश्वर | लिंगेश्वर | नरहरिनाथ | |
| गोविंद भटजी | येकलिंग | नारायणनाथ | |
| आत्मानंदस्वामी | मुक्तालिंग | रमानाथ | |
| | सहजलिंग | रघुनाथ | |

महाग्राम (महागांव), वरवंड, किलारी व नरंदें या ठिकाणीं वरील शिष्यशाखा पसरलेल्या दिसतात. नागनाथांचा संप्रदाय सर्वसमावेशक कसा होता याची कल्पना शिष्यनामांवरून येऊं शकेल.

---

८. Kolhapur District Gazetteer, Vol. XXIV, p. 292.
९. नागेश-लीलामृत, अ. ३४.

अज्ञानसिद्धांचा शिष्यविस्तार पाहतां,

गुरुप्रसाद अंबर । माजि अज्ञानसिद्ध चंद्र ।
शरण मनुज ते चकोर । अर्थ सत्वर पावती ॥ १० ॥

हें 'नागेश-लीलामृतां'तील वर्णन यथार्थ वाटतें.

'नागेश-लीलामृत' या अप्रसिद्ध ग्रंथाच्या आधारें अज्ञानसिद्धांविषयीं कांहीं माहिती वर दिलेली आहे. हा ग्रंथ भास्कर ऊर्फ भानजी त्र्यंबक देशपांडे यांनीं लिहिला आहे. ग्रंथ अत्यंत अर्वाचीन आहे असें म्हणतांना श्री. वा. सी. बेंद्रे लिहितात– "'नागेश-लीलामृत' हा ग्रंथ मोहोळच्या भास्कर ऊर्फ भानजी त्रिंबक देशपांडे यांनीं ज्येष्ठ ते मार्गशीर्ष शके १८५६ प्रजापति संवत्सरांत (इ. स. १९३४) रचला व लिहिला."[१०]

बेंद्रे यांना मिळालेल्या प्रतींत अशा तऱ्हेचा कालनिर्देश असेलहि. परंतु मला मिळालेल्या प्रतींत मात्र,

पांच प्रकर्ण पूर्ण जाली । ग्रंथरचना स्थिरावली ।
**सत्रासे सत्तर** वहनशाली । श्रावणी झाली पूर्ण कथा ॥ ६२ ॥

असा कालोल्लेख आहे.[११] त्यावरून श १७७० (इ. स. १८४८) मध्यें श्रावण महिन्यांत ग्रंथलेखन संपलें असें कळतें. तेव्हां श्री. बेंद्रे समजतात तितका हा ग्रंथ अर्वाचीन नाहीं. तसेंच ग्रंथ जितका जुना तितका तो अधिक विश्वसनीय असेंहि नाहीं. 'नागेश-लीलामृता'चा कर्ता हा नागनाथांची पिढ्यानुपिढ्या भक्ति करणाऱ्या घराण्यांतील आहे. त्याच्या माहितीला परंपरेचें अधिष्ठान आहे. असें मानावें लागेल. आपल्या एखाद्या लाडक्या सिद्धांताला बाध आणणारा मजकूर तो लिहितो एवढ्याचसाठीं त्याच्यावर गैरमर्जी करणें वा त्याच्या माहितीला हास्यास्पद ठरविणें योग्य ठरणार नाहीं. 'नागेश-लीलामृता'ची माझ्याकडील प्रत कोणा अलबत्यागलबत्याकडील नसून 'तात्याबोवा मठसिद्ध टेकडी चंद्रमौळी मोहोळ' यांची–मोहोळकरांच्या घराण्यांतील–आहे. अज्ञानसिद्धांच्या चरित्रा-

१०. तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा, पृ. २०.
११. नागेश-लीलामृत, अ. ३४.

विषयींची माहिती विश्वसनीय-निर्णायक नव्हे-वाटण्यास कांहींच हरकत नाहीं.

'नागेश-लीलामृत'कारांच्या मतें नागेश ऊर्फ नागनाथ हे चैतन्य-संप्रदायी होते.

ब्रह्म चैतन्य स्वरूप । स्वयंप्रकाश तेजरूप ।
ते चैतन्य अनुभविजे साक्षप । चैतन्यसांप्रदाय या हेतू ॥ २० ॥
यातोनि चैतन्यसांप्रदाय । स्वीकारी श्रीनागेश पाहे ।
चैतन्यरूप सर्वदा आहे । विराजे सांप्रदाय जाचेनी ॥ ३१ ॥

या ओव्या[१२] त्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत. आदिनाथ-नागनाथ-केशवचैतन्य-राघवचैतन्य-बाबा चैतन्य-तुकाराम अशी परंपराहि दिलेली आढळते. श्री. वा. सी. बेंद्रे यांना ती विश्वासाई न वाटली तरी महत्त्वाची आहे.

नागनाथ या नांवावरून त्यांना नाथसंप्रदायी म्हणूं नये.

नाथनामावरूनी देख । नाथसांप्रदाय म्हणो नये[१३] ॥ ५५ ॥

ब्रह्म हें चैतन्यस्वरूप आहे असें चैतन्यसंप्रदाय मानतो. या अर्थानें अज्ञानसिद्धांना चैतन्यसंप्रदायी म्हणावयास प्रत्यवाय नसावा. ही व्यापक भूमिका लक्षांत घेतां नागनाथांच्या शिष्यांत मुसलमान, लिंगायत इत्यादींचा समावेश कसा झाला हें कोडें उलगडतें. नागेश हे नासिरउद्दीन किंवा शिवयोगी बनण्याचें-बनविण्याचेंहि-कारण येथेंच सांपडतें. अज्ञानसिद्धांचे मुख्य शिष्य **दत्त-चैतन्य** होते हीहि गोष्ट बोलकी आहे.

अज्ञानसिद्धांच्या चरित्रावर दृष्टिक्षेप टाकल्यानंतर त्यांच्या काव्याकडे वळणें बरें. त्यांचा 'वरदनागेश'हा ग्रंथ अप्रसिद्ध असला तरी त्याची माहिती चांदोरकर[१४] व पांगारकर[१५] यांनीं दिलेली आहे. ('महाराष्ट्र-सारस्वतां'त याचा नामोल्लेखहि नाहीं). 'वरदनागेशा'खेरीज इतर प्रकरणांची यादी कांहीं

१२. नागेश-लीलामृत, अ. २८.
१३. नागेश-लीलामृत, अ. ३३.
१४. भा. इ. सं. मं. षष्ठ संमेलनवृत्त, श. १८४०.
१५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, पृ. २६-२९.

ठिकाणीं आढळली तरी त्यांमधील विषयाचें विवेचन कोठेंहि आलेलें नाहीं· म्हणून मला उपलब्ध झालेल्या अज्ञानसिद्धांच्या चार प्रकरणांची माहिती येथें देत आहें·

## १· तत्त्वबोध

हें २०१ ओव्यांचें लहानसें प्रकरण असून त्याचें स्वरूप गुरुशिष्यसंवादाचें आहे·

शिष्य गुरूला परब्रह्म म्हणजे काय, मी म्हणजे कोण, असे प्रश्न विचारतो·

....परब्रह्म विकारा । वेगळीची ते ॥ ६७ ॥

हें स्थूळ देह नव्हेसी । तुवा जाणीतले यासी ।
सहज स्वयंप्रकाशी । परमात्मा तूं ॥ ११४ ॥

....या लिंगदेहापासून । वेगळाचि तूं ॥ ११५ ॥

अशीं उत्तरें गुरु देतात· संकल्पानें बंध निर्माण होतो. म्हणून—

बंध मोक्ष दोन्ही । कल्पू नको मनी ।
द्वैत सांडूनि उन्मनी । भोगी पुत्रा ॥ १५५ ॥

प्रपंच आणि ब्रह्म यांत पुष्प-परिमळ, सुवर्ण-अलंकार, कापूस-वस्त्र, गूळ-गोडपणा, तरंग-जळ, मेघ-आकाश यांच्याप्रमाणें अभेद आहे.

आतां सांडी भ्रांतिभेदू । त तध सहजसिद्धू ।
मोक्ष आणि बंधू । कैचा तुज ॥ १६३ ॥

अशा तऱ्हेचें तत्त्वज्ञान 'तत्त्वबोधां'त आहे·

परब्रह्म हें मणिपुर, अनाहत, सहस्रदल, कुंडलिनी, त्रिकूट, गोल्हाट, श्रीहाट, औटपीठ, भ्रमरगुंफा या सर्वांहून निराळें आहे असें म्हणून भक्तीचें महत्त्व सांगितलें आहे:—

ज्ञानाचे भूषण । एकी भक्तीची कारण ।
येरवी घ्राणेविण । मुख जैसे ॥ १८६ ॥
भक्ती लटिकी म्हणती । तरी गणी पूजिले ईश्वरासी ।
पिसे लागले विष्णूसी । पूजा केली नेत्रकमळी ॥ १८७ ॥

भक्ती केली इंद्र । एकदंत लंबोदर ।
पार्वती बसवेश्वर । आदिकरूनी ॥ १८८ ॥

ग्रंथाचें माहात्म्य सांगतांना कवि म्हणतो:—

हें उपनिषदांचें गहिवर । सकळशास्त्राचे सार ।
सकळ श्रुतींचे माहेर । ग्रंथ झाला ॥ १९१ ॥
कृष्णे अर्जुना सांगीतले । ईश्वरे पार्वतीप्रति कथिले ।
अनंतसिद्धें निरोपिले । आदिनाथा ॥ १९२ ।

'तत्त्वबोधा'च्या प्रारंभीं कवि म्हणतो:—

आतां नमीन श्रीगुरुनाथु । जो नागेश कृपावंतु ।
तेणें मस्तकी ठेविला हस्तु । कृपा करूनि ॥ १९ ॥
चरणींचे तीर्थ मुखांचा प्रसादु । देवोनि तोडिला भवबंधु ।
निरोपिला ब्रह्मबोधु । कृपा करूनि ॥ २० ॥

तर समारोप करतांना तो लिहितो:—

मग श्रीगुरुसी केली प्रदक्षिणा । केले चरणवंदना ।
दोहीं करीं उचलून । संबोखिलें गुरुदेवें ॥ १७८ ॥

या ओव्यांनीं या संवादाला जिवंतपणा आला आहे. संवाद चालतो तो नागेश व अज्ञानसिद्ध यांच्यांत. त्यानंतर इतरांसाठीं शिष्य कळलेल्या गोष्टींचें निरूपण करतो. या निरूपणाला आधार उपनिषदें, श्रुति, गीता व परंपरागत शिवकथित ज्ञान यांचा.

## २. जीवब्रह्मभेदलक्षण

हें ५०२ ओव्यांचें प्रकरण असून त्यांत

भेदमतखंडण । कीजे स्वामी ॥ ९ ॥

या शिष्याच्या विनंतीवरून गुरूंनीं तसें केलें आहे. जीव सगुण कीं निर्गुण, भोक्ता कीं अभोक्ता, जीवाची मरणोत्तर स्थिति, ब्रह्मानंदाचें स्वरूप इत्यादि प्रश्न व गुरूंनीं दिलेलीं उत्तरें या प्रकरणांत आहेत. हाहि गुरु-शिष्य-संवादच होय.

म्हणती पंचरसाचे पाणी । जीवासी पाजिती कढोनी ।
तरी मुखेविण कैसेनी । प्राशन केले ॥ ५० ॥
म्हणती तापले खांबासी । बांधिताती या जीवासी ।
तरी देहावीण बांधावयासी । सर्वथा नये ॥ ५२ ॥

आशा कांहीं शंका शिष्य विचारतो. जीवाला नरकयातना भोगाव्या लागतात असें म्हणतात पण देहाशिवाय जीव नरकयातना भोगतो कसा ? या प्रश्नाचें उत्तर गुरु देतात—

ते लिंगदेह स्वर्गा नेती । तेथे प्रतिशरीरे असती ।
तयामाजी प्रवेशविती । तया लिंगदेहा ॥ ३६९ ॥

स्वर्गातले भोग पुण्य क्षीण झाल्यावर संपतात.

[१६]जरी उत्कृष्ट उत्तम पुण्य । ते स्वर्ग भोगणे होय क्षीण ।
मग मागुती जाण । पडावे जन्मी ॥ ३९४ ॥

या प्रकरणांतील विवेचनाला गीतेचा आधार आहे हें पुढील ओवीवरून स्पष्ट होतें—

ऐसें असे श्रीकृष्णवचन । गीतेमाजी निरोपण ।
सातवे अध्यायी जाण । अर्जुनाप्रति ॥ ४०४ ॥

कवि पांडित्याचा निषेध करतांना म्हणतो :—

एक ब्रह्मज्ञानावीण । कांहींच नकळे जाण ।
जरी केले पठण । वेदांत कोटी ॥ ४३२ ॥
ज्ञानाकारणे वेद पढती । शेखी ज्ञान सोडोनी अभिमाने मरती ।
ते कैसेनी जाणती । तरणोपाय ॥ ४३३ ॥
चारी वेद वाचिती । अंगी चढे अहंमती ।
मग मत्सर करिती । येरयेरा ॥ ४३४ ॥

---

१६. ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं । क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशान्ति ।
—श्रीमद्भगवद्गीता, ९.२१

' शस्त्रेवीण वधणे । दुसरीया द्विजा ' हें ज्यांना माहीत अशा पढीक पंडितांचें चित्रच कवीनें रेखाटलें आहे.

वंध्या धेनुवेचे कष्ट । क्षीर नाही परी नुसधा अट ।
तैसे ( सु ) खेवीण बोभाट । वेद शब्दाचे ॥ ४४६ ॥
मृगजळीचे जीवन । करू धावती प्राशन ।
तृषा न जाय परि हनन । होय प्राणा ॥ ४४७ ॥

हा निषेध कडक असला तरी असत्य आहे असें कोण म्हणेल ?

' ज्या शब्दे न होय ब्रह्मभेटी । काय करावी ते चावटी ' हेंच खरें.

या प्रकरणाच्या शेवटीं कवीचें कवित्व दाखविणारें एक सुंदर परंपरित रूपक येतें:—

राउळीचे सेवन । परमामृतवचन ।
वर्षाव झाला पूर्ण । शिष्यभूमीवरी ॥ ४८५ ॥
तेथूनी शब्दवृक्षावरी । आकारता चढली तोवरी ।
मग ज्ञानाचा ( ? ) मोहरी । भगभगीत दावी ॥ ४८६ ॥
तेथे शब्दरत्नाचे घोस । घड लागले आसपास ।
माजी अर्थ तो रस । भरला असे ॥ ४८७ ॥
ते परिपक्व दशे । ओळंबती ब्रह्मरसे ।
ते भोगिती प्राप्तिसरिसे । विवेकपक्षिये ॥ ४८८ ॥

## ३. पृच्छापत्र

या प्रकरणांत १९८ ओव्या असून त्यांत 'सच्चिदानंदपद व्याख्यान' आहे.

जी पृच्छापत्र पाठविले राजचंद्रे । तरी तुवा विज्ञानस्थिती योगींद्रे ।
शिष्यवृंद निववोनि सुखींद्रे । स्वसुख निववीजे ॥ ५ ॥

या ओवीवरून कांहीं प्रश्न विचारलेल्या पत्रास उत्तर देण्याच्या निमित्तानें हा गुरु-शिष्यसंवाद झालेला दिसतो. 'राजचंद्रे' या शब्दाचा नीट उलगडा होत नाहीं.

सच्चिदानंद पदाचें विवरण करीत असतांना सद्=ब्रह्म=सत्य, चिद्=माया=विवर्त असें स्पष्टीकरण केलेलें आढळतें; तर आनंदाचें वर्णन एका दृष्टांतानें केलेलें आहे:—

मुखी घालिता शर्करा कवळ । सर्वांगी स्वानंदाचा सुकाळ ।
तैसा स्वानंदकल्लोळी इंद्रियांचा मेळ । विकळ ते स्वानंदसुखे ॥ २१ ॥

या प्रकरणांतील चर्चेसहि गीतेचा आधार आहे. तेवढ्याच स्थळांचा निर्देश करतों. क्षराक्षराचा विचार करतांना,

....म्हणे अक्षयी चैतन्य भासते अक्षर ।
तथा कूटस्थापरते परमस्वरूप ॥ ३१ ॥
तेथोनि त्रिगुणात्मक आणि पंचभूतात्मक । हे क्षर जे क्षरले सकळिक ।
असती अनुवादले श्रीकृष्णनायक । भगवद्गीते तेरावे अध्यायी ॥ ३२ ॥

सगुण-निर्गुणाच्या विवेचनांतहि पुन्हा गीतेचा निर्देश येतो:—

आता सगुणाचे लक्षण । ते तव अष्टधाप्रकृति भिन्न ।
अविद्या प्रपंचभेदत्रय कार्य मायाकारण ।
हे भगवद्गीते भगवान वदे सातव्याध्यायी ॥ ४९ ॥

पुन्हां एकदां १८९ व्या ओवींत गीतेच्या सातव्या अध्यायाचा संदर्भ दिलेला आहे.

## ४. काळज्ञान

'काळज्ञान' हें ५११ ओव्यांचें प्रकरण स्वतंत्र नसावें असें वाटण्यास जागा आहे. प्रकरणाच्या शेवटीं "इति सद्गुरुशिष्यसंवादे **वरदनागेशग्रंथे** काळज्ञानकथा संपूर्णमस्तु" असा मजकूर आहे. प्रकरणाच्या मध्यभागीं

ते जन्मपटाचे ज्ञान । विचारिसी कैसे म्हणोन ।
ते पाचवे अध्यायी पूर्ण । पुढे निरोपिले असे ॥ १७६ ॥

अशी एक ओवी आहे. बरें, हें प्रकरण ५ अगर अधिक अध्यायांत विभागलेलें नाहीं. तसेंच 'वरदनागेशा'च्या माझ्याकडील प्रतींत हा भाग नाहीं. तेव्हा सध्या तरी स्वतंत्र प्रकरण म्हणून त्याला मान्यता देण्यास हरकत दिसत नाहीं.

काळ आल्याचें ज्ञान कसें व्हावें व काळ आल्यावर काय करावें या प्रश्नांची चर्चा प्रारंभीं केलेली आहे. यांत पवन-विचार आहे. तसेंच त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट औटपीठ, भ्रमरगुंफा हीं स्थानें, तेथील देवता व 'दशनादाचा विवरू' आहे.

दशनादांचें वर्णन अत्यंत प्रत्ययकारी आहे. चिनीचिनी, शिंगी, तंती, ताल, वंश, वर्षा, शंख, घोष, भेरी, मेघ या नादांचें वर्णन आपणांस ते नाद ऐकविणारें आहे. उदाहरणार्थ, 'ताल' म्हणजे "गंगेची खळाळ वाहे । तैसी ध्वनि उमटताहे" ॥ ३०६ ॥ तर या नादांची फलश्रुति सांगतांना, त्या आनंदाचें वर्णन करतांना शारीर आनंदाचें उदाहरण कवि देतो.

चिनीचिनी नादानें मिळणाऱ्या आनंदाचें वर्णन बघा:—

जैशा रतिसुखाच्या अंतीं । मदनकळा सुख देतीं ।
त्या ऊर्ध्वे यतीश्वर भोगिती । येणे सुखे ॥ २५१ ॥

समाधिसुख हें रतिसुखासारखेंच असतें असें म्हणावयास कवि बिचकत नाहीं. 'काळज्ञाना' मध्यें मनोलययोगावर भर दिलेला आढळतो.

या प्रकरणांची भाषा जुनी वाटत नाहीं. कारण जुन्या प्रती उपलब्ध नसून नकला उपलब्ध आहेत. त्यामुळें भाषेचें अर्वाचीनीकरण झालेलें आहे. तरीहि भरोवरी, मार्गु, उदासु, ग्रासू, गोरांजन, परवडी, थेंबुटी, वोगरी, चावटी, राउळ, फुडाफुडी, मातु, पैसू, उत्सावो, अनारिसे, अपैसे, शिराणी, सपुर, कानवले, वेळाइत, असे कांहीं जुने शब्द आढळतात.

# विष्णुदास नाम्याचें "हरिश्चंद्रोपाख्यान"

विष्णुदास नाम्यासंबंधीं स्फुट स्वरूपाचें लेखन बरेंच झालें असलें तरी त्याच्या वाङ्मयाचा स्वतंत्र अभ्यास प्रा. डॉ. सरोजिनी शेंडे यांच्या खेरीज कोणी केलेला दिसत नाहीं. ( याचें कारण विष्णुदास नाम्याचें वाङ्मय अप्रकाशित आहे, हें होय ). डॉ. शेंडे यांचा विष्णुदास नाम्यावरील प्रबंध अजून बाहेर यावयाचा आहे. तोंपर्यंत स्फुट लेखनाचें महत्त्व वाटेलच.

प्रा. शेंडे यांनीं 'हरिश्चंद्र पुराण – विष्णुदास नामा' या आपल्या स्फुट लेखांत[1] या कृतीसंबंधीं माहिती देऊन, मूळ संस्कृतांतील कथांचीहि मौलिक चर्चा केली आहे. तसेंच मुक्तेश्वर व श्रीधर यांच्या 'हरिश्चंद्राख्यानां' शीं विष्णुदास नाम्याच्या 'हरिश्चंद्र पुराणा' ची ( पहिल्या अध्यायापुरती ) तुलना करून "हा सर्व कथाभाग तिन्ही ठिकाणीं सारखाच आहे; ही गोष्ट उल्लेखनीय वाटते;" असें म्हटलें आहे ( ही गोष्ट मुक्तेश्वराच्या स्फुट काव्यांचें संपादन करणाऱ्या ओक व भिडे यांच्या ध्यानांत आलेली होती ).

---

१. नवभारत, जून १९५७.

या तीन कवींची तपशीलवार तुलना करून ( म्हणजे पुढें चालवून ) विष्णुदास नाम्याचा मुक्तेश्वर व श्रीधर यांच्यावर झालेला परिणाम अभ्यासण्याचा प्रयत्न येथें करावयाचा आहे. हें करीत असतांना विष्णुदास नाम्यानें कोणाकडून काय घेतलें याचाहि शोध ('हरिश्चंद्राख्याना' पुरता) घ्यावयाचा आहे. तो न घेतल्यास मुक्तेश्वर-श्रीधरांना अन्याय होण्याचा संभव आहे. सरोजिनीबाईंच्या कांहीं विधानांना पुस्ती जोडण्याचें व कांहींना दुरुस्ती सुचविण्याचें काम जातां जातां करावयाचें आहे. मुक्तेश्वराच्या 'हरिश्चंद्राख्याना'च्या संपादकांचीं विधानेंहि या निमित्तानें पारखून घ्यावयाचीं आहेत. माझ्या या पुस्ती–दुरुस्तीला आणखी कांहीं पुस्ती–दुरुस्ती जोडणें शक्य आहे हें प्रांजळपणें कबूल करून कांहीं विचार मांडतों.

विष्णुदास नाम्याच्या या कृतीला 'हरिश्चंद्र पुराण' असें नांव देऊन सरोजिनीबाई लिहितात : " या काव्याचें हस्तलिखित तंजावर येथील 'सरस्वती महाल' ग्रंथालयांतील आहे. एकंदर ओवीसंख्या ८९७ आहे. राजवाड्यांनीं कऱ्हाडला पाहिलेल्या ग्रंथांत ११०० ओव्या असल्याचें म्हटलें आहे. हें विष्णुदास नाम्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें प्रसंगांत विभागलेलें आहे. त्यांत चार प्रसंग आहेत."

ही माहिती त्यांनीं राजवाड्यांच्या लेखावरून दिलेली दिसते. ज्या हस्तलिखिताचा निर्देश ( वापर ? ) त्या करीत आहेत, त्यांत वास्तविक १०३६ ओव्या असून ४ प्रसंग आहेत. हें हस्तलिखित ३८ पानांचें आहे.[२] सरोजिनीबाईंनीं दिलेली प्रसंगांची संख्या बरोबर असली तरी ओवीसंख्या बरोबर नाहीं. 'सरस्वती महाला'च्या सूचींत आणखी एखाद्या प्रतीचा उल्लेख आढळत नाहीं. 'हरिश्चंद्र पुराणा'च्या अन्यत्र मिळालेल्या प्रतीची ओवी संख्या म्हणून त्यांनीं ही दिली असती तर प्रश्न नव्हता. कारण भिन्न प्रतींत

२. A Descriptive Catalogue of the Marathi Manuscripts and Books in the T. M. S. S. Mahal Library, Tanjore; Vol. 1, P. 291; ठो. क. ९०५; व. क्र. ४०५.

भिन्न संख्या आढळतात. राजवाड्यांनीं पाहिलेल्या कऱ्हाड-प्रतींतील संख्येबद्दल म्हणूनच शंका घेतां यावयाची नाहीं. परंतु 'सरस्वती महालां'त 'हरिश्चंद्र पुराणा'ची एकच प्रत असून तिच्यांत १०३६ ओव्या आहेत एवढी दुरुस्ती करावयास हवी.

'हरिश्चंद्र पुराण' हें नांव तंजावर-प्रतीवरूनच दिलेलें दिसतें. या काव्याला 'हरिश्चंद्राख्यान' व 'हरिश्चंद्रोपाख्यान' या नांवांनींहि संबोधिलेलें आढळतें. माझ्याकडे या काव्याची एक त्रुटित प्रत असून, ती बरीच जुनी असावी. ती केव्हां लिहिली गेली याचा निर्देश आढळत नाहीं. प्रत संपूर्ण असती तर शेवटीं हा निर्देश आढळला असता.

माझ्याकडील प्रतींत या काव्याचें 'हरिश्चंद्रोपाख्यान' असें नामकरण केलेलें आहे. पहिलीं ४ पानें गेलेलीं असून त्यांत पहिल्या प्रसंगांतील ५३ ओव्या होत्या असें दिसतें. कारण ५४ व ५५ या ओव्या व पहिला प्रसंग संपल्याचा मजकूर प्रतीच्या प्रारंभीं आहे.

चौथ्या प्रसंगाच्या ४३ पुढील व पांचव्याच्या पहिल्या १२ आणि अखेरच्या १२२ पुढील ओव्या गहाळ झालेल्या आहेत. प्रसंग दुसरा व तिसरा हे पूर्ण आहेत. उपलब्ध प्रसंग व ओव्या यांची संख्या अशी :—

प्रसंग : १ – २ – ३ – ४ – ५

ओव्या : ५५ + ८४ + १३८ + ४४ + १२२

उपलब्ध ओव्यांची संख्या ४५० च्या आंत भरते. पुढें निदान आणखी दोन प्रसंग असावेत असें वाटतें. रोहिदासाला सर्पदंश झाल्याचें तारामतीला कळतें व ती शोक करूं लागते; यापुढील भाग मला उपलब्ध झाला नाहीं. ओक-भिडे यांनीं विष्णुदास नाम्याची एक ओवी उद्धृत करतांना "हरिश्चंद्राख्यान, अध्याय ७ । १९३-१९५ पहा." असा संदर्भ दिला आहे.[३] त्यावरून ७ अध्याय (म्हणजे प्रसंग) असलेली आणखी एक प्रत कोठें तरी होती व ती ओक-भिडे यांनीं पाहिली होती असें कळतें. पुण्यास भारत इतिहास संशोधक

३. महाराष्ट्र कविवर्य मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें, पृ. २४९ (टीप १५).

मंडळाच्या संग्रहालयांत एक प्रत असून तिला ' हरिश्चंद्राख्यान ' असेंच म्हटलें आहे.४ या प्रतींत किती प्रसंग आहेत व तिची ओवी संख्या किती आहे याची मला कल्पना नाहीं.

ऐतरेय ब्राह्मण, सांख्यायन श्रौतसूत्र, मार्कण्डेय पुराण व देवीभागवत इतक्या संस्कृत ग्रंथांत हरिश्चंद्राची कथा दिलेली आढळते. प्रत्येक ग्रंथांतील कथेचा सारांश सरोजिनीबाईंनीं आपल्या ' नवभारतां ' तील लेखांत दिलेला आहे. ' महाभारतां ' त हरिश्चंद्राची कथा नाहीं असें मानण्याकडे बहुतेक विद्वानांचा कल दिसला तरी ' महाभारता ' च्या कांहीं संस्कृत प्रतींत ' हरिश्चंद्राख्यान ' असावें या तर्काला जागा आहे. कारण मुक्तेश्वराच्या ' वनपर्वा ' त – कांहीं प्रतींत – त्याच्या ' हरिश्चंद्राख्याना ' चा समावेश झालेला दिसतो. ''एवंच मुक्तेश्वरापाशीं असलेल्या संस्कृत भारताच्या वनपर्वाच्या पोथींत 'हरिश्चंद्राख्यान' होतें व तें त्यानें स्वकृत 'वनपर्वा' तहि रचिलें होतें, असें म्हणावयास हरकत दिसत नाहीं; ''५ हा ओक-भिडे यांचा अभिप्राय तर्कास धरून आहे. 'महाभारतां'तर्गत संस्कृत आख्यान उपलब्ध नसल्यानें त्यांतून मुक्तेश्वरादि कवींनीं काय काय घेतलें हें कळण्यास मार्ग नाहीं. मराठी हरिश्चंद्राख्यानांवर मुख्यतः 'मार्कण्डेय पुराण ' व ' देवीभागवत ' यांचाच प्रभाव दिसतो इतकेंच सध्यां म्हणतां येईल. मोरोपंत तर ' देवीभागवता ' चाच प्रामाणिक अनुवाद करीत असल्यानें व त्यांच्यावर प्राकृत कवींचा प्रभाव नसल्यानें त्यांचें आख्यान येथें विचारांत घेत नाहीं.

विश्वामित्रानें राज्य व दक्षिणा मागणें, हरिश्चंद्रानें राणी व पुत्र यांच्याबरोबर काशीस जाणें, तेथें राणीस व मुलास एका ब्राह्मणास व स्वतःला एका चांडाळास विकणें, मुलगा सर्पदंशानें मरणें, स्मशानभूमीवर राजा राणीची भेट होणें, या घटना ' मार्कण्डेय पुराण ' व ' देवीभागवत ' यांत असून तेथूनच त्या मराठी 'हरिश्चंद्राख्यानां'त आलेल्या आहेत. मुलाच्या मृत्यूनंतर, राणीला

४. भारत-इतिहास-संशोधक-मण्डलस्थ-हस्तलिखित ग्रंथानुक्रमणिका, पृ. ३३७; क्र. २१, ८७.

'डाकिणी' बनवून वीरबाहूकडून हरिश्चंद्राला तिचा शिरच्छेद करण्याची कामगिरी देण्याचा कथाभाग फक्त 'देवीभागवतां'त आहे. तेथूनच तो मराठी कवींनी घेतलेला दिसतो. शिरच्छेदाच्या प्रसंगीं देव येऊन विमानांतून सर्वांना स्वर्गांत नेतात असा कथेचा 'देवीभागवतां'त शेवट होतो, तर 'मार्कण्डेय पुराणां'त राजाराणी चितेंत उडी घेत असतांना देव येऊन त्यांना वर देतात व नंतर हरिश्चंद्र राज्य करतो, असा कथाभाग आहे.

विष्णुदास नाम्याच्या कथानकाबद्दल सरोजिनीबाई लिहितात : "त्यांत विश्वामित्रानें त्याची ( हरिश्चंद्राची ) घेतलेली सत्त्वपरीक्षाच फक्त आहे. ती 'देवीभागवतां'तील कथावस्तूशीं सदृश असली तरी त्यांत विष्णुदास नाम्यानें स्वतःच्या कल्पनाशक्तीचा विलास दाखविला आहे. निरनिराळ्या प्रसंगांतून हरिश्चंद्र, तारामती व रोहिदास यांच्या आचरणांतील एकवाक्यता दाखविली आहे. उदा- पाणपोईचें पाणी न पिण्याचा तिघांचा निर्धार, ऋण फेडण्याविषयीं उत्सुकता व खडतर प्रसंगांत दिसून येणारें तिघांचेंहि अतुलनीय धैर्य हें त्यांच्या कृतींतून व उद्गारांतून दाखवून काव्याची उदात्तता वाढविली आहे."

'विष्णुदास नाम्याचा कल्पनाविलास' या शब्दांतून मूळ कथेंत नसलेला नवा भाग विष्णुदास नाम्यानें आणला असें सुचवावयाचें आहे. इंद्रसभेंतील नारदकृत हरिश्चंद्रस्तुति; विश्वामित्राची सत्त्वपरीक्षेची प्रतिज्ञा, वसिष्ठाचें अयोध्येला व विश्वामित्राचें सिद्धवनाला गमन, विश्वामित्राचा मातंगेश्वरीला प्रसन्न करणारा यज्ञ, हिंस्र श्वापदांची निर्मिति, प्रजेची राजाला रक्षणाबद्दल विनंति, राजाचें वनांत आगमन व हिंस्र पशूंचा नाश, दोन स्त्रियांचें आगमन, विश्वामित्रास स्वप्नांत **राज्यदान**, काशीस जातांना विश्वामित्रानें केलेला छळ (सूर्यास तापण्याची आज्ञा करणें, जोडे मागणें, पाणपोईकडे बोलावणें, वणवो लावणें, इत्यादि) हा भाग संस्कृत कथांत नाहीं हें खरें. हा कल्पनाविलास आहे याबाबतहि वाद होणार नाहीं. परंतु हा कोणाचा कल्पनाविलास ? विष्णुदासनाम्याचा की, आधींच्या मराठी कवींचा ?

---

५. मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें, प्रस्तावना, पृ. १७.

नामदेव आणि जनाबाई यांनीं 'हरिश्चंद्राख्यानें' लिहिलीं आहेत, तीं प्रसिद्धहि झालीं आहेत. विष्णुदास नाम्याचा नवा वाटणारा कथाभाग त्यानें या कवींच्या हरिश्चंद्राख्यानांतून उचललेला दिसतो.

नामदेवाच्या गाथ्यांत[६] 'हरिश्चंद्रराजाचें चरित्र' या नांवानें हें आख्यान दिलें आहे. त्यांत हरिश्चंद्रानें 'स्वप्नीं हें समग्र दिलें राज्य' येथपासून कथेला प्रारंभ होतो. हरिश्चंद्राच्या स्वप्नापूर्वीचा वृत्तान्त नामदेव देत नाहीं. (परंतु त्यानें हा दिलेला असावा आणि तो गहाळ झालेला असावा. कारण कथेला आधींच सुरुवात झाली असावी असें वाटावयास लावणारा हा प्रारंभ आहे.)

जनाबाईचें 'हरिश्चंद्रआख्यान' स्वप्नापूर्वीचा सर्व वृत्तान्त देतें. 'इंद्रसभें झाला वाद' असें जनाबाईनें म्हटलें आहे. विश्वामित्राच्या 'मातंगयागा'चाहि उल्लेख तिनें केला आहे. हरिश्चंद्र वनांत अल्यावर 'मृगकनकाचा साजरा' पाठविण्याचें 'लाघव' ऋषीनें केलें. सिद्धवनाचें वर्णन ती पुढीलप्रमाणें करते :—

धेनुव्याघ्र एके स्थानीं ।
चाटी एकमेकां दोन्ही ॥

'दोघी रूपसा' शिवालयांत येऊन राजापुढें नाचतात व

नाही द्रव्यासी कारण ।
तुझ्या स्वरूपासी लीन ॥

असें म्हणतात.

पुढें विश्वामित्र स्वप्नांत येऊन 'अंकुश कडिया लेखणी' मागतो. वर 'ओट तुक दे कनकातें' असें म्हणतो. पुढील कथाभाग नामदेव व जनाबाई यांनीं जवळ जवळ सारखाच सांगितला. आणि विष्णुदासनामा या दोघांचाच मागोवा घेत पुढें चालला आहे. त्यानें या दोघांपासून शब्दशः काय काय घेतलें तें पुढील साम्यस्थळांवरून कळेल :—

---

६. श्री नामदेवाचा गाथा, आवृत्ति दुसरी, ह. भ. प. वि. जोग. शके १८५३.

(१)

नामदेव

...............

जनाबाई

धेनुव्याघ्र एके स्थानीं ।
चाटी एकमेकां दोन्हीं ॥

विष्णुदास नामा

गाई आणि पंचाननि ।
एसि येकेठाई येकत्वें ॥

(२)

ना.

...............

ज.

अंकुश कडिया लेखणी ।
राया वोपी माझ्या पाणीं ॥

वि.

लेखणि कडियाळें अंकुश ।
राया दक्षणा देगा आम्हांस ॥

(३)

ना.

...............

ज.

एक नवल देखे दृष्टीं ।
काळपुरुष उभा पाठीं ॥
लोहदंड घेउनी करीं ।
घालूं पाहे त्याचे शिरीं ।

वि.

एक काळ आला आहे ।
नभेंसि टेकला पाहे ॥
तेणें पर्वतावरुनि लोटिलें पाहे ।
गदेनें हाणितले मस्तकावरि ॥

ना. (४)

...............

ज.

हें तो आलें राज्यदानें ।
औट भार* कनक देणें ॥

वि.

तंव बोले ब्राह्मण ।
अगा राज्य पावलें मजलागोन ॥
तरि औटभार सूवर्ण ।
देई मज ॥

ना. (५)

पाहूनियां लोक करिताती शोक ।
पशुपक्षादिक सर्व ते ही ॥

ज.

वनीं निघाला त्वरित ।
झाला लोकांचा आकांत ॥

वि.

दुःखें आक्रंदे क्षिति ।
पक्षितरूवर गहिंवरति ॥

ना. (६)

कृपेच्या सागरा राजा हरिश्चंद्रा ।
कां आम्हां सर्वत्रां मोकलीसी ॥
लेंकुराचे परी केलासे सांभाळ ।
मातेविण बाळ राहे कैसें ॥

ज.

लोट पूर जाती पळा ।
नेत्रीं उदक ढळढळां ॥

वि.

लोक बोळावित येति ।
राया हरिश्चंद्रासि ॥

---

* 'फार' असें छापलें गेलें आहे; नामदेवाची गाथा, पृ. ६६९

( ७ )

ना·

आदित्यासी तेव्हां सांगे विश्वामित्र
तपा तुम्ही तीव्र सोळा कळा ।

ज·

आज्ञा करूनी सूर्यासी ।
तपवी द्वादश कळेसी ॥

वि·

मग सूर्यासि पाहिं ।
आंवतिलें ॥
मग आज्ञा केलि तयासि
सहस्र किर्णि तपावें गगनासि ॥

( ८ )

ना·

आम्ही तिघे जण पुत्र आणि दारा
जात हरिश्चंद्रा भिक्षेलागीं ।
उष्णकाळ दीन पायां आले फोड।
देई चर्मजोडे तिघांजणां ॥

ज·

होवोनियां वृद्धें विप्र ।
हातीं काठी भार्याकुमर ॥
पुढें प्रवास कठीण ।
पायीं नाहीं पायतण ॥

वि·

तरि त्रिपुत्र आपण ।
तिघें पाई असों जाण ॥
परि ये वेळिंचा प्राण ।
रक्षि राया आमुचा ॥
या आकांतासि ।
तुं पाव गा आम्हांसि
पाद रक्षा तिघांसि ।
देई दान यजमाना ॥

( ९ )

ना·

............ ...

ज·

रंभा ऐशा देवांगना ।
सर्व शृंगारी भूषणा ॥
वेल वाळा तोयें सारी ।
उभ्या तिष्ठताती द्वारीं ॥

वि·

....आणि द्वारिंउभ्या केल्या ।
—दोनि नारि ॥
लावण्यता शरिरिं ।
न माये तयांचे ॥

( १० )

ना·

विश्वमित्रें तेथें केलेसें विचित्र ।
मायेचा हरिश्चंद्र निर्मियेला ॥

ज·

भाव करूनि तात्काळ ।
कैसा निर्मिला नृपाळ ॥
शुद्ध सुमन सेजे नीरा ।
घालिताती विंझणवारा ॥

वि·

पैल रावो उदकिं नाहाला ।
आणि भ्रमरमंचकि अस बैसला ॥
तरि चाल वो तुजला ।
बोलावितसे ॥

( ११ )

ना.

अन्नोदक सेवीं रुचेल हें तूतें ।
असे तुझा कांत तेथें बाई ॥
बोलावितो तुज पाहे विलोकुनी ।
देखे त्या नयनीं तारामती ॥

ज.

...............

वि.

तिकडे तारामति जव पहाता ।
तव हरिश्चंद्रासारिखा दिसत ॥
तंव तो असे बोलवित ।
ये ये ह्मणोनि खुणावि ॥

( १२ )

ना.

पूर्वेचा हा हा सूर्य पश्चिमे उगवेल ।
समुद्र सांडील मर्यादेसी ।

ज.

पुष्पभारा शेषावरी ।
कैसा आजि झाली भारी ॥

वि.

जरि रावो प्रवर्ते अधर्मासि ।
तरी धैर्य न धरे क्षितिसि ॥
आणि सविता नुगवे पूर्वेसि ।
समुद्र मर्यादा सांडिल ॥

मुळांत जें नांहीं तें विष्णुदास नाम्यानें नामदेव आणि जनाबाई यांच्या हरिश्चंद्राख्यानांतून घेतलें असें म्हणतांना त्यानें नवीन कांहींच सांगितलें नाहीं असें म्हणावयाचें नाहीं. नामदेव व जनाबाई यांच्या कांहीं गोष्टी त्यानें गाळल्या आहेत. स्वतःची व बायकोमुलांची विक्री करतांना हरिश्चंद्रानें डोक्याला तृण बांधले असें वर्णन नामदेव[७] व जनाबाई[८] करतात. विष्णुदासनामा करीत नाहीं.

नामदेवाच्या कथेंत तारामतीला प्रथम एक वेश्या विकत घेते, पण नंतर तारामतीच्या विनंतीप्रमाणें विश्वामित्र तिला काळकौशिकाला विकतो. वेश्येचा उल्लेख ( जनाबाईप्रमाणेंच ) विष्णुदासनामाहि करीत नाहीं.

---

७. तिघांजणीं माथां बांधोनिया तृण ।
बैसली जाऊन हाटवटीं ॥

८. माथां बांधोनियां तृण ।
घाली विक्रया आपण ॥

विष्णुदासनाम्यानें हरिश्चंद्राच्या कथेंत नवें असें कांहीं आणलें नाहीं. ( विश्वामित्रानें रोहिदासाला डसण्याची आज्ञा तक्षकाला केली होती; अशा सारखी घटना अपवाद. ) कथानक-रचनेंत त्याचें कौशल्य दिसत नाहीं. तर त्याच्या वर्णनांत त्याचा कल्पनाविलास दिसतो. त्याची प्रतिभा ही वर्णननिष्ठ आहे. त्यानें केलेलें अयोध्येचें वर्णन पाहा :—

कोटी सूर्यांचा प्रकाश । येसे नगरि झळकति कळस ।
आणि उपरिया गोपुरांस । जाळाधरें असे सोडविलिं ॥
कनकाचिया भिंति । खांब मर्गजांचे शोभति ।
आणि पौळियांचि असति । उथळिया तेथें ॥
हिरे रत्न मोतियें । ठाईं ठाईं जडलि असति पाहे ।
आणि निळ पेरोजें माणिकें । झळकति तेथें ॥
बिदि चौबारे हाटावटिया पाहिं । नागचांपे ठाईं ठाईं ।
आणि खिसमिसि द्राक्षांचे पाहि । मंडप असति ।

हरिश्चंद्र वनांत येऊन हिंस्र पशूंची शिकार करतो तेव्हांचें वर्णनहि सुंदर आहे. विष्णुदास नाम्याचीं वर्णनें म्हणजे शब्दचित्रें असतात. थोड्या शब्दांत तो आपल्या डोळ्यापुढें चित्र उभें करतो. तारामतीला विश्वामित्रानें कशी मारहाण केली त्याचें हें वर्णन बघा :—

चडकणा हाणतुसे तोंडावरि । तेणे डोळ्या येतसे अंधारि ।
पडत पडत भूमिवरि । उठवि वेणि धरूनि ॥
कुराळे धरुनियां आसुडित । मानेवरि बुकिया असे मारित ।
आणि सर्वेचि बांधत । माघारे कर रायाचे ॥

त्याचीं वर्णनें वेगवेगळ्या रसांचीं कारंजीं उडवीत असतात. उपमा-उत्प्रेक्षांचा वापर तो संयमानें करतो; त्यांतूनहि त्याचा कल्पनाविलास बघावयास मिळतो. पुढील कांहीं उदाहरणें त्या दृष्टीनें ध्यानांत राहण्यासारखीं आहेत :—

१) जेवि आत्मा जाये कुडितुन । तैसा रावो चालीला तयामधुन ॥
२) ....जेवि अर्कापुढे किर्णे जाति । तैसि रोहिदास तारामति । चालिलि पुढें ॥

३) क्षितिशी कट फुटला । शेष माथां असे पोळला ।
मस्तकिंचा मणि असे फुटला । तया ज्वाळें ॥

४) मग जैसि चंडवातें पाहे । कर्दाळि हाणितलि आहे ।
तैसि तारामति पाहे । मृछना येवोनि पडलि असे ॥

५) जैसि राहोने चंद्रकळा ग्रासिलि । तैसि दिसे दैन्यवाणि ॥

विष्णुदास नाम्याचें व्यक्तिचित्रण-कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. तो सत्त्वपरीक्षेचा भोक्ता आहे. अशा प्रसंगाच्या साहाय्यानें त्या व्यक्तींतील उदात्त अंश बाहेर काढण्याची संधि त्याला मिळते. नामदेव व जनाबाई यांच्यापासून कथा घेऊन त्यानें ती रंगवून सांगितली आहे. तिच्यांत जीव भरला आहे. यामुळेंच मुक्तेश्वर-श्रीधरांनीं आपलें 'हरिश्चंद्राख्यान' रचतांना मुख्यतः विष्णु-दास नाम्याचीच कृति डोळ्यांपुढें ठेवली असावी. विष्णुदास नाम्याचा त्यांच्यावर किती परिणाम झालेला आहे हें पाहणें उद्बोधक ठरेल.

मुक्तेश्वराच्या 'हरिश्चंद्राख्याना' च्या संपादकांनीं जें जें मूळ संस्कृत कथांत नाहीं तें तें मुक्तेस्वराच्या पदरचें आहे, असें म्हटलें आहे. कांहीं ठिकाणीं त्यांनीं तसें स्पष्ट म्हटलें आहे तर कांहीं ठिकाणीं तसें सुचविलें आहे. ओक व भिडे यांचीं विधानें घेऊन त्यांच्या सत्यासत्यतेचा विचार करावयास हवा :—

(१) "दोन मातंगकामिनी (तापस दासी) हरिश्चंद्राकडे पाठविल्या असें मुळांत नाहीं. ज्या विद्यांचें साधन विश्वामित्र करीत होता त्या सर्व विद्या भयभीत होऊन स्वसंरक्षणार्थ हरिश्चंद्राकडे आल्या असें वर्णन मुळांत आहे. (मार्कंडेयपुराण-अध्याय ७ पहा.)"१

नामदेवानें हा कथाभाग दिलेलाच नाहीं; पण जनाबाईनें 'दोघी रूपसा' राजाकडे आल्याचें म्हटलें. विष्णुदास नाम्यानें त्यांना 'यातीच्या मांगिणि' केलें आणि मुक्तेश्वरानें त्याचाच अनुवाद केला.

---

१. स्फुटकाव्यें, टीप २४ पृ. २०६

(२) "हा स्वप्नादि प्रकार मुळांत नसून मुक्तेश्वरानें स्वकल्पनेनेंच योजिलेला आहे."[१०] हें हरिश्चंद्राच्या स्वप्नाविषयींचें मतहि बरोबर नाहीं. कारण नामदेव, जनाबाई व विष्णुदास नामा या तिघांनींहि ही कल्पनाशक्ति दाखविली आहे.

(३) "हरिश्चंद्रादि मंडळी वाराणशी नगरीस जात असतां त्यांस मार्गांत विश्वामित्रानें छळलें असें वर्णन मुळांत नाहीं. अध्याय २ ओवी ८५ पासून येथपर्यंतच्या सुमारें १३० ओव्या मुक्तेश्वराच्या पदरच्याच आहेत."[११] या विधानांत वर्णनाचें जें श्रेय मुक्तेश्वराला दिलें गेलें आहे तें श्रेय त्याच्या पूर्वींच्या कवींचें. मुक्तेश्वरासारखेंच वर्णन श्रीधर व विष्णुदास नामा यांनीं केलेलें आहे असें म्हणूनहि हें वर्णन 'मुक्तेश्वराच्या पदरचें' कसें ठरलें हें कळत नाहीं. नामदेव व जनाबाई यांनीं या छळाचें जें वर्णन केलें आहे त्याहून वेगळें असें कांहीं मुक्तेश्वरांत आढळत नाहीं. त्यामुळें मुक्तेश्वराच्या पदरांत या वर्णनाचें श्रेय टाकण्याहून ऋण टाकलेलें बरें.

(४) "हरिश्चंद्रानें आंगठी देऊन तृण घेतलें व तें आपल्या मस्तकावर बांधलें असें वर्णन मुळांत नाहीं;"[१२] हें खरें. पण त्यामुळें हा मुक्तेश्वराचा कल्पनाविलास असल्याचा आभास निर्माण होतो. नामदेव व जनाबाई यांनीं असें वर्णन केलेलें आहे. तेथूनच मुक्तेश्वर ही कल्पना घेतो. (विष्णुदास नामा हें वर्णन करीत नाहीं).

(५) "तारामतीला विकत घेण्याकरितां कुंटीण आली असें वर्णन मुळांत नाहीं. ओव्या १२–२४ ह्या मुक्तेश्वराच्या पदरच्याच आहेत. ह्यावरून मूळ पोथी जवळ ठेवून मुक्तेश्वर ग्रंथरचना करीत नसे, असें अनुमान होतें."[१३]

---

१०. स्फुटक व्यें, टीप १२ पृ. २०९

११. ,, टीप १२ पृ. २३१

१२. ,, टीप ९, पृ. २३४ (अंगठी देण्याची कल्पना मुक्तेश्वराची).

१३. ,, टीप ३, पृ. २३६

तारामतीला वेश्येनें विकत घेतल्याचें वर्णन, मुक्तेश्वरानें नामदेवापासून घेतलेलें आहे. दोघांचीं वर्णनें अशीं :–

## नामदेव

म्हणोनियां उभी केली ही बाजारीं । प्रारब्धाची दोरी पाहे कैसी ॥
विकावया आणिली लावण्यवनिता । समजली वार्ता वेश्येलागीं ॥
येऊनि ब्राम्हणा पुसे तिचें मोल । सुवर्ण एक तुळ घेऊं इचें ॥
मानली हे गोष्टी वेश्येचिया चित्ता । घेतली हे आतां तारामती ॥
चाल बाई आतां माझिये सदनीं । होशील स्वामिनी सर्वस्वी तू ॥
आवडे तितुके लेई अलंकार । विलास समग्र भोगीं आतां ॥
देखूनि लावण्य आतां तुझें रूप । वश्य होईल भूप नगरीचा ॥
हरलें हें दैन्य आतां तुझें बाई । नाहीं तुज कांहीं भयचिंता ॥
ऐकोनियां शब्द तेव्हां तारामती । येती काकुळती विप्रालागी ॥

## मुक्तेश्वर

कर्मरेखा करुनी मान्य । अंगना मस्तकीं बांधी तृण ॥
रूप यौवन लावण्य । देखोनि आलीं ग्राहकें ॥
ऐश्वर्यसंपन्न कुट्टिणी । शिबिके बैसोनी ते क्षणीं ॥
लावण्य वनिता देखोनी । येती जाली जवळिके ।
कुंटिणी म्हणे, ' वो ! सुंदरी । तुझा भाग्य लक्षणतमारी ॥
उदयो झाला म्हणोनी घरीं । दैवें आलीस आमुच्या ॥
आम्हां ऐशिया तुझिया दासी । सकळ वैभवा स्वामिणी होशी ॥
तूं ची पढियंती रायाशीं । होशील पात्र प्रीतीचें ॥

यावरून नामदेवाची रचना जवळ ठेवून मुक्तेश्वर कांहीं वेळां काव्यरचना करीत असे, असें अनुमान होतें.

(६) "हरिश्चंद्रानें आपण होऊन आपल्यास डोंबास विकलें, असें मुळांत नाहीं." [१४] परंतु नामदेव, जनाबाई व विष्णुदास नामा यांनीं मुक्तेश्वरा

---

१४ स्फुटकाव्यें, टीप २२, पृ. २३९–२४०

प्रमाणेंच वर्णन केलें आहे. त्यामुळें या नव्या कथाभागाचें श्रेयहि आधींच्या कवींना दिलें पाहिजे.

(७) " अध्याय पांचवा हा बहुतेक मुक्तेश्वरानें आपल्या उज्ज्वल प्रतिभेनेंच निर्माण केला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं;"[१५] असें संपादकद्वयांना वाटलें तरी तसें आपणास वाटत नाहीं. कारणें :– (१) विश्वामित्राच्या आज्ञेनें तक्षक रोहिदासाला चावला, ही कल्पना मुक्तेश्वराची नसून विष्णुदास नाम्याची आहे. (२) स्मशानाजवळील देवळांत तारामती रोहिदासाचें प्रेत घेऊन गेली; तिला निद्रा आली. तेव्हां तिच्या गळ्यांत आंतडीं बांधून तिला विश्वामित्रानें लांव बनविलें वगैरे ' चित्तवेधक प्रसंग ' म्हणजे मुक्तेश्वराचा प्रतिभा–विलास नव्हे. नामदेव व जनाबाई यांनीं हे प्रसंग वर्णिलेले आहेत. तुलनेसाठीं हा भाग न देतां केवळ तारामतीनें मागितलेलें मागणें दिलें तरी पुरेसें होईल :–

**नामदेव**

भ्रतार हरिश्चंद्र रोहिदास बाळ । मागता स्नेहाळ विश्वामित्र ॥
श्रीगुरुवसिष्ठ कृपेचा सागर । असो त्याचा कर मस्तकीं हा ॥
हेचि जन्मोजन्मीं दे नारायणा । नाहीं हे वासना आणिकांची ।

**जनाबाई**

रोहिदासा ऐसा पुत्र । हरिश्चंद्र राजा भ्रतार ॥
याचक विश्वामित्रा ऐसा । जन्मोजन्मीं दे जगदीशा ॥

**मुक्तेश्वर**

हरिश्चंद्रासारिखा कांत । रोहिदासासारिखा सुत ॥
कुळगुरु अरुंधतीनाथ । जन्मोजन्मीं असावा ॥
प्रतिसृष्टीचा अपरधाता । तपो तेजें तीव्र सविता ।
तोचि जन्मोजन्मीं मागता । याचक असो कौशिक ॥

---

१५. स्फुटकाव्यें, टीप ६, पृ. २५८

मुक्तेश्वराचा प्रतिभाविलास कथानकांतील फेरफारांत दिसत नसून त्याच्या रूपकादि अलंकारयोजनेंत व वर्णनांत दिसतो. त्या दृष्टीनें त्याच्या 'हरिश्चंद्राख्याना' चा विचार येथें केलेला नाहीं. नामदेव-जनाबाईचा प्रभाव, विष्णुदास नाम्याच्या द्वारें, त्याच्यावर पडलेला दिसतो.

श्रीधराचें 'हरिश्चंद्राख्यान' 'पांडवप्रतापा' च्या ३० व्या अध्यायांत समाविष्ट झालेलें आहे. एका वेगळ्या (?) 'हरिश्चंद्रोपाख्याना' चा उल्लेख प्रा. चिं. नी. जोशी यांनीं केलेला आढळतो. "यांत तीन प्रसंग आहेत. पहिल्या प्रसंगांत एकशे बावीस पद्यें, दुसऱ्या प्रसंगांत एकशें सोळा पद्यें व तिसऱ्या प्रसंगांत एकशें बारा पद्यें अशीं एकूण तीनशें पन्नास पद्यसंख्या आहे;"[१६] अशी माहिती ते देतात. या आख्यानांत व 'पांडवप्रतापां'तर्गत आख्यानांत कोणते फेरफार आहेत याची कल्पना नाहीं. 'पांडवप्रतापां'तील 'हरिश्चंद्राख्यानां'त पूर्वकवींहून नवीन असें कांहींच नाहीं. मुक्तेश्वराची कृति पुढें ठेवून श्रीधरानें तें लिहिलेलें दिसतें. तरी त्यानें विष्णुदास नाम्याचें आख्यान वाचलें असावें याच्या खुणा पुढील साम्य-स्थळांत दिसतात :—

### विष्णुदासनामा

क्षितिसी कट फुटला । शेष माथां असे पोळला ॥
मस्तकिंचा मणि असे फुटला । तया ज्वाळें ॥
....तेणें तिघे पाई पोळत । तळवांचि उसळत ।
आगि मस्तकिं ॥

### श्रीधर

उष्णें तापलीं मही अत्यंत । शेषाचाही माथा पोळत ॥
तळव्याची आग माथां येत । तृषेनें जात प्राण त्यांचे ॥

---

१६. श्रीधर : चरित्र आणि काव्यविवेचन, पृ. १६९

## विष्णुदास नामा

तिघें आ (?) नें करपलिं । तोंडासि खरसि आणिलि ॥
मग थोर चडफडूं लागलिं । उदकाविणें ॥

## श्रीधर

तिघें तापली उष्णें करून । तोंडीं खरस आली दाटून ॥
उदकाविण जाती प्राण । तिघांचेही तेधवां ॥

विष्णुदास नाम्याचें ‘ हरिश्चंद्राख्यान ’ केंद्रस्थानीं ठेवून त्याच्या आधींच्या व नंतरच्या हरिश्चंद्राख्यानांचा–कथानकापुरता–विचार येथें केलेला आहे. नामदेव व जनाबाई यांनीं मूळ कथानकांत केलेले फेरफार कशाच्या आधारावर केले हा प्रश्न आज तरी सुटण्यासारखा नाहीं.[१७] मराठींतील या प्रमुख हरिश्चंद्राख्या-नांतील साम्य–विरोध ( शब्द व कल्पना यांतील ) दाखविण्याचा हा प्रयत्न त्रोटक वाटण्याचाहि संभव आहे. एका त्रुटित प्रतीच्या आधारें हें विवेचन केलेलें असल्यानें तसें होणें अपरिहार्य होतें.

---

१७. सिद्धवनाच्या वर्णनांत पशूंच्या परस्पर प्रीतीचा जो भाग आढळतो तो ‘ जैमिनिकृत अश्वमेधा ’ तील वाल्मीकीच्या आश्रमाची आठवण करून देणारा आहे व बाणभट्टाच्या ‘ कादंबरी ’ तहि असेंच वर्णन येतें; ही गोष्ट ओक व भिडे यांनीं सांगितली आहे. विष्णुदास नामा व मुक्तेश्वर यांच्या वनवर्णनांतील साम्याला असणारे हे आधार पाहतां; कोण कुणाचे ऋणी आहे हें ठरविणें किती अवघड आहे हें कळतें.

# महानुभाव कवि नवरसनारायण

नवरसनारायण हा कांहीं अज्ञात कवि नाहीं. कै. भावे,[१] कै. पांगारकर[२] व डॉ. य. खु. देशपांडे[३] यांनीं या कवीचा निर्देश केला आहे. या कवीच्या नांवासंबंधीं व त्याच्या रचनेसंबंधीं अजून मतभेद आढळतात. त्याच्या 'शैल्य-पर्वा'ची अेक प्रत मला मिळाली आहे. तिच्या आधारें या कवीविषयीं व त्याच्या काव्याविषयीं कांहीं विचार मांडत आहे.

ही प्रत संपूर्ण लिहिलेली असून तिच्यात १८ प्रसंग व २३५० ओव्या आहेत. लेखन बरेंचसें अशुद्ध आहे. "शेखे १७५१ || वीकारीनाम सवछरे || माघमासे सूक्लपक्षे पंचमे मंदवासरे सूभ नक्षत्रे देवराय नारायणचे सूत त्याचे हस्तक-लीखीत....|| " असा कालोल्लेख व प्रत करणाऱ्याचा नामोल्लेख प्रतीच्या शेवटीं आहे. त्यावरून प्रत सव्वाशे वर्षांपूर्वींची आहे अेवढेंच कळतें.

---

१. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. २३४.

२. मराठी वाङ्मयाचा अितिहास खं. २, पृ. ७६९-७७०.

३. महानुभावीय मराठी वाङ्मय, पृ. ५५-५६.

' नवरसनारायण ' या नांवानें हा कवि ओळखला जात असला तरी हें त्याचें टोपण नांव आहे; असें कै. पांगारकर व डॉ. य. खु. देशपांडे म्हणतात. सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांनीं ' नारायण ' (५) या नांवाखालीं पुढील माहिती दिली आहे.:— " अेक मराठी कवि. याला ' नवरसनारायण ' म्हणतात. याचा ग्रंथ शैल्यपर्व. हा महानुभाव असावा."[४] " याचें खरें नांव शाङ्र्गधर पंडित व उपनांव भोजने " असें भावे लिहितात. तर डॉ. देशपांडे त्यांचाच अनुवाद करतात व त्यानें ' महाभारत ओवीबद्ध रचल्याचें ' मानतात.

नवरसनारायण ' सारंगधर ' व ' भोजे ' हीं नांवें वारंवार घेतो. परंतु ' सारंगधर ' (शाङ्र्धर) भोजनें ' हें कवीचें नांव मानण्यांत चूक होत आहे. ज्या ओवीचा आधार[५] भावे व देशपांडे घेतात ती ओवी माझ्या प्रतींत अशी आहे,

धनुशाभी नाम सारंगधरू । भोज उपनाम माहायोगेश्वरू ।
**वरमंडीत** काव्ये सुंदरू । ह्मणे नवरस नारायेण ॥ १–२७ ॥

' तेया मुण्डीतु ' पेक्षां ' वरमंडीत ' हा पाठ अधिक अन्वर्थक व सूचक वाटतो. सारंगधराच्या वरामुळें आपलें काव्य सुंदर झालें, असें नवरसनारायण सांगतो. यावरून तो सारंगधर नव्हे हें स्पष्ट होतें.

"प्रस्तुत नारायण हा शाङ्र्धर भोजने याचा शिष्य होय;" असें पांगारकरांनीं म्हटलें आहे. तेंच बरोबर आहे. डॉ. शं. गो. तुळपुळे दोघांना अेकच मानतात व ' तीर्थ मालिके'चें कर्तृत्वहि नवरसनारायणाकडेच देतात.[६] पांगारकरांच्या मताला आधार म्हणून कांहीं ओव्या देतों :—

---

४. मध्ययुगीन चरित्र कोश, पृ. ४८९

५. श्रीकृष्ण धनुष्यनामा शाङ्र्धरू । भोजनोपनाम्ना योगेश्वरू ।
**ते या मुण्डीतु** काव्य सुंदरू । म्हणे नवरस नारायणू ॥

६. महाराष्ट्र-सारस्वत, पुरवणी, पृ. १२४

आता सैल्याची युद्धकथा । सुरस अैकावी श्रोता ।
**सारंगमुनीसीश्य वक्ता** । ह्मणे नवरसनारायेण ॥ १०–१३३ ॥
नंदाचा जो परमानंदकुमर । त्या धनुशानाम सारंगधर ।
**तया सीशें** तो कवेश्वर । ह्मणे नवरसनारायेण ॥ १४–१३८ ॥
ज्ञानवैराग्ये लक्षणी । भोजे उपनाम सारंगमुनी ।
**वंदोनी तयाचे चरणी** । ह्मणे नवरसनारायेण ॥ १५–१११ ॥
भोजेनी सारंगधरू । अद्‌भूत ज्ञानशेक्तीचा सागरू ।
**तया सीष्ये तो कवेस्वरू** । ह्मणे नवरसनारायेण ॥ १६–११३ ॥

या सर्व उल्लेखांवरून नवरसनारायण हा सारंगधर भोजनेचा शिष्य ठरतो. कवीचें खरें नांव 'नारायण'. 'नवरस' हें आत्मगौरव दाखविणारें पद आहे. आपल्या काव्यांत सर्व रस आहेत, अशा आत्मविश्वासानें तो स्वतःला 'नवरस-नारायण' म्हणवून घेतो.[७]

'सारंगधर' हें नांव अनेक ठिकाणीं आढळतें. गीतेवर 'कैवल्यदीपिका' नांवाची संस्कृत व मराठी टीका आणि 'काव्यचूडामणि' लिहिणारे पंडित शार्ङ्धर पुसदेकर, प्रसिद्ध आहेत.[८] नुकताच 'कालिका पुराण' लिहिणाऱ्या आणखी अेका सारंगधराचा परिचय श्री. न. शे. पोहनेरकरांनीं करून दिला आहे.[९] श. १७०७ मध्यें शृंगेरी पीठाच्या विद्यारण्य भारतींनीं दिलेल्या आज्ञा-पत्रांत अेका सारंगधराचा उल्लेख आहे.*

---

७. नवरसाची कथा थोरी । टाकोनी वदलों श्लोक च्यारी ।
आता तेची कथा पुढारी । चालली उत्तरी तै अैका ॥ ४–९३ ॥
तेची कतेचा ईतीहासु । सांगे मुनी सारंगधराचा शेश्रु ।
कथा सांगेन नवरसु । ह्मणे नारायणे कवी ॥ ९–१०९ ॥

८. महानुभावीय मराठी वाङ्मय, पृ. ७४.

९. सारंगधराचें कालिका पुराण, प्रतिष्ठान, फेब्रुवारी १९५८, पृ. २२.

* या सर्वांहून जुना सारंगपंडित आढळतो. त्याची पत्नी उमाअिसा चक्रधरांकडे न सांगतां उपहार घेऊन गेल्यानें हेमाद्रीपंडिताप्रमाणेंच त्याच्याहि मनांत चक्रधराबद्दल किंतु निर्माण झाला होता व म्हणून त्यानें चक्रधरांविरूद्ध साक्ष दिली. पण याचें 'सारंगधर' असें नांव मिळत नाहीं.

नवरसनारायणाचा गुरु नुसताच 'सारंगधर' नसून 'सारंगधर भोजने' आहे. म्हणून तो वरील सर्वांहून भिन्न मानला पाहिजे. 'कालिका पुराण'कर्त्या सारंगधराला श्री. पोह्नेरकर भिन्न मानतात. 'पुसदेकर' हा 'भोजने' ठरूंच शकत नाहीं. आणि आज्ञापत्रांतील 'सारंगधर' अगदींच अलीकडचा आहे.[१०]

'भोजने' हें आडनांव सारंगधरापूर्वींहि आढळतें. 'भोजने कृष्णव्यास' असें नांव उपाध्य-आम्नायांत आहे. सारंगधर भोजने याच परंपरेंतील आहे. नवरस-नारायणाचा गुरु 'तीर्थमालिका'कार सारंगधर होय.

सारंगधर (शार्ङ्गधर) भोजने हाच नवरसनारायणाचा गुरु ठरल्यावर त्याच्या परंपरेचा अधिक विचार करतां येईल. नवरसनारायणानें दिलेली परंपरा म्हणून डॉ. तुळपुळे ती अशी देतात:—श्रीदत्त-मुनिदेव-नागार्जुन-कवीश्वर-पटवर्धन–योगेश्वर–जानुभोज–मुकुंदराज–शारंगधर–येल्हन–नारायण. देशपांडे शारंगधराला उपाध्य-आम्नायांतील मानतात व अशी परंपरा देतात:—श्री चक्रपाणि-गोविंदप्रभु–चक्रधर-जनोपाध्ये-कमळाउसे-हीराइसे–पोटकुळे मालोव्यास–महाळा–इसे–चाहेव्यास–जानोव्यास–भोजने कृष्णव्यास–मुरारीव्यास–मुकुंदव्यास-शारंगधर. स्वतः नवरस नारायणानें दिलेली परंपरा (?) माझ्याकडील प्रतींत पुढील प्रमाणें आहे.:—

मातापुरी श्रीदत्त दीगांबर । तयाचा सीश्ये मुनींद्र योगेश्वर ।
तयाचा नागार्जुन परीकर । आच्यार्य तो ॥ १८–१५२ ॥
तयाच्या सीष्य तेराजण । ते माहाब्रह्मज्ञानी वीज्ञान ।
उपाधे दीवाकर कवेस्वर ज्ञान । साळंकार ब्रह्मज्ञानामृते ॥१८-१५३॥
पारमंडळ आणि महेश्वर । दामोदर मादळसनत्कुमार ।
येक्षदेव जयदेव साचार । हे ब्रह्मज्ञानी आच्यार्या ॥ १८–१५४ ॥

'कविसी ब्रह्मज्ञान कैसे जाले' हें सांगतांना कवि ही परंपरा सांगतो. पण हे तर १३ आम्नाय आहेत. कवि कोणत्या आम्नायांतील हें यावरून कळत नाहीं. आणि सारंगधरापूर्वींचीं नांवें 'शैल्यपर्वांत' मिळत नाहींत.

---

१०. नवरसनारायण हाच मुळीं १४ व्या शतकांतील मानला जातो.

महानुभावीय कवि आणि ग्रंथकार यांची शिष्यपरंपरा (वंशवृक्ष!) य. खु. देशपांडे यांनीं विस्तारानें दिली आहे.[११] आम्नायांपैकीं उपाध्य, कवीश्वर व पारमांडल्य या तिहींच्या परंपरा ते देतात. त्यांच्या आधारें तुळपुळे व देशपांडे यांनीं दिलेल्या नवरसनारायणाच्या परंपरांत दुसरीच अधिक विश्वसनीय वाटते.

तुळपुळ्यांच्या यादींतील जानुभोज, मुकुंदराज व शारंगधर हीं तीन नांवें जानोव्यास, मुकुंदव्यास व शारंगधर अशीं दुसऱ्या यादींत आहेत. जानोव्यासहि 'भोजने' असावा असें 'भोज' या पदावरुन वाटतें. मुकुंदव्यास हें नांव बरोबर आहे. कारण मुकुंदराज म्हणून रामदेवराव वडणेरकर (दादोस) यांचा अेक शिष्य नागदेवाच्या काळीं होऊन गेला व दुसरा मुकुंदराज कारंजेकर हा अगदीं अलीकडे झाला. या दोहोंहून सारंगधराचा गुरु, मुकुंदव्यास निराळा आहे. येल्हण हा चाहेव्यासाचा शिष्य, शारंगधराचा नव्हे. तेव्हां सध्यां मुकुंदव्यास, सारंगधर व नारायण अशीच परंपरा मानणें वादातीत ठरेल.[१२] नवरसनारायण हा महानुभावपंथीय असल्याच्या खुणा त्याच्या काव्यांतहि आढळतात. तिकडेहि लक्ष दिलें पाहिजे.

'शैल्यपर्वा'वर महानुभाव पंथाची व तत्वज्ञानाची दाट छाया पडलेली दिसते. नमनाच्या ओव्यांत–

कृती परपरमहंस परमेश्वर । त्रीती दत्तात्रयदेव दीगांभर ।
द्वापारी भगवानु ईस्वर । काळि बोधदेवा ॥ १–६ ॥

असे अवतार सांगितले तरी श्रीकृष्ण हाच पूर्णावतार म्हणून त्याचेंच चरित्र नवरस-

---

११, महानुभावीय मराठी वाङ्मय, पृ. १०४–११०.

१२. नवरसनारायण 'सारंगधर' या शद्वाचा 'श्रीकृष्ण' या अर्थींहि अनेकदां उपयोग करतो. गुरु आणि दैवत यांचा अशा श्लिष्ट पदानें निर्देश करणें महानुभाव कवींनाहि जमतें, असें म्हटलें पाहिजे. महिपतीहि 'भक्तलीलामृतांत' मुद्गलभट्टांनें चरित्र सांगतांना 'सारंगधरा'चा वापर करतो. पण नारायणाच्या श्लेषांतील सौंदर्य त्यांत नाहीं.

नारायण सांगतो. श्रीकृष्णाचें चरित्रगायन हाच या रचनेचा मुख्य हेतु आहे.[१३] श्रीकृष्णाचें गुणगान केलें नाहीं तर श्रोते कोपतील अशीहि कवीला भीति वाटते.[१४]

'शैल्यपर्व' हें अेक कृष्णचारित्रच आहे. कृष्णाच्या पूजेचें वर्णन अप्रतिम आहे. त्यांत श्रीकृष्णाच्या मूर्तीचेंहि वर्णन येतें. कांहीं ओव्या पाहण्यासारख्या आहेत:—

टाच तळवे आरक्त । वरी वोर धुरा मीरवत ।
मोक्षे मार्गाची वाट दीसत । श्रीकृष्ण चरणावरी ॥ १७–५ ॥
पुढा दोंद वीराजत । सखोल नाभी शोभत ।
वरी त्रीवळी मीरवत । त्रीगुणा वेगळी ॥ १७–१० ॥
पाहाता दीसे उदर । जैसे कैवल्याचे नीजघर ।
नाना वसंताचे सेजार । आसे चेतुर्दशा भावनाचे ॥ १७–१२ ॥
परावाचा सहीत कंटोते । त्रीरेशाळी साळंकृत ।
पाहाता कैवल्यगीरीवरी शोभत । कळस जैसा ॥ १७–१८ ॥

यांतील काव्यसौंदर्यांत पंथीय सांकेतिकताहि आहे असें वाटतें. 'ऋद्धिपूरवर्णनांत' गोविंदप्रभूंच्या मूर्तीचें असेंच वर्णन केलें आहे, त्याचें येथें स्मरण होतें.

द्वारावती ही कृष्णाची व चांगदेवराऊळांची. म्हणून महानुभावांना ती प्रिय. या आत्मीयतेनेंच कवि द्वारावतीचें वर्णन करतो.[१५] द्वारावती त्याला 'सुरवराची मुळपीटिका' वाटते.

कृष्णाबरोबरच दत्तात्रेयालाहि महानुभाव मानत असल्यामुळें नवरसनारायण पहिल्याच प्रसंगांत दत्तात्रेयाबद्दलचा आदर विस्तारानें व्यक्त करतो. हा दत्त

---

१३. मुख्य श्रीकृष्णाचेने । पांडव पावले राज्यालागुन ।
त्या देवाचें पुजेन । केले पाहीजे ॥ १६–१०६ ॥

१४. नातरी श्रोतें कोपती । ग्रंथ आणीला समाप्ती ।
परी श्रीकृष्ण नाममुर्ती । वर्णीली नाही ॥ १६–१०७ ॥

१५. सर्व सुखाची द्वारावती । मोक्षाची सप्तमपुरी वसती ।
तेथे वर्णना वर्णाबी कोणती । मोक्षे प्राप्ती गेलीया ॥ १८–१२ ॥

'सीह्याद्रीपर्वताचे सीखरी' प्रगटला व त्याचेच अवतार 'सीह्याद्री राज्ये' निरंतर करतात असें कवि म्हणतो.[१६]

नवनाथ तेथे देखिले । सोळा सीध वोळगे आले ।
तीर्थ करूनि उभे टेलें । बावन पुरुषासि ॥ १-५० ॥

असेंहि दत्ताचें स्वरूप तो सांगतो.

परमार्थी बोध बरवा । चेक्रधर होये सुहावा ।
पुढा मुक्षमार्ग जाणावा । नागार्जुन मतें ॥ १-९ ॥

असा चक्रधर व नागार्जुन यांचा उल्लेखहि कवि करतो. 'चेक्रेश्वरु' प्रसन्न झाल म्हणून हा ग्रंथ आपण लिहिला असें नारायण म्हणतो.[१७]

येरवी मतीमंद अज्ञान । नेणे काव्यकळा च्यातुर्यज्ञान ।
परी श्रीदत्त कृपें करून । ग्रंथनीर्धार बोलीलो ॥ १८-१४६ ॥
पंचेवक्त्र ईश्वरु । येवोनी स्वप्नी दीधला वर ।
दान दीधला बरवा स्वर । मती वीस्तार पै जाला ॥ १८-१४७ ॥

असें दत्ताचें, पंचवक्त्र ईश्वराचें ऋणहि कवि मान्य करतो. 'माहाअनुभवी' असा शब्द तो अेकदां वापरतो.[१८] पण अन्यत्र आपल्या पंथाचा उल्लेख 'मोक्षमार्ग' किंवा 'मुक्षमार्ग' असाच करतो ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

---

१६. कवण येक आवेस्वरी । सीह्याद्री पर्वताचे सीखरी ।
दीगांबर वेशधारी । श्रीदत्तात्रेय प्रगटला ॥ १-२८ ॥
त्याचे चेतूर युगी अवथार । सीह्याद्री राज्ये क(री?) नीरंतर ।
भक्तीभावे सदातार । प्रगट हो येथ भक्तालागी ॥ १-२९ ॥

१७. श्रोतीयावीण कवेश्वरु । सांगितला मुळग्रंथ वीचारु ।
प्रसन्न जाला चेक्रेश्वरु । म्हणोनी बीवरुभाषेण केले ॥ १८-१४५ ॥

१८. अैसीया कथालागव जाणा । ह्मणती रामकृष्ण येकची वचना ।
परी हे लीळालाघव कथना । माहाअनुभवी जाणती ॥ ११-१३९ ॥

वर अेका ओवींत ' मुक्षमार्ग ' हा शब्द आला आहे, तर पुढील ओवींत 'मोक्षमार्ग ' आहे :—

मोक्षेमार्ग माहा नागार्जुनी ! त्यामाजी भोजे उपनाम सारंगमुनी ।
वंदोनी तयाचीं चरणी । ह्मणे नवरसनारायेण ॥ ११-१७६ ।

महानुभाव पंथाचें 'परमार्ग' हेंच मूळ नांव असें डॉ. कोलते मानतात.[१९] 'परमार्ग' या अर्थींच नवरसनारायण ' मोक्षमार्ग ' हें नांव वापरतो. ' इति श्री परधर्मे महामोक्षेक साधने ' या ग्रंथसमाप्तिनिदर्शक महानुभावीय निर्देशांत हीच कल्पना दिसते. स्वतःला ' नवरस ' म्हणवून घेणाऱ्याच्या काव्यांत ' रसराज ' नसावा; यांतहि पंथीय तत्वज्ञानाची प्रचीति येत नाहीं काय ?

'महाभारत' आणि 'पद्मपुराण' यांचा आधार घेतल्याचें कवि सांगतो.[२०] पण 'शैल्यपर्वांतील' कथांचा आढळ 'पद्मपुराणां'त होत नाहीं. पहिल्या प्रसंगातच दत्तात्रेयाच्या भेटीला नारद आले तेव्हा जय–विजयांनीं त्यांचा उपमर्द केला. नारदानीं शाप दिला आणि जय–विजय हेच पुढें हिरण्यकश्यपु–हिरण्याक्ष, रावण-कुंभकर्ण व शिशुपाल—वक्रदंत झाले.

जय-विजयांची कथा 'पद्मपुराणांत' वेगळीहि आहे. ते दोघे भांडले आणि दोघांनाहि परस्परांचा शाप भोगला. जय हत्ती झाला. विजय मगर झाला. आणि विष्णूला गजेंद्रमोक्ष करावालागला. (पद्मपुराण, उत्तरखंड, अ. ११०)'भागवतां'त प्रल्हादचरित्रांत येणारी कथा मात्र 'शैल्यपर्वांतील' कथेशीं बरीच जुळती आहे. पण तेथें नारदाअैवजीं सनत्कुमारादि येतात व तेच शाप देतात. 'भागवता'चें नांव कवीनें घेतलें नाहीं तरी आधार मात्र घेतला आहे.

---

१९. 'महानुभाव पंथ कीं परमार्ग ?', ' लोकशिक्षण' वर्ष ७, अंक ४-५

२०. पुर्वी व्यासमाहामुनी । कथा बोलिली सर्वंस्कृत वाणी ।
ते माहाराष्ट्र भाशा करूनी । सांगीतली नारायणे ॥ १८.१५६ ॥
ईती श्री माहाभारते । शतसहश्र संहीतायां ।
रामकृष्ण कथा पद्मस्त्री नीर्मीता ॥ शांतीपर्वणोनाम ॥

'भागवत' ( विशेषतः दशम व अेकादश स्कंध ) हाहि महानुभावांचा आवडता ग्रंथ आहे.

याखेरीज 'रामायण' व अितर पुराणें यांचेंहि कवीचें वाचन दिसतें. रामाचें सेतुबंधन, हनुमंतानें द्रोणागिरी उचलला, अि. रामायणी कथा तो देतो.[२१] भीमाचें भस्म झालें, तेव्हां ब्रह्मदेवानें वृष्टी रूरून ' भीमरक्षाचा बोध ' पूर्वसमुद्रीं नेण्यास ' च्यारी मेघां'नां सांगितलें. त्यांतूनच भीमगंगेचा उगम झाला,[२२] असली कथा पुराणांत आढळेल. याखेरीज कांहीं ' आडकथा ' कवि सांगतो.

शरपंजरांत शकुनीला कोंडलें आणि त्याच्या दाराशीं रक्षणार्थ हनुमंताला बसविलें. तेव्हांपासून नगररक्षणार्थ बाहेरच हनुमंताची स्थापना होऊं लागली.[२३] असली कथाहि व्यासांनीं सांगितल्याचा निर्वाळा कवि देतो :—

कथेसी जाली आडकथा | ह्मणोनी न कोपावे श्रोता |
व्यासे सांगीतली भारता | ह्मणोनी कथा वदलो मी || ४-९१ ||

पुढेंहि ' चेरणी टीळक काहो | रायासी लावावा ? ' या जनमेजयाच्या संदेह-निरसनार्थ वृषभ—शतपुत्रांची कथा वैशंपायनानें सांगितली असें कवि म्हणतो.[२४]

---

२१. रामसीळे सेत बांधील ||
हनुमंत द्रोणागीरीस उचलीले । तैसे राम दुर्ग उत्पाटीले ।
नातरी रावण भूजाबळी तुळीले । कैलासासी ज्यापरी || १०-२५ ||

२२. ते च्यारी वर्शले मेघ | नीघाला भीमागंगेच्या उगमबोध |
पश्चमेचा जाउनी वाघ | मीळाला पुर्वसमुद्रा || ६-१९२ ||

२३. कुडकापटे शेकुनीपासी | ह्मणोनी रक्षेण ठेवीलें हनुमंतासी |
तैपासुनी नगरबाहेर प्रदेशी | लोक स्थापीती हनुमंता || ४-८० ||

२४. हे आडकथा जेन्मोजयासी | सांगे वैसंपायने रुषी || १६-९२ ||

२५. हराष्ट्र भाशाचे क्षेण | माजी शैल्यपर्व बोलन रत्न |
नाना वरशी आळंकार भूशेण । होये श्रोतयासी || १-२३ ||

'महाभारता'चा आधार घेऊनही 'शैल्यपर्वा' ची वेगळी कथा दिलेली दिसते.

सकळ शास्त्रामाजी सार | पुराणो माहा थोर |
कथा भारती सुंदर | तिही लोकि || १—१२ ||

असा 'महाभारता'चा गौरव कवि करतो. त्यांतहि 'शैल्यपर्व' त्याला मोलाचें वाटतें-२५

आधी सभा वन विराट पर्व | सौभाग्य भीश्म द्रोण शांतीपर्व |
धावी कथा शैल्यपर्व | अकरावी शांतीपर्व जाणावे || १-१७ ||

अशी पर्वांची अनुक्रमणिका कवि देतो. हीं सर्व पर्वें या कवीनें लिहिलीं आहेत असा मात्र या ओवीचा अर्थ लावतां येणार नाहीं.

'महाभारतां'तील 'शल्यपर्व' आणि नारायणाचें 'शैल्यपर्व (हें नांवहि अशुद्ध आहे) यांची तुलना करतां मुळांतील शल्यसैनापत्याभिषेक, ह्रदप्रवेश, गदायुद्ध, सारस्वतोपाख्यान, अर्जुनरथज्वलन, अश्वत्थाम्यास सैन्यापत्याचा अभिषक यांचा आढळ होत नाहीं.

कवीनें 'शैल्यपर्वांत'च 'सौप्तिकपर्वा'मधील रात्रियुद्ध, सर्वसंहार, दुर्योधनाला सौप्तिक कथन, दुर्योधनाचा मृत्यु या प्रसंगांचा समावेश केला आहे. 'स्त्रीपर्वां'तील गांधारीचा विलाप व मृतांच्या और्ध्वदेहिक क्रिया 'शैल्यपर्वा'च्या शेवटीं येतात. व्यासांचें आगमन होतें. त्यांच्या सूचनेप्रमाणें धर्माची प्रतिष्ठापना होते. नंतर 'अनंताची पूजा' होते. बळराम व कृष्ण द्वारावतीला जाण्यास निघतात. बरोबर भीमार्जुन जातात. वाटेंत भीष्मांची भेट होते. द्वारावतीस गेल्यावर आनंदी आनंद होतो. भीमार्जुन सातपांच दिवसानीं परत येतात. येथें 'शैल्यपर्व' संपतें.

कथांचा अनुक्रम कवीला नीट माहीत नाहीं. गदापर्वानंतर, बलराम तीर्थयात्रेहून परत आला आणि पुढें काय झालें तें शल्यपर्वांत सांगितलें आहे असें कवि म्हणतो.२६ क्रमभंग हा या ग्रंथांतील मुख्य दोष आहे. असलेंच आणि अेक उदाहरण म्हणजे 'ऊरुभंगा'नंतर शकुनीचा वध आहे. ( अर्थात् 'ऊरुभंगा'चें वर्णन 'शैल्यपर्वा'त कोठेंच नाहीं. अेकदा क्रम चुकला तो चुकलाच! )

नवरसनारायणानें बळरामाला धर्माशीं युद्ध करावयास लावलें आहे. राम धर्माला धरतो. पण कृष्ण त्याला पळवून नेतो. राम त्याच्या पाठीस लागतो' कृष्ण धर्माला सुदर्शनांत लपवितो. कृष्णाला ' धर्म कोठें आहे ? ' असें रामानें विचारतांच ' तुमचा धर्म तुम्ही पाहावा ' असें कृष्ण सांगतो.

कवीनें बिभीषणालाहि 'महाभारतांत' आणलें आहे. शैल्य-अर्जुन युद्ध करीत असतां भीमानें आवेशानें रथपदाती फेकले ते लंकेंत जाऊन पडले. बिभीषण राज्य करीत होता. त्याला कोठें काय चाललें आहे तें समजेना. अितक्यांत नारदमुनि आले. त्यांनीं युद्धाचा वृत्तांत सांगितला.

येथेंच मंदोदरीला कृष्णशापानें कुष्टता जडल्याची कथा कवि सांगतो.[२७] कृष्णाचा कोप जावा म्हणून बिभीषण त्याला लंकेंत आणवून त्याची पूजा करतो. रामच भेटल्यासारखें त्याला वाटतें :-

न्याहाळुनी पाहे वदन । तव रूप देखीले राम संपूर्ण ।
कर कोदंड धनुशबाण । पुर्व स्थीती राम देखीला ॥ ११-१२६ ॥

पण या स्वातंत्र्यापेक्षां व्यक्तिचित्रणांत कवीनें घेतलेली मोकळीक विचार करण्यासारखी आहे. शकुनीची व्यक्तिरेखा म्हणजे जादूटोणा, मंत्रतंत्र-करणाऱ्या माणसाचें रेखाचित्रच आहे. स्मशानभूमींत होमकुंडाजवळ बसलेल्या नग्न

---

२६. राजो-जन्मेजये प्रष्ण करी । ह्मणे रुषीशया आवधारी ।
गदापर्व जालियावरी । पुढे वर्तले कैसे ॥ १-१४ ॥
तीर्थं करू बळिराम गेला । तंव पांढवी कौरवा बधीला ।
पुनरप संकर्शेण पावला । मग वर्तले कैसें ॥ १-१५ ॥
ऐसे राये पुसीले । मग रुषी वैसंपाने बोले ।
पुढा सांगो आधरीलें । माहा शैल्यपर्व कथा ॥ १-१६ ॥

२७. सातपाच सावज मीळती । परस्पर कल्हो करीती ।
तैसी कौरव पांडव भीडतीं । कुरूक्षेत्रा मध्यभागी ॥ ११-७२ ॥
असी मंदोदरीने नींदा केली । तीयेचा आंगी कुष्टता जडली ।
गरुड वार्ता सांगीतली । श्रीकृष्णासी ते काळी ॥ ११-७३ ॥

शकुनीचें चित्र वेगळेंच पण ठसठशीत आहे.[२८] त्यांत कवीच्या काळीं मंत्र-तंत्राला बरेंच महत्व असल्याचें व्यक्त होतें.

गांधारी ही वास्तविक आदरणीय स्त्री. परंतु कवीला तिच्याविषयीं आदर दिसत नाहीं. पुत्रांच्या मरणानंतर स्मशानांत येऊन गांधारी शोक करूं लागते. तेथें अेक 'कैकाडीण' येते व 'कृष्णाला शरण गेलीस तर तुझे पुत्र उठतील', असें गांधारीस सांगते.

पण 'यावच्चंद्र दिवाकरौ' आपण कृष्णाचें दर्शन घेणार नाहीं असें गांधारी तिला सांगते.[२९] आणि शेवटीं कैकाडणीनें सांगितल्याप्रमाणें (पुत्रांच्या प्रेतांवर चढून) चिंचेचा पाला खाते. त्याचवेळीं बळरामादि तेथें येतात व गांधारीचा धिक्कार करतात.[३०] या कथेचें मूळ शोधण्यासारखें आहे. डॉ. तुळपुळे सांगतात की, 'शैल्यपर्वां'तील कथा मानभावी कृष्णचरित्रांत आढळतात.[३१]

'कथा सांगेन नवरसु', 'नवरसाची कथा थोरी', असें आपल्या कथेबद्दल कवि आत्मविश्वासानें–उद्‌गार काढतो. 'तेहे कथेची रसमांडणी', 'ते कथा श्रोतीयासी रसाळ दिसें' असेंहि तो म्हणतो. स्वतःला 'नवरस' या पदवीनें अलंकृत करून घेतो.

---

२८. बाव्हन वीर आव्हानीले । सोळा चेटक चेतवीले ।
नवनाटक आतीं आणीले । स्मशाना मजी ॥ २–९२ ॥
नग्न होउनी आपण । करी भूत श्रीष्टीचे पुजेन ।
जे जे भूत होय प्रसन्न । ते ते धाडी पांडवावरी ॥ २–९३ ॥

२९. चेंद्र सुर्य आकासी भ्रमती । आप तेज पृथ्वीचि वस्ती ।
तो वरी श्रीकृष्णमुर्ती । मी तया प्रती आवलोकीना । १४–८० ॥

३०. शतपुत्रावरी उभी टेली । पाला खाता रामें देखीली ।
म्हणे धीग्ग धग्ग जीवीत्व जाली । अैसी परी देखीली नाहीं ॥ १४–९७ ॥

३१. महाराष्ट्र सारस्वत, पुरवणी, पृ. १२४, तळटीप

परंतु कवीनें आधीं 'सात रस दाखवावेत व नंतर नवरस दाखवून कथा वाढवावी', असें नारायण म्हणतो.[३२] कथा हेंच काव्यकारण असें त्याचें मत आहे.[३३] सात रस म्हणजे शृंगार व हास्य वजा जातां उरलेले (नवांपैकीं) रस.

करुण, वीर आणि अद्‌भुत हे रस या कवीला चांगले साधतात. युद्ध-वर्णनांत वीररस ओतप्रोत भरला आहे. पांडवांचा सभामंडप आणि श्रीकृष्णमूर्ति यांच्या वर्णनांत अद्‌भुताची किमया दिसते. किंबा 'शांताचिया घरा अद्‌भुत पाहुणेरा' आला आहे असें वाटतें. पण भीमाच्या मरणाची (व नंतर तो जीवंत झाल्याची) कवीनें दिलेली कथा बुद्धिला पटली नाहीं तरी त्या कथेंत भीमाबद्दल धर्म, कुंती, द्रौपदी इ. नीं. केलेला विलाप करुणरसाचा चांगला नमुना म्हटला पाहिजे. कुंतीनें केलेला शोक हृदयस्पर्शी आहे.

तु माझा आधारू । तु माझे धरंधर तारू ।
उत्तरी आता पैलपारू । धरुनी करू मज नेई ॥ ७--१६ ॥
त्या संतोशाचे मुळ उपडीलें । रोप शांतीचे खुडोनी नेले ।
जीवरत्न तुझे हारपले । नेवोनी घातले वेणव्यांत ॥ ७-१८ ॥
कल्पद्रुमाची साउली मोडिलि । कवण चांडाळ खांडोनी नेलि ।
माजा वीसावा माउली । कोटे हारपली नेणवें ॥ ७-१९ ॥
माझा गुणरत्नाचा सागरू । गंभीरपण जैसा मेरु ।
आता कै देखन वरकोदरु । सांग सत्वर श्रीकृष्णा ॥ ७-२० ॥

द्रौपदीचा विलापहि तितकाच उत्कट आहे.[३४]

---

३२. तरी कवीचा मार्ग नव्हे ऐसा । आधीं दावीजे साती रसा ।
पाटी दाउनी नवरसा । कथा वाढविजे ॥ ४-९ ॥

३३. आधी कथा मुख्य पाहीजे । पुढा तैसाची उत्तरी जे ।
म्हणोनी कथालागी बोलीजे । काव्यकारण ॥ ४--११ ॥

३४. द्रोपदी भूमीवर लोळे । केशे सोडोनीया मोकळे ।
असुवे भरूनीया डोळे । थोर विव्हाळे आक्रंदतु ॥ ७-२९ ॥
तुवा वैराटाचे घरी । दासेत्व केले परोपरी ।
कीचकाची करुनी बोहरि ते आवेश्वरी सोडवीले ॥ ७-३० ॥

या रसांना अलंकारांनींहि सौंदर्य आलें आहे.

> ह्मणे माझा भीमअगस्ती उटेल । तो रामशौर्यें सींधु सोखील ।
> अर्जुन धनुर्वाडा भीडेल । तो तोडील रामशक्तीते ॥ ८–५५ ॥

अशीं रूपकें आढळतात.

> तुवा कापटे मात बहू केली । ती पाप आजी फळासी आली ।
> जैसे कोशे कीटकें घरे केलीं । गुंतोनी वेसनी मरावया ॥ ४–४८ ॥

असे दृष्टांत कवि देतो. 'चक्रधर', 'सारंगधर' हीं नांवें वापरून कितीतरी वेळा कवि श्लेष साधतो. उपमा, उत्प्रेक्षाहि अधून मधून भेटतात.[३५] पण एकंदरींत अलंकार माफक प्रमाणांतच सांपडतात. काव्यांत कथा महत्वाची, रस हे तिला सहाय्यक अशी कवीची दृष्टि आहे.

मेळीकार, कूडावा, नामोछारण, बोहरी, रहंवरु, आवलीळा, संजोगणी, कैउता, राउत, कैवाड, आगलोहो, सातापाचा, कौल, उदीम, तके, चांदवा, पुजाआवसर, कल्हो, उश्राप असे शद्ब कवि वापरतो. नीशाण, दुंदूभी, रणतुरे, सींगे, बुरंगे, काहाळा, भेरी, कर्णा, बाका, नरसी, जेंगठ, तासा, घंटा, ढोल, रणसींगे, अि. वाद्यवाचक शद्ब कवि उपयोजितो. त्याचा काल ठरवितांना हेंहि विचारांत घेतलें पाहिजे. शस्त्रवाचक शद्बांत भाले, बरची, गदा, मुद्गल, तोमर, आसी, फरश, लोहोआर्गळा, शुळ, कतरि, लहुड, ढाळा, चेक्र, पाश, अंकुश, कटारी, सुरी अि.चा. समावेश आहे. खर्ग, धनुशबाण, विविध अस्त्रें याचे उल्लेख विपुल आहेत. नीवडला, नीर्भछीला, अरुडला, आभीळासली, आधरीले, अशीं क्रियापद रूपें आढळतात. कुड करील, रथ संजोगा, काडावा काडोनी गेला, आदावळी दीधली, लाग केला, मुखी धरति त्रुणाते, पाळा पडीला,

---

३५. जीवा चौकदान द्यावयासी । च्यार भुजा जाला रुषीकेसी ।
की वेदाचीया चौकमतीसी । आवरावया ॥ १७–१५ ॥
मुर्ती उदयेगिरी वरी उगवला । तैसा मुखचेंद्र शोभला ।
जेवी आमृतरस द्रवला । शोडशोकळी का ॥ १७–२० ॥

पावाडे गर्जीती, हाकार केला, रणवट बांधीला, वीघड केला, अरे तु कालीचे लेकरु, असे शद्बप्रयोग कवि उपयोजितो. एकंदर भाषेत प्रसाद आणि ओज अधिक आहेत.

कालविपर्यास हा दोष मानला गेला तरी बऱ्याच वेळां कवीचा काळ ठरविण्यास तो उपकारक ठरतो. धर्माची राज्यीं प्रतिष्ठापना झाली तेव्हांच्या वर्णनांत सींदे, साळोंके, चव्हाण, मोरे, पोवार अि. राजांचा कवि उल्लेख करतो.[३६] पुढेंच तो फिरंग, हाबसी यांचाहि निर्देश करतो.[३७] पुन्हां अेकदां फिरंग्यांचा (म्लेंछांच्या बरोबर) उल्लेख आढळतो.[३८] पडदा,[३९] पाट काढणें[४०] अि. तत्कालीन रूढींचाहि कवि जातां जातां निर्देश करतो. अवयवच्छेदाचेंहि तो वर्णन करतो.[४१] राजांच्या नामावळीचा विचार करतां कवि १४व्या शतकापेक्षां अर्वाचीन वाटतो. मान्य (माने), चालुक्य (साळोंके), मौर्य (मोरे), परमार (पोवार); असें या राजांचे मूळ (किंवा कुळ) शोधतां आलें आणि शिंध (शिंदे, किंवा जगद्दळ=जगदाळे) सारखें नांव कर्नाटकांत १०—११ व्या शतकांत आढळें तरी हीं सर्व नांवें अेकत्र देण्याचें कारण वेगळें असण्याची शक्यता आहे.

---

३६. सींदे साळोंके पंडीभार । चव्हाण मोरे आणी पोवार ।
मोहिते नीकम सीसोद सागर । अैसे राय संवादीती ॥ १६—३२ ॥

३७. बहुत देश आंगवंग देशीचे । फीरंग हाबसी मळयारीचे ।
सींगळ आणी दक्षण देसीचे । बहुत देसीचे बोलती ॥ १६—३४ ॥

३८. म्लेंचेमंडळा नीघाला काळयोवन । सींधुतटाका चालीले फीरंगाण ।
अैसे आपुलालिया देशालागुन । राहजे फीरोन चाललीले ॥१८-१११॥

३९. सकळ पांडवांचीया स्त्रीया । आडपडदा बैसलीया ।
पुजारंग पाहावया । उल्हासले मन ॥ १७—३४ ॥

४०. मग तो अश्वथाम सापडीला । पाच पाट काढुनी शीसीला ।
भोवंडीला ततक्षणी ॥ १३—६६ ॥

४१. जीव्हा नासीक नयना । सीक्षा केलि तिघाजणा ।
चौरंगाची मौन्यता करूनीं जाणा । शेकुनी मामा बोळवीला ॥४-१०॥

मराठ्यांच्या राजवटींतहि हा महानुभाव कवि झाला असण्याची शक्यता आहे. परंतु निर्णायक पुराव्याच्या अभावीं नवरसनारायणाची कालनिश्चिति करणें आज तरी शक्य नाहीं. तोंवर तो १४ व्या शतकांत होऊन गेला असेंहि मानावयास हरकत नाहीं.

नवरसनारायणाबद्दल कांहीं भ्रम आढळले. त्यांचा निरास करण्याच्या हेतूनें कांहीं विचार मांडले आहेत. सारंगधर भोजने हाच नवरसनारायण हा गैरसमज आतां दूर व्हावा आणि 'तीर्थमालिका' नवरसनारायणाची नव्हे असेंहि मानणें क्रमप्राप्त आहे.

वेगळेंच 'महाभारत' सांगणयाऱ्या या कवीचें, 'महाभारत ओवीबद्ध रचलें,' असें वैशिष्ट्य (?) सांगतां येणार नाहीं. त्यानें महाभारत बदलून सांगितलें म्हणजे काय केलें तेंहि सांगण्याचा हा प्रयत्न आहे. तसेंच नवरसनारायणानें सर्व महाभारत रचलेलें आढळत नाहीं व मिळणारें 'शैल्यपर्व' उपेक्षणीय नाहीं.

# एक 'चंद्रहास्याख्यान'

माझ्याकडील एका लहानशा चोपडींत बिष्णुदास नाम्याच्या 'कर्णपर्वा' बरोबरच एक 'चंद्रहास्याख्यान' उतरलेलें आढळलें. कागद बराच जुना असून चोपडीचा आकार ७½" × ५" असा आहे. चोपडी कुणाची; कुणी व केव्हां हा भाग नकलला याबद्दल कांहींच उल्लेख नाहीं. तसेंच पहिलीं व शेवटचीं कांहीं पानें गहाळ झालेलीं आहेत.

या आख्यानावर "आस्वमेध चंद्रहाशाची कथा" असा मजकूर असून प्रारंभीं : "श्री गणेशायेन्मः ॥ श्री गुरुभ्योन्नमः ॥ श्री कुळदेवायन्मः ॥" असें नमन आहे. "नीर्वीघ्नमस्तू" असेंहि म्हटलें आहे. हा मजकूर कवीचा नसून प्रतकाराच्या पदरचा असावा असें वाटतें.

ते वळी वारु चंदने चर्चिला । तोडर वामचरणि लेववीला ।
पूशी मूर्डिव घातलें । रत्नबध आवलीळा ॥ १ ॥[1]

या ओवीने कथेचा प्रारंभ होतो. 'ते वेळी' या शद्बांतून त्या वेळेचें वर्णन कवीनें आधीं केलेलें आहे व तेंच वर्णन तो पुढें करणार आहे ही कल्पना सूचित होते.

---

१. ओवींतील चौथा चरण तिसरा व तिसरा चरण चौथा हवा.

म्हणजेच हा प्रारंभ एखाद्या नव्या किंवा स्वतंत्र आख्यानाचा प्रारंभ वाटत नाहीं. आधींचा भाग प्रतकारानें नकललेला दिसत नाहीं. त्यामुळें कथेला मध्येंच कोठेंतरी सुरुवात झाल्यासारखें वाटतें. पुढील कथाभाग वाचल्यावर पहिल्या कांहीं ओव्या गळलेल्या असाव्यात असा तर्क वाहतो.

या 'चंद्रहास्याख्याना'ची सुरुवात धर्मराजानें अश्वमेधाच्या वेळीं सोडलेल्या अश्वाच्या वर्णनानें होते. धर्माचा घोडा 'कोंतळापूर' नगराजवळ येतो आणि एकदम अदृश्य होतो. सगळीकडे (हा) 'हाकारू' उडतो. अर्जुनसुद्धां विस्मित होतो.

काय रीघाला गंगाजाळि । कि प्रवेशला पाताळीं ।
किंवा नेला गगनमंडळि । गंधर्वादिकि ॥ १२ ॥

असें सर्वजण म्हणूं लागतात.

इतक्यांत विमानांतून नारदमुनि येतात. कृष्णार्जुन त्यांना वंदन करून अश्वाचा वृत्तांत सांगतात. तेव्हां 'हासोनी' नारद सांगतात की चंदनावती-मध्यें तुमचा घोडा आहे. चंद्रहास्याच्या कथेचा प्रस्ताव नारदच करतात. चंद्रहास्याचा जन्म, वनवास, 'कळिंद्ररायें' त्याला पाळणें, दुष्टबुद्धीच्या कन्येशीं लग्न, इ. घटनांचा उल्लेख या प्रस्तावांत येऊन जातो.

पार्थानें सर्व आख्यान ऐकण्याची इच्छा दर्शविल्यावरून नारद पुढील कथा सांगतात. पूर्वीं 'कोळधापति थोर' राजा होऊन गेला. तो धार्मिक व प्रजाहितदक्ष होता. त्याला कालांतरानें एक पुत्र झाला. तो पुत्रहि मोठा सुलक्षणी होता. परंतु अचानक राज्यावर परचक्र आलें. युद्धांत राजा मृत्यु पावला. राणीनें अग्निप्रवेश केला. त्यानंतर एका दाईनें तीन वर्षें चंद्रहास्याचा प्रतिपाळ केला. पुढें तीहि वारली. चंद्रहास्य निराधार झाला. गांवातल्या 'लेकुरांमाजी' तो खेळे. लोक त्याला घरी बोलावत. खायला प्यायला देत. खेळतां खेळतां त्याला एक दिवस 'शुध साळिग्राम सीला सांपडली.' शाळिग्रामाला आधीं स्नान घालून मग तो स्नान करी. त्याला आधीं नैवेद्य दाखवून मग तो भोजन करी.

कोणी त्याला ‘ टोपी अंगी ’ देत. तो सर्वांचा इतका आवडता होता की ‘ म्या अवतीलें चंद्रहास्या ’ असें म्हणून स्त्रियांत कलह चाले.

एकदां दुष्टबुद्धि प्रधानाच्या घरीं ‘ माहाउछावो ’ चालला होता. दुष्टबुद्धीनें चंद्रहास्याला ‘साउमा’ बोलावलें. ‘ तुहि जेवी गा वाहिला ’ असें म्हटलें. चंद्रहास्यानें देवतार्चन केलें. शाळिग्रामाला नैवेद्य दाखविला. ‘तीर्थ घे तुळसी समवेत’ आणि ‘रुषीमधीं’ जेवावयास बसला.

ऋषींना या मुलाचें कौतुक वाटलें :—

आवघे आसीर्वाद देत । राज्ये करी या पूत्रासमवेत ॥
क्षोभले प्रधानाचे चीत । काये बोलत कवणाश ॥ ४५ ॥
वाउगाची असिर्वाद देता । पूत्र कोन्हाचा नेणता ॥
घालेती भरलेंती अता । घरा जारें आपुलीयां ॥ ४६ ॥

‘ मानूभावाचे’ आशीर्वाद खोटे होणार नाहींत तर या गोष्टीचा प्रतिकार कसा करावा या विचारांत दुष्टबुद्धि गढून गेला. त्यानें चांडाळांना बोलावून ‘ हें बाळ वधा वनीं ’ म्हणून सांगितलें. ‘ वामचरणीची सावी अंगोळी । खुण अणा मजजवळी ’ असेंहि बजावलें.

चांडाळांनीं चंद्रहास्याला भुलवून वनांत नेलें. ‘खर्ग’ काढलें व देवाचें नांव घेण्यास सांगितलें. चंद्रहास्यानें मुखांतून ‘ सीळा ’ काढली. तिच्या वियोगाची कल्पनाच त्याला सहन होईना. प्राणाहून या वियोगाचें दुःख त्याला अधिक झालें. तो ‘ फुदफुदुनी रूदन ’ करूं लागला. चांडाळांना दया उपज़ली. त्यांनीं त्याचा सहावी ‘ अंगोळी ’ कापली. प्रधानाला दाखविली. संतुष्ट होऊन दुष्टबुद्धीनें त्यांना द्रव्य दिलें.

चंद्रहास्य वनांत हिंडूं लागला. इतक्यांत शिकारीला आलेल्या ‘कळिंद्र’ राजानें त्याला पाहिलें. त्याचें नांव विचारलें. त्याला प्रेमानें हृदयाशीं धरलें व त्याला घरीं घेऊन आला. चंद्रहास्याच्या स्वागतार्थ प्रजाजनांनीं ‘गुढ्या मखरें उभविल्या.’ कळींद्राचें ‘ राज्य अधिक बळावलें.’

चंद्रहास्याला सहावें वर्ष लागल्यावर त्याला शिकविण्यासाठीं 'पंत' नेमला गेला. परंतु 'हरी' खेरीज हा शिष्य दुसरें कांहीं लिहीना. सातव्या वर्षी मुंज होऊन वेदाभ्यासाला सुरुवात झाली. आठव्या वर्षी तो 'वेद पढीनला.' सोळाव्या वर्षी चंद्रहास्यानें राजाकडे दिग्विजयाला जाण्यास आज्ञा मागितली. राजा म्हणाला की एवढें सामर्थ्य आपणांत नाहीं. कोंतळेश्वर व दुष्टबुद्धि ही गोष्ट ऐकून रागावतील. तरीहि चंद्रहास्य गेला व त्यानें 'जींकीलें पृथ्वीचे भुपती'.

यापुढील कथाभाग गहाळ झाला आहे. उपलब्ध भागांत २०३ ओव्या आहेत. दुष्टबुद्धीनें चंद्रहास्याच्या नाशाचे केलेले प्रयत्न व त्यांतून पार पडून चंद्रहास्याचें त्याच्या कन्येशीं (व कोंतळेश्वराच्या[1] कन्येशीं) झालेलें लग्न आणि राज्य-प्राप्ति या घटना या आख्यानांत पुढें आल्या असतील पण त्या उपलब्ध नाहींत.

या आख्यानाच्या कवीची प्रतिभा वर्णनांत चांगली रमते. धर्माच्या अश्वाचें वर्णन त्या दृष्टीनें पाहण्यासारखें आहे. :—

घोश मूक्ताफळाचे दोहि धडी । शुध साडे पंधराची शखळाकडी ॥
आदभुत विराचीया प्रौढि । वारू पूढां सोडीला ॥ २ ॥
सुवर्ण कडीयाळि स्वलीळां । पूष्पाचीया माळा गळा ।
घातलीया प्रबळा । शोभती अंगकांती ॥ ३ ॥
शुभ्र दिप्ती चंद्रप्रभा । कस्तुरी कुंकुम महतीची शोभा ॥
ठाईटाई चमकत वीबत उभा । भाळीं सुवर्णपत्रे बांधली ॥ ४ ॥

जेव्हा चंद्रहास्याला चांडाळ मारणार असतात तेव्हां त्याच्या ध्यानांतील मूर्तीचें कवीनें केलेलें वर्णन केवळ अप्रतिम आहे :—

चरणि वा नेपुरे गर्जति । तेणे कलिकाळ कांपती ।
जग तारावया श्रीपति । दुजा क्षीति आसेना ॥ ६९ ॥
ध्वज अंकुश उर्ध्वरेखा । कोटि दीप्ती नखी देखा ॥
तेणे ससी अर्का । उणेपण आणीले ॥ ७० ॥
जेवि सुंदर रातोत्पळ । घोटी सकुमार सुनिळे ॥
कैसी शोभति वर्तुळे । मुक्ताफळे लाजीली ॥ ७१ ॥

पोटरीया जानुजंघ | जेवी ईंद्रानिळस्तंभ ||
की स्वर्गिहुनि मेघकोंब | सरळ स्वयेभ उगवले || ७२ ||
माज अतिशय सुंदर | वर कासीला पीतांबर ||
वाजती घटीका मनोहर | तेणे अंबर गर्जतसे || ७३ ||
नाभिवर्तुळ समान | जेथे विधिचें जन्मस्थान ||
मदन त्यागुन आभीमान | उदरासि आला तो || ७४ ||
हृदयाचे उतमपण | कोण वर्णील महिमान ||
श्लाघ्यता कळेल विप्रजन | श्रीवत्सलांछन शोभतसे || ७५ ||
बाहुदंड सरळे | विरकंकणे विराजले ||
गुढगे परीयंत आले | यालागी आजानाबाहो ह्मणती || ७६ ||
अंगोळिया सरळ देखा | जडीत शोभति मुद्रिका ||
कोटि कंदर्प नखी यका | हरपोनया गेले || ७७ ||
करी कौस्तुभ सुमनमाळा | आपादवरी मिरवे गळा ||
तैसीच वैजंतिमाळा | हरीसुख घेतसे || ७८ ||
श्रवणि कुंडले मकराकारे | दिप्ति फिटे आज्ञान धारे ||
उपमे लाजे दीनकरे | नभमंडळि राहीला || ७९ ||
दंतप्रभा आति साजीरी | जेवि रत्ने बैसलि हारी ||
ताम्र वोष्टचि सरी | प्रवाळे ते न पावलि || ८० ||
नासीकट सरळ | नेत्र शोभति विशाळ ||
पाति राहिलि निश्चळ | कृपादृष्टी पाहातुसे || ८१ ||
भक्ती विघ्न वरपडा होती | ह्मणोनि न लगती पातिया पाति ||
कृष्ण माउलि कृपामुर्ति | सहजस्थिति पाहातुसे || ८२ ||
भोवया आती व्यंकटा | भेटो आलिया भृकुटा ||
देखतांचि धाका मोटा | सुराआसुर कांपति || ८३ ||
टिळा रेखीला कस्तुरीचा | सीरी मुगुट रत्नखचितिचा ||
बाप पुतळा मन्मथाचा | ऐसा साच [illegible]

चंद्रहास्याच्या नगरीचेंहि असेंच सुंदर वर्णन कवीनें केलेलें आहे. या वर्णनांचा विशेष हा की, त्यांत कल्पना विलास असून तो रसोत्कटतेला पूरक आहे. उपमा व उत्प्रेक्षा हे कवीचे आवडते अलंकार. चंद्रहास्य खेळतांना मुलांत कसा दिसे त्याचें वर्णन करणारी ही ओवी पहा :—

सर्वे बाळकांन्हि मांदि । खेळतसे जे बिदि ॥
जैसा चंद्र तारामधी । तैसा मीरवे चंद्रहास्य ॥ ३६ ॥

कळींद्रराजाच्या शिकारीचें वर्णन करतांना अशीच एक ओवी येते :—

तव वेगाथीले असी वारें । हिसे गर्जतसें अंबर ॥
गजावरी घालुनी पाखर । जेवी गीरीवर चालीलें ॥ ११९ ॥

रसोत्कटतेच्या दृष्टीनें चंद्रहास्यानें केलेला धांवा पाहण्यासारखा आहे.

कवीची कथन-चातुरी खरोखर वेधक आहे. ही कथा प्रतिलोम ( Flash-back ) पद्धतीनें सांगितली गेली आहे. धर्माच्या अश्ववर्णनानें प्रारंभ करून नारदाच्या मुखांतून, चंद्रहास्याची कथा वदविण्यांत कवीचें निवेदनकौशल्य दिसतें. चंद्रहास्याच्या जीवनांतील नंतरचा एक प्रसंग घेऊन त्याच्या जीवनांतील आधींच्या घटना कवीनें वर्णिल्या आहेत. आख्यानकाव्याला लागणारी ओघवती भाषा कवीजवळ आहे. थोड्या शब्दांच्या साह्यानें एखादें चित्र डोळ्यापुढें उभें करण्याचें सामर्थ्य त्याच्या वर्णनांतून दृष्टीस पडतें. त्याच्या निवेदनाची ही दृश्यात्मक पद्धति सांगितलेली सर्व कथा डोळ्यापुढें उभी करूं शकते.

या आख्यानाची भाषा बरीच जुनी आहे. पूशी ( पुच्छीं ), साडेपंधरा ( सोनें ), साउमा ( समोर ), उच्छवो ( उत्सव ), बोहरी ( नाश ), लेहि ( लिही ), अंवतीलें ( आमंत्रण दिलें), जाजावली ( त्रासली ), टोपी अंगी ( अंगडें टोपडें ), घालेंति भरलेंती ( खाल्लांत प्यालांत ), खर्ग ( खड्ग ), फरशराम ( परशुराम ), हारी ( ओळीनें), व्यंकटा ( वांकड्या ), बिदि ( रस्त्यांत ), पढीनला ( पढला ), शुध ( शुद्ध ), यांसारखे शब्दप्रयोग या दृष्टीनें टिपण्यासारखे आहेत. भाषेचा बिचार करतां ती एकनाथोत्तर वाटत नाहीं. भाषेवरून हा कवि एकनाथपूर्व असावा असें वाटतें.

प्रस्तुत हस्तलिखितावरून या चंद्रहास्याख्यानाचा कवि कोण याचा नीट उलगडा होत नाहीं. सर्व आख्यान मिळालें असतें तर शेवटीं कोठेंतरी कवीचा उल्लेख आला असता. हें आख्यान म्हणजे स्वतंत्र कृति आहे कीं, कवीनें लिहिलेल्या संपूर्ण अश्वमेधांतील एक भाग आहे याचाहि खुलासा होत नाहीं.

तव पार्थ म्हणे जी ताता | पूर्वि परब्रह्म उपदेशितां ।
राउळीं सांगीतली होती कथा | या चंद्रहास्याची || २५ ||

ही ओवी चिंत्य आहे. नारदांना कथा सांगा असें म्हणतांना अर्जुन सांगतो कीं पूर्वी परब्रह्माचा उपदेश करतांना (कोणाला ?) नारदांनीं ही कथा सांगितली होती; पण त्यावेळीं मी तेथें नव्हतो. या ओवीवरून हें आख्यान स्वतंत्र ( म्हणजे सुटें ) नसावें; अशी शंका निर्माण होणें शक्य आहे. परंतु अशा तऱ्हेचा उल्लेख श्रीधराच्या ‘ जैमिनी अश्वमेधांत ’ येत नाहीं. त्यावरून ही कथा पूर्वी नारदानें सांगितली होती ही कवि-कल्पना ( poetic device ) दिसते. तिच्यामुळें कथेचें महत्व वाढतें.

अश्वमेधावर रचना करणाऱ्या नऊ कवींची माहिती ‘ महाराष्ट्रसारस्वतां ’त भाव्यांनीं दिलेली आहे. श्रीधराच्या अश्वमेधाखेरीज अन्य रचना प्रसिद्ध झालेली नाहीं. प्रस्तुत आख्यान हें थोड्याफार फरकानें श्रीधराच्या ‘जैमिनी अश्वमेधां’तील अध्याय ५१, ५२, ५३, ५४ व्याच्या प्रारंभीं आलें आहे. एवढेंच नव्हे तर श्रीधराच्या उपयुक्त कथाभागावर या आख्यानाची दाट छाया आहे. त्यावरून श्रीधरानें तें पाहिलें असावें याची खात्री होते.

श्रीधरावर ज्या प्राकृत कवींची दाट छाया आहे त्यांत विष्णुदास नामा व मुक्तेश्वर हे प्रमुख होत. त्यांतहि विष्णुदास नाम्याचा प्रभाव त्याच्यावर अधिक दिसतो. मुक्तेश्वर हाहि विष्णुदास नाम्यापासून बरेंच घेतांना दिसतो. विष्णुदास नामा मुक्तेश्वर व श्रीधर यांच्या हरिश्चंद्राख्यानाचा तौलनिक अभ्यास ( हा मी अन्यत्र मांडला आहे ) हेंच स्पष्ट करतो.

मुक्तेश्वरानें अश्वमेधावर रचना केलेली नाहीं ( केलेली असल्यास उपलब्ध नाहीं ). प्रस्तुत ‘ चंद्रहास्याख्यान ’ व श्रीधराचें आख्यान यांच्या तौलनिक

अभ्यासांत दुसरें पहिल्याच्या अनुकरणासारखें वाटतें. या दोन कृतींतील कांहीं साम्यस्थळें पुढें देत आहें.

**हस्तलिखितांतील ओव्या**

सांप्रत वैष्णव धर्म अचरणे । केवळ परब्रह्माकारणें ॥
कोतळेस्वर राजमाने । नेणोनि वनांतरी केला ॥ १६ ॥
दुष्टबूधि प्रधा ( न ) नंदनी । प्रणीली चंद्रहास्यालागुनी ॥
कोतळाधिपती वौशी उपजोनी । कळिंद्ररायें पाळीला ॥ १७ ॥
पाहे ठाकती दोहि भार्गी । कोण्ही लेत्रवी टोपीअंगी ॥
बारे भुकेला जालासी वेगी । जेवीं आरता ये चंद्रहाशा ॥ ३७ ॥

**श्रीधराच्या ओव्या**

जो वैष्णवांमाजी मुगुटमणी । नित्य ध्यातसे चक्रपाणी ॥
कुंतळेशें तया राज्य देउनी । आपण गेला तपातें ॥ ५१-२७ ॥
दुष्टबुद्धि प्रधान नंदिनी । जेणें वरिली कौतुकें करोनी ॥
कुलिंदें पाळिलें त्या लागोनि । केरळाधिपाचा पुत्र जो ॥ ५१-२८ ॥
बाळांसवे करी क्रीडन । अनाथ जाणोनि देती भोजन ॥
कोणी आंगडटोपी जाण । देती आपले बाळांची ॥ ५१-५२ ॥

कथेच्या दृष्टीनें पाहतां श्रीधर तीच कथा सांगतो. नांवें मात्र भिन्न दिल्यासारखीं वाटतात. चंद्रहास्याच्या वडिलांचें वर्णन करतांना,

पूर्वी कोळधापती थोर । स्वधमी कुळविख्यात ॥ ३६ ॥

असें त्यांचें नांव हस्तलिखितांत आढळतें. पुन्हां २८व्या ओवींत 'कोळधापती' असेंच नांव येतें. तर आधीं १७ व्या ओवींत ' कोतळाधिपती ' असें येतें. श्रीधर ' केरळाधिपती ' असें म्हणतो व ' सुधार्मिक ' हें नांव देतो. ' स्वधमी ' हें ' स्वधर्मी ' म्हणजे ' सुधार्मिक ' चेंच भ्रष्ट रूप दिसतें.

हस्तालिखितांत ' काळिंद्ररायें ', ' काळिंद्रदेसीचा भूपती ' असें नांव वापरलें आहे. श्रीधर 'कुलिंद' नांवाचा उपयोग करतो. कोतळेस्वर व कुंतलेश्वर

अशीं नांवें अनुक्रमें, आपला कवि व श्रीधर हें वापरतात. श्रीधरानें सर्वत्र चंद्रहास असेंच नांव दिलें आहे. तर हस्तलिखित आख्यानांत तें चंद्रहास्य असें आढळतें. ( म्हणूनच या आख्यानास ' चंद्रहास्याख्यान ' म्हटलें आहे ). चेंद्रहस्य, चंद्रहस्य अशीं रूपें आढळलीं तरी तीं लेखनप्रमादाचीं किंवा भाषेच्या जुनाटपणांचीं द्योतक वाटतात. ' धृष्टबुद्धि ' हा दोन्ही ठिकाणीं ' दुष्टबुद्धि ' झाला आहे.

चंद्रहास्य कृष्णाचा धांवा करतो, त्यांत येणारा दशावतारांचा उल्लेख महत्वाचा आहे. त्या ओव्या अशा :—

मदूसुदना चक्रधरा । केशवा अनंत अवतारा ॥
मछवेश धरूनी सागरा । धांडोळीले तुवा ॥ ५६ ॥
कमळनयना कमळांपति । कासवे रूपे श्रीपती ॥
रसातळां जाता क्षीती । धरीली दाती उचलुनीया ॥ ५७ ॥
सर्वोत्तमाजी वामना । सानेपणें न मासी त्रिभूवना ॥
औठ हात भूमी घेता दाना । तुजवीण नेणवेची ॥ ५८ ॥
नरहरी पावे फरशरामा । रामचंद्रा वीरोत्तमा ॥
कृष्णा तु घनशामा । मोहनकामा धरीसी तुं ॥ ५९ ॥
कलंकि अवतार धरी । महि गाजीता असुरी ।
तुजवीण नरकेशरी । कोण साह्ये करील ॥ ६० ॥

मुक्तेश्वराच्या सभापर्वांत द्रौपदीवर वस्त्रहरणाचा प्रसंग ओढवतो. तेव्हां तिनें केलेला धांवा अगदीं असाच आहे. दशावतारांना आवाहान करण्याची कल्पना मुक्तेश्वराला ' चंद्रहास्याख्याना ' वरून सुचली असावी असा विचार मनांत येतो : निदान तशी शंका येते.

विष्णुदास नाम्याच्या माझ्याकडील ' हरिश्चंद्रोपाख्यान ' या त्रुटित हस्त-लिखिताशीं ' चंद्रहास्याख्याना ' ची तुलना करतांना कांहीं वर्णनें सारखीं वाटलीं. हरिश्चंद्र व ' कळिंद्र ' हे वनांत शिकारीला येतात तेव्हांचीं हीं वर्णनें पाहण्यासारखीं आहेत :—

**'चंद्रहास्याख्यान'**

तव वेगाथीले असीवारें । हिसे गर्जतसें अंबर ॥
गजावरी घालुनीया पाखर । जेवी गीरीवर चालीलें ॥ ११९ ॥
हुंकारीती शद्बे तिखटें । सहश्र लक्षवनि सुभट ॥
घडघडीलें चक्रवाट । हाकित टाकित पायाचें ॥ १२० ॥
पाडीती हरणाच्या मुरकुंडी । जीह्वा काढिती धावती परवडी ॥
विरदोर्दंढ प्रचंडीं । वन झाडीलें पारधीयें ॥ १२२ ॥
ससी सावजे अडकती । येक अनेक पडती ॥
येक शब्दे गर्जती । हुंकारें करूनीया ॥ १२३ ॥

**'हरिश्चंद्रोपाख्यान'**

किंकाट सुटले कुंजर । रथ घडघडिले अपार ॥
हिसताति रहिंवर । तेणें अंबर दणाणिलें ॥ २-४३ ॥
नक्षत्रें लोपलिं गगनिं । भारें दाटलि मेदनि ॥
ऐसें अपार चालिले सैन्य वनि । रजें दिनकर लोपला ॥ २-४४ ॥
सिंहीनादें गर्जति विर । येक रोहिं चितळें मारिती अपार ॥
येक गेंडे मारिति थोर । ऐसि वद्याळिं खेळति ॥ २-५१ ॥
येक लंगडें ससाणा सोडिति । येक उडतां पांखरूं मारिति ॥
येक जळिं खळती । पारधि राया ॥ २-५२ ॥

वरील ओव्यांतील शब्द व कल्पना यांच्यांतील साम्य चिंत्य आहे. विष्णुदास नाम्याच्या ध्वन्यनुकरण-प्रीतीचा ध्वनि 'चंद्रहास्याख्यानां'त ऐकूं येतो. दोन्ही आख्यानें भाषेच्या दृष्टीनें जवळचीं-एकाच कवीनें लिहिल्यासारखीं-वाटतात.

त्यामुळें विष्णुदास नामा हा या आख्यानाचा कर्ता असावा असा माझा ग्रह झाला. नऊ अश्वमेधांची माहिती देतांना "सातवा नामा विष्णुदासाचा" असें[२] भाव्यांनीं म्हटलें आहे. "नामा पाठकानें सांगितलेली चंद्रहासाची कथा

---

२. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. २४५

एकंदर ग्रंथाच्या मानानें पुष्कळ सरस उतरली आहे"; असेंहि मत ते देतात.[३] पुण्यांतील भारत इतिहास संशोधक मंडळांतील हस्तलिखितांची पाहणी करीत असतांना तेथें ' चंद्रहासकथा '[४] नांवाचें प्रकरण पाहावयास मिळालें. माझ्या कडील आख्यानाशीं तें तपशीलवार तुळून पाहणें शक्य नव्हतें. परंतु दोहोंतील सारखेपणा ध्यानांत आला. त्या प्रकरणाचा कर्ता नामा पाठक हा आहे. अनुक्रमें पहिल्या व तिसऱ्या प्रसंगाच्या अखेरीस पुढील ओंव्या आढळल्या :—

(१) आतां दृष्टबुधी उठवी जेवना : तें यकादसी जाणां : तें ऐकावें श्रोतेजणां : तेथे काये वर्तलि वीवंचणा : तें **पाठक नामा** सांगे :

(२) ऐसे सोडीले शामकर्ण वाक : पुढें टाकीले कोण स्थाणे : तें **पाठक नामा** करी कथण : तें श्रुतेहो परीयेसा :

धुळ्याच्या ' समर्थ वाग्देवतामंदिरां ' तहि " पाठक नामाकृत ' चंद्रहास्य अख्यान ' " असल्याची माहिती मिळतें. त्यांत तीन प्रसंग असून एकूण ओवीसंख्या ४७५ आहे.[५] ही प्रत कांहीं मी पाहिलेली नाहीं. परंतु सध्यां मात्र मला उपलब्ध झालेल्या ' चंद्रहास्याख्याना ' चा कर्ता नामा पाठक आहे एत्रदें[६] निश्चयपूर्वक म्हणतों.

३८५८ वि. ९५५८

३. महाराष्ट्र—सारस्वत, पृ. १८६

४. हस्तलिखित क्रमांक २९–२३६८.

५. श्रीरामदासीसंशोधन, प्रथम खंड, पृ. ३०२.

६. चंद्रहास व धृष्टबुद्धि हीं मूळ नांवें न वापरतां आख्यानांतील चंद्रहास्य व दुष्टबुद्धि हींच नांवें येथें वापरलीं आहेत.

# 'भावार्थ रामायणा'चें युध्दकांड

एकनाथांच्या 'भावार्थ रामायणा'ची रचना सर्वस्वीं एकनाथी नाहीं; एकहाती नाहीं—असें मानण्यांत येतें. एकनाथांनीं (कमींतकमी) उत्तरकांड तरी लिहिलें नव्हतेंच. म्हणून गावबा आणि मुक्तेश्वर (?) या दोघांनींहि आपापल्या परीनें तें रचण्याचा प्रयत्न केला असें दिसतें.

युद्धकांडांतील ५१ ते ५४ या चार अध्यायांचा कर्ता म्हणून जयरामसुताचें नांव पुढें आलें आहे. हे अध्याय अहिरावण–महिरावण–आख्यानाचे आहेत. एकनाथांनीं हें आख्यान लिहिलें नव्हतें व म्हणून जयरामसुतानें तें ग्रंथांत घातलें; असें ज. स. करंदीकर, न. र. फाटक व डॉ. तुळपुळे मानतात.

स्वतः जयरामसुतानें केलेलें निवेदन असें आहे—

एकनाथी रामायण । केलें सप्तकांड कथन ।
त्यांत अहिरावणाख्यान । काय म्हणोन विसरलें ॥ ३३३ ॥
ऐसे न वदावें उत्तर । तें तव विष्णूचा अवतार ।
त्यांसी स्वप्नीं नाहीं विसर । महाचतुर ग्रंथकर्ते ॥ ३३४ ॥

परंतु झाले बहुत दिवस । मुखीं पाळितां ग्रंथास ।
गाहाळिलें ह्या अध्यायास । तिहीं तयास काय कीजे ॥ ३३५ ॥
मग साक्षेपें जयरामसुतें । करोनि घातलें अध्यायातें :
हृदयीं रिघोनि एकनाथें । हें मजहातें करविलें ॥ ३३६ ॥

ह्या ओव्यांचा अर्थ नीट लावला गेलेला नाहीं. ह्या निवेदनावरून पुढील गोष्टी कळतात—

१) एकनाथानीं आहिरावणाख्यान लिहिलें होतें. २) 'ग्रंथ मुखीं पाळितां' त्या आख्यानाचा हा अध्याय (म्हणजे ५४ वा) गहाळ झाला. ३) म्हणून हा (एकच) अध्याय जयरामसुतानें 'साक्षेपें' (?) ग्रंथांत घातला.

वरील अर्थ बसविण्याइतका पुरावा मला उपलब्ध झाला आहे. तो म्हणजे जयरामसुतानें उल्लेख केलेला अहिरावणाख्यानाचा (५४ वा) अध्याय होय.

हस्तलिखितांचा शोध करीत फिरत असतां धारवाडनजीक कलघटगी येथें मला 'भावार्थ रामायणा'चें फक्त युद्धकांड मिळालें. हस्तलिखित किती जुनें असावें तें सांगतां येण्यासारखें नाहीं. कारण सदर प्रतींत ९१ च प्रसंग (अध्याय) आहेत. ९२ वा प्रसंग लिहावयाचा राहिलेला दिसतो. त्यामुळें प्रत कोणी व केव्हां केली हें कळण्यास मार्ग नाहीं. छापील प्रतींत व सदर हस्तलिखितांत महत्त्वाचे फरक आहेत.

माझ्याकडील हस्तलिखितांत ५४ वा अध्याय अगदीं वेगळा आहे. त्यांत १८६ ओव्या आहेत. तर छापील ( जयरामसुतकृत ) अध्याय ३४० ओव्यांचा आहे. दोहोंत बराचसा कथाभाग सारखा असला तरी एकहि ओवी दोहोंत सारखी नाहीं.

५१, ५२ व ५३ हे अध्याय मात्र तेच आहेत. त्यांत फरक नाहीं. यावरून माहिरावणाख्यान एकनाथांनीं लिहिलें होतें. तें गहाळ न होतां फक्त अहिरावणाख्यान म्हणजे ५४ वा अध्यायच गहाळ झाला होता व तेवढाच जयरामसुतानें घातला; हें सिद्ध होणार आहे.

" मागून कित्याच वर्षांनीं कोणी जयरामात्मज कवीनें एवढाच अध्याय रचून ग्रंथपूर्तीसाठीं त्यांत घातला असावा; " ही पांगारकरांची समजूत चुकीची आहे असें प्रा. न. र. फाटक यांना आतां तरी वाटूं नये. ' या अध्यायास ' मधील एकवचनी उल्लेख तरी नजरेआड कसा झाला ?

जयरामसुत आणि गावबा ह्या व्यक्ति एकच हा पांगारकरांचा समज मात्र प्रा. फाटक, ज. स. करंदीकर व डॉ. तुळपुळे यांना चुकीचा वाटावा हें रास्त आहे. कारण उपलब्ध झालेल्या ५४ व्या मूळ अध्यायावरून ह्या दोन व्यक्ति असल्याचें स्पष्ट होतें. " गावबा ४४ व्या अध्यायापासून पुढच्या रामायणाचा कर्ता कीं अहि-महिरावणाख्यानाच्या चार अध्यायांचा कर्ता हा प्रश्न उपस्थित होतो; " असें प्रा. फाटक म्हणतात. हा प्रश्नहि आता सुटण्यासारखा आहे.

कारण माझाहि कल युद्धकांडअखेर रचना एकनाथांनीं केली; असें मानण्याकडे आहे. गावबा व जयरामसुत यांनीं एकनाथी युद्धकांडांत आपला जमेल तसा शिरकाव करून घेतला. ५४ वा अध्याय नवीन लिहिणारा जयरामसुत व अधूनमधून अन्यत्र डोकावणारा पण नांव न सांगणारा गावबा या दोन व्यक्ति असल्याचें यावरून कळतें. सांपडलेल्या ५४ व्या अध्यायांत गावबा कोठेंहि डोकावत नाहीं. म्हणून ' एकनाथी अहिरावणाख्यान ' असेंच नांव ह्या अध्यायाला मी देतों.

ह्या अध्यायांत एकनाथी विशेष दिसतो तो प्रामुख्यानें चंद्रसेनेच्या कथेंत. श्रीरामाबद्दलचा अत्यादर येथें उत्कृष्टरीत्या व्यक्त झाला आहे. रामाच्या दर्शनानेंच चंद्रसेनेच्या विषयीवृत्तीचें निर्मूलन झालें आहे, तर जयरामसुतानें त्या कथेला वेगळीच कलाटणी दिली आहे. उपकाराचें ओझें वाहणाऱ्या भुंग्याचा त्यानें उपयोग करून घेऊन मंचक पोखरून ठेवला आहे व रामाला त्यावर बसविलेंहि आहे. मारुतीच्या पुच्छानें उडविलेल्या हाहाकाराचें वर्णन पुच्छाइतक्याच लांबीचें केले आहे ! अशा गोष्टींचा अभाव हाच एकनाथी विशेष. एकनाथांचा हा अध्याय जयरामसुताला माहीत होता; तोच स्वतःच्या शब्दांत थोड्याफार फरकानें त्यानें रचून घातला. फरकाचा तपशील देण्याचें कारण नाहीं.

"जयरामसुतानें नाथांच्या युद्धकांडांत समाविष्ट न झालेली अहिरावणाच्या (व महिरावणाच्या ?) वधाची उपकथा तेवढी लिहिली व तो भाग अध्याय ५१ ते ५४ असा मध्येंच घुसडून दिला"[१]; "अहि-महिरावणाख्यानाचे चार अध्याय जयरामसुताचे आहेत"[२]; "एकनाथी रामायणांत अहिरावणाख्यान नाहीं असें पाहून मागाहून कोणीतरी तें रचून ग्रंथपूर्ति केली आहे, असें युद्धकांडांतील ५४ व्या अध्यायावरून वाटतें"[३]; हीं आमच्या सन्मान्य संशोधकांचीं विधानें बदलावीं लागतील. अशीहि शंका मनांत येतें, कीं, हे चारहि अध्याय जयराम-सुताचे मानणाऱ्यांना ९२ ऐवजीं ८८ अध्यायच असलेली एखादी प्रत कां उपलब्ध होऊं नये ? या शंकेबरोबरच आणखी एक प्रश्न मनांत येतोः - जयराम-सुतानें म्हटल्याप्रमाणें 'मुखीं पाळिलेला' अहिरावणाख्यानाचा गहाळ अध्याय आपणांस उपलब्ध झाला. त्याप्रमाणें एकनाथांनीं 'सप्तकांड कथन' केलें असें तो सांगत असतांना आपण एकनाथांच्या उत्तरकांडाबाबत अगदींच आशा कां सोडावी ? हा प्रश्न आज तरी हास्यास्पद वाटेल ही मला जाणीव आहे.

युद्धकांडअखेर रचना अेकनाथांची म्हणून हें अहिरावणाख्यानहि त्यांचेंच (गावबाचें नव्हे); हें माझें म्हणणें सिद्ध करण्यासाठीं उपलब्ध प्रत व छापील प्रत यांची थोडीशी तुलना करीत आहे.

या दोन प्रतींतील फरक असेः—

| प्रसंग | ओव्या : हस्तलिखित प्रत | छापील प्रत |
|---|---|---|
| ४१ | ११७ | १८४ |
| ४६ | १८६ | १६१ |
| ५४ | १८६ | २४० |
| ५८ | २०२ | १६५ |

१. एकनाथ-दर्शन, पृ. १३५.

२. श्री एकनाथ : वाङ्मय आणि कार्य, पृ. ३०२.

३. महाराष्ट्र-सारस्वत पुरवणी, पृ. ९२९.

यापैकीं ५४ वा प्रसंग म्हणजेच 'अेकनाथी अहिरावणाख्यान' होय. हा अध्याय संपूर्ण निराळा आहे. तसाच ४१ वा प्रसंग जवळ जवळ निराळा आहे. वरवर पाहतां असें दिसतें कीं छापील प्रतींत फक्त ६७ ओव्या अधिक आहेत. परंतु खरी गोष्ट तशी नाहीं.

हस्तलिखितांत नसलेल्या अशा १२० हून अधिक ओव्या छापील प्रतींत आहेत. तर छापील प्रतींत नसलेल्या अशा ५६ ओव्या हस्तलिखितांत आहेत. दोन्हींमध्यें सारख्या अशा ६०–६२ च ओव्या आहेत. म्हणजे छापील ४१ वा अध्याय हा जवळ जवळ नवाच लिहिला आहे.

छापील 'भावार्थ रामायणां'तील पुढील ओव्या हस्तलिखितांत नाहींत या ओव्या उपलब्ध असल्यानें फक्त आंकडे देतोः— ५-१२, १४-२१, २५-३३, ३९-४०, ४२-५५, ५७, ६२-६३, ६६-६९, ८५-९७, १०४, १०७, १११-११६, ११९-१२२, १२४-१४१, १४३-१४४, १४६-१८४; अितक्या ओव्या छापील प्रतींत अधिक आहेत.

तर अिंद्रजिताच्या भुजेची सविस्तर कथा (५–६, १९-२७); रावणाचें सांत्वन (५२–५५); श्रीराम व सुलोचना यांच्या भेटीचें तपशीलवार वर्णन (६४–६७, ७४-८०, ८६–९६); सती जाण्याचा करुणोदात्त प्रसंग (९७–१०३); त्याविळीं झालेली आकाशवाणी (१०४) व अग्नि-वायु यांची साक्ष (१०५, १०८); सुलोचनेनें केलेलें नामस्मरण (११० त अखेर); अेवढा भाग छापील ४१ व्या अध्यायांत नाहीं.

हा अध्याय 'सुलोचना अग्निप्रवेशा'चा आहे. "स्त्रियांनीं सती जाऊंनये अशा मताचे अेकनाथ होते"; असें प्रा. फाटकांचें मत आहे. 'जीवित्व करावें रामार्पण' असें अेकनाथ म्हणतात. सुलोचना 'जीवित्व रामार्पण' करूनच सती जाते. तिच्या अग्निप्रवेशाचें अेकनाथांनीं केलेलें हें वर्णन आतां उपलब्ध झाल्यावर प्रा. फाटकांच्या या मताचाहि फेरविचार करावा लागेल.

५८ व्या प्रसंगात छापील प्रतीहून ज्या अधिक ओव्या आहेत त्यांत 'संकल्प-नदीचें आवरण' कसें 'निरसिलें' हें वर्णन आहे. 'भावार्थ रामा-

यणा' च्या युद्धकांडांतील मला उपलब्ध झालेला हा नवा भाग अभ्यासकांसाठीं पुढें दिलेला आहे.

उपलब्ध हस्तलिखिताच्या आधारें निघूं शकणारे निष्कर्ष असे :—

(१) ४१ व्या अध्यायापासूनच हस्तक्षेप दिसून येतात. आपण ४१ व्या अध्यायापासून पुढें गावबाची रचना असें मानीत नाहीं. तर ४४ व्या अध्यायानंतरची रचना त्याची, असें मानतों. ४१ वा अध्याय त्याचा कां नव्हे ? ( करंदीकरांची 'श्लोकांची कसोटी' अेकनाथांविरुद्ध जाअील ? )

(२) गांवबा डोकावणाऱ्या ओव्या ४४ पासून पुढें आढळतात; या वरून युद्धकांडाचे पुढले अध्याय त्यानें रचले असें मानण्यापेक्षां ह्या ओव्या प्रक्षिप्त आहेत; असें मानणें जास्त सयुक्तिक ठरेल. ह्या ओव्याहि माझ्याकडील प्रतींत थोड्या फार फरकानें आहेत. युद्धकांडाच्या उत्तरभागापुरतें तरी गांवबाचें कर्तृत्व दंतकथेच्या स्वरूपाचें आहे; असें मला वाटतें.

(३) जयरामसुतानें मुखोद्गत केलेलें व अेकनाथांनीं लिहिलेलें पण गहाळ झालेलें 'अहिरावणाख्यान' सांपडल्यामुळें ५४ अध्याय तरी अेकनाथांनीं लिहिले होते; असें मानण्यास हरकत नाहीं. अेवढेंच नव्हे तर अेकनाथांनी— 'सप्तकांड कथन' केलें; असें जयरामसुत म्हणतो. त्यानें तें सर्व रामायण पाहिलेंहि असावें. तो गावबाचा उल्लेखहि करीत नाहीं. गावबाची म्हणून समजली जाणारी ( उत्तरकांडासकट ) रचना अेकनाथांचीच ठरण्याची शक्यता आहे.

(४) गावबा हा 'लेखक' नसून 'लेखकू' असावा. 'ग्रंथ लिहिविजे मजकरवी'; 'माझेनि हातें ग्रंथ लिहिवित'; हे उद्गार गावबाचे मानावयाचे झाले तर अेकनाथ वक्ता व गावबा लेखकू असा अर्थ व्हावयास अडचण नाहीं. 'अहिरावणाख्यान' त्याचें नव्हे, अेकनाथांचेंच.

प्रा. न. र. फाटक व ज. स. करंदीकर यांनीं युद्धकांडअखेर रचना अेकनाथांची—असें मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मी त्यांच्याशीं सहमत होऊं

शकेन. पण ५१ ते ५४ हे चार अध्याय जयरामसुताचे असें वरील दोघांचें म्हणणें मला मान्य नाहीं. छापील ५४ वा अध्याय तेवढा जयरामसुताचा हें माझें मत ग्राह्य व्हावें. अितकाच सर्व विवेचनाचा मथितार्थ आहे.

माझ्या अनुमानांस आणखी अेक आधार आहे. तो म्हणजे 'भावार्थ-रामायणा'च्या कांहीं उत्तरकांडांचा. मुक्तेश्वराच्या नांवावर देखील अेक उत्तरकांड आहे आणि अलीकडेच तें प्रसिद्ध झालें आहे.[१] तें मुक्तेश्वराचें ठरो अथवा न ठरो, त्यानें व अितर कांहीं कवींनीं 'उत्तरकांड'च लिहिलें. यावरून युद्धकांड अखेर तरी अेकनाथांनीं 'भावार्थरामायण' लिहिलें होतें; असा त्यांचा समज होता, असें दिसतें. मुक्तेश्वराचें म्हणून पुढें आलेलें 'उत्तरकांड' खरोखर त्याचेंच ठरलें तर ती अेक या चर्चेंत महत्वाची वाटावी अशी 'नाथांघरची खूण' ठरेल. ज्या नवोपलब्ध भागाच्या आधारें वरील विवेचन केलें आहे, तो माझ्याकडील हस्तलिखितांतील भाग पुढें दिला आहे.

---

१. मुक्तेश्वर कृत भावार्थरामायण : उत्तरकांड; संपादक : प्रा. वसंत स. जोशी. या पुस्तकाचें मी केलेलें परीक्षण 'अिंद्रायणी' (जानेवारी-फेब्रुवारी १९६४) मध्यें प्रसिद्ध झालेलें आहे. जिज्ञासूंनीं जरूर वाचावें.

**प्रसंग ४१.**

भुजा यतां खर्गधारीं । सुलोचना झेली वरच्या वरी ।
म्हणे आदळेल धरेवरी सकुमार भारी स्वामीची ॥ ५ ॥
अभ्यांगमार्जना उद्वर्तन । करुनियां निरांजन ।
घालूनियां लोटांगण । पुसे आपण भुजेसी ॥ ६ ॥

× × × ×

दाखवावया सुमित्रप्रतापरासी । इंद्रजीचा निजशिरासी ।
वानरीं आणिले रामापासी । निश्चयेंसी सुलोचने ॥ १९ ॥
सुमैत्राची यशकीर्ती । दाखवावया शौर्यवृत्ती ।
शिर आणिलें श्रीरामाप्रती । सुनिश्चिती सुलोचने ॥ २० ॥

× × × ×

श्रीराम अतिशयें कणवाळु । श्रीराम परपरमार्थे कृपाळु ।
श्रीराम तो दीनदयाळु । भावार्थभुकाळु श्रीरामु ॥ २२ ॥
श्रीरामु जीवाचें जीवन । श्रीरामु विवेकाचें अंजन ।
श्रीरामुअंकीच नाचें निजधन । भावार्थ भजन श्रीरामु ॥ २३ ॥
तेथें जाउनि उठाउठी । सांगोनि भावार्थाची गोठी ।
धडाशिरा करुनि भेटी । मग तुं उठी सत्यत्वा ॥ २४ ॥
श्रीरामभेटी सकळ स्वार्थु । श्रीरामदृष्टी परमार्थु ।
ऐसा सांगोनि स्वहितार्थु । भुजा निवांतु राहिली ॥ २५ ॥
ऐसिया बोळी धरेवरी । लिहिलिया अर्थुगंभीरीं ।
क्षराक्षरातीत अक्षरीं । वर्णाक्षरीं अभिव्यक्तु ॥ २६ ॥
अर्थगंभीर गुणगहन । देखोनि भुजेचें लेखन ।
सुलोचना अति सज्ञान । सतीत्व पूर्ण प्रारंभी ॥ २७ ॥

× × × ×

लक्ष्मण नव्हे पैं कुमैत्र । तो तंव आज्ञा सत्य सुमैत्र ।
ब्रह्म पावलों परात्पर । सत्यसाचार लंकेशा ॥ ५२ ॥

सुलोचना अनुवादोन । रावणा दीधलें समाधान ।
सावध करुनि दशानन । राजलक्षण स्वयें सांगे ॥ ५३ ॥
निजपुत्र युद्धधर्मी । समुख पडिल्या संग्रामी ।
गुढिया उभवाव्या संभ्रमी । कळिकाळ आह्मी. जिंतिला ॥ ५४ ॥
ऐसें रायाचें लक्षण । सिंव्हासनी शंखस्फुराण ।
सभेसि करणें रुदन । अशुभचिन्ह लंकेशा ॥ ५५ ॥

× × × ×

भुजा घातली सुरवासनी । सतीसी बैसाव्या आसनी ।
सुलोचना तेथें न बैसोनि । निघाली चरणी श्रीरामभेटी ॥ ६४ ॥
पादीका पाईं श्रीरामु टांके । हे बोल वेदवादें लटिकें ।
श्रीरामभेटीचेनि हरिखें । चरणी चामके सुलोचना ॥ ६५ ॥
श्रीरामाचिया भेटी । न चलती परवणीच्यिे कोटी ।
ते चाली आहे उपराठी । सर्वांचा सेवटी श्रीरामु भेटे ॥ ६६ ॥
मींतुंपणाचा सेवटीं । श्रीरामाची सुखभेटी ।
ऐसें जाणोनि गोरटी । उठाउठी निघाली ॥ ६७ ॥

× × × ×

सादर पाहोनि रघुनाथा । धरिला हृदया अतीतता ।
चरणी ठेउनिया माथा । विनवी पतिव्रता श्रीरामा ॥ ७४ ॥
आजि माझें सार्थक धर्म । आजी माझें सार्थक कर्म ।
आजि माझें सार्थक जन्म । आत्माराम पावलें ॥ ७५ ॥
रामुसुमैत्रा भेटवितां । सुलोचना वंदी उल्हासता ।
तुझेंनि प्राप्त रघुनाथा । सायुज्यदाता तूं आह्या ॥ ७७ ॥
खुणाउनी हनुमावीर । देवाविलें इंद्रजीचें शिर ।
हातीं धरुनि सुंदर । काय चतुर अनुवादे ॥ ७८ ॥
बाण भेदले कपाळीं । तें सायुज्याची मुंढावळी ।
बांधिली रणसमेळीं । निजकरजाळें सुमित्रें ॥ ७९ ॥

धन्य सुमित्राचा हातु । येकेचि बाणे बळान्वितु ।
चहुं देहाचें करूनि घातु । सायुज्य समर्थु सुमेत्रें ॥ ८० ॥

× × × ×

तंव ते म्हणे रघुनाथा । तुं वांचवीसी हें तत्वता ।
परी आजि ऐसी मरणावस्था । पुढें सर्वथा मिळेना ॥ ८६ ॥
करितां योगयागादि धर्म । जपतपादि कोटिकर्म ।
अंती नाठवे रामनाम । तो पुरुषोत्तम तुं प्रत्यक्ष ॥ ८७ ॥
तुज देखतां जे मरण । तणें पाविजे ब्रह्म पूर्ण ।
वांचलेयाचें कार्य कोण । भोगतो जाण क्षयरोगु ॥ ८८ ॥
विषयाची विषयविधी । द्वेसी जाहालों परमदंदी ।
धन्य सुमित्र सदूबुद्धी । आधिव्याधी छेदिली ॥ ८९ ॥
तुझें दृष्टीपुढें मृत्यु । मृत्युपरमानंदे तृप्तु ।
धन्यभर्त्तार इंद्रजीतुं । शिरार्थीं रघुनाथु टांकिला ॥ ९० ॥
त्याचेनि धर्में तुजसी भेटी । जाल्या स्वानंद सुखगोष्टी ।
परमानंदें कोंदली सृष्टी । पुरे थापटी वांचवणे ॥ ९१ ॥
चिमटुनियां पायांसी । हनुमा सांगे श्रीरामासी ।
नको वांचवुं इंद्रजीसी । सुलोचनेसि देईं आज्ञा ॥ ९२ ॥
जाणोनि कपीचें मनोगत । हांशिनला श्रीरघुनाथ ।
सीर देउनि त्वरित । चरणतीर्थ दीधलें ॥ ९३ ॥
घेतांचि चरणतीर्थ । सुखें जाहाली सदोदित ।
धन्य भतरि इंद्रजीत । ज्याचेनि प्राप्त श्रीरामु ॥ ९४ ॥
श्रीरामश्रवणें श्रवण निवे । रामु देखतां दृष्टी सुखावे ।
रामु चिंतितांचि वीसावे । स्मरतां पावे परमानंदु ॥ ९५ ॥
ऐसेनि सुखावोनि सुंदरा । वंदुनि हनुमावीरा ।
पुसोनि इंद्रजी कळेवरा । अतित्वरा जावों इछी ॥ ९६ ॥

यक्षिणी वटाचें सेजारीं । भेटी होईल कळेवरीं ।
तेचि वरिले पाठारीं । भुजा दुसरी देखर्ध ॥ ९७ ॥
ऐसें हनुमंतें सांगतां । त्याचें चरणीं ठेविला माथा ।
वंदुनियां श्रीरघुनाथा । निघे उल्हासता सुंदरी ॥ ९८ ॥
धडाशिरा करुनि भेटी । उभय भुजा एकवटी ।
स्नान करूनि गोरटी । सवेग उठी सतीत्वा ॥ ९९ ॥
अग्नी पेटविला साचार । चंदनकाष्टें सहस्र भार ।
सहस्रानुसहस्रीं अगर । बिल्वकाष्टें अपार पेटविली ॥ १०० ॥
अग्नी संस्कारिती द्विजवर । वस्त्रें भूषणें सुवर्णपात्र ।
सफळफळीं फळभार । वाणें विचित्र दीधलीं ॥ १०१ ॥
पाहोनि सूर्याची वास घालूनि सतीत्वाची कास ।
पूजूनियां हुताश । केला द्विजांस नमस्कार ॥ १०२ ॥
स्मरोनि श्रीरघुनाथ । प्रदक्षणा करूनि तेथ ।
माझी साक्षी वदो भगवंत । साक्षभूत निजात्मा ॥ १०३ ॥
झाली अशरीर वाणी । सुलोचना सत्याशिरोमणी ।
परपुरुष नाहीं ध्यानी मनी । जागृती स्वप्नी सुषुप्ती ॥ १०४ ॥
अग्नी वदे निजशब्दीं । निजपती भजली भगवद्बुद्धी ।
नाहीं ईसी पापबुद्धी । सती त्रिशुद्धी सुलोचना ॥ १०५ ॥
साक्षी वदती आंगींचें रोम । जागृती स्वप्नी नाहीं अधर्म ।
सुलोचना सती परम । कर्माकर्म अतित ॥ १०६ ॥
घेता श्रीरामचरणतीर्थे । जाली सर्वार्थी नीर्मुक्त ।
कर्माकर्म अतित । सुनिश्चित सुलोचना ॥ १०७ ॥
वायु साक्ष वदे पाहीं । मी प्राणवृत्ती ( ? ) वादेहीं ।
श्रीराम देखतांचि पैं देहीं । विदेही सती सुलोचना ॥ १०८ ॥
साक्षता निजप्राणासी । सुलोचना अतिउल्हासी ।
केलें अग्निप्रवेशासी । जयजयकारेंसी स्वानंदें ॥ १०९ ॥

पद्मासनें अग्नीवरी । बैसोनि वदे सत्यसुंदरी ।
रामपरमात्मा निजनीर्धारीं । समाह्याभंतरीं आत्मारामु ॥ ११० ॥
रामनामाचें स्मरण । छेदीजीवाचें जन्म मरण ।
रामतारक ब्रंह्मपूर्ण । सकळ कल्याण रामनामें ॥ १११ ॥
नामे भुक्ती नामे मुक्ती । रामनामें परम प्राप्ती ।
नामापाशीं सकळ विश्रांती । नाम त्रिजगती तारक ॥ ११२ ॥
नामा नाहीं कर्मबंधन । नामा नाहीं विधिविधान ।
नाम सर्वार्थी चिद्धन । नाम तें जाण परब्रंह्म ॥ ११३ ॥
ऐसें करितां रामस्तवन । देह गेल हारपोन ।
देहीं देह आलें विदेहपण । नामस्मरण करितांची ॥ ११४ ॥
दोराआंगीं पैं सापपण । तैसें देहा आलें विदेहपण ।
येकाजनार्दना शरण । नाम परिपूर्ण परब्रंह्म ॥ ११५ ॥
ऐसी नामाची निज ख्याती । अभाग्यासीं नुपजे भक्ती ।
सभाग्य नित्य नाम स्मरति । तेवीं दे स्थिती परब्रह्म ॥ ११६ ॥
रामनामाचीया आवृत्ती । देहीं वर्ततां विदेहस्थिती ।
येकाजनार्दनी निजभक्ती । उत्पतस्थीती परब्रह्म ॥ ११७ ॥

**प्रसंग ४६.**

भूमी पडतां राक्षस । बोले मानुनि संतोष ।
चुकविले जन्म मरणास । ह्मणउनि कपीसी नमियलें ॥ ३६ ॥
तुझेनि हातें मरतां । उद्धरलों मी सर्वथा ।
जन्ममरणा ह्मणोनि लाता । श्रीरामी निश्चीती मीनलों ॥ ३७ ॥
शद्बजाला घोरांबर । आंदोळिलें पर्वतशिखर ।
भूमी पडिला पर्वताकार । केला भुभुकार कपिंद्रें ॥ ३९ ॥
येथें अक्षेप असे गहन । पहिलें वंदिलें साधु ह्मणोन ।
अप्सरावाक्यें करुनि हेळण । राक्षस ह्मणोन मारिला ॥ ४० ॥

जो आपण अंतरीं निवाला । तो दृश्यमात्रीं श्रीराम देखे वहिला ।
तेथें राक्षसभास उरला । कपीसी लागला हा बोलु ॥ ४१ ॥
ऐसें ह्मणाल ह्मणें । कपीस ज्ञान पूर्णपणे ।
त्याहीवरी सांगीतलें सुषेणें । राक्षस कपटणे आहे मार्गीं ॥ ४२ ॥
तयाचा उद्धरणालागी । कपिकेशरी आला सवेगीं ।
दुष्ट संव्हारुनि मोक्षमार्गीं । सरता वेगीं तेणें केला ॥ ४३ ॥
जो धर्म मार्ग रूंधितु । त्याचा अवश्य करावा घातु ।
येविषईं भगवद्वाक्यार्थु । पाहा निश्चितु गीतारत्नी ॥ ४४ ॥

श्लोक — परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

हनुमंत पूर्णावतार । दुष्ट दमनी काळाग्नि रुद्र ।
करुनिया साधुचा फुडार । शेषावतार उठउं पाहे ॥ ४५ ॥
धर्ममार्ग जे रुंधिती । त्याची करुनिया शांती ।
धर्मप्रतिष्ठा धर्ममूर्ती । करी निश्चीती युगान्युगे ॥ ४६ ॥
जें अज्ञानाचें लक्षण । जया येकदेशीं भाषण ।
राक्षसभार मेदिनीचा फेडुन । दणाणुन उडाला ॥ ४७ ॥

× × × ×

वर्षाकालिं रविमंडळ । जेवी आछादी अभाळ ।
तेविं आछादुनी धृवमंडळ । नक्षत्रें सकळ सचंद्र ॥ ११० ॥
पुसें कवळुनि पर्वत । सवेग जातां कपिनाथ ।
झडाडिला अंगवात । लोकपाळ समस्त उडें पाहाती ॥ १११ ॥
जैसा मेघ वोळे अंबरीं । तैसा जातुसे कपिकेशरी ।
पडिली घडघुप आंधारी । लोपीजे नक्षत्रीं सचंद्र ॥ ११२ ॥
भरथासि पडिलें दुष्ट स्वप्न । आपुले सव्यबाहसी होतसे छेदन ।
तें देखोनि उठिला गजबजुन । श्रीरामस्मरणे करिता जाला ॥ ११४ ॥

गुरु वसिष्ठासि जागृत केलें ! पडिलें दुःस्वप्न सांगितलें ।
श्रीरामलक्ष्मण वना गेले । काय वर्तलें नकळे तया ॥ ११५ ॥
श्रीरामु आठवला मनीं । अश्रु आले दोन्ही नयनीं ।
गुरु वसिष्ठें समाधान करुनी । शांतीहवन आरंभिलें ॥ ११६ ॥
श्रीगुरुवसिष्ठ प्रवीण । शांतीहवन आरंभुन ।
कुंडी अग्नी प्रतिष्ठुन । मंत्र वेदोक्त उच्चारिलें ॥ ११७ ॥
भरतें स्नानविधी सारिली । होमसामग्री सिद्ध केली ।
अग्नीमाजि आहुती दीधली । उपराउपरी संत्रुस ॥ ११८ ॥
ऐसा संतोषउनि अग्नी । पूर्णाहुती दीधली उपचारें करुनी ।
स्वप्न निर्वृत्ती हो त्यालागोनी । शांतीहवन संपविलें ॥ ११९ ॥
कल्याण असो रामलक्ष्मणासी । सदां सौभाग्य असो जानकीसी ।
ह्मणौनियां अति आदरेंसीं । शांतीहवन संपविलें ॥ १२० ॥
तंव आकाशमार्गेकरुनि । महाप्रचंड गिरी उचलुनी ।
हनुमा जातुसे श्रीरामस्मरणी । तें भरथरायें लक्षिलें ॥ १२१ ॥
मग ह्मणे गुरुवसिष्ठासी । काय जातें नकळे आकाशीं ।
दुष्टस्वप्नाचिया दृष्टांतासी । हें विघ्नचिन्ह उदेलें ॥ १२२ ॥
ह्मणौनि निरीक्षितेस गगनी । तें कांही केल्या निर्धारेना मनीं ।
मग श्रीरामस्मरणें करुनि । विचार करी भरथरावो ॥ १२३ ॥

**प्रसंग ५४.**

मारिला देखोनि महिरावण । क्षणेकु मनातें करी उपशमन ।
बोलता जाला अहिरावण । पाहा हो कर्म चुकेना ॥ १ ॥
कैंचा राम कैंची सीता । कैंचा रावण आह्मा भ्राता ।
कैंचा दुत पाठविला । सर्वानर्था बोडवलें ॥ २ ॥
निरापराधें करुनि कपट । आमुचें बोंडवलें तळपट ।
ऐसेंचि कर्म दुर्घट । आमुचें आह्मां प्राप्त जाहालें ॥ ३ ॥

स्वच्छ असतां लंकनाथ । आम्हासी सैन्यापरिस अधिक मानित ।
आह्मी पुरुषार्थी ह्मणोनि येथ । राज्य करणें पाताळीं ॥ ४ ॥
आणीक असो त्याचें कर्माचरण । चतुराननासि करितां छळण ।
त्या प्रसादें आह्मीं समस्त जाण । राक्षसत्व पावलों ॥ ५ ॥
सत्प्रवृत्तीनें असतां । आराध्य करुनि विश्वनाथा ।
संतोषविलें नाना प्रयत्नता । त्या प्रसादें हें ऐश्वर्य ॥ ६ ॥
पाहा हो केवढें देणे ईश्वराचें । आपणासमान करुनि निरुतें ।
त्रैलोक्य देउनिया साचें । निजगणाआंत स्थापिलें ॥ ७ ॥
संपती आणी कळत्र । इंद्रादिका जें दुर्लभ पदार्थ ।
तेथें आर्थ स्वयें पुरवित । महिमा येथें कळेना ॥ ८ ॥
ब्रह्मांदिकां आदि देव । सेवक करुनि ठेले सर्व ।
मृत्यलोकीचे राजेमानव । किंकरत्वें दास्य करवितो ॥ ९ ॥
त्याच्या उन्मादें करुनि । पार्वती मागों गेला जगज्जननी ।
नेदी ह्मणतां संकोचला मनी । ते समई वचन मानिलें ॥ १० ॥
मग राहोनि ध्यानस्थ । अंतरीं स्मरिला आत्मा रघुनाथ ।
दुष्ट प्रवर्तला सृष्टीआंत । तयाचा संव्हार करीं स्वामीं ॥ ११ ॥
जहालें वेदाचे उच्छृंखळण । गेले नीतीधर्मांचे आचरण ।
अन्योन्य प्रवर्तलें पूर्ण । पाप दारुण प्रवर्त्तलें ॥ १२ ॥
मग कर जोडुनि करी स्तवन । बहुत श्रोत्रीं करी विनवण ।
मस्तक ठेउनि चरणी पूर्ण । अत्यानंदें करुनियां ॥ १३ ॥
मज जी अभय तुझें होतें । शंख धमाडल्या विवस्वतें ।
निश्चयें यावें न निरुतें । तरी या समई पावावें ॥ १४ ॥
मग कृपेचेनि करुणाकरें । सुप्रसन्न होउनियां सादरें ।
अभय होउनि अत्यादरें । भविष्य पुढें जाणोनियां ॥ १५ ॥
करी रे वेदांची स्थापना । चालवी धर्मांची प्रतीज्ञा ।
सुखी ठेवी जीवा सर्वज्ञा । संतां सुत्रसंरक्षी ॥ १६ ॥

ऐसें कृपेचें वचन । परोपकारीं अमृतासमान ।
संतोषोनि राम चिद्घन । हृदयस्थ तो प्रकट जाला ॥ १७ ॥
अभय असो जनातें । मी नुलंघी तुझ्या वचनातें ।
दुष्ट संव्हारुनि निश्चितें । जाण निरुतें महेशा ॥ १८ ॥
स्वभावेंचि होणारासारिखें । दशरथकौशलेनें मत्त केलें नीकें ।
आह्मासी अवतार घेणें सुखें । अंबऋषीवचनार्थी ॥ १९ ॥
आतां तुह्मासहित समस्त देव । मृत्यलोकीं किस्किंधा अपूर्व ।
तेथें येउनियां रुक्ष सर्व । वानर स्वमेव होउनि यावें ॥ २० ॥
माझे शक्तीचेनि मिसें । उपपादुनि कार्यावसें ।
उत्धरुनी तापसींच्या लक्षें । मीं अव्यक्त व्यक्ती प्रगटेन ॥ २१ ॥
ऐसें सिवाचें समाधान । करुनि अदृश्य जाला नारायण ।
आश्चिर्य मानी भवानी आपण । कोण महिमान शंकराचें ॥ २२ ॥
अल्हादें जाहाली सद्गदित । चरणी माथा ठेवित ।
मज होवावया ज्ञान प्राप्त । करी निश्चीत प्राणनाथा ॥ २३ ॥
भविष्य जाणोनि आपण । परम अल्हादें दे आळिंगण ।
उमे पावसी ज्ञान पूर्ण । छळण करिता योमागिरी ॥ २४ ॥
ऐसी पाहा हे पूर्वील वार्ता । आपणासमवेत मारिलें समस्तां ।
कोणकोण्या कर्मा शरण जावें आतां । भविष्यवार्ता चुकेना ॥ २५ ॥
ऐसी जाला खेदखिन्न । दुःखें फुटों पाहे हृदय जाण ।
मग धैर्य धरुनियां पूर्ण । करी स्मरण कामाक्षेचें ॥ २६ ॥
म्हणे पावें समयकाळीं । चरण ध्यातों हृदयकमळिं ।
मानसपूजेचें आहाळबळी । प्रसन्न केली कुळदेव्या ॥ २७ ॥
तंव बोलिली आद्यशक्ती । कोणे अर्थी येतोसी काकुळती ।
तें सांग मजप्रती । यथा निगुती अहिरावणा ॥ २८ ॥
तुजनिमित्यें शेषें आपण । स्तवन करुनि वंदी चरण ।
ये समई अहिरावण । वांचवीं ह्मणउनि बोलतु ॥ २९ ॥

दुष्ट कर्मांचा अटाटीं । तुह्मी आचरलेती कोट्यानुकोटी ।
न स्मरोनि उठाउठी । शरण येता मजलागीं ॥ ३० ॥
न रक्षितां तुह्मालागी । जघन्यप्राप्ती मज जगीं ।
वर दीधल्या सवेगीं । बाधा वेदोक्तीं पावावें ॥ ३१ ॥
आजीवरी दीधला इहलोक । आतां भोगाल परलोक ।
सुख पावाल संग्रामीं देख । अंबा स्वमुखें बोलती जाहाली ॥ ३२ ॥
लाहोनि अंबेचें वचन । हर्षे रणी मांडोनि ठाण ।
भस्म जालें पाप ह्मणोन । कृतकल्याण स्वयें मानी ॥ ३३ ॥
ह्मणे मी धन्य आजी आपण । उभयसुखभोक्ता जालों जाण ।
कोण माझा भाग्योदयो पूर्ण । स्वस्वरूप मी पावेन ॥ ३४ ॥
करुनि महिरावणा उध्वगती । त्याच्या पत्न्या स्वयें निघाल्या सती ।
राज्य उपेक्षुनि रणाप्रती । स्वयें निश्चती चालिला ॥ ३५ ॥
शस्त्राअस्त्रीं सन्नध । बरथ रथीं बैसला सावचित्त ।
सारथ्यातें ह्मणे प्रेरी रथ । जेथें रघुनाथ उभा असे ॥ ३६ ॥
क्रोधें गडगर्जना करित । आला जैसा काळ कृतांत ।
आरक्तलोचन भंवडित । ज्वाळाकुळित सत्राणें ॥ ३७ ॥
श्रीराम पुसे हनुमंतातें । हा कोण येतो सांग मातें ।
मारुती सांगे निश्चितार्थें । अहिरावण युद्धातें स्वयें येतो ॥ ३८ ॥
महिरावणाचा धाकुटा बंधू । पाहोदें याचा पुरुषार्थु ।
ह्मणौनि धनुर्षि घातला हातु । क्रोध प्रळयांत खवळला ॥ ३९ ।
पुढां होउनि अहिरावण । स्वयें त्यांसि बोले रघुनंदन ।
तुज निर्दळील न लगतां क्षण । परमप्रतापी हनुमंतु ॥ ४० ॥
ऐकोनि तयाचें वचन । बोले श्रीरामेसीं क्रूर वचन ।
भला सांपडलासी न सोडीं जाण । पाहें राणांगण पैं माझें ॥ ४१ ॥
माझेनि हातें तुज मरण । येक उरलासे रावण ।
त्याचें संपलें युद्धाचरण । पुढें सुगम धर्मसंस्छा ॥ ४२ ॥

ऐसें ऐकोनि वचन । क्रोधा आला वायुनंदन ।
आरे दुष्टा दुर्जना । आझुनि कैसा राहिलासी ॥ ४३ ॥
जो कां अंतका अंतक । तो वानर आलों आम्ही देख ।
झेलित पर्वत आलों ऐक । वांचवीं आवश्यक प्राण आपुला ॥ ४४ ॥
आवेशु आला अहिरावणासी । क्रोधें प्रेरिली वायुशक्तीसी ।
आदळतां हनुमंताच्या मस्तकासीं । जाला मारुती भ्रमभूत ॥ ४५ ॥
आश्चीर्यातें हनुमंत मानी । पीता कां आला समरंगणीं ।
काय वंचलों रामसेवेलागोनि । आला कृपेनें लवलाहें ॥ ४६ ॥
ऐसें देखोनि हनुमा भ्रमित । मनी जाणोनि दुष्ट मत्त ।
अहिरावण तेथें काय करित । अघोरास्त्र प्रेरिलें ॥ ४७ ॥
दंडास्त्र आणि खंडास्त्र । रौद्रास्त्र आणि दमनास्त्र ।
नरुसिंव्हास्त्र आणि भैरवास्त्र । स्वयें काळास्त्र प्रेरिलें ॥ ४८ ॥
सर्वेचि प्रेरिली वाराहशक्ती । त्यामागें सवेंचि यमशक्ती ।
स्वयेंचि प्रेरिली पाशशक्ती । दुर्धरशक्ती वरुणाची ॥ ४९ ॥
तेचि संधि लवलाहें । आला रथेंसी आफळुनि बाह्यें ।
तुज राखेल कोण माय । ह्मणौनि रोखें आकळिला ॥ ५० ॥
दृढ धरुनि आवेशु । करूं पाहे येकचि ग्रासु ।
दंष्ट्रा दंडिला वानरेशु । राहोग्रस्तु जैसा रवी ॥ ५१ ॥
आश्चिर्य मानी रामचंद्रु । स्वर्गी सुरवरां आहाकारू ।
भूतळिं रुषेश्वरां चींता थोरू । सुमैत्र साचार स्तब्ध जाहाला ॥ ५२ ॥
नारद येवुनि ते संधी । हनुमा प्रबोधिला सद्बुद्धी ।
सावध होईं तुज कोण बाधी । मन आन ठाईं घालुं नको ॥ ५३ ॥
कैचा पिता वायुदेवो । हें अहिरावणाचें लाघव ।
आतां स्मरोनि श्रीराघव । करीं अपूर्व युद्धातें ॥ ५४ ॥
तुं वज्रदेही लाठा । पुरुषार्थ आपुला न करीं खोटा ।
मारीं अहिरावणा दुष्टा । धर्मवाटा रोधिली ॥ ५५ ॥

तंव ह्मणें हनुमंतु । मीं कां जाहालों भ्रमितु ।
सीरीं असतां श्रीरघुनाथु । करीन घातु दुष्टाचा ॥ ५६ ॥
मग विचारुनि पोटीं । वळुनियां वज्रमुष्टी ।
उसळोनियां गगनपुटीं । क्रोधदृष्टी न्याहाळितुसे ॥ ५७ ॥
करूं पाहे रणनर्तन । देव जाहाले आनंदघन ।
उठिला आमुचा वायुनंदन । करील हनन दुष्टाचें ॥ ५८ ॥
स्वर्गमृत्यमाताळिंचे देव । त्याही प्रार्थीला राघव ।
अद्यापी कोण पाहाणे अपूर्व । तोडींना संदेह आमुचा ॥ ५९ ॥
मग ह्मणे श्रीरामचंद्र । अवश्य मारी राक्षसेंद्र ।
काय पाहातोसि याचें चरित्र । तु कपींद्र पुरुषार्थी ॥ ६० ॥
आज्ञा लाहोनि हनुमंतु । मज तुष्टला श्रीरघुनाथु ।
आतां करिन शत्रुचा घातु । क्षणार्ध लागों नेदीं ॥ ६१ ॥
हनुमा श्रीराम विचार करी । तंव अहिरावण आला श्रीरामावरी ।
तें देखोनियां झडकरी । धनुष्य सज्ज करी रामु ॥ ६२ ॥
अहिरावणें पांच बाण । श्रीरामावरी सोडिले जाण ।
ते वरिच्यावरी छेदुन । धनुश करीचें छेदिलें ॥ ६३ ॥
श्रीरामे तीक्षण बाण । सोडुनि विंधिला अहिरावण ।
तेणे रुधिरप्रवाहो उसळोन । राक्षसराज त्रासिला ॥ ६४ ॥
अहिरावणाच रक्तबिंदु पडे । तेथें प्रतिबिंबें होउनि राहाती पुढें ।
तें आश्चीर्य देखोनि वाडेकोडें । श्रीरामरावो विस्मित ॥ ६५ ॥
अहिरावणाचें सहस्त्र बिंदु । तितुकेही अहिरावण सुबुद्धु ।
रघुनाथासिं करावया युद्धु । उभे राहाती रणरंगीं ॥ ६६ ॥
श्रीराम धनुवाडा नेटका । बाण सोडिला अति नेटका ।
सकळ अहिरावण वधुनि देखा । श्रीराम उभा रणरंगीं ॥ ६७ ॥
तें देखोनि अहिरावण । सहस्त्रसंख्या सोडी बाण ।
श्रीरामें शर सोडुनि जाण । बाणेंबाण निवारिले ॥ ६८ ॥

श्रीराम सर्वोचि शर सोडी । अहीरावणातें घाई पाडी ।
रुधिरथेंबें अहिरावणाच्या जोडी । पुनःपुन्हा होती असंख्य ॥ ६९ ॥
ऐसें युद्ध अति दुर्धर । केलें तरी न पडे तो राक्षस क्रूर ।
तें देखोनि सुमैत्र विर । परम आश्चीर्य पावला ॥ ७० ॥
ऐसें श्रीराम अहिरावणासी । युद्ध होतसे अति कर्कसी ।
तें देखोनि हनुमंतासी । अति आवेशु चढिन्नला ॥ ७१ ॥
हनुमंत विचारी मानसीं । अहिरावणा मरणयुक्ती कैसी ।
हें विचारूं मकरिसी । ते स्वभावेसीं सांगेल ॥ ७२ ॥
मग समुद्रतीराप्रतीं । बोलावुनि मकरेसी पुसे गुह्योक्ती ।
अहिरावणा अमरत्वप्राप्ती । कैसेन स्थिती सांग पां ॥ ७३ ॥
मीं सर्वस्वेसीं युक्तायुक्ती । युद्ध करितां अपरमिती ।
श्रीराम शस्त्रास्त्रीं मारी निश्चितीं । तऱ्ही अहिरावण मरेना ॥ ७४ ॥
आणीक येक आपूर्व पाहीं । अहिरावणाचें रक्त पडे पाहीं ।
ते ठायाहुनि लवलाहीं । प्रतिरूप पाहीं राक्षसांचें ॥ ७५ ॥
ऐसें अहिरावण लक्षावधी । रामें मारिलें क्षणार्धी ।
तऱ्ही न मरेची कुबुद्धी । कोण युक्ती करावी ॥ ७६ ॥
मग मज सांगीले नारदानें । यासि युद्ध करितां व्यर्थ श्रमणें ।
हा मृत्य पावे कवणे गुणें । ते विवंचना करावी ॥ ७७ ॥
ऐसें सांगतां हनुमंत । मकरा ह्मणे स्वामीचें मनोगत ।
क्षणार्धें करीन फळितार्थ । बहुवचनार्थ काय बोलों ॥ ७८ ॥
आतां ऐकें प्राणनाथा । अहिरावण अजेय सर्वथा ।
याणे अनुष्ठान करुनि तत्वता । शेष प्रसन्नता केला असे ॥ ७९ ॥
निराहारी निरोदक । नेत्र करुनि सूर्याभिमुख ।
येकांगुष्टावरी उभा राहुनि देख । मंत्र जपे सबीज ॥ ८० ॥
शेष ह्मणें जाहालों प्रसन्न । मागसी ते देईन जाण ।
येरू म्हणे रणीं मरण । सर्वथा जाण देउं नको ॥ ८१ ॥

हांसोनि बोले सर्पराज । जन्मा आलियां न मरे चोज ।
इंद्रादिक मरतील सहज । तेथें तुज कवण पुसे ॥ ८२ ॥
अहिरावणा ऐकें सावधान । तुज युद्धिं मारितां जाण ।
रक्तबिंदु पडे आपण । त्यांत भूमीस जाण पडेल ॥ ८३ ॥
जाहालियां भूमि स्पर्श । अ(हि)रावणे उठती असमसाहास ।
देवांचा करिती नाश । विजयाभिनिवेश पावती ॥ ८४ ॥
आणीक येक वरदान ! अल्हादें देईन तुजलागुन ।
पाताळींचें अमृत जाण । भ्रमर आपण आणितील ॥ ८५ ॥
तें प्रोक्षितां तुझ्या प्रेतासी । दिव्यकांती येउनि तुं उठसी ।
परमयोद्धा पाताळवासी । विजयी होसी सर्वथा ॥ ८६ ॥
या दोही जो अवरोधी । तो तुझा वैरी त्रिशुद्धि ।
त्याचेनि हातें मरणविधी । जाण निश्चितीं पावसी ॥ ८७ ॥
मग शेष आपण । स्वस्छाना गेला जाण ।
येर लाहोन वरदाभिमान । स्वयें आहिरावण परतला ॥ ८८ ॥
वरदबळें मातला राक्षसराजा । पराभविल्या देवांच्या फौजा ।
बोलाउनि रावणराजा । लंकेमाजी स्छापिला ॥ ८९ ॥
पुनरपीं अहिरावणे । अनुष्ठान आरंभिलें चौगुणे ।
मार्गो आदरिलें चंद्रसेने । शेषकन्यालागोनी ॥ ९० ॥
तपेंकरूनि आगळा अहिरावण । स्वयें येउनि मागे कन्यारत्न ।
आपण संतोषला जाण । देउनि चंद्रसेनाचिद्रत्न धाडिला ॥ ९१ ॥
ते म्हणे मी शेषकन्या । वरीना राक्षसदुर्जना ।
तो होय माझा गुरुबंधु जाणा । यासि अंगसंज्ञा करीना ॥ ९२ ॥
ह्मणौनि आदरिलें तपाचरण । भ्रतार होवा नारायण ।
ऐसें करितां अनुदिन । तें मकरेसि कळों सरलें ॥ ९३ ॥
मकरा ह्मणे साजणी । नार्भी ह्मणे आपुलें वचनी ।
तुं पावसी माझे प्रयत्नी । हरीलागोनि भर्त्तारू ॥ ९४ ॥

तें आजी वचन फळा आलें । चंद्रसेनेचे भाग्य उदले ।
जरी अंगीकारिलें रघुनंदनें । तरी म्यां क्षणार्धे साधिन ॥ ९५ ॥
हें सकळही कारण । चंद्रसेना मुख्य जाण ।
तीचे आधीन आहिरावण । तो हें गुह्य जाणेना ॥ ९६ ॥
ऐसे जाणोनि उपपरी । मकरा म्हणे कपिमूर्ति अवधारीं ।
त्वरितें जाईन चंद्रसेनेघरी । कार्यत्रिशुद्धी साधीन ॥ ९७ ॥
तरी आतां शफथवचन । स्वामीने द्यावें आपण ।
अन्यथां आणिक प्रयत्न । सर्वथा जाण साधेना ॥ ९८ ॥
तीच्या तपश्चर्यांपुढें । ब्रह्मा काय बापुडें ।
तियेवांचोनि वाडेकोडें । आहिरावण न मरवे ॥ ९९ ॥
आतिसत्वर हनुमंते । न विचारितां श्रीरामातें ।
देउनियां निजशफथातें । मग मकरेतें धाडिलें ॥ १०० ॥
सत्वर पातली गृहासी । येउनि चंद्रसेनेपासी ।
बोलाउनि येकांतासी । गुह्यें त्यापासीं सांगती जाली ॥ १०१ ॥
साजणी ऐकें सावधान । तुझें तप फळलें जाण ।
जें तुझें मनी होत पूर्ण । तें सर्वंही आजी फळासी आलें ॥ १०२ ॥
येरी ह्मणे मकरे मातें । चरणक्षाळण करीन तुतें ।
षोडशोपचार पूजनेतें । करीन आर्तें मनोभावें ॥ १०३ ॥
ऐसें करूनि विनवण । मकरा पूजिली संपूर्ण ।
मग ह्मणे माझे हृदईचें ज्ञान । तुज कैसोनि कळलें साजणीयें ॥ १०४ ॥
यरी ह्मणे हनुमत्प्रसादे । मज हृद्गत प्राप्त निजबोधें ।
ऐसें जाणोनि आल्हादें । आले सत्वर तुजपासीं ॥ १०५ ॥
कपिवचनप्रसादगती । श्रीराम भ्रतार तुज निश्चितीं ।
ऐसें करूनि आल्यें युक्ती । शकुनग्रंथी बांधी पदरीं ॥ १०६ ॥
येरी ह्मणे गुह्यवचना । कळों नेदावें सर्वथा आना ।
ह्मणउनि धरिले दृढ चरणा । सीघ्र आपण करूं माय ॥ १०७ ॥

येरी ह्मणें न करीं उसीर । कार्ये साधिं सत्वर ।
येचि घडी हनुमावीर । येउंदे सत्वर भेटीसीं ॥ १०८ ॥
मग न लगतां अर्धक्षण । भेटउं ह्मणे चंद्रसेने ।
हनुमा तेथें आणिला जाण । अभयवचन देवविलें ॥ १०९ ॥
हनुमा ह्मणे चंद्रसेनेसि । श्रीराम भर्तार पावसी ।
युक्ती सांग अहिरावणवधासी । सत्वरेंसी आमुतें ॥ ११० ॥
येरी म्हणे माझी तपस्छिती । अहिरावण अवध्य त्रिजगती ।
आतां न लगे निमीष्यगती । वधी सर्वार्थीं दुरात्मा ॥ १११ ॥
आधिं जाण अमृतापासीं । भ्रमर विचरती ते प्रदेसीं ।
अमृत घेउनि युद्धसंधीसी । प्रेत अहीरावणाचें उठविती ॥ ११२ ॥
आधिं साधुन तयांतें । नमस्कारूनि शेषराजातें ।
आशिर्वचन लाधुनि त्वरितें । मग अहिरावणातें वधी पां ॥ ११३ ॥
वचन मानिलें कपीसी । संव्हारिता जाहाला भ्रमरासी ।
ते काळीं श्रेष्ठ भ्रमर येउनि पायांसीं । अतिकरुणेसिं बोलतु ॥ ११४ ॥
जीवदान दे मज तुं ये समईं । विनउनिया माथा ठेवी पाईं ।
मीं येईन येके समईं । सेवेलागोनि कपिराया ॥ ११५ ॥
मग हांसोनियां हनुमंते । संरक्षिलें श्रेष्ठ भ्रमरातें ।
नाभी म्हणउनियां स्वहस्तें । अतिप्रेमे सोडिलें ॥ ११६ ॥
मग नमिले शेषाते । साह्य होईं गा आमुतें ।
येरु म्हणे वधी दुष्टातें । अद्यापीं येथें कां ठेविलें ॥ ११७ ॥
मग परतला कपिराणा । वंदूनियां श्रीरामचरणा ।
वृत्त सांगोनिया कर्णा । नेत्रसंज्ञा लाधला ॥ ११८
मग दीधला भुभुकार । कोपें जाला काळाग्निरुद्र ।
आवेश जैसा प्रळयसमुद्र । ब्रह्मांडगोळ बुडवुं पाहे ॥ ११९ ॥
पाताळवासियांचा संव्हार । येके मिसें करुनि रामचंद्र ।
हनुमंत आपण सुमैत्र । आले गर्जत रणभूमीसी ॥ १२० ॥

ह्मणउनी आवेश धरुनि जाण । अहिरावण धरिला आकळुन ।
पुढें करचरण बंधोन । करी गहन तें ऐका ॥ १२१ ॥
मग ह्मणें स्मरें आपुलें कुळदैवत । चहुदेहा करीन शांत ।
तुज आतां मरणकाळ प्राप्त । व्यक्त अव्यक्तिं मीळविन ॥ १२२ ॥
अहिरावणु ह्मणें हनुमंतातें । मज ज्ञान आहे कुळदेवी अनुमतें ।
जंव मारिलें नाहीं तुतें । तंवपरियंत सोडीना ॥ १२३ ॥
क्रोधें नेत्र फोडुं पाहे । तंव हनुमंतें केलें काये ।
पोट चिरुनि काढिलें पाहे । अंत्रमाळेलागोनी ॥ १२४ ॥
काढुनियां अंत्रमाळा । हनुमंतें घातलीयां गळा ।
तेणे शाभतसे गोळांगुळा । नृसिंव्हासमान ॥ १२५ ॥
स्वर्गीं देव करिती जयजयकार । नादें कोंदलें अंबर ।
देव वरुषती सुमनभार । आनंदु सकळा प्रवर्तला ॥ १२६ ॥
उमा प्रार्थी चंद्रमौळीसी । माझी विनंती परियसीं ।
विमान पाठवीजे पाताळासी । अहिरावणासी आणावया ॥ १२७ ॥
म्हणे तुझें वचन होवें सत्य । विमान पाठविन तेथ ।
तुझा गेलिया वचनार्थ । विश्व सकळ उपहासील ॥ १२८ ॥
ऐसें बोलोनियां जाण । वीमान पाठविलें त्या स्छाना ।
बैसउनि अहिरावणा । मग गमना उसळलें ॥ १२९ ॥
तंव तया जाहालें पूर्ण ज्ञान । अम्ही तरी शक्तीचें मुख्य गण ।
पावलों शिवसन्निधान । आद्याशक्ती कृपेने ॥ १३० ॥
ऐसेनि आनंदेसि जाण । प्रार्थुं आदरिलें कपिनदंन ।
तुझ्या हातें समरंगण । कृतकल्याण पावलों ॥ १३१ ॥
तोडुनि हाडांची बेडी । तुवां चढविलें मोक्षसिडी ।
उभउनि स्वानंदाची गुढी । सायुज्यगोडी पावलों ॥ १३२ ॥
दुरुनि देखोनि श्रीरामातें । म्हणती आम्ही पावलों मोक्षधर्मातें ।
छेदुनियां मोहभ्रमातें । मग श्रीरामातें न्याहाळितें जाहालें ॥ १३३ ॥

संपूर्ण न्याहाळुनि श्रीरामासी । नमस्कारुनियां अतिप्रीतीसी ।
तुझी महिमा न कळे कोण्हासी । प्रत्यक्ष आत्मा होसी विश्वाचा ॥१३४॥
सवेंचि विमान चालिलें । कैलासभुवनाप्रती गेलें ।
मग भवानिसी नमीयलें । निवांत राहीलें स्वानंदें ॥ १३५ ॥
यानंतरें रघुनाथें । पाचारुनि मकरध्वजातें ।
अपुनी[1] महीरावणराज्यातें । पट्टाभिषेकु मग केला ॥ १३६ ॥
तदुपरी अहिरावणपुत्र जाण । श्रीरामा आले शरण ।
घालूनियां लोटांगण । विनितता नमीयेलें ॥ १३७ ॥
करुणावाचा परिसोनि जाण । हृदइं संतुष्टला रघुनंदन ।
नाभी म्हणोनियां प्रधानपण । मकरध्वजाकरीं वोपिलें ॥ १३८ ॥
ज्यांगट पिटिलें राजनगरीं । आनंदु जाहाला नरनारी ।
तोरणपताका घरोघरी । अतिउत्सावो मांडिला ॥ १३९ ॥
तदुपरी मकरध्वजानें । पुर्सो आदरिलें संतोषपणे ।
श्रीरामासांघातें मज लागेल येणे । ह्मणोनि विनविलें कपिनाथा॥१४०॥
हनुमंत ह्मणे मकरध्वजासी । जें जें असेल तुझ्या मानसीं ।
तें तें पावसी निश्चयेसी । मदनुग्रहेंसि ममात्मजा ॥ १४१ ॥
संतोषोनियां कपिराजु । हातीं धरुनि मकरध्वजु ।
पुजावया रघुराजु । अति सत्वरू चालिला ॥ १४२ ॥
सवेग आणुनि श्रीरामाजवळी । मस्तक ठेवविला चरणकमळिं ।
आपण होउनियां बध्वांजुळी । स्वयें तिष्टतु विनवितसे ॥ १४३ ॥
जयजयाजी सर्वोत्तमा । आनंदघनपूर्णकामा ।
परात्पर आत्मया रामा । माझी विज्ञापना परिसावी ॥ १४४ ॥
मकरध्वजाचें मनोगत । तुजसवें यावें इत्थंभुत ।
याचा मनोरथ करुनि निश्चित । मग स्वराज्यासी पाठवावें ॥ १४५ ॥
श्रीरामु म्हणे हनुमंतासी । हेंचि होतें माझ्या मानसीं ।
अवश्य नेउनि मकरध्वजासी । सुग्रीवादिकांसि भेटावया ॥ १४६ ॥

तदुपरी मकरध्वजें । कर जोडुनि विनवी वोजें ।
पुजा माझी रघुराजें । घेउनि प्रयाण करावें ॥ १४७ ॥
आवाहनादि षोडशोपचार । पूजा करुनियां मनोहर ।
अर्पूनियां दिव्यालंकार । श्रीरघुराज पाठविला ॥ १४८ ॥
तैसेंचि सुमेत्र आणि हनुमंतासी । पूजा करुनि अति उल्हासीं ।
मुकुटकुंडलें रत्नमाळेसी । अतिहरुषेंसी धाडिलें ॥ १४९ ॥
हें ऐकोनि कथन । शेष आला धांवोन ।
वंदूनि रामलक्ष्मण । मनोहरमणी अर्पिला ॥ १५० ॥
पुनरपीं करुनि स्तवन । नमूनियां रघुनंदन ।
स्वयें घालूनियां लोटांगण । स्वस्छाना आपण चालिला ॥ १५१ ॥
स्वर्गीं उत्साबो देवांसी । अतिहरुष रुषेश्वरासी ।
वरुषोनि सुमन संभारेसीं । हति हरुषोनी गर्जती ॥ १५२ ॥
तदुपरी श्रीरघुनाथें । अश्वासुनी समस्तातें ।
हातीं धरुनि मकरध्वजातें । अंबालयाप्रति चालिला ॥ १५३ ॥
घेउनि सुमनसंभार । पुजासामग्री चतुरस्त्र ।
पुढें करुनि वाद्यांचा गजर । पातले महाद्वार देवीचें ॥ १५४ ॥
करुनियां भोंगावतीस्नान । संध्याजप माळिंगार्चन ।
ऋषीसी देउनी नित्यदान । मग पूजन आरंभिलें ॥ १५५ ॥
कलशप्रतिष्टा पीठप्रतिष्ठा । आवर्णादि देवप्रतिष्ठा ।
स्वप्नमुद्रादि ज्ञाननिष्ठा । येकाग्रचित्तें पूजित * ॥ १५६ ॥
करुनि देवीचें आवाहन । बैसों घाली सिंव्हासन ।
पाद्य अर्ध्य मधुपर्क विधान । वस्त्र चंदन अर्पिलें ॥ १५८ ॥
सवेंचि देउनि उत्तरापोशन । मुखहस्तपादादि प्रक्षाळन ।
करुनियां शुद्धाचमन । उत्तरपूजन मांडिलें ॥ १५९ ॥

* १५७ वी ओवी गळली असावी किंवा १५८ हा आंकडा चुकून पडला असावा

अर्पूनियां सुगंध तांबोल । पुढें ठेउनि अमृतफळ ।
तुझें दर्शन सफळ । ह्मणोनि चरण वंदिलें ॥ १६० ॥
वंदोनियां मंत्रस्वर । करितां निरांजनाचा गजर ।
अर्पूनियां सुमनसंभार । प्रदक्षिणानमन करिते जालें ॥ १६१ ॥
तंव तेथें आश्चीर्य जाहाले । प्रत्यक्ष अंबेने स्तविलें ।
तुझ्या अर्चेनें मी जगद्वंद्य जालें । पावन जाहाल्यें त्रैलोकीं ॥ १६२ ॥
मग उठोनि लागली पायां । धन्य तुझा महिमा रघुराया ।
अव्यक्ताव्यक्तीसी लवलाह्या । येउनि भक्तजना रक्षापिलें ॥ १६३ ॥
आतां सीघ्र करीं गमन । वधी रावण दुर्जन ।
त्रैलोक्य करीं सुखसंपन्न । जनकनंदनी समवेत ॥ १६४ ॥
आज्ञा वंदुनि शिरीं । निघता जाल झडकरी ।
समवेंत सेना गडगजरीं । बिळद्वारीं पातलें ॥ १६५ ॥
पाताळवासियांचा संव्हार । येकोमिसें करुनि श्रीरामचंद्र ।
हनुमंत आपण सौमित्र । आले गर्जत बिळद्वारीं ॥ १६६ ॥
संतोषें सभा दाटली । हनुमंत उभा बद्धांजुळी ।
विनविता जाला नृपमौळीं । स्वामीनें बिनंती परिसावी ॥ १६७ ॥
संतोषला रामराणा । बोल वहिला भक्तरत्ना ।
सर्वथा नुलंघी तुझ्या वचन । कल्पांत आलियां देख ॥ १६८ ॥
हनुमा ह्मणे चंद्रसेनेसी । सपत्नी करीं तीयेंसी ।
अंगसुख देउनि तियेसी । अतिउल्हासी प्रणावी ॥ १६९ ॥
मग बोले रघुनाथ । येकपत्नीव्रत मज निश्चित ।
कैसेन घडेल आन प्राप्त । चंद्रसेनेलागोनी ॥ १७० ॥
वचना गुंतला कपिराणा । चंद्रसेनेलागोनि जाणा ।
हासें आलें रघुनंदना । काय वचन बोलतु ॥ १७१ ॥
राम म्हणे अंजनीसुतासी । चंद्रसेनेसी आणी मजपासीं ।
संपादीन तिच्या वचनासी । आपुल्या व्रतासि रक्षिण ॥ १७२ ॥

त्वरें करुनि हनुमंतें । गजस्कंदी बैसउनी चंद्रसेनेतें ।
वाद्यें करुनि हरुषयुक्तें । आणी त्वरितें श्रीरामाभेटीं ॥ १७३ ॥
समीप आली चंद्रसेना । नेत्रीं न्याहाळिला रामराणा ।
तृप्ती जालें तुझ्या दरुषणा । विशयकामना विसरलें ॥ १७४ ॥
जरी मी धरितें विषयाशक्ती । तरी तुं छळितासी भ्रमरावृत्ती ।
ऐसे कळोनि निश्चींती । तुं माझा मूर्ती परमात्मा ॥ १७५ ॥
सिद्ध पावो तुझें येकपत्नीव्रत । सकळ फळले माझें मनोरथ ।
द्वापारीं होउनि कृष्णनाथ । द्यावें अर्धांग मजलागीं ॥ १७६ ॥
वचन मानलें श्रीरामासी । संतोषोनि बोले तियेसीं ।
जैसे असे तुझ्या मानसीं । होसीं निश्चयेसीं ममाज्ञा ॥ १७७ ॥
चंद्रसेनेचे मस्तकीं ठेउनि हस्त । तीसी केलें ध्यानस्छ ।
आद्यापी पाहाती लोक समस्त । कन्याकुमारी म्हणौनी ॥ १७८ ॥
चंद्रसेना कृष्णावतारीं । झाली सत्यभामा सुंदरी ।
नित्यवस्ती तीच्या घरीं । श्रीहरी अत्यादरी करिता जाला ॥ १७९ ॥
येरीकडे वानरसैन्यांत । सुग्रीव बिभीषण चिंताक्रांत ।
कळों नेदितां अनंतवृत । बाह्यवृत संरक्षी ॥ १८० ॥
बिभीषण सुग्रीवातें ह्मणत । विनाकार्य न वचे रघुनाथ ।
जेथ जाईल हनुमंत । तो कार्यार्थ साधुनि येयील ॥ १८१ ॥
ऐसें करितां अनुवादन ! प्रकट जाला रघुनंदन ।
सौमित्र हनुमा मकरध्वज जाण । अल्हादयुक्त पैं आले ॥ १८२ ॥
हरुषें धाविले यकसरें । येकामागे येक न सांवरे ।
ब्रह्मानंदाचेनि गजरें । श्रीरामातें आळंगिती ॥ १८३ ॥
येक देती आळिंगण । येक चुंबिती श्रीचरण ।
येक बोलती कोण शाहाणपण । तुम्हेनि तुज बरें दिसे ॥ १८४ ॥
येक मौन्येचि राहिले । येक श्रीरामातें पाहों लागले ।
येकमेकां ह्मणो लागले । वंदा पाय अतिप्रीती ॥ १८५ ॥

एका जनार्दना शरण । जालें अहिरावणउद्धरण ।
पुढें रसाळ निरोपण । श्रोते सज्जन परिसतु ॥ १८६ ॥

**प्रसंग ५८.**

सद्गुरू हनुमंताचें कृपेकरुनी । तत्पर श्रीरामभजनी ।
तें स्मरोनि रामनामध्वनी । करिते जाले वानर ॥ ७० ॥
करितां रामनामस्मरण । निरसिले आनंदाचें आवरण ।
पुढें चालिले वीर दारुण । लंकापती जेथें असे ॥ ७१ ॥
तंव संकल्पाची नदी । आड देखिली महाविधी ।
परपार पावयाची सिद्धी । कोण्हा त्रिशुद्धी स्मरेना ॥ ७२ ॥
त्या उदकाचा वायू लागतांचि जाण । वानरां मांडिले अतिकदन ।
येकमेकातें निर्भत्सुन । युद्धालागीं प्रवर्तले ॥ ७३ ॥
संकल्पें व्यापिलें बहुवस । विकल्पें व्यापिलें मानस ।
आपण आलों रामकार्यास । हेंही कार्यातें विसरले ॥ ७४ ॥
ते वेळीं हनुमंतें । प्रार्थीलें पित्या पवनातें ।
तेणे शोषिलें संकल्पनदीतें । तेणे मार्ग निर्मुक्त जाहाला ॥ ७५ ॥
ते वेळीं वायुनंदनें । प्रबोधोनि वानरगण ।
श्रीरामस्मरणकरुन । पुढें ससैन्यें चालिलें ॥ ७६ ॥
तंव सुटला जंझमारुत । तृणप्रायें वानरांतें उडवित ।
आकाशीं गरगरा भंवडीत । जैसी शुष्कपर्णे आकासीं ॥ ७७ ॥
मुखिं नेत्रीं धुळोरा । भरुनि फिरती सैरावैरा ।
नेत्रीं वाहाती अश्रूंचिया धारा । वानरां सकळां प्रळयांतु ॥ ७८ ॥
तें देखोनि हनुमंतवीर । क्रोधें जाहाला जैसा रुद्र ।
बोले पीत्या वायूसि खडतर । रामकार्यीं मार्ग रोधिसी निमित्य काय ॥ ७९ ॥
ऐंकोनि पुत्राचें बोलणें । वायू सांगता जाला वीवंचने ।
मंत्रें खिळीलें रावणें । येथ आपण काय करावें ॥ ८० ॥

ते वेळीं हनुमंतें जाण । वायुश्रवणी रामस्मरण ।
उपदेशिता जाला आपण । तेणें मंत्रार्थ खिळण निरसिलें ॥ ८१ ॥
श्रीरामनामस्मरणप्रतापें । वानर जाहाले सुखोद्भुतें ।
देउनिया भुभुकारातें । वानरसैन्य चालिले ॥ ८२ ॥
पुढें चालतां कपिगण । तंव देखी अद्भुत आपण ।
तेथें क्षुधा महादारुण । तेथें सकळ पावले ॥ ८३ ॥
क्षुधें पिडीले बहुवस । ह्मणती गिळुं सगळें आकाश ।
समुद्र नेउं पहाती प्राशनास । ऐसें क्षुधेंकरुन पीडिलें ॥ ८४ ॥
येकाची वळली बोंबडी । येकें जाहाली वेडी ।
येके पडिली उपडी । होती कासावीस क्षुधेकरूनी ॥ ८५ ॥
येक आवाळी चाटिती । येक वृक्षातें डसती ।
येक आपणातेंच भक्षु पाहाती । ऐसी वृती झाली त्यांची ॥ ८६ ॥
नोळखती आपुले सैन्य । खावों म्हणती वानरगण ।
ह्मणती तुं कोठील कवण । ऐसें सभ्रांत होउनि पडिले ॥ ८७ ॥
येकी हातपाय झाडिलें । येकीं नेत्रीं प्राण आणिले ।
येकीं संग्राम गोष्टीतें सोडिलें । विकळ जाले पैं शरीरीं ॥ ८८ ॥
ऐसें झाले कासावीस । तें कळों सरलें हनुमंतास ।
तो महावीर अतिकर्कश । काय करिता जाला ते वेळीं ॥ ८९ ॥
सकळां वानरांचे कानी । भरुनि रामनामांमृत संजीवनी ।
क्षुधातृप्ती करून ततःक्षणी । कपीगण सावध केले ॥ ९० ॥
श्रीरामनामस्मरणापुढें । क्षुधा काईसी बापुडें ।
तात्काळ निरसोनि वाडेकोडें । वानरगण सुखी केलें ॥ ९१ ॥
देउनिया भुभुकार । पुढें चालिला वानरभार ।
तंव आंगी लागोनी शस्त्रमार । करचरण छेदिले ॥ ९२ ॥
येकाचें पुछ तुटलें । येकाचे सीरच तुटलें ।
येकाचें हातपाय छेदिलें । पडिले धरणीवरी निचष्टित ॥ ९३ ॥

काय होतसे नकळे । आकस्मात आंगी घाय आदळे ।
तेणे रुधिराचे पूर सुटले । विटंबिलें सकळ सैन्य ॥ ९४ ॥
तेवेळीं वायुनंदनें । पुछ वाढविले दारुण ।
शस्त्रदेवता सकळही बांधोन । आपटुं पाहे पर्वतीं ॥ ९५ ॥
तें देखोनि शस्त्रदेवता । ह्मणती नको मारुं गा हनुमंता ।
तुज शरण आलों समस्तां । आह्मालागीं मुक्त करीं कपिराया ॥ ९६ ॥
आह्मासि खिळिले मंत्रप्रयुक्ती । आह्मासि सोडवावया तुज आहे शक्ती ।
आह्मी वांचलीय समस्तीं । श्रीरामासी साह्य होतसों ॥ ९७ ॥
ऐकोनि शस्त्रदेवतावचन । कृपा द्रवला वायुनंदन ।
श्रीरामनाम त्यासी उपदेशुन । निर्मुक्त केल्या शस्त्रदेवता ॥ ९८ ॥
त्याणी नमस्कारिले हनुम्यातें । सोडुनि गेल्या आवरणातें ।
वानर चालिले उल्हासयुक्त । रामस्मरण करुनी ॥ ९९ ॥
पुढें जातां सकळ सैन्य । तेथें उठावले सर्प धारुण ।
वीषगरळातें वमुन । वानरातें जाळु पाहाती ॥ १०० ॥
देती धुधुकार अद्भुत । वानरसन्यातें वेटाळित ।
हातपाय बांधोनि तेथ । पाडिले निचेष्टित धरणीवरी ॥ १०१ ॥
विषगरळें ब्रह्मांड जळे । तेथें काइसी कपींकुळें ।
सर्वही जाहाले व्याकुळ । प्राण सोडु पाहाती ते क्षणी ॥ १०२ ॥
ऐसें वानरसैन्य पडीतां क्षीती । हनुमंत रुद्रावतारमूर्ती ।
सर्प आकळुनि दोहीं हातीं । मारुं मारुती इछितसे ॥ १०३ ॥
माझे अळंकार तुह्मी । मिळोनि राक्षसा श्रमी ।
वानरां करितसा दुर्गमी । तुह्मासी प्राणहानी पैं आली ॥ १०४ ॥
म्हणोनि पुछाभीतरी । सर्प बांधोनि कोट्यांतरी ।
आदळुं पाहे पर्वताग्रीं । तंव त्याणी स्तविला वायुनंदन ॥ १०५ ॥
आम्ही तुझें नाभभूषण । आमचा संव्हार करुं नको जाण ।
मंत्रें खिळिलेसे रावण । तें निवारीं कपिराया ॥ १०६ ॥

ऐकोनि सर्पाचें बोलणें । केले रामनामें गर्जन ।
नाममात्रें सर्पाचें खिळण । तुटोनी गेलें तत्काळ ॥ १०७ ॥
वानर जाले समाधान । सकळें निरसीली आवरण ।
आतां काईसें बापुडें रावण । क्षणें शोधुनी बाहेरी काढुं ॥ १०८ ॥
आनंदाचें आवरण । महोमाहाचे दुसरे जाण ।
संकल्पनदीचें आवरण । तेही निरसिलें रामस्मरणी ॥ १०९ ॥
झंझमारुत क्षुधा अद्भुत । मंत्रावरण वेताळभूतप्रेत ।
निवारुनी राक्षससैन्याते । विजई जाहाले कपिगण ॥ ११० ॥
शस्त्रवरण सर्पावरण । ऐसी निरसुनी महादारुण ।
पुढें जातां सकळ सैन्य । तंव रावणयज्ञ देखिला ॥ १११ ॥
त्या हवनकुंडाजवळी । मिळउनि सामग्री सकळी ।
होम करितसे महाबळी । राक्षसराजा लंकापती ॥ ११२ ॥

# मुक्तेश्वरावर प्रकाश

मुक्तेश्वराचें चरित्र व काव्य यासंबंधीं पुष्कळ लिहिण्यांत आलें आहे. कवि म्हणून त्याची श्रेष्ठता वादातीत आहे. मतभेद आहे तो त्याच्या चरित्राशीं निगडित असणाऱ्या कांहीं प्रश्नांसंबंधीं. हे प्रश्न अनेक वेळां चर्चिले जाऊनहि अजून अनिर्णीत आहेत. मुक्तेश्वरावर प्रकाश टाकणाऱ्या एका अलक्षित संबंधाकडे लक्ष वेधून कांहीं अनुमानें मांडण्याचा हा प्रयत्न आहे. मुक्तेश्वरविषयक प्रश्न निकालांत काढण्याची व काढल्याची भ्रामक कल्पना मनांत नाहीं, हें आधीच सांगितलें बरें.

मुक्तेश्वर हा एकनाथांचा नातू हें सर्वमान्य आहे. नाथांचे चरित्रकार केशव आणि महीपति यांनीं या गोष्टीचा उल्लेख करूं नये याचें आश्चर्य वाटलें तरी स्वतः मुक्तेश्वरानें,

मातृजनक जनार्दनी । एकनाथ नमियेला ॥

असें म्हटलेलें असल्यानें[१] शंकेस जागा नाहीं.

---

१. आदिपर्व, १–७७

नाथांना मुली किती होत्या, त्यांचीं नांवें कोणतीं होतीं व त्यांना कोठें दिलें होतें याचा समाधानकारक निर्णय अजून लागलेला नाहीं. गोदा आणि गंगा या नांवांबरोबरच लीला आणि उमा अशींहि आणखी दोन नांवें पुढें आलीं आहेत.

भिन्न भिन्न अभ्यासकांनीं भिन्न मतें व्यक्त केलीं तर फारसें आश्चर्य वाटूं नये. पण एकाच अभ्यासकाचीं एकाच ग्रंथांत भिन्न मतें पाहिलीं की हा विषय किती गुंतागुंतीचा आहे तें कळतें. उदाहरणार्थ, डॉ. तुळपुळे यांचे हे दोन परिच्छेद पाहा :—

( अ ) एकनाथांस एकूण चार अपत्यें झालीं. पैकी थोरली मुलगी **गोदा** ही पैठणकर मुद्गलांच्या घराण्यांत दिलेली असून कविवर मुक्तेश्वर हा तिचा मुलगा व नाथांचा नातू होय. त्यांची दुसरी मुलगी उमा ही तंजावर प्रांतीं कोणा नागनाथास दिलेली असून तिचा मुलगा माधवस्वामी हा एक महाकवि होऊन गेला.[२]

( आ ) हरिपंडित हा मुलगा आणि गंगा, गोदा व उमा या मुली, अशीं एकूण चार अपत्यें नाथांना होतीं. पैकी प्रसिद्ध कवि मुक्तेश्वर हा गंगाबाईचा म्हणजे नाथांचा नातू हें सर्वांना ठाऊकच आहे. **गोदावरीची माहिती मिळत नाहीं.** नाथांची तिसरी कन्या उमाबाई ही तंजावर प्रांतीं कोणा नागनाथास दिली होती व तिचा मुलगा म्हणजेच आपले माधवस्वामी होत.[३]

येथें मुक्तेश्वराच्या आईचें नांव एकदां गोदा तर एकदां गंगा असें दिलेलें आहे; एकदा गोदेबद्दल माहिती देऊन पुन्हा तिच्याबद्दल माहिती मिळत नाहीं असें सांगण्यांत आलें आहे. डॉ. तुळपुळे यांच्यासारख्या चिकित्सक व थोर संशोधकाच्या मनांतहि असा गोंधळ उडतो. "मौज अशी की गोदावरीचें सासरचें नांव गंगाबाई व गंगाचें सासरचें नांव गोदावरी असें होतें;" हें पांगारकरांचें विधान[४] मौजेचें असलें तरी ही मौज अनर्थकारक आहे.

---

२. महाराष्ट्र—सारस्वत, पुरवणीसह, पृ. १२७

३. उपर्युक्त, पृ. ११४

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, पृ. ४६९

प्रथम नाथांच्या अपत्यांची संख्या निश्चित केली पाहिजे. हरि नांवाचा त्यांना एक मुलगा होता यासंबंधीं वाद नाहीं. मुली दोन कीं तीन हा खरा प्रश्न आहे. नाथांना दोनच मुली होत्या असें नाथांच्या चरित्रकारांनीं सांगितलेलें आहे. नाथांना तीन मुली होत्या असें म्हणताना डॉ. तुळपुळे आधार देत नाहीत. असा आधार पुढें येईपर्यंत नाथांना दोनच मुली होत्या असें मानणें भाग आहे.

या दोन मुलींच्या नांवातील लीला व उमा या नांवांचा प्रथम विचार करूं. लीला हें नांव भीमस्वामी देतात.[५] 'लीलाविश्वंभर' या शब्दामुळें उद्भवलेला गैरसमज लीला या नांवाच्या मुळाशीं आहे. परंतु ही 'भ्रामक कल्पना' आहे हें प्रा. प्रियोळकर यांनीं[६] सिद्ध केलेलें असल्यामुळें लीला या नांवाचा अधिक विचार करावयाचें कारण नाहीं.

माधवस्वामीच्या आईचें नांव उमा होतें, हें डॉ. तुळपुळे यांचें म्हणणें बरोबर आहे. नाथांच्या एका मुलीचें नांव उमा होतें हें मलाहि मान्य आहे. पण हें तिचें सासरचें नांव होय. तिचें माहेरचें नांवें कोणतें ?

या प्रश्नाचें उत्तर शोधतांना नाथांच्या मुलींचीं नांवें अनुक्रमें गोदा व गंगा अशीं होतीं हें केशव आणि महीपति यांचें म्हणणें मान्य केलें पाहिजे. "या गंगेचेंच सासरचें नाव उमा असलें पाहिजे;" हें चिं. ग. कर्वे यांचें मत[७] मला पटत नाहीं. गोदेला पैठण येथें व गंगेला कर्नाटकांत दिलें होतें आणि गोदेचाच मुक्तेश्वर हा मुलगा असें अनेकांनीं म्हटलें आहे. यासंबंधीं माझीं मतें निराळीं आहेत, तींच आतां मांडतों.

गोदेचें सासरचें नांव उमा होतें व तिलाच तंजावरप्रांतीं नागनाथास दिलें होतें. माधवस्वामी हा तिचा मुलगा. याला आधार म्हणजे नाथांची दुसरी मुलगी गंगा ही – कर्नाटकांतच पण – तंजावरास दिलेली नव्हती, हा होय. या

५. भीमस्वामीकृत, 'भक्तलीलामृत'.

६. श्रीमुक्तेश्वराचा शोध, पृ. १६.

७. भा. इ. सं. त्रै. वर्ष १९, अं. १, पृ. ११.

गंगेचेंच सासरचें नांव गोदा असें होतें. ( पांगारकरांचें मौजेचें विधान म्हणजे असें अर्धसत्य आहे ! ) तिचा मुलगा मुक्तेश्वर होय.

ही गंगा कोठें दिलेली होती याचा खुलासा शिवरामस्वामींच्या चरित्रांतुन होती. शिवराम पूर्णानंद ऊर्फ शिवरामस्वामी हे नाथांचे पणतु होत. स्वतः त्यांनींच,

मायेचा जो पाहतां आजि आजा ।
तो हा येका जाहाला बाप माझा ॥

असें म्हटलें आहे.[८] ' आजा ' ह्या शब्दावर टीप देतांना भावे[९] लिहितात :— " याचा अर्थ ' एकनाथ हा माझे आईचा आजा ' असा घ्यावयाचा कीं काय ? म्हणजे शिवराम हा एकनाथाचा पणतु होतो. "

शिवरामस्वामींच्या वडिलांचें नांव नारायण व आईचें नांव लक्ष्मी असें होतें. हे नारायण ऊर्फ पूर्णानंद कलबुर्गे प्रांतांत महागांव येथें राहात असत. लक्ष्मीच्या वडिलांचें नांव बाळकृष्णपंत चंद्रकेत. या लक्ष्मीसंबंधीं शिवरामस्वामींनीं ' गोदा आपण जाली कन्यकारूप ' असें ' गीताचंद्रिके'च्या उपसंहारांत म्हटल्याचें पांगारकरांनीं नमूद केलें आहे.[१०] मुक्तेश्वर हा शिवरामस्वामींचा मामा असें माझें म्हणणें आहे. माझ्या मतें नाथांच्या कन्यांचा वंशविस्तार असा :—

एकनाथ
- गोदा ( माहेरीं ) उमा ( सासरीं ) × नागनाथ
  - माधवस्वामी
- गंगा ( माहेरीं ) × गोदा ( सासरीं ) × बाळकृष्णपंत ऊर्फ चिंतामणि
  - लक्ष्मी × नारायण
    - शिवरामस्वामी
  - मुक्तेश्वर ऊर्फ मुद्गल

८. शिवरामस्वामीकृत ' भागवत एकादशस्कंध टीका '.

९. महाराष्ट्र—सारस्वत, पुरवणीसह, पृ. ५१२.

१०. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, पृ. २३९.

येथेंच मुक्तेश्वराचे वडील कोण याचाहि उलगडा होतो. चिंतामणि आणि विश्वंभर अशीं दोन नांवें या संदर्भात पुढें करण्यांत येतात. चिंतामणि हें नांव स्वतः मुक्तेश्वरानें दिलेलें असल्यामुळे तें स्वीकारलें पाहिजे. तसेंच मुक्तेश्वराच्या वाडिलांचें दुसरें नांव विश्वंभर नसून बाळकृष्णपंत होतें असें मानलें पाहिजे. लीला-विश्वंभर हा त्यांच्या आईवडिलांचा निर्देश आहे या कल्पनेंतील भोंगळपणा यावरूनहि कळेल.

शिवरामस्वामींची आई ही मुक्तेश्वराची वडील बहीण असावी. शिवराम स्वामींचा जन्म शके १५५४ मधील. त्यांच्यासह लक्ष्मी–नारायणांना सात अपत्यें होतीं आणि शिवराम हा सर्वांत लहान होता. यावरून मुक्तेश्वराच्या जन्मापूर्वी (श. १५३१) लक्ष्मीचा जन्म झाला असावा, हें स्पष्ट होतें.

तिला कलबुर्गे प्रांतांत दिलेलें असल्यामुळें मुक्तेश्वरास कलबुर्गी लुगडीं चांगलीं माहीत आहेत. द्रौपदीवस्त्रहरणाच्या कथाभागांत[११] तो लिहितो,

बोटधारि दुतारें । कृमिरें सुतारें सुलारें ।
कलंभिगर्भ सुहुतारें । वैरागारें चिनोडें ॥

कलंभिगर्भ म्हणजे गुलबुर्गा. डॉ. सॅलेटोर[१२] सांगतात, "Gulbarga was essentially a Karnatak centre, its earlier name being Kallubarige or Kallukurike." गुलबर्गा त्या काळीं लुगड्यांसाठीं फार प्रसिद्ध होतें असें दिसतें. कारण अमृतरायांनाहि 'कलबुर्गे हल्बुर्गे लुगडें' माहीत आहे.

कर्नाटकांत दिलेल्या गंगाबाईच्या पुत्राचें नांव पुंडाजी किंवा पुंड असें देऊन तो हरिभक्त म्हणून प्रसिद्ध असल्याचें केशव आणि महीपति सांगतात. हा मुक्तेश्वराचा भाऊ असावा किंवा त्याचें स्वतःचेंच नांव पुंडाजी किंवा पुंड असें असावें. "....व याच दांपत्याला मुक्तेश्वर हा 'गुंडा पुत्र' लाभला;" असें लिहितांना बा. अ. भिडे[१३] यांच्या मनांत काय होतें तें सांगतां येत नाहीं.

---

११. सभापर्व, १५–२२३.

१२. Karnatak's Trans-oceanic Contacts, p. 9.

१३. मुक्तेश्वर, पृ. १–२.

स्वतः मुक्तेश्वरानें केलेल्या ‘ गौतमीच्या तटाकीं,’[१४] किंवा ‘गोदावरीतट निवासी’[१५] या शब्दप्रयोगांवरून तो पैठणास राहात होता हा समज दृढ झालेला दिसतो. या उल्लेखांवरून त्याचें नेहमीचें वास्तव्यस्थान सूचित होण्यापेक्षां संबंधित कृतींचें रचनास्थळ सूचित होतें, असें म्हणणें अधिक योग्य होय.

मुक्तेश्वराचे वडील चिंतामणि हे पैठणला राहात. एवढेंच नव्हे तर ते नाथांचे घरजावई होते, अशा आख्यायिका नाथचरित्रांत आढळतात. पांगारकर[१६], भिडे[१७], तुळपुळे[१८] ही मंडळी मुक्तेश्वरास ‘ पैठणकर ’ मानतात. पांगारकरांनीं “ पैठणास नाथांच्या वाड्याशेजारींच चिंतामणिशास्त्री यांची समाधि आहे,” असा आधारहि दिलेला आहे.

आजगांवकर लिहितात.[१९]:—( अ ) त्यांची गोदूबाईनांवाची एक मुलगी होती; ती कुरुंदवाडाजवळ नाथांचा कोणी अत्रिगोत्री आप्त राहत असे, त्याच्या मुलास दिली होती. ( आ ) मुक्तेश्वरांचे तीर्थरूप चिंतामणि ऊर्फ विश्वंभरबुवा हे मूळचे राहणारे कर्नाटकांतले, परंतु ते नाथांचे घरींच पैठणास राहत असत.

वरील आख्यायिकांप्रमाणेंच मुक्तेश्वर व एकनाथ यांच्याविषयींच्या अनेक दंतकथा रूढ होत्या. मुक्तेश्वराचा मुकेपणा, त्याचें एकनाथांच्या घरीं गेलेलें बालपण, गोदेंत भारताचीं पर्वें सोडणें, इ. त्यांपैकींच होत. या आख्यायिकांतील फोलपणा उघड आहे. कारण एकनाथ शके १५२१ मध्यें समाधिस्थ झाले, तर मुक्तेश्वर शके १५३१ मध्यें जन्मास आला. अशा परिस्थितींत वरील आख्या-यिकांवर विश्वास ठेवणें केवळ अशक्य आहे. चिंतोपंत हे नाथांचे घरजावई होते,

---

१४, रामायण, युद्धकांड, ४७०.

१५. सभापर्व, उपसंहार; आदिपर्व, उपसंहार.

१६. कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र आणि काव्यविवेचन, पृ. १३.

१७. मुक्तेश्वर, पृ. १.

१८. महाराष्ट्र–सारस्वत, पुरवणीसह, पृ. ९२७.

१९. महाराष्ट्र कविचरित्र, भाग १ ला, पृष्ठें ३७ व ३९.

तर नाथांच्या मृत्यूनंतर ते कोठें गेले? की पैठणासच राहिले? स्वतःला मुलगा असतांना नाथ एखाद्याला घरजावई म्हणून ठेवून घेतील तरी कसे?

आजगांवकरांनीं मध्येंच 'कुरुंदवाडाजवळ' असें म्हणून एक पिल्लूं सोडलें आहे. (म्हणजे तेरवाडला काय?) याहून 'चिंतामणि हे मूळचे राहणारे कर्नाटकांतले' हा निर्देश महत्वाचा आहे. "कर्नाटकांत त्याचें वास्तव्य असावें, ही जी समजून ती दृढ होतें," असें प्रा. प्रियोळकरहि म्हणतात.[२०]

मुक्तेश्वराचे वडील चिंतामणि ऊर्फ बाळकृष्णपंत हे डंबळ येथें राहात होते असें माझें म्हणणें आहे. "डंबळ गांवचे बाळकृष्णपंत चंद्रकेत यांची मुलगी लक्ष्मी ही नारायण दीक्षितांस दिली होती;" असा डंबळचा उल्लेख आजगांवकरांनीं करून ठेवला आहे.[२१] हे बाळकृष्णपंत व मुक्तेश्वर यांच्यांतील पितापुत्रांचें संभाव्य नातें मी नव्यानें आपल्या नजरेस आणीत आहे.

डंबळ हें गांव धारवाड जिल्ह्यांत गदग–मुंडर्गी रस्त्यावर गदगहून १३ मैल दूर आहे. गांव लहान असलें तरी फार जुनें आहे. (अर्थात् आतांचीं घरें गांवाच्या जुन्या जागेंत नाहींत!) गांवाबाहेर एक सुंदर तळें आहे. तें ३०० वर्षांपूर्वी बांधलें गेलें असें म्हणतात.

डंबळ येथें दोड्डबसाप्पा, कालेश्वर आणि सोमेश्वर (दबगडी) अशीं तीन ११ व्या १२ व्या शतकांतील देवळें आहेत. पूर्वी या गांवांत बौद्ध विहार होता, असें त्यास पश्चिमचालुक्य राजा दुसरा त्रिभुवनमल्ल ऊर्फ सहावा विक्रमादित्य यानें दिलेल्या देणगीवरून कळून येतें. ही माहिती देणारा शिलालेख १०९५ मधील असून त्यावर तारा किंवा तारादेवीची मूर्ति आहे. डंबळ येथील (आतां पडलेल्या) किल्ल्यांतील जैन देवळाजवळ हा लेख सांपडला.[२२]

---

२०. श्रीमुक्तेश्वराचा शोध, पृ. २६.

२१. महाराष्ट्र कविचरित्र, भाग ३ रा, पृ. १०१

२२. Bombay Gazetteer, Vol. XXII, pp. 660–665.
Fleet : Indian Antiqueri, X 185

यावरून डंबळवरील एके काळच्या बौद्ध व जैन प्रभावाची कल्पना यावी. शिलालेखांतून या गांवाचें नांव धर्मपुर किंवा धर्मपोळल् असें आढळतें. तेथील देवळें खरोखरच प्रेक्षणीय आहेत. 'दोड्डबसाप्पा' हें नांव सार्थ ठरविणारा प्रचंड व सुंदर नंदी त्या देवळांत आहे. याच देवळांतील ब्रह्याचें चित्र खरे यांनीं दिलें असून, "यास पांच मस्तकें आहेत हें याचें वैशिष्ट्य आहे;" असें म्हटलें आहे.[२३]

मुक्तेश्वर डंबळ येथें होऊन गेल्याचा बहिरंग पुरावा अजून मिळूं शकला नाहीं हें मी कबूल करतों. आत्रिगोत्री, अश्वलायनसूत्री, करवीरनिवासिनी लक्ष्मी व सोनारीचा भैरव हीं कुलदैवतें असणारें एखादें ब्राह्मण घराणें डंबळ येथें सांपडतें काय याचा मी कसून शोध केला. असें घराणें आज तेथें नाहीं. पूर्वीं तेथें नव्हतेंच असें मात्र यावरून म्हणतां येणार नाहीं.

मुक्तेश्वरी महाभारतांतून कांहीं अंतरंग–पुरावे देण्याचा प्रयत्न मी करणार आहें. हीं अनुमानें आहेत हें मी प्रारंभींच म्हटलें. पण बळकट पुरावे मिळविण्याचें साधन म्हणून या अनुमानांकडे पाहिलें पाहिजे.

> बौद्धरूपिया जगदीशा । कौरवीं मांडिली माझी हिंसा ।
> करुणाकरा कृष्णा परेशा । प्राणरक्षक मज होई ॥

अशा द्रौपदीच्या मुखीं येणारा बुद्धावताराचा उल्लेख[२४] बुद्धविहाराच्या दर्शना–मुळेंहि सुचणें शक्य आहे. गदग ते डंबळ या मार्गांत अनेक लहान लहान डोंगर लागतात व ते मुक्तेश्वराच्या एका सुंदर उत्प्रेक्षेची जणूं जन्मकथा सांगतात. या डोंगरांनाच त्यानें 'शिवपिंडिका'[२५] म्हटलें असावें असें वाटूं लागतें. कापसानें माथें आच्छादिण्याचा दृष्टांत[२६] त्याच्या प्रदेशांतील कापसाच्या पिकाची विपुलता

---

२३. मूर्तिविज्ञान, चित्र ३ आणि पृ. ९

२४. सभापर्व, १५–१४६

२५. सभापर्व, १०–१९६

२६. सभापर्व, उपसंहार, ५

दाखविणारा आहे. जोंधळ्यावर पडणाऱ्या रोगांचीं नांवेंहि[२७] येथें आठवण्यासारखीं आहेत. डंबळ येथें जोंधळा व कापूस हीं पिकें मुख्यतः निघतात हें सांगितलें पाहिजे.

मुक्तेश्वरानें प्रवास खूप केला होता याचा प्रत्यय त्याच्या वर्णनांतून येतो. वास्तव्यामुळें धारवाड जिल्ह्याशीं त्याचा निकटचा संबंध आला असावा आणि या प्रदेशाच्या पौराणिक इतिहासामुळें मुक्तेश्वरास महाभारतरचनेची स्फूर्तीहि मिळाली असावी. " The traditional history of Dharwar goes back to the time of the Pandavas; " हा समज[२८] येथें नोंदण्यासारखा आहे. विशेषतः, " Hangal, fifty miles south of Dharwar, in inscriptions of the twelth century is called Viratkot and Viratanagari "; ही माहिती[२९] उपयुक्त वाटावी.

पांडवांनीं विराटनगरींत प्रवेश केला तेव्हांच्या वर्णनांतील[३०] 'दुर्गाप्रासाद'शीं " Hangal has thirteen temples,—three of Hanuman and one each of Durga " ......[३१] ही माहिती जुळते. एवढेंच नव्हे तर या तेरा देवळांत एक 'कीचकाजिता' चें देऊळ आहे. मुक्तेश्वरानें हें सर्व आपल्या डोळ्यांखालून घातलें असावें आणि त्याच्या काळीं या स्थळासंबंधींच्या पौराणिक स्मृतीहि अधिक उत्कट असाव्यात, हेंहि मुक्तेश्वराच्या प्रत्ययकारी वर्णनांचें एक कारण आहे.

---

२७. वनपर्व, १ — १४२

२८. Bombay Gazetteer, Vol. XXII, p. 389

२९. उपर्युक्त.

३०. विराटपर्व, १ — ६७

३१. Bombay Gazetteer, Vol. XXII, p. 723

याच्याच जोडीला मुक्तेश्वरानें केलेले कर्णाटक-यंत्र,[३२] कर्णाटकयुद्ध,[३३] चिंध्यादेवी,[३४] शैव–वैष्णव[३५] आणि जैन–वेदांती[३६] यांचे वाद, हे उल्लेख त्याचें वास्तव्य कोठें होतें हें सिद्ध करणारेच आहेत.

मुक्तेश्वरास द्रविड देशांतील मानून त्याच्या भाषेंत द्राविडी लकवा शोधणें हा ' द्राविडी प्राणायाम ' ठरेल अशी भीति वाटते. मुक्तेश्वरानें धर्माबरोबर वनांत गेलेल्या ब्राह्मणांचीं नांवें,

गुर्जर महाराष्ट्र कर्नाटक । आंध्र चौल मल्याळ देख ।
पंचद्राविडी अनेक । धर्मासंगीं चालिले ॥

अशीं दिली आहेत.[३७] राजसूय यज्ञाच्या वेळीं पांडवांच्या दिग्विजयांत पुढील नांवें येतात.[३८]:—

कर्नाटक पांड्य प्रबळ । द्रविड आणि चोळ मंडळ ।
अंध्र ताळवन विशाल । काळीक उद्भट उष्ट्रकर्णिक ॥

यावरून एकतर पंचद्राविडांची कल्पना मानली पाहिजे किंवा कर्नाटक आणि द्रविडदेश हे भिन्न मानले पाहिजेत. ज्या सैल आचारासंबंधीं मुक्तेश्वर लिहितो, ते ' कुरुपांचाळ देशीं मल्याळीं ', किंवा ' केरळमल्याळ सिंधुपारीं ' प्रचलित होते. प्रवास करीत असतां मुक्तेश्वरास तेथील कांहीं गोष्टी विचित्र वाटल्या त्या त्यानें येथें टिपल्या इतकाच या वर्णनाचा अर्थ आहे. ' द्रविडदेश ' हा शब्द

---

३२. वनपर्व, १५–१८४
३३. आदिपर्व, ३१–५५
३४. सभापर्व, ५–१७८
३५. सभापर्व, १०–७६, ७७
३६. वनपर्व, १५–१०२
३७. वनपर्व, १–३२
३८. सभापर्व, ८–१३१

निश्चितार्थबोधक नाहीं, उलट गोंधळ उडविणारा आहे. म्हणून मुक्तेश्वराचें वास्तव्य कर्नाटकांत होतें, असें म्हणणें सयुक्तिक ठरतें.

भाषेचा कौलहि असाच पडेल. मुक्तेश्वराच्या भाषेंत तमिळ शब्द शोधण्यापेक्षां कन्नड शब्द शोधणें श्रेयस्कर होईल. ( हें रसास्वादाला आवश्यक मात्र नाहीं. ) मुक्तेश्वर व कुमारव्यास यांच्या दोन उताऱ्यांतील विलक्षण साम्य शं. बा. जोशी यांनीं दाखविलेंच आहे.[३९] कुमारव्यासहि डंबळच्या परिसरांतीलच.

प्रा. प्रियोळकरांनीं श्री मुक्तेश्वराच्या देवळाचा शोध देशभर घेऊन शेवटीं " कवि मुद्गलानें कोठल्या मुक्तेश्वराच्या प्रेरणेवरून ' मुक्तेश्वर ' असें मुद्रानाम धारण करून ' महाभारत ' लिहिलें याचा निश्चय होत नाहीं; " असें म्हटलें आहे.[४०] प्रा. प्रियोळकरांसारख्या थोर संशोधकानें इतक्या अनाग्रही बुद्धीनें लिहिल्यावर मी ठामपणानें लिहिणें हें केवळ धारिष्ट होय. म्हणून प्रामाणिक मतभेदाला एक जागा आहे ती दाखवितों.

मुक्तेश्वराच्या देवळाच्या शोध देशभर घेणें आवश्यक आहे असें मला वाटत नाहीं. कारण धारवाड जिल्ह्यांतच चौडदानपूर या तुंगभद्रा तीरावरील गावांत मुक्तेश्वराचें देऊळ आहे. हें गाव राणेबेन्नूरच्या उत्तरेस सुमारे १५ मैलावर आहे. येथील देवळासंबंधी माहिती मिळते ती अशी :— " Mukteshwar's is a black stone temple less graceful than the Dodda Basappa temple at Dambal, but a fine bold building of the same age and style ( 1000–1100 ) with its detail more completely finished than in the Dambal temple....As a design the chief defects of the Mukteshwar temple are the form of its dome, and the smallness of its crowning pot or Kalash. "[४१]

---

३९. मऱ्हाटी संस्कृति : कांहीं समस्या, पृ. १०४.

४०. श्री मुक्तेश्वराचा शोध, पृ. २८.

४१. Bombay Gazetteer, Vol. XXII, p. 659. Ferguson in Architecture of Dharwar and Mysore, p. 57, photograph 39.

चौडदानपूर येथील मुक्तेश्वराच्या आणि डंबळ येथील दोड्डु बसप्पाच्या देवळांत जी तुलना करण्यांत आली आहे ती सूचक आहे. दोड्डु बसप्पा हें नांव मला त्या मानानें अर्वाचीन वाटतें. या देवळाचें जुनें नांव कोणतें होतें, मुक्तेश्वर असें होतें काय याचा शोध होणें जरुरीचें आहे. कारण देवळांत ' मोठा नंदी ' असला तरी आंत जें लिंग आहे त्यालाहि कांहीं नांव असलें पाहिजे. तेंहि मुक्तेश्वराचें देउळ ठरलें तर हा प्रश्न कायमचा सुटेल. सध्यां तरी कांचीच्या मुक्तेश्वराबद्दल जें विधान[४२] प्रा. प्रियोळकरांनीं केलेलें आहे तेंच चौडदानपूरच्या मुक्तेश्वराबद्दल करतां येईल.

चिंतामणीचें देवागार । स्पर्शमणीच नंदिकेश्वर ।
नादनिधीचि मनोहर । सोमसूत्रीं शिवलिंगें ॥

अशी एक ओवी मयसभा—वर्णनांत[४३] येते. मुक्तेश्वराच्या देवळाची निश्चिति करतांना निकष म्हणून वरील ओवीचा उपयोग करावयास हरकत नाहीं. चिंतामणि आणि स्पर्शमणि हे कविसंकेत म्हणून बाजूस ठेवले तरी कोणत्या देवळांत नाद अधिक घुमतो व कोठें ' सोमसूत्रीं शिवलिंगें ' आहेत, याचा शोध घेतला पाहिजे. कारण कल्पनेलाहि प्रत्यक्षाचा आधार असतोच.

मुक्तेश्वराची कुलस्वामिनी करवीरनिवासिनी महालक्ष्मी व कुलदैवत सोनारीचा भैरव यांसंबंधीं वाद नाहीं. रेणुकेचाहि तो उपासक असावा असें त्यानें दिलेल्या कांहीं दृष्टांतावरून वाटतें.[४४] मुक्तेश्वरावर शैव—संप्रदायाची दाट छाया पडलेली दिसते. " कवि मुक्तेश्वर दत्ताला शिवस्वरूपच मानतो " या प्रा. प्रियोळकरांच्या विधानांत[४५] मोठा अर्थ आहे. उपमादृष्टांत देतांना शंकर—

---

४२. श्री मुक्तेश्वराचा शोध, पृ. २७.

४३. सभापर्व, २—५२

४४. सभापर्व, १५—१४२; वनपर्व, ...

४५. श्रीमुक्तेश्वराचा शोध, पृ. २...

... १८५१८५

गंगा, गौरी–शंकर, भवानी–चंद्रचूड,[४६] यांचा विसर त्याला पडत नाही. राम–सीतेचें मीलन म्हणजे शिवशक्तीचेंच मीलन होय; किंवा भरत व राम यांची भेट म्हणजे जीवशिवैक्य होय,[४७] या त्याच्या कल्पना या संदर्भांत आठवतात. हृदय-लिंग,[४८] जिव्हालिंग[४९] हे शब्दहि त्याच्या शिवभक्तीचेच द्योतक आहेत.

पृथ्वीला किंवा पर्वतांना लिंग वा शिवपिंडिका म्हणणें[५०] ही मुक्तेश्वराची आवडती व भव्य कल्पना आणि त्यानें आपल्या ओव्यांचें 'बाणलिंगें' असें केलेलें वर्णन[५१] काव्यात्मक तसेंच सूचक आहे. मुक्तेश्वर म्हणजे शंकर हें त्याचें उपास्य दैवत होतें .... "लीलाविश्वंभर व मुक्तेश्वर एकच होत," असें मलाहि वाटतें. कारण लीलाविश्वंभर म्हणजेहि शंकर. किरातार्जुनयुद्धाच्या समारोपांत अर्जुनाच्या मुखीं पुढीलप्रमाणें शिवस्तुति येते[५२] :—

> लीले करिशी विश्वजनन । कृपादृष्टी प्रतिपालन ।
> प्रलयीं करूनी सर्वदहन । शेष उरशीं तूं एक ॥

या ओवींतील 'लीले करिशीं विश्वजनन' या शब्दांतील आशयच लीलाविश्वंभर या पदांत आहे.

चामरसाच्या 'प्रभुलिंगलीले'च्या मराठी अनुवादास ब्रह्मदास 'लीला-विश्वंभर' असें नांव देतो. 'लीलाविश्वंभराची करणी', 'लीलाविश्वंभराचें चरित्र' असा या शब्दाचा वापर तो करतो. 'विश्वंभराची अतर्क्य लीला' हा

---

४६. वनपर्व, ६—२१, ३०, ४५
४७. वनपर्व, १५—२४२, २५४
४८. विराटपर्व, १—९
४९. आदिपर्व, १—५०
५०. सभापर्व, १६—६६; वनपर्व, १०—१९६
५१. वनपर्व, ७—२१७
५२. वनपर्व, ४—१३६

त्याचा शब्दप्रयोगहि टिपण्यासारखा आहे. 'विश्वंभरचरित्र' आणि 'शंभुचरित्र' हे शब्द तो समानार्थक म्हणूनच वापरतो.[५३] विश्वंभर किंवा लीलाविश्वंभर हे शब्द शिववाचक आहेत, हें यावरून स्पष्ट व्हावें.

दत्तात्रेय असाहि या शब्दाचा अर्थ आहे, हें प्रा. प्रियोळकरांचें म्हणणें मला मान्य आहे. एकनाथाकडून आलेली दत्तोपासनाहि मुक्तेश्वरास चालवावयाची होती. त्यांत मुख्यतः तो शिवोपासक होता, म्हणून त्यानें दोन्ही दैवतांचा उल्लेख लीलाविश्वंभर या श्लिष्ट शब्दांतून केला असें माझें म्हणणें आहे.

परमार्थानें मुक्तेश्वर व लीलाविश्वंभर एकच ठरले तरी लौकिकदृष्ट्या ते भिन्न होते कीं काय, अशी शंका पुढील ओवीवरून येते :—

लीलाविश्वंभरप्रसादें । मुक्तेश्वरअवधूतगुणानुवादें ।
भारतनलिनीचीं अरविंदें । महदाख्यान सुपंक्ती ॥

कारण लीलाविश्वंभरप्रसाद आणि मुक्तेश्ववरअवधूतगुणानुवाद या दोन भिन्न गोष्टी आहेत. मुक्तेश्वराच्या गुरुसंबंधीं अजून संशोधन होण्याची आवश्यकता आहे.

मुक्तेश्वर आणि शिवरामस्वामी यांच्यांतील एका अलक्षित संबंधावर लक्ष केंद्रित करून मनांत आलेले कांहीं विचार मांडले आहेत. एकनाथांसंबंधीं लिहितांना पांगाकरांनीं म्हटलें होतें,:— "पहिल्या मुलीचा मुलगा मुक्तेश्वर हा जगविख्यात कवीश्वर झाला व दुसऱ्या मुलीचा नातू शिवरामस्वामी हाहि नाथांना शोभण्यासारखा निघाला."[५४]

नाथांना दोन मुली होत्या. त्यांतील एका मुलीचा मुलगा माधवस्वामी व नातू रामपंडित आणि कृष्णपंडित असल्यामुळें शिवरामस्वामीस दुसऱ्या मुलीचा (मुक्तेश्वराच्या आईचा) नातू मानणें भाग होतें. यांमुळें पांगाकरांचें विधान दुरुस्त करतांना मुक्तेश्वरावर कांहीं प्रकाश पडेल असें वाटलें.

---

५३. नवें नवनीत, पृ. ३१५ — ३१६.

५४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, पृ. २४१.

डंबळ येथून मुक्तेश्वर तेरवाडास आला याचें एक कारण असें की, कर्नाटकावर त्या वेळीं विजपूरचा अंमल होता. मराठी राज्याची पहाट दिसूं लागल्यावर मराठीचा हा महाकवि स्वातंत्र्यसूर्याला अर्घ्य द्यावयास तिकडे गेला नसता तरच नवल. शिवाय नृसिंहवाडी येथें त्याचें एक आराध्यदैवत होतें.

मुक्तेश्वराचा मुलगा निरंजन व भावे[५५] यांनीं निर्देशिलेला, "शिवरामाचा गुरुबंधु, म्हणजे पूर्णनंदाचा शिष्य निरंजन" हे एकच असतील तर मुक्तेश्वराचा मुलगाहि ग्रंथकार होता असें मानावें लागेल. मुक्तेश्वर हें कवीनें धारण केलेलें नांव असून, मुद्गल हें त्याचें व्यक्तिनाम होतें, हें शंकातीत सत्य असल्यामुळें त्या संबंधीं कांहींच चर्चा न करतां येथेंच थांबतों.

५५. महाराष्ट्र–सारस्वत, पुरवणीसह, पृ. ५१३.

# विप्रनारायण

विप्रनारायणकृत ' अश्वमेध ' या ग्रंथाची मजकडील प्रत चांगल्या स्थितींत असून चरीत्रशी शुद्धस्वरूपांत आहे. "ग्रंथसहकर्ता वीटोबा नायीक ॥ रामाजी गोवींद ॥ वास्तव्य गोकाक ॥" आणि हास्तक्षर रामचंद्र कोनेरी अलुरकर वास्तव्ये मुरगोड".. असे नामोल्लेख प्रतीच्या शेवटीं आहेत. " स्वस्ति श्री नृपशालीवाहन शके व्यये नाम संवत्सरे अश्वीन वद्य चतुर्थी ॥ भोमवासरे रोहिणी नक्षत्रे । तदिनी समाप्त ॥" असा प्रत-लेखनाचा काळहि दिला आहे. त्यावरून ( पिल्ले-जंत्रीच्या आधारें ) सदर प्रत श. १६८८ मधली आहे, असें स्पष्ट होतें.

माझ्याकडील प्रतींत प्रसंग ५६ व पण ओव्या ६४२६ आहेत. प्रा. वसंतराव जोशी यांच्याकडील प्रतींत ६२३२ ओव्या आहेत.[1] आणखी एका प्रतीचा उल्लेख कै. आजगांवकरांनीं[2] केला आहे. ती प्रत म्हणजे कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे यांना उपलब्ध झालेली. त्यांची प्रत श. १६७६ मधली आहे. तिच्यांत

---

१. विप्रनारायणकृत अश्ववमेध, लोकसत्ता, ९-२-१९५८

२. महाराष्ट्र कवि-चरित्र, भाग ४ थ , पृ. २०

६४२८ ओव्या आहेत. काळे-प्रत व माझ्याकडील प्रत सारखीच दिसते. प्रा. जोशी यांनीं प्रतीचा लेखनकाल दिला असता तर या तीन प्रतींत अधिक जुनी कोणती हें ठरविण्यांत मदत झाली असती. पण कांहीं पाठभेद अत्यंत महत्त्वाचे आहेत. तेवढीच चर्चा सध्यां करतां येण्यासारखी आहे.

प्रा. जोशी यांनीं ' विप्रनारायण हाच नाभाजी ' अशी कल्पना आपल्या लेखांत मांडली आहे. ही कल्पनाच आहे, सत्यस्थिति नाहीं. त्यांनीं आधाराला घेतलेली त्यांच्या प्रतींतील ओवी अशी आहे:—

गोपजी दामोधराचा सुत । नाभाजी नामें विख्यात ।
तेणें प्रार्थुन यदुनाथ । केली माहाराष्ट्र टीका ॥ ५६–८४ ॥

या ओवींतील ' नाभाजी ' या शब्दामुळें प्रा. जोशी यांना ' विप्रनारायण हाच नाभाजी ' असें मत मांडावेंसें वाटलें. पण ' नाभाजी ' असा पाठ काळे-प्रतींत नाहीं. काळे–प्रतींतील ओवी अशी आहे—

गोपजी दामोदराचा सुतु । नाथाजी नामें विख्यातु ।
तेणें प्रार्थुनी यदुनाथु । केली महा ............ ॥ ८४ ॥

हा ' नाथाजी ' असा पाठ आहे. माझ्याकडील प्रतींत ' नाभाजी ' असेंच दिसतें. पण 'थ' आणि 'भ' यांचें सारखें वळण लक्षांत घेतां ' नाथाजी ' चेंच पुढें ' नाभाजी ' असें अशुद्ध रूप प्रती करणाऱ्यांनीं केलें असावें. हेंच विधान ' नाभाजी ' च्या समर्थनार्थ करतां येईल. पण काळे–प्रत ही उपलब्ध प्रतींत जुनी ठरली तर माझ्याच विधानाला अधिक बळकटी येईल.

पण ' नाथाजी ' ( अगर जोशी म्हणतात त्याप्रमाणें ' नाभाजी ' ) हें नांव कोणाचें? विप्रनारायणानें दिलेल्या माहितीप्रमाणें त्याची वंशावळ अशी ठरते:—

नागनाथ
।
दादाजी ऊर्फ दामोदर
।
गोपजी ऊर्फ गोपीनाथ
।
विप्रनारायण.

'प्रपिता' या शब्दाचा कवीला नेमका अभिप्रेत अर्थ कोणता ? रूढ अर्थ 'पणजा' असा आहे. कै. काळे यांनीं म्हणूनच, नागनाथ–दादाजी ऊर्फ दामोदर-गोपजी ऊर्फ गोपीनाथ–नाथाजी–विप्रनारायण; अशी वंशावळ दिली. तर कै. आजगांवकरांनीं " 'प्रपिता' या शब्दाचा अर्थ 'आजा' असा घ्यावा लागतो"; असें म्हणून गोपीनाथालाच 'नाथाजी' व विप्रनारायणाचा जनक ठरविले.[३] 'नाथाजी' हा नारायणाचा पिता असें कै. काळे व कै. आजगांवकर या दोघांचेंहि मत आहे. 'नाथाजी' हा गोपीनाथाचा मुलगा असें काळे म्हणतात. तर गोपीनाथ हाच 'नाथाजी' असें आजगांवकर सांगतात. या प्रश्नाचा निर्णय लावला पाहिजे.

वरील ओवीचा अर्थ लावतांना, गोपजी हा दामोदराचा सुत आणि तोच नाथाजी नांवानें प्रसिद्ध–असा अर्थ आजगांवकरांनीं काढला. परंतु पूर्वीच्या पद्धतीला अनुसरून दादाजी नागनाथ, गोपजी दामोदर अशीं नांवें कवि देतो. तेव्हां नाथाजी हा गोपजी दामोदराचा सुत असाच अर्थ लावला पाहिजे.

कै. काळे यांनीं तसा अर्थ लावला. पण पुढें एक चूक केली (तीच आजगांवकरांनींहि केली). ती अशी, की, या नाथाजीनें 'महाराष्ट्र टीका' केली; हे दोघेहि विसरले. 'अश्वमेध' हा ग्रंथ विप्रनारायणाचा म्हणत म्हणत 'माराष्ट्र-टीकेचें कर्तृत्व' मात्र या दोघांनीं भलत्यालाच बहाल करण्याचा विसंगत प्रयोग केला. 'नाथाजी' हें नांव विप्रनारायणाचें : असें दोघांपैकीं कोणीहि म्हटलें नाहीं.

असें असतां प्रा. जोशी यांनीं 'नाथाजी' असा पाठ पत्करून कां होईना या ओवीचा वाक्यरचनेच्या दृष्टीनें बरोबर अन्वय लावला असें म्हटलें पाहिजे. विप्रनारायण हाच 'नाथाजी' असें मी म्हणतों. त्यासाठीं कांहीं आधार देण्यासारखे आहेत.

> पुढे जाली कैसी कथा । येज्ञाची अईति तत्वतां ।
> ते सांगिजे कविनाथा । कथा दहनी पापाते ॥ ५४–१०८ ॥

---

३. महाराष्ट्र-कवि-चरित्र, भाग ४था, पृ. २२

पुढें कैसी जाली कथा । मछे गीळीले जे जगन्नाथा ।
ते अपुर्व कवीनाथा । सांगें श्रोतीया पुढें ॥ ४९-३९ ॥
पुडे कैसे झाली कथा । वारू चालीले कवणे पंथा ।
ते कथा सांगे कवीनाथा । सादरे चीतें ॥ ४६-१४७ ॥

असे कितीतरी उल्लेख काढून दाखवितां येतील. येथें कवि 'नाथा' असा स्वतःचा उल्लेख करतो. यावरून 'नाथाजी' हें विप्रनारायणाचेंच दुसरें नांव ठरतें.

विप्रनारायण हा 'नाभाजी' ('भक्तमाल' कार) नाहीं. हें सिद्ध करावयास कांहींच अडचण नाहीं. नाभाजीबद्दल कै. भाव्यांनीं दिलेली दंतकथात्मक माहिती प्रा. जोशी आपल्या विधानाच्या समर्थनार्थ वापरतात. नाभाजीचे नांव नारायणदास होतें असें मानलें तरी, तेवढ्या आधारावर नाभाजी म्हणजेच विप्रनारायण असें मानणें निव्वळ धाष्ट्‍र्य आहे. या दंतकथेंतील महत्वाचा भाग म्हणून जो जोशी उद्धृत करतात तेहि त्यांच्या विधानास पोषक नाहीं. कारण विप्रनारायण कोठेंहि या घटनांचा उल्लेख करीत नाहीं. वडील वारले, आईनें सोडलें, ग्वाल्हेरला होतों किंवा अग्रदासांकडून उपदेश मिळाला; यापैकीं कशाचा तरी विप्रनारायणानें (तोच नाभाजी असता तर) उल्लेख केला असता. पण याबाबत अवाक्षरहि त्यानें काढलेलें नांहीं.

याउलट 'पूर्वजांसहित नींवास' केल्याचा उल्लेख त्याचे वडील (व आजोबाहि) हयात असल्याचें सुचविणारा आहे.

मग सद्भावे वंदीला श्री गुरुनाथु । जेणे दावीला परमार्थ पंथु ।
त्याचा मस्तकीं वंदीला हातु । भुजगणीं जैसा ॥ १-२१ ॥

एवढेंच गुरुबद्दल तो म्हणतो. गुरूचें नांवहि कवीनें दिलेलें नाहीं.

नाभाजीबद्दल भाव्यांनीं दिलेली आणखी कांहीं माहिती प्रा. जोशी यांनीं विचारांत घेतलेली नाहीं. तीहि महत्वाची आहे. "नाभाजी हा जातीचा नागर ब्राह्मण होता", "नाभाजी हा दोन्ही डोळ्यांनीं आंधळा होता", असें भावे[४]

४. महाराष्ट्र-सारस्वत, (आवृत्ति पांचवी), पृ. ४७४

सांगतात. नागर ब्राह्मण हा गुजराथी ब्राह्मणांतील एक प्रकार आहे. विप्रनारायण हा यजुर्वेदी माध्यांजनी, वसिष्ठ गोत्री ब्राह्मण आहे. तसेंच विप्रनारायण हा आंधळा होता असें मानावयास आधार नाहीं. त्याचा 'अश्वमेध' ही आंधळ्या कवीची कृति वाटत नाहीं. त्याच्या वर्णनशैलीवरून तो चांगलाच डोळस होता; हें स्पष्ट होतें,

याहून महत्वाची बाब म्हणजे 'नाभाजी' चा मराठीशीं व महाराष्ट्राशीं परिचय नव्हता. 'भक्तमाल' हा ग्रंथ 'ग्वाल्हेर भाषेंत' नाभाजीनें रचला व तो मथुरा प्रांतांत राहणारा होता; अशीहि हकीकत भावे देतात. प्रा. जोशीहि मार्तंडबुवांच्या 'भक्तिप्रेमामृता' ला सामान्यत्वें 'भक्तमाला' म्हणतात. त्याअर्थी खुद्द नाभाजीचा ग्रंथ मराठींत आहे; असा जोशी यांचा गैरसमज दिसत नाहीं. असें असतांना, विप्रनारायणानें मराठींत 'अश्वमेध' रचूनहि, मराठी अवगत नसलेल्या नाभाजीशीं, त्याचें एकरूपत्व सिद्ध करण्याचा प्रपंच प्रा. जोशी यांनीं करावा याचें आश्चर्य वाटतें.

विप्रनारायणाच्या वास्तव्याबाबत लिहितांना त्याला ( नाभाजी ठरविण्या-साठीं) प्रा. जोशी यांनीं 'रामटेक'वर नेऊन टेकविलें आहे आणि नाभाजीप्रमाणेंच नारायणभट्ट नांवाच्या महिपतिवर्णित साधूशींहि एकरूप ठरविण्याचा प्रयत्न केलाआहे. अर्थात् 'नारायणभट्ट हा विप्रनारायण' ही कल्पना जोशी यांची नव्हे. तर आजगांवकरांनींच ती विप्रनारायणासंबंधी बऱ्याच वर्षांपूर्वी मांडली[५] व आजही कल्पनेहून अधिक महत्व तिला नाहीं.

महिपति हा प्रसिद्ध संतचरित्रकार ( श. १६३७ ते १७१२ ) 'भक्त-विजय' व 'भक्तलीलामृत' या आपल्या ग्रंथाच्या आरंभींच नाभाजींचा आपण अनुवाद करीत आहों असें म्हणतो. नाभाजीबद्दलचा याचा आदर येथें चांगला व्यक्त झाला आहे :—

५. महाराष्ट्र-कवि-चारित्र, भाग ४था, पृ. २७

उत्तर देशीं साचार । नाभाजी विरंची अवतार ।
तेणें संतचरित्र ग्रंथ थोर । ग्वालेरी भाषेंत लिहिला असे ॥

( —'भक्तविजय' )

तो हिंदुस्थान देशांत पूर्ण । नाभाजी नामें वैष्णवजन ।
संतचरित्रें वर्णिलीं त्याणें । ग्वाल्हेर भाषेनें निश्चित ॥ १–१०६ ॥

ग्वालेर देश भाषा जाण । छपया केल्या असती त्यानें ।
तयाच्या आधारें करून । प्राकृत भाषण वदतसें ॥ १–१६८ ॥

महिपतीच्या या ओव्यांत नाभाजीचा देश व त्याची भाषा यासंबंधीं आलेले उल्लेख महत्वाचे आहेत. 'उत्तर देशीं' व 'हिंदुस्थान देशांत' या निर्देशावरून नाभाजी महाराष्ट्रांतील नव्हता हें स्पष्ट होतें. त्यानें 'ग्वालेर (देश) भाषें'त संतचरित्रें गायिलीं व त्यांच्या आधारें आपण 'प्राकृतांत' (म्हणजे मराठींत) लिहीत आहोंत; या महिपतीच्या निवेदनावरून नाभाजीची भाषा 'मराठी' नव्हती हें सिद्ध होतें.

सारस्वतकारांनीं दिलेली नाभाजीविषयींची हकीकत महिपतीनें 'भक्तलीलामृतांत' (अ. १ ओ. १०६–१६८) दिली आहे. त्यांत रामचंद्राचलाचा मात्र उल्लेख नाहीं. 'नाभाजी' या नांवाचें स्पष्टीकरण महिपति असें करतो :—

म्हणे सर्वथा भय न धरी मनें । म्हणोनि दीधलें आश्वासन ।
यास्तव नाभाजी नामाभिधान । वैष्णवजन ठेविती ॥ १-१३६ ॥

महिपतीनें नाभाजीची गुरुपरंपरा दिली आहे ती अशी:

तरी त्याची गुरुपरंपरा ऐसी । रामानंदस्वामी संन्यासी ।
त्यांचें वास्तव्य वाराणसीं । महासमर्थ तापसी जे ॥ १–१०९ ॥
भक्तिज्ञान वैराग्य निश्चित । हें त्याचे देहीं मूर्तिमंत ।
आनंदानंदस्वामी निश्चित । शरण येत त्यालागीं ॥ १–११० ॥
तया आनंदानंदाचा शिष्य जाण । पोहरीदास नामाभिधान ।
अग्रजी किलजी दोघेजण । शिष्य निपुण तयाचे ॥ १–१११ ॥

वि: ... नों. दि: ...


महिपति अग्रजी ( अग्रदास ) व किलजी ( कील्हदास ) अशीं नांवें देतो. हा अग्रजीच नाभाजीचा गुरु होय. महिपतीनें दिलेली नाभाजीची ही माहितीहि विचारांत घेतली पाहिजे.

महिपतीचा नारायणभट्ट तापीतीरवासी आहे व आमचा कवीहि तापीतीरवासीच आहे; यावरून ते एक असाहेत असें म्हणण्यास नामसादृश्याखेरीज दुसरा आधार नाहीं. महिपतीनें नारायणभट्टाकडून 'परिस' हत्याहरणतीर्थांत टाकविला असता तर विचार करण्यासारखा प्रश्न होता. केवळ 'थारनेर' शब्दावर जाऊन चालणार नाहीं. महिपतीचा नारायणभट्ट हा 'संत' आहे; तर विप्रनारायण 'कवि' आहे. 'सर्वकाळ विदेहि !' किंवा 'अन्नवस्त्रांची अडचण घरीं, हें विप्रनारायणाबाबत खरें दिसत नाहीं.

'हत्याहरण'चें 'थारनेर' असें रूप होतें कीं नाहीं हा प्रश्नहि म्हणूनच गैरलागू आहे. हत्याहरण नांवाच्या सरोवरावरून 'हाताळे' असें नांव गांवाला पडलें; असा अर्थ विप्रनारायणाच्या निवेदनांतून निघतो. 'हाताळे' चा हाताळण्याशीं कांहीं संबंध नाहीं. 'हाताळे' हें 'हतियाळे' चें रूप असावें. 'हतियाळें' हेंहि तळ्याचेंच नांव आहे. या तळयाजवळ महानुभाव चक्रधरांचा शिरच्छेद मेळा नांवाच्या चांडाळानें केला. बेलापूर, खोकरगांव, कीर्तिखांब व मग घाटाखालीं हातियाळे असा पालखींतून चक्रधरांचा प्रवास झाला. नंतरहि चक्रधरांची एक लीळा अशी :—

" घाटांचे माथांहुनि प्रतले । मग प्रतिस्थानासि बीजे केले "

यावरून 'हातियाळे' हें ठिकाण नक्की कोठें आहे याचा बोध होईल. 'हाताळे' नांवाचें ओसाड ( Deserted ) गांव पश्चिम खानदेशांत, सिंदखेड तालुक्यांत आहे. तळोद्याहून ३० मैलांवर असलेलें 'हातधुई' व चाळिसगांव तालुक्यांतील 'हातळे' हीं गांवेंहि 'हत्याहरण' सरोवराच्या नांवाशीं व कथेशीं कांहीं संबंध असणारीं निघण्याची शक्यता आहे. तीं या संदर्भात चिंत्य आहेत.

म्हणूनच विप्रनारायणाचें वास्तव्य खानदेशांत होतें, असें मानावें लागतें. ग्वाल्हेरशीं त्याचा कांहींच संबंध नसल्यानें, तो जोडण्यासाठीं त्याला रामटेककडे

नेणेंहि दूरान्वयाचा प्रकार वाटतो; आणि 'आगे, झगडा' यांच्यासारख्या शब्दांवरून विप्रनारायणावर हिंदीचा पगडा आहे; असें म्हणणेंहि यथार्थ ठरत नाहीं. डॉ. तुळपुळेहि[६] 'हाताळे' खानदेशांत आहे असें मानतात.

यानंतर महत्वाचा प्रश्न म्हणजे ग्रंथलेखनाचा काल हा होय. प्रा. जोशी यांच्याकडील प्रतींतील उल्लेखावरून शके १३४२ हा सदर ग्रंथाचा काल ठरतो. हें गणित शास्त्रदृष्ट्या खरें आहे. परंतु भाद्रपद वद्य षष्ठी कीं शुद्ध षष्ठी हा उल्लेख नसल्यानें शार्वरी संवत्सरांत १३४२ मध्येंच शुद्ध व वद्य दोन्ही षष्ठींना गुरुवार येतो. म्हणूनच हा शक ठरविला गेला कीं काय अशी शंका येते. पुढें श. १४०२ मध्यें शुद्ध षष्ठीला शुक्रवार तर वद्य षष्ठीला शनिवार येताता. श. १४६२ मध्यें शुद्ध षष्ठीला रविवार व वद्य षष्ठीला सोमवार येतात. गुरुवार हा श. १३४२ मध्यें येतो.

म. म. पोतदारांनीं कोणत्या कालोल्लेखाच्या आधारें, १५८२, १६४२, १७०२ व १७६२ हे शक दिले त्याची मला कल्पना नाहीं. यांतील १५८२ हाच शक डॉ. तुळपुळ्यांना का मान्य व्हावा, हेंहि स्पष्ट होत नाहीं. ग्रंथरचनेचे कांहीं वेगळेच शक विचारार्थ मला पुढें ठेवावयाचे आहेत. माझ्याकडील प्रतींत कालदर्शक ओवी अशी आहे: —

साटिमाजी क्रोधन नाम संवत्सर । उत्तरायण शरद्रती ।
जेष्ट शुद्ध अष्टमी रवीवार । ईंदुवासर तो ५६–९७ ॥

श. १४८७, श. १६०७ आणि श. १६६७ मध्यें सोमवार येतो. श. १४२७ मध्यें ज्येष्ठ वद्य अष्टमीस सोमवार व शुद्ध अष्टमीस रविवार येतो. वरील ओवींत रविवार व सोमवार दोन्हीहि दिले आहेत. त्याअर्थी वद्य कीं शुद्ध अष्टमी हा गोंधळ प्रत करणाऱ्याच्या मनांत होऊन त्यानें दोन्हीहि वार घातले असावेत. आणखीहि तर्काला जागा आहे.

श. १३६७ मध्यें शुक्रवार येतो. श. १४२७ च्या मागें जातां येईल असें वाटत नाहीं. कारण ग्रंथाची भाषा इतकी जुनी वाटत नाहीं. श. १३४२

६. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. ८०७

म्हणूनच विश्वसनीय वाटत नाहीं. तसेंच श. १६६७ च्या पुढें जाणें तर शक्य नाहींच व श. १६६७ हाहि शक मान्य करतां येण्यासारखा नाहीं. कारण श. १६७६ मधली काळे—प्रत आपणांस उपलब्ध आहे. प्रत करण्याइतपत लोकप्रियता एखाद्या ग्रंथास मिळावयास बराच कालावधि जावयास हवा. त्या दृष्टीनें श. १४२७, १४८७ व १६०७ हे तीन शक अभ्यासकांच्या विचारार्थ पुढें ठेवावेसे वाटतात. काव्याच्या शैलीवरून व भाषेवरून विप्रनारायण हा एकनाथांपूर्वीचा वाटत नाहीं. आणि प्रा. जोशी यांनीं मार्मिकपणानें दाखविलेल्या श्रीधरकृत निर्देशावरून तो श्रीधरापूर्वीचा ठरतो. म्हणून व्यक्तिशः मला श. १६०७ हाच अधिक संभाव्य रचनाकाल वाटतो. अधिक संशोधनांतीं शकनिश्चिति करतां येईल. आजतरी असा निर्णय होणें घाईचें ठरेल.

मराठीबद्दल विप्रनारायणाला वाटणारा आदर व जिव्हाळा सांगून 'मराष्ट्री' शब्दाकडे प्रा. जोशी यांनीं वाचकांचें लक्ष वेधलें आहे. 'मराष्ट्री' असा शब्द माझ्याकडील प्रतींत आढळला नाहीं. माराष्ट्र, मऱ्हास्ट, मऱ्हाष्ट, माऱ्हाष्ट, असे शब्द तो वापरतो. 'मराठी' पेक्षां 'मऱ्हाटी'ला हे शब्द अधिक जवळचे आहेत. महाराष्ट्रापासून कवि दूर होता हें खरें नसल्यानें या भाषाप्रेमाकडे निव्वळ कौतुकानें पाहाणें आवश्यक नाहीं.

कवीबद्दल जसे कांहींचें गैरसमज दिसतात, तसेच काव्याबद्दलहि आढळतात. कै. काळे यांचा (गैर) समज हा 'अश्वमेध' महाभारतावरील ('अश्वमेध'पर्वावरील) मराठी टीका आहे, असा असल्याचें कै. आजगांवकरांनीं नमूद केलें आहे. 'हा जेयमीनाचा वागवीलास', 'त्या जेयमीनी काव्याची टीका', 'जयमुनि वाक्याची टीका'; असे कितीतरी उल्लेख आढळत असतांना कै. काळे यांचा गैरसमज कसा झाला हें समजत नाहीं.

दुंदुभी-आख्यानासारख्या कथांबद्दल श्रीधरानें कवींना दोष दिला व त्यांत विप्रनारायणहि येतो, असें जोशी म्हणतात. पण दुंदुभी-आख्यान जैमिनी 'अश्वमेधां'त आहे, अशी आमच्या कवीची श्रद्धा आहे. तो म्हणतो—

मुनि म्हणे भारता । ऐसी दुंदुभीची पवित्र कथा ।
अनुसंधान ऐक समर्था । वदला जयमुनि व्यासशीष्ये ॥ ४१/९७ ॥

जैमिनीची जी प्रत विप्रनारायणाला उपलब्ध झाली तींत दुंदुभी-आख्यान असण्याची शक्यता गृहीत धरली पाहिजे व नंतर श्रीधराच्या 'शापवाणी'चा विचार केला पाहिजे !

काव्य म्हणून ही 'अश्वमेध'-कथा मौलिक समजली पाहिजे. विप्रनारायण हा चांगला कवि आहे. 'नेणे काव्यरचना' असें म्हणत म्हणत त्यानें प्रसन्न व प्रासादिक रचना केली आहे. उपमा—दृष्टांतांचा वापर करण्याची त्याची हातोटी लक्षांत घेण्यासारखी आहे. कृष्ण रागावून निघाला तेव्हां द्रौपदीनें केलेली विनवणी पाहा:—

तुजवाचोनि मंगळधामा । कोण राखेल आमुची महीमा ।
चकोराशी उबगला चंद्रमा । तरी ते कैसे जींततील ॥ १–१२३ ॥
चातक मेघोदका कारणें । अनुसरलासे जीवें प्रमाणें ।
मेघे त्याची उपेक्षा करणें । तेव्हां तो प्राणी केंवि वाचे ॥ १–१२४ ॥

कर्णपुत्राच्या आवेशाचें वर्णन कवि असें करतो:—

कोपाचा सुटला पंचाननु । की गजावरि चौताळिला केशरी नंदनु ।
तैसा कर्णपुत्र दारुणु । मारा पेटला सैन्यातें ॥ २–१३५ ॥

युवनाश्व व वृषीकेताच्या युद्धाच्या अखेरीस अद्‌भुततेबरोबरच उदात्ततेची जोड कवि देतो :—

रावो जाणोनी नीचेष्टीत जाण । वृषीकेत आला धांवोन ।
रायाचे नेत्र परीमार्जुन । वारा घालीत बैसला ॥ २–१८३ ॥
म्हणे कठकटां काये जाले । येवडे रत्न माझ्या हातें पडीलें ।
आतां कृष्णभक्तीचे फळ वहीले । अर्पीन राजा वांचवावया ॥२-१८४॥

श्यामकर्ण वारूचें वर्णन करणारी एक ओवी तरी पाहिली पाहिजे :—

शामकर्ण वाजले आळंकार । तेजे उजळतसे अंभर ।

प्रष्टी दीव्य झुली वीचीत्र । झल्लरी घोश मुक्ताफळांचे ॥ २-१०६ ॥

विप्रनारायणाच्या काव्यसमुद्रांतून अशीं कितीतरी रत्नें काढतां येतील.

त्याच्या काव्यांतील हरुषनीर्भर, भक्तवछ, मछें, पौळी, वीपण असे कांहीं शब्द व 'हा जीव विकीला आहे तुझ्या चरणीं'; 'नाहीं वाळला मस्तकिचा जारू'; ' घोडा मुरडला स्वस्छळाकडे '; ' मुळ धाडीती '; असे कांहीं वाक्प्रचार जातां जातां नमूद करण्यासारखे आहेत. आंदण देणें, नींबलोण करणें, अशा कांहीं चालीरीतींचाहि निर्देश तो करतो. 'अश्वमेधा'चा काव्यदृष्ट्या विचार होणें जरुरीचें आहे.

मग फुटले अंकुर जाण । मतिस नाना रसाचे ॥ १-२७ ॥

ही कव्युक्ति मृषा नाहीं.

माझ्या विवेचनाचा सारांश इतकाच :- (१) विप्रनारायण हा 'नाभाजी' नव्हे, तर 'नाथाजी' आहे. (२) ' हत्याहरण ' ऊर्फ 'हाताळे' हें कवीचें गांव खानदेशांत आहे. (३) महिपतीचा नारायणभट्ट व विप्रनारायण एक नव्हेत. (४) या अश्वमेधाचा रचनाकाल आजतरी निश्चित करतां येण्यासारखा नाहीं. (५) काव्यदृष्ट्या या ग्रंथाचें मूल्य कमी नाहीं.

# 'देशिकचरित्र'

'देशिकचरित्र' हें अेक अज्ञात संतचरित्र आहे. तें अज्ञात संतांचेंहि चरित्र आहे. या चरित्रावरून नवीं नांवें पुष्कळच कळतात. महाराष्ट्रांतील संतपरंपरेचा वेगळाच व अज्ञात अितिहास कळतो.[१]

त्या दृष्टीनें मला लागलेला या अज्ञात संतचरित्राचा शोध महत्वाचा आहे. बेळगांव जिल्ह्यांत गोकाकजवळ मुडलगी नांवाचें अेक लहान गांव आहे. गांवांत 'स्वामी' घराणें पूर्वापार प्रसिद्ध आहे. गांवांत स्वामींचा मोठा वाडा आहे. आणि वाड्यापासून थोड्याच अंतरावर स्वामींचा मठ असून तेथें होऊन गेलेल्या सत्पुरुषांच्या समाध्या आहेत.

हें घराणें गृहस्थाश्रमी 'स्वामीं'चें. आज मूळ पुरुषापासून अकरावी पिढी चालू असून सध्यांचे श्री. कल्मेषबोध श्रीपादबोध स्वामी हे मुडलगींतच

१. विशेषतः मुकुंदराजांच्या परंपरेवर अधिक प्रकाश पडतो. मुकुंदराजांनंतरहि त्यांची परंपरा चालू राहिली ही माहिती प्रकाशांत येत आहे. या परंपरेची विस्तृत चर्चाहि मी अनेक आधार देऊन अन्यत्र केली आहे.

वास्तव्य करतात. आपल्या घराण्याची थोरवी जाणून परंपरागत आध्यात्मिक, वाङ्मयीन व ऐहिक संपत्तीचें रक्षण करण्याचें कर्तृत्व त्यांच्यांत आहे. पूर्वजांनीं अगर पूर्वजांविषयीं लिहिलेले ग्रंथ वगैरे 'कागद पत्र, हस्तलिखितें यांचें महत्व ते जाणतात. म्हणूनच आज ' देशिकचरित्रा ' सारख्या अज्ञात ग्रंथाबद्दल मला लिहिणें शक्य झालें.

' देशिकचरित्र ' हें ' गुरु-चारित्रा ' सारखें आहे. अशा अर्थानें कीं त्यांत आपल्या गुरुघराण्याचें चरित्र कवीनें सांगितलें आहे. अेका अर्थी हें अेक ' लीळा 'चरित्रहि आहे. कारण त्यांत सत्पुरुषांच्या लीला वर्णिल्या आहेत.

ग्रंथांत अेकंदर सात अध्याय असून त्यांचीं नांवें व ओवीसंख्या अशी आहे :—

| | | |
|---|---|---|
| १ | मंगलाचरणं. | ओव्या. ९६ |
| २ | अधिकारीअनधिकारी लक्षणनिरोपणं. | ओव्या. ६६ |
| ३ | रंगबोधमहात्म्यवर्णनं. | ओव्या. ६६ |
| ४ | अद्वयबोधचरित्रवर्णनं. | ओव्या. १६० |
| ५ | शिवबोधचरित्रवर्णनं. | ओव्या. १६६ |
| ६. | रंगबोधमहात्म्यवर्णनं. | ओव्या. ९० |
| ७. | शिवबोधमहात्म्यवर्णनं. | ओव्या. २५२ |
| | | अेकूण. ८९६ |

मुडलगीच्या स्वामींतील रंगबोध, अद्वयबोध, शिवबोध, रंगबोध व शिवबोध या पांच प्रमुख संतांचीं चरित्रें हा या ग्रंथाचा विषय आहे. पहिल्या रंगबोधांचे वडील कोनेरिबोध आणि दुसऱ्या शिवबोधांचे पुत्र संगबोध यांच्यामध्यें होऊन गेलेल्या सत्पुरुषांचें गुणगान कवि करतो. कोनेरिबोधांपासून चरित्राला खरा प्रारंभ होतो. मंगलाचरणाचा पहिला अध्याय कांहीं संदर्भामुळें महत्वाचा वाटल्यावरून त्याचा विचार वेगळा केला पाहिजे. दुसऱ्या अध्यायांत भक्त-अभक्त यांचींच रूढ लक्षणें दिलीं असल्यानें त्यांत नवीन असें फारसें नाहीं. म्हणून मूळ चरित्राचाच तपशील पाहावासा वाटतो.

कोनेरिबोध हे गोदातीरावरील 'टाकळी' गांवांत निष्काम जीवन कंठत होते.[२] याच गांवांत सहजबोध स्वामी राहात होते.[३] कोनेरिबोधांनीं त्यांच्या कडून उपदेश घेतला होता. रंगबोध हे कोनेरिबोधांचे पुत्र व सहजबोधांचे शिष्य. कोनेरिबोधांच्या लीळांत, ते 'श्रीशैल्याला' गेले असतां नंदीनें त्यांच्या हातची 'डाळी' खाल्ली, ही अेक प्रमुख आहे.[४] आणि याचमत्कारामुळें हवे तें मिळत असतां त्यांनीं 'मुडलगीच्या लोकांना यात्राकर माफ व्हावा' अशी मागणी केल्याचीहि कथा कवि सांगतो.[५] कोनेरिबोध काशीस जाऊन समाधिस्थ झाले आणि त्यांच्या पत्नीनें सहगमन केलें.

रंगबोधांना टाकळींत असतांना सहजबोधांनीं आज्ञा केली कीं, तुम्ही आतां दक्षिणेस जावें व तेथील लोकांचा उद्धार करावा. गुरूची आज्ञा. पण गुरूचे पाय सोडून तर जाववेना. गुरूंनीं पुढें असेंहि सांगितलें कीं, मी तुला जेथें आकाशवाणीच्या रूपानें हांक मारीन व कोणत्यातरी रूपांत दर्शन देईन. तेथेंच तूं थांब व वास्तव्य कर.

अितकें सांगितल्यावर गरूंच्या पादुका बरोबर घेऊन रंगबोध निघाले.[६] आईवडिलांचा निरोपहि त्यांनीं घेतला नाहीं. आणि दक्षिणेकडे जात असतां

---

२. गोदातीर उत्तम । टाकळी म्हणोनि ग्राम ।
तेथे कोनेरि बोधाचें धाम । नित्य निष्कामें वसतसे ॥ ३—५ ॥

३. तेथें सहजबोधस्वामी गुरुवर । मठ करूनी निरंतर ।
तया ग्रामी कृपाकर । वर्ते साचार ब्रह्ममूर्ति ॥ ३—७ ॥
........मग सहजबोध यथार्थ । वास टाकळींत गोदातीर ॥ ७—८७ ॥

४. अ. ३, ओ. ७०—७१. रुक्मागदकृत 'श्लोकपंचकांतील उल्लेख:—
कोनेराख्य महानुभाव जेगती यत्कीर्ति विस्तारिली ।
श्रीशैलीं बहु दाळि विश्व पाहतां नंदीश्वरा चारिली ॥

५. अ. ३, ओ. ८१.

६. या पादुका आजहि स्वामींच्या पूजेंत आहेत.

' ये रे रंगा ' अशी आकाशवाणी त्यांनीं एकाजागीं ऐकली. तेथेंच त्यांनां एका सिद्धपुरुषाचें दर्शन झालें. हा सिद्ध म्हणजे रेवणसिद्ध होय, असें कवि म्हणतो.[७] हें ठिकाण म्हणजेच मुडलगी गांव. गांवापासून जवळच रेवणसिद्ध व रंगबोध यांच्या भेटीनें ठिकाण दाखविलें जातें. मुडलगींत व अन्यत्र रंगबोधांनीं अनेक चमत्कार दाखविले. मठांत बसूनच स्वर्गी निघालेल्या विमानस्थ माता-पितरांना त्यांनीं पाहिलें. अवढेंच नव्हे तर त्यांच्या निर्वाणाचें तिथिवार नक्षत्र लिहिलें व तें बरोबर आढळलें. त्यांनीं काष्ठाचा पिंपळ करून दाखविला ही कथा तर अनेकांनीं सांगितली आहे. त्यांत आपल्या कवीबरोबरच ज्ञानबोध हाहि आहे.[८] हा ज्ञानबोध म्हणजे रंगबोधांचा मूर्तिमंत चमत्कार. कारण गलगल (गलगली ?) येथें गोविंदबोध हे ७५ वर्षांचे गृहस्थ राहात होते. ते रंगबोधांचे शिष्य. त्यांची पत्नी अन्नपूर्णाबाअी ६० वर्षांची. ज्ञानबोध हा अशा वयांत गुरूंच्या कृपेनें झालेला पुत्र. याचा पुत्र जीवबोध.

काशींत एका ब्रह्मराक्षसाला मुक्तिदिल्याची[९] व गांवांतील रजकाला 'शैल' दाखविल्याची[१०] कथा कवि सांगतो. ( रंगबोधांचा गीतेचा अभ्यास दांडगा होता.[११] ) ते पंढरीची वारीहि करीत.[१२] अद्वयबोधांच्या रूपानें त्यांच्या पोटीं पांडुरंगच आला असें कवि म्हणतों.[१३]

रंगबोधांच्या पत्नी लक्ष्मीबाई याहि मोठ्या साध्वी होत्या. त्यांनीं पीतांबरावर कसीदा काढून सर्व गीता उतरली होती व हा पीतांबर त्यांच्या वृंदावना

---

७. तो महारेवणसिद्ध । ईश्वराचा अवतार प्रसिद्ध ।
त्या सिद्धासि वंदूनि रंगबोध । मुडलगींत स्वतसिद्ध राहिले ॥ ३-५५ ॥

८. सहज विचरता मुडलगीच्या मटीं । हातीं होती ते पिंपळाची काठी ।
सहज रोउनि वृक्ष केला नेटीं । काय सांगु अगाध त्याची गोष्टी ॥

९. अ. ३. ओ. १३२.    १०. अ. ३. ओ. ११५.

११. अ. ३. ओ. ९६.    १२. अ. ३. ओ. १५७.

१३. अ. ३. ओ. १५८.

खाली आहे.[१४] या माहितीवरून त्यांच्याबद्दल आदर वाटतो. त्यांचें वृंदावन पतीच्या समाधी शेजारींच आहे.

रंगबोध हे या घराण्यांतील पहिले संत. त्यांनीं गोकाकच्या तटेश्वराजवळ तपश्चर्याहि केली होती. त्यांच्याबद्दल त्यांच्या समकालीनांनां वाटणारा आदर व 'पुढीलां'नां वाटणारी भक्ति पत्रें, पदें व आरत्या यांतून व्यक्त झाली आहे. 'देशिकचरित्रा' पुरताच येथें विचार करावयाचा असल्यानें अन्य निर्देश देण्याचा मोह टाळतो. रंगबोधांचें वाङ्मय व त्यांच्या विषयींचे वाङ्मय यांचा उल्लेख आपला कवि करीत नाहीं. तो स्वतंत्रच लेखाचा विषय असला तरी अद्वयबोधांच्या 'श्रीरंग श्री विलास' वरून 'श्रीरंगरंगीं' सर्व कसें रंगले होते हें कळून येईल एवढेंच म्हणतो.[१५]

अद्वयबोध हे जनकाप्रमाणें विदेही होते,[१६] चोरांनीं म्हशी नेल्यावर त्यांनीं रेडकेंहि बहाल केलीं.[१७] या माहिती बरोबरच विजापुरांत घडलेला प्रकारहि कवीनें वर्णिला आहे. तो असा:– विजापूरच्या एका शिष्यानें बोलविलें म्हणून अद्वयबोध तिकडे गेले. राजा यवन होता. त्यानें कांहींतरी 'निमित्त्य' ठेवून त्या शिष्याला दंड केला.

दंडासाठीं स्वामी जामीन राहिले. वायदा ठरला. पण त्याप्रमाणें पैसे दंड भरतां आले नाहींत. म्हणून स्वामींनां तुरूंगांत घातले. शिपायांनीं दार उघडून पाहिले तर बेड्या आंत पडलेल्या, स्वामी मात्र नाहींत.

शोध केल्यावर त्या शिष्याच्या घरांत पूजा करीत बसलेले स्वामी शिपायांनां दिसले. त्यांनीं हे वर्तमान राजाला सांगितलें. राजानें नैवेद्यासाठीं स्वामींकडे

---

१४. अ. ३. ओ. १६१, ६२.

१५. श्रीरंगरंगीं मन रंगलं हो । श्रीरंगरंगीं धन रंगलं हो ॥
श्रीरंगरंगीं जेन रंगलं हो । श्रीरंगरंगीं वन रंगलं हो ॥ २८ ॥

१६. अ. ४. ओ. ६.     १७. अ. ४. ओ. ११, १२, १३.

'मास' (झांकून) पाठवलें. स्वामींनीं त्यावर मंत्रोदक शिंपडलें आणि प्रसाद म्हणून राजाकडे पाठविलें. राजानें पात्र उघडून पाहिलें तर आंत फुलें! तो स्वामींना शरण आला.[१८]

वरील कथेंत राजाचें नांव दिलें नाहीं तरी दुसऱ्या अेका कथेंत मलिक कंबराचा उल्लेख आहे. मलिक कंबराचा सैन्यासह मुडलगीजवळ तळ पडला. "आपलें सैन्य भुकेजलेलें आहे. त्याला जेवायला घातलें तरच गांव राखूं; नाहीं तर लुटूं", असा निरोप त्यानें अद्वयबोधस्वामींना धाडला.

स्वामींनीं आपल्या पत्नीस-राधाबाईस–'घरांत काय आहे'? म्हणून विचारलें. अेक भाकरी आणि लोणच्याच्या चार फोडी घेऊन स्वामी सैन्यांत आले. सर्व सैन्याला वाटूनहि अेक भाकरी व चार फोडी उरल्या. अशी अद्भुत कथा कवीनें दिली आहे.[१९] कृष्णराव पंडित[२०] नांवाच्या अेका विद्वानाचा गर्व आपले बंधु पूर्णबोध यांच्याकरवीं स्वामींनीं हरविला.[२१] कृष्णराव पंडिताच्या वर्णनांत वामन पंडिताच्या छटा बऱ्याच दिसतात हें विचार करण्यासारखें वाटतें. अद्वय-बोधांचा अधिकार मोठा होता. म्हणूनच मुडलगींत काशीयात्रा आली असतां "होंचि काशी" म्हणून आकाशवाणी झाली. येथेंच कवीनें—मुडलगी माहात्म्य सांगितलें आहे.[२२]

पवित्रगडास (?) गमन करून मृतास जीवंत करण्याचा अेखादा चमत्कारहि स्वामींनीं केला असला तरी त्यांचें–मोठेंपण जाणवतें तें त्यांच्या वाङ्मयीन कृतींत. मलिक कंबराच्या भेटीनंतर स्वामींनीं 'अद्वयशतक' लिहिलें असें आपला कवि सांगतो.[२३] पण स्वामींच्या 'श्रीरंगश्रीविलास' स्तोत्राचा आणि असंख्यपदांचा उल्लेख तो करीत नाहीं.

---

१८. अ. ४. ओ. ४७–७०. १९. अ. ४. ९६–१०७.

२०. आणीक येक झालें नवल । कृष्णराव पंडित आगळे ।
चहुराष्ट्रीं प्रख्यात भले । जयपत्र घेतले पृथ्वीवरी ॥ ४–१२३ ॥

२१. अ. ४. ओ. १२४–१५८, २२. अ. ४. ओ. ८१–९५.

२३. अ. ४. ओ. ११३.

अद्वयबोधांचे पुत्र शिवबोध. त्यांच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई. त्यांनां फक्त अेक कन्याच झाली. तिचें नांव 'काशीबाई'. 'साक्षात् वाराणसीच येउनी अवतरली जाण पार्वती उदरीं' असें तिचें वर्णन कवि करतो.[२४] पण पुत्र नाहीं ही खंत पार्वतीबाईंना वाटे.

होसूरच्या कुलकर्ण्यांकडे अेकदां शिवबोधांना बोलावलें होतें. तेथें भीमातीराहून कोणी कुलकर्ण्याचे 'शरीरसंबंधी' आले होते. त्यांचा मुलगा स्वामींच्या मनांत भरला. त्याचें लक्षण योग्याचें असून नांव संगमनाथ असें होतें व त्याची मागणी करतांच आईवडिलांनीं मुलास स्वामींच्या चरणावर घातलें.[२५] त्याला घेऊन स्वामी मुडलगीस आले. उभयतांनीं त्याचें पालनपोषण केलें. काशीबाईशी त्याचें लग्न लावून दिलें. वास्तविक स्वामींचें गोत्र भारद्वाज आणि संगमनाथाचें वसिष्ठ.[२६] म्हणून आजचे वंशजहि वसिष्ठगोत्रीच आहेत.

संगमनाथ गुरूची सेवा 'चोख' करीत.[२७] शिवबोधांच्या शिष्यांत गोकाकचे सिद्धराम देसाई प्रमुख होते. त्यांना स्वामींनीं फकीराच्या वेषांत बोध दिला. 'कुरबेट्टां'त त्यांची समाधि आहे. सिद्धरामांनां शिवबोधांनीं पाठविलेल्या 'निर्याणपत्रिके'चा निर्देश कवि करीत नसला तरी गुरुशिष्यांचा हा 'सुखसंवाद' हृदयस्पर्शी आहे.

---

२४. अ. ५. ओ. ९.

२५. लक्षण पाहतां मुलाचें । चिन्ह आहे योग्याचें ।
शांतपणाची मूर्ति साच । योगत्व स्वभावच दिसताहे ॥ ५–२० ॥
ऐसे सांगतां स्वामिनाथें । चरणावरि घालिती संगमनाथातें ।
सर्वे घेऊनि तयातें । मूडलगी ग्रहांत पातले ॥ ५–२४ ॥

२६. स्वामीचे भारद्वाज गोत्र । संगमनाथाचें वसिष्ट गोत्र ।
कूटादि पाहोनि कंठसूत्र । लग्न पवित्र करिते झाले ॥ ५–२९ ॥

२७. नाना गुरुसेवेसि दीपक । अथवा साक्षात यदुनायक ।
प्रतिष्ठानीं येकनाथ देख । संगमनाथ चोख तैसे करी ॥ ५–३५ ॥

…क्रम …३८८३६… दि: …
…ांक …१५५८… नों दि: …


शिवबोधांनींहि काष्ठाचा वृक्ष केला,[२८] लक्ष्मेश्वरांत मृत पुत्रांना उठविलें,[२९] आणि गांवीं आल्यावर संगमेश्वरांस उपदेश, रूद्राक्षाची माळ व शाठी (छाटी) देऊन त्यांचें नांव ‘रंगबोध’ ठेवलें.[३०] शिवबोध ‘वैशाख शुद्ध दशमी गुरूवार’ दिवशीं समाधिस्थ झाले.[३१]

वर म्हटल्याप्रमाणें रंगबोध हे शिवबोधांचे पुत्र नव्हेत, तर जामात होत.

रंगबोध वैराग्यसील । गीता अनुष्ठान केवल ।
सतत गुरूभजनी प्रेमल । शांतसील सर्वदा ॥ ६–११ ॥

असें त्यांचें वर्णन आढळतें. त्यांच्या पत्नी काशीबाई. त्यांना चार कन्या-रत्नांनंतर पुत्ररत्न झालें. पुत्राचें नांव ‘शिवबोध’ असेंच ठेवण्यांत आलें. कवि म्हणतो:—

जैसा कौसल्येच्या उदरीं राम । देवकीउदरीं कृष्ण परब्रह्म ।
तैसा जन्मला शिवबोध पुरूषोत्तम । पूर्णब्रह्म ते काळीं ॥ ६-१५ ॥

एकदां करवीराहून ‘शंकरभारती’ आले. त्यांना सामोरें जाऊन रंगबोधांनीं त्यांना ‘मंदिरा’ आणलें. त्यांचा आदर-सत्कार केला तेव्हां ते म्हणाले,

तु साक्षात सगुणब्रह्म । आम्हा आतां कळलें वर्म ।
मूडलगी प्रत्यक्ष कैलासधाम । साधूसमागम अगाध ॥ ६–३७ ॥

याहून कोणती प्रशस्ति हवी ?

रंगबोधांची ‘अउबाई’ म्हणून एक कन्या होती. मोठी पतिव्रता व कनवाळु होती. पण तिचा पुत्र धुंडिराजेश्वर ‘तोत्रा’ होता. ‘वोखदादि नवस’ केले. पण व्यर्थ. एक दिवस स्वामी भोजन करून ‘पर्ण’ खात बसले होते.

तव रंगबोध स्वामी वळखुनी । तांबोल हातीं घेउनी ।
घातले धुंडिराजयाचे वदनी । वाचा तत्क्षणीं फूटली ॥ ६–४६ ॥

---

२८. अ. ५. ओ. १०२–१०७. २९. अ. ५. ओ. १४९.
३०. अ. ५. ओ. १५४. ३१. अ. ५. ओ. १६१.

येथें कवीला ज्ञानेश्वर व नृसिंहसरस्वती यांचें स्मरण होतें.[३२] धुंडिराजाला 'कंठ फुटला'. तो कवित्व करूं लागला' लोक त्याच्या वाणीचें कौतुक करूं लागले.[३३] (येथें मुक्तेश्वराच्या मुकेपणाची आख्यायिका आठवते.) या धुंडिराजाची कांहीं रचना माझ्या हाताला लागलेली आहे.

हा धुंडिराज आणि आपला कवि समकालीन असावेत; असें

"आतां प्रत्यक्ष असे मूर्तिमंत । गुरूनामामृत सेउनी" ॥ ६–५२ ॥

या चरणांतील 'आतां' शब्दावरून वाटतें. रंगबोधांनीं सर्पदंशानें मेलेल्या अेका शूद्राला उठविलें. त्यांच्या भक्तांत शिवापूरची अेक 'अंत्यजीण'हि होती, ती येऊन मठाची झाडलोट करीत असे.

पुढें सद्‌गुरू श्रीरंग । वैकुंठासि गेले लागवेगें ।

माघ शुद्ध दशमी सुभग । उत्तरायण अव्यंग त्या दिवसीं ॥ ६–६४ ॥

तर निर्वाणयात्रेपुढेंहि झाडलोट करायला ती हजर ! अेवढेंच नव्हे तर तिनें तेथेंच प्राण सोडला.[३४]

निर्वाणानंतरहि 'प्रयागी' आणि गोदातिरीं' व 'पंढरपुरांत' स्वामींनीं भक्तांना दर्शन दिलें. गोदातीरीं रूद्रोपंत चिकोडीकरांनीं व पंढरीस आषाढी यात्रेच्या वेळीं

---

३२. जैसे ज्ञानेश्वर प्रसिद्ध । रेड्यामुखीं बोलविला वेद ।
नातरी नरसिंव्ह सरस्वती श्रीपाद । वाचा विनोदें दिल्ही द्विजपुत्रा
॥ ६–४७ ॥

३३. तधींपासोनि धुंडिराजा । कवनें करिती अति चोजें ।
विशालबुद्धीचेनि भोजें । क्रीडेसह जनामाजि ॥ ६–५० ॥
ज्यांची अेकतां गोड वाणी । हृदइं गोंदळ घालिते वाणी ।
लोक वारवाणिती अनुदिनी । तया सिराणी पूर्ण होती ॥ ६–५१ ॥

३४. श्रीरंग श्रीरंग म्हणत । हंस गेला अकस्मात ।
लोक पाहती परमाद्भुत । ठेली तटस्त तेवेळीं ॥ ६–७३ ॥

विठलाच्या जागीं अनेक भक्तांनीं स्वामींना पाहिलें.[३५] रंगबोधांची थोरवी अशी असल्यानें आपण त्यांच्या ‘दासाचा दास’ झालों, असें कवि म्हणतो.

रंगबोधांचे पुत्र शिवबोध. शिवराम असेंहि त्यांचें दुसरें नांव ‘गुरुपरंपरा स्तोत्रां’ त हरिबोध देतो.[३६] रंगबोध हा कवीच्या पित्याचा गुरु.[३७] तर शिव बोध हा कवीचा गुरु.[३८] त्यांचा व्रतबंध व विवाह झाल्यावर करवीरचे शंकराचार्य आले होते. तेव्हां त्यांच्याकरवीं पार्वतीबाईंनीं ( स्वामींच्या मातोश्रींनीं ) शिवबोधांस ‘पट्टाभिशेक’ करविला.

स्वतःच्या गुरुबद्दल कवीला विलक्षण प्रेम व आदर आहे. शांति रुद्र, ब्रह्मा व नारद यांच्याकडे गेली व म्हणाली, “ मज पोषण करा हृदयांतरीं. ” पण तिला कोणी थारा दिला नाहीं. विष्णूनें सांगितलें,

मूडलगी म्हणोन सत्क्षेत्र । काशीच केवल परम पवित्र ।
तेथें मी अवतरलों साचार । शिवबोध विचित्र नाव माझे ॥ ७-७२ ॥
तयापासीं जातां । ठाव मिळेल निश्चयता ।
ऐकोनि शांति तत्वता । आनंदभरि पातली ॥ ७–७३ ॥

अशी कथा सांगून आपला गुरु शांतीचें आश्रयस्थान असल्याचें वर्णन कवि करतो.

श्रृष्टिकर्ता चतुरानन । कीं वैकुंठिंचा नारायण ।
कीं कैलासनाथ त्रिनयन । तिघेजण येकवटले ॥ ७–४६ ॥

---

३५. चिकोडीकर रूद्रोपंत । यात्रे गेले कुटुंबसहित ।
तेथ देखिले अकस्मात । रंगबोधातें तटिनीतटीं ॥ ६–७६ ॥
च्यार घटिका दर्शन देउनी । अदृश्य जाले श्रीरंगमुनी ।
मग पांडुरंग गाते देखनी नयनीं । विस्मय मनी होऊनिया ॥ ६-८८ ॥

३६. शिवराम तोचि शिवबोध । महिमा न कळे अगाध ।
वर्णिती चारि वेद । भाट होउनिया ॥ २९ ॥

३७. या श्रीरंगाच्या सिष्य परम । माझा पिता शिवराम ॥ ६–५३ ॥

३८. तया रंगबोधापासून । शिवबोध माझा सद्गुरु जाण ॥ ७–८९ ॥

असाहि संभ्रम कवीला पडतो. आपल्या गुरुनें कामादिक जिंकल्याचें काव्यात्मक वर्णन तो करतो.[३९] शिवबोधांनीं बसवेश्वर माळ्याला शिवरात्रीस बसल्याजागीं श्रीशैल दाखविला. मठांतली पुष्करणी कोरडी झाली तेव्हां अमृतदृष्टीनें सुजला केली. अशा कथा सांगून कवि म्हणतो

असो इतराची कथा । मजचि साक्ष आली आतां ॥ ७–१३५ ॥

तो स्वतःचीच हकीकत सांगतो कीं, स्वामींनीं 'गडी' होऊन आपली सेवा केली.[४०] शिवबोध हे कृष्णातीरी 'अगस्तिक्षेत्री' समाधिस्थ झाले. नंतर त्यांनीं 'खिजलापुराभीतरी' व 'पंढरपुरी' दर्शन दिलें. पंढरपुरांत मल्लिकार्जुनाच्या देवळांत कानफाट्यांच्या समुदायांत ते दिसले;[४१] हें वर्णन चिंत्य आहे.

शिवबोधांचे पुत्र संगबोध. हे व कवि समवयस्कहि असतील. तरी त्यांच्याबद्दल कवि असा आदर व्यक्त करतो :—

असो माझा शिवबोधाचे पुत्र । प्रत्यक्ष जाण संगमेश्वर ।
संगबोध नावें निर्धारें । या धरित्रीवर अवतरले ॥ ७–१८१ ॥
तया संगबोधाचे चरणीं । मस्तक ठेविलों अनुदिनीं ।
माझा शिवबोधचि म्हणोनी । चित्त तयाचरणीं ठेविलें ॥ ७-१८२ ॥

'देशिकचरित्र' शिवबोधांनीं कसें 'लिहवून' घेतलें तें कवि सांगतो,

या ग्रंथाचा हव्यास । नव्हताच मजला सरस ।
सद्गुरु शिवबोधें बहुवस । रात्रीदिवस पाठी लागे ॥ ७–२५ ॥
आधीं सामोपचारें सुचविलें । परि मी मन न घातलें ।
सेवटीं महाभय दाखविलें । विघ्न वोडवलें अत्यंत ॥ ७-२६ ॥

---

३९. असा माझा सद्गुरु । शिवबोध माझा करुणाकरु ।
ज्यांचे चरणीं कामादीक तोडरु । होऊनि नुपुरु गर्जती ॥ ७-८० ॥

४०. अ–७ ओ. १३५-१५२

४१. भूवैकुंठ पंढरपुर । तेथ मल्लिकार्जुन देवालय थोर ।
कानफाटेचा समुदाव फार । देउळांत परिकर बैसला होता ॥ ७-१९६ ॥

मग पांडुरंगाचें स्मरण करतांच दृष्टांत झाला, 'तुझी गुरुची कीर्ति वाखाणी.'

ऐसें श्री रुक्मिणीकांतें । सांगतां चमत्कारलों मनांत ।
मग या देशिकचरित्रांत । मन प्रशस्त विरूढलें ॥ ७–२९ ॥

पण कर्ता तोच शिवबोध । हा यथार्थ जाणावे प्रबुद्ध ।
अन्यथा नव्हे हा शब्द । गुरुचरणारविंदें जाणतीं ॥ ७-३० ॥

मग विघ्नें गेलीं पळोनी । सुकाळ झाला अनुदिनी ।
म्हणोनि वाचाकोकिल विवेकवनीं । शिवबोधस्मरणी कूजते ॥ ७–३१ ॥

हें सर्व शिवबोधच लिहीत आहेत असें अन्यत्र म्हणतांना कवीनें चांगली कल्पना शक्ति दाखविली आहे.[४२]

कवीच्या 'आत्मनिवेदना' वरून त्याची बरीच माहिती कळते. कवीचें नांव गुरू (नाथ),[४३] त्याच्या मातापितरांचीं नांवें शिवराम व गिरिजाबाई,[४४] पितामह तुकदेव[४५] आणि आडनांवें फडणीस व खासनीस[४६] असल्याचें तो सांगतो. त्याला आपल्या मातापितरांबद्दल अत्यंत आदर आहे. वडील म्हणजे 'व्यासरूपचि तत्वतां' व आई म्हणजे मूर्तिमंत भक्ति, चौथी मुक्ति, अवस्थांतील उन्मनी किंवा भागीरथीच असें त्याला वाटतें.

---

४२. नवखंड पृथ्वी करूनि कागद । सप्तसमुद्र शाई स्वच्छंद ।
वनस्पती लेखण्या विषद । लिहिणार शिवबोध स्वयेंचि ॥ ७–७ ॥

४३. तो शिवराम माझा जनक । तया उदरीं जन्मलों देख ।
गुरुनाथ नांव कौतुकें । ठेविलें देख जनकजननी ॥ ७–१४२ ॥

४४. वैराग्यें आथिला पूर्ण । तोचि माझा पिता जाण ।
शिवराम त्याचें नामाभिधान । गिरिजा सुलक्षण जननी माझी ॥ ७-१३५ ॥

४५. असो आतां पूर्वज्याचें । कथन सांगेन साचें ।
नांव तया पितामहाचें । तुकदेव हेंच पावन नाम ॥ ७–१३२ ॥

४६. मऱ्हाटे म्हणती फडणीस । कानडे म्हणती खासनीस ॥ ७–१४१ ॥

जंबगी परगण्यांतील, घटप्रभेच्या तीरावरील, पांडुरंगदेव असलेलें 'मुत्धापूर' हें कवीचें गांव असून तेथेंच त्याचा निरंतर वास असे.[४७] 'देशिकचरित्रा'चें लेखन मात्र कवीनें हुक्केरी येथें 'पांडुरंगाच्या चरणीं ठाव करूनि' तडीस नेलें. कारण परचक्राच्या उपद्रवानें त्याला हुंक्केरीस यावें लागलें.[४८] शके १७०७ मध्यें 'चैत्र शुद्ध पौर्णिमेस' ग्रंथलेखन संपलें. म्हणजे जवळ जवळ पावणेदोनशें वर्षांपूर्वीचा हा ग्रंथ आहे. ती कालनिदर्शक ओवी अशी आहे:—

शके सतरासेंहे सात । विश्वावसु संवत्सर यथार्थ ।
चैत्र शुद्ध पौर्णिमा वसंत । नक्षत्र हस्त जाणिजे ॥ ७–२५० ॥

परंतु या प्रतीच्या मलपृष्ठावर—"शके १७०९ प्लवंग नाम संवत्सरे आश्विज (न) वदि ३ इंदुवार शुभादिनी देशिकचरित्र ग्रंथलेखन समाप्तः ॥ शुभं भवतु ॥ श्री सद्‌गुरू शिवबोधस्वामीचरणकमलभृंगसंगबोधलिखितं ॥"— असा मजकूर आहे. त्यावरून मूळग्रंथाच्या समाप्तीनंतर दोनच वर्षांत त्याची प्रत केली गेली व ती संगबोधांनीं केली; अेवढेंच कळतें. कवीच्या नांवांगांवा बरोबरच त्याची कुलदेवता माहूरअियली,[४९] खंडोबा बेदरचा,[५०] नृसिंहसरस्वती हे आराध्यगुरु;[५१] अशी माहिती मिळते. कवीचें चरित्र समजतें तें अेवढेंच.

---

४७. देशामाजी परम पवित्रक । जंबगी परगणा देख प्रसिद्ध ॥ ७–१३९ ॥
तयामाजि मुत्धापुर । पांडुरंगदेव घटपातीर.... ॥ ७–१४० ॥

४८. होतां परचक्राचा उपद्रव । हुकेरीस आलों स्वयमेव ।
तेथें आहे पांडुरंग देव । तच्चरणीं ठाव करूनि राहिलों ॥ ७–१४७ ॥

४९. त्यांचे वंदूनिया श्रीचरण । करीन कुलदेवीचें स्तवन ।
जीचें स्थान माहोरीं जाण । पीठपूर म्हणोनि बोलती ॥ १–२५ ॥

५०. मग वंदिला बेदरचा खंडेराव । जो मल्लारि मार्तंड देव ।
ज्यांचे वर्णितां गुणगौरव । सुखवैभव साधकां ॥ १–२८ ॥

५१. शिवबोध माझा सद्‌गुरु । नरसिंव्हसरस्वती आराध्यगुरु ।
प्रत्यक्ष त्रैमुर्तिचा अवतारु । जगदोद्धारु पैं केला ॥ १-२४ ॥

कवीची ( म्हणजेच मुडलगीच्या स्वामींची ) गुरुपरंपरा मुकुंदराजांशीं ( ‘विवेकसिंधु’ कर्त्या ) घनिष्ट संबंध असणारी आहे. मंगलाचरणांत मंगलमूर्ति, शिवबोध, श्रीपाद श्रीवल्लभ, सरस्वती, कुलदेवता, पांडुरंग या दैवतांना नमन केल्यावर कवि प्रथम मुकुंदराजांस असें वंदन करतो :—

आतां वंदीन संत सज्जनासी । मुकुंदराज आदिकवीसी ।
विवेकसिंधु ग्रंथासी । जगदोधारासी निर्मिला ॥ १-१४ ॥

कवीची परंपरा अशी :—

आदिनाथ–रमारमण-चतुरानन–वसिष्ट–शक्ति पाराशर–व्यास–शुक-गौडपादाचार्य-गोविंद-शंकराचार्य–हरिनाथ-रामचंद्र-मुकुंद (राज)–जगन्नाथ–सहजबोध-रंगबोध-अद्वयबोध-शिवबोध-रंगबोध-शिवबोध-(संगबोध).

हरिबोधकृत ‘गुरूपरंपरास्तोत्रां’त याहून वेगळी परंपरा दिली आहे. ती अशी :—

आदिनाथ–हरिनाथ–सुरींद्रभारती–रामचंद्र–मुकुंदराज–नरसिंहभारती–जगन्नाथ–सहजबोध–रंगबोध-अद्वयबोध–शिवबोध–रंगबोध-शिवराम.

अन्यत्र मुकुंदराजांची म्हणून दिली जाणारी परंपराहि विचारणीय आहे.[५२]

मी केवल मंदमती । नेणे काव्यावित्पती ।
स्तवन करावया बुद्धि केउती । अज्ञान निश्चिती यथार्थ ॥ १-३ ॥

असें कवि म्हणत असला तरी तो विनयच आहे. तो चांगलाच बहुश्रुत आहे. शास्त्रें, पुराणें, रामायण-भारतादि महाकाव्यें यांचा त्यानें व्यासंग केला आहे. म्हणूनच काष्ठाचा वृक्ष झाल्यावर अहिल्योद्धाराचें, चोरांना जीवदान दिल्यावर हरिश्चंद्राकडून बळी जाणाऱ्या ब्राम्हणपुत्राला विश्वामित्रांनीं वाचविल्याचें, त्याला स्मरण होतें. संतचरित्रें त्याला परिचित आहेत.

---

५२. आदिगुरू श्री आदिनाथ । तेथून श्रीहरिनाथ ।
तयाचा शिष्य श्रीरघुनाथ । जो गुणसिंधू ॥ —‘विवेक सिंधु’

कृष्णराव पंडिताशीं झालेल्या वादाचें वर्णन करतांना, अधिकारी-अनाधिकारी लक्षण सांगतांना, त्याचें तत्व-पांडित्य चांगलेंच व्यक्त झालें आहे. पांडित्याचीं अनेक अंगें सांगून तें न मिरविण्याची अिच्छाच त्यानें प्रकट केली आहे.[५३] संस्कृत व मराठीकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोणहि निराळा आहे.[५४]

कवीचा आत्मविश्वासहि पाहण्यासारखा आहे. तो म्हणतो :—

असो हें देशिकचरित्र । अतिसुंदर परम पवित्र ।
सात आध्य हे सत्पात्र । सप्त गोदातीर जाणिजे ॥ ७—२१३ ॥

आपल्या ग्रंथांतील सात अध्याय हे सप्त ऋषी, सप्तशृंगीदेवी, सप्त चिरंजीवी व सप्त मोक्षपुरीच होत असेंहि कवि सांगतो.

हा आत्मविश्वास अनाठायीं नाहीं. वास्तविक 'देशिक'—चरित्र सांगणें सोपें काम नाहीं. कां तें कळण्यास या ग्रंथाच्या नांवाचा विचार केला पाहिजे. 'देशिक' या शब्दाचे तीन अर्थ दिलेले आढळले :—[५५] (१) प्रवासी, मुशाफर, परदेशांत फिरणारा; (२) आत्मज्ञानोपदेशक सद्गुरु; (३) समूह, थवा. [ 'कोकिळांचा देशिकू'; शिशु. ८४३ ] 'देशिक' या शब्दाला पंडित, विद्वान, असा रूढार्थ असला तरी हें शब्द-पांडित्य नव्हे. वेदांतदेशिक, शांतलिंगदेशिक या व्यक्तिनामांत या शब्दाचा उपयोग अशा अर्थीच झाला आहे. शिवबोधाला 'देशिकेंद्र' म्हटल्याचें आढळतें.[५६]

---

५३. यास्तव देशिकचरित्रांत । न मिरवलों पांडित्यपणातें ।
जरि मिरवतो घटपटार्थे । ब्राह्मणपणातें वाउगें ॥ १-७४ ॥

५४. हें मूर्खांचें बोलणें । संस्कृत आणि महाराष्ट्र ॥ १-७६ ॥

५५. महाराष्ट्र शब्दकोश. (पृ. १६९७)

५६. हें श्लोकपंचक यथामति आरूषोक्ती ।
रूक्मांगदें सहज अर्पुनि मूढ भक्ती ।
त्या देशिकेंद्र शिवबोधपदीं विरक्ती ।
मागे सदा भजनपूर्वक भुक्तिमुक्ती ॥

अशा अधिकारी, आत्मज्ञानी पुरूषांचें चरित्र सांगतांना कवि कचरत नाहीं. कारण त्यालाहि कांहीं 'अनुभव' आहे; असें पुढील गुरूस्तवनावरून वाटतें:-

पूर्ण कृपेची नाव । त्यांत घालोनिया अभिनव ।
पार करूनि जीवभाव । तात्काळ वाव केला तुवां ॥ ७-१७ ॥
मग सावध होऊनि पाहतां । हा भवसमुद्र कोरडाच होता ।
तो लाजूनियां तत्वता । आश्चर्यता पावलो ॥ ७-१८ ॥

हा 'अनुभव' लहान सहान नाहीं. 'वाचा फुटली परेपासुन' हे त्याचे उद्‌गार विश्वसनीय वाटतात.

ज्या संतांचीं चरित्रें कवीनें गायिलीं आहेत त्यांचा काल कोणता? हा विचार मनांत आला तरी कवीनें ही माहिती फारशी दिली नाहीं असेंच म्हणावें लागतें. परंतु कांहीं निर्देश महत्वाचे आहेत. अद्वयबोधांचें चरित्र सांगतांना कवि विजापूरचा यवन राजा व मलिक कंबर यांचीं नांवें देतो. हा यवन राजा म्हणजे इब्राहीम आदिलशहा ( स. १५८०-१६२७ ) हा असावा. याच्या आधींचा इब्राहीम ( स. १५३४-१५५७ ) 'फकीरा'ला शरण जाणारा वाटत नाहीं. दुसऱ्या इब्राहीमच्या स्वभावछटा 'देशिकचरित्रां'तील कथेशीं जुळत्या वाटतात.

मलिक कंबरचा काळ स. १५४६-१६२६ असा आहे. स. १६२४ मध्यें निजाम व मोंगल यांच्यांतील लढाई 'भातवड' येथें झाली व ती निजामाच्या वतीनें मलिक कंबरानें जिंकली असें इतिहास सांगतो. मुडलगीला सैन्याचा तळ पडण्याचा प्रसंग तेव्हांचा ( स. १६२४ मधील ) असावा. यावरून अद्वयबोध हे १६ व्या शतकांत होऊन गेले व ते वरील दोघांचे समकालीन होते; एवढेंच म्हणतां येईल.

पहिले शिवबोध 'वैशाख शुद्ध दशमी गुरुवार' व दुसरे रंगबोध 'माघ शुद्ध दशमी' या दिवशीं समाधिस्थ झाल्याचें कवि सांगतो. यावरून शक काढणें शक्य नसेल तरी शिवबोधांनीं त्यांचे शिष्य सिद्धराम देसाई यांना लिहिलेल्या काव्यमय पत्रावरुन श. १६२८ मध्यें ते समाधिस्थ झाले असें कळतें.

मास, पक्ष, तिथि व वार यांचा बरोबर मेळ जमतो.[५७] रंगबोधांच्या निर्वाण-शकाची निश्चिति 'देशिकचरित्रा'वरुन करतां येत नाहीं. कालनिर्देश असे 'देशिकचरित्रां' त एवढेच सांपडतात.

ग्रंथाबाहेरच्या निर्देशांचा विचार करतां बरीच माहिती मिळण्यासारखी आहे. पण 'देशिकचरित्रा'पुरतीच आपली दृष्टि सध्यां मर्यादित असल्यानें इतर कागद पत्रांचा व आधारांचा स्वतंत्र विचार करणेंच इष्ट ठरेल. तरीहि एका महत्वाच्या गोष्टीबद्दल थोडेसें लिहितों.

ही गोष्ट म्हणजे रंगबोध (पहिले) यांच्या निर्वाणशकाची निश्चिति. रंग-बोधांनीं सहजबोधांचे नातू शिवकल्याण यांना एक 'निर्वाणपत्र' लिहिलेलें मिळालें. त्या पत्रांत अशी अेक ओवी आहे की, जिच्या आधारें त्यांचा निर्वाणशक १५८१ ठरतो.[५८]

या शकाला अनुकूल व प्रतिकूल अशा कांहीं गोष्टी आहेत. विकारी संवत्सर, कार्तिक मास, शुद्ध चतुर्थी व रविवार हा योग शक १५८१ मध्यें येतो.[५९] ज्यांना हें पत्र लिहिलें आहे, त्या शिवकल्याणांनीं शके १६०३ मध्यें समाधी घेतली असें दिसतें.[६०]

असें असेल तर श. १५८१ च्या मागें रंगबोधांचा निर्वाणशक नेतां येत नाहीं. कारण, शके १५२१ मध्यें कार्तिक शु. ४ ला रविवार येत नाहीं तर शनिवार येतो. आणि त्याच्या मागें जावयाचें म्हटलें तर श. १४६१ मध्यें

---

५७. अम्ही व्ययनाम संवत्सरी वैशाख मासी ।
प्रयाण करितों शुद्ध दशमी गुरुवार दिवसी ‖ २१ ‖

५८. विकारीनाम वत्सरीं समाप्ती । दक्षणायन शरदृतीं ।
कार्तीक शुद्ध चतुर्थी । रवि दिवा ‖ १४ ‖

५९. पिले जंत्री.

६०. गुणखगरसमिंदूवछरीं दुर्मतीसी ।
शरदऋतु सितपक्षीं विजयाश्वीन मासीं ।

रंगबोधांनीं समाधि घेतली व तत्पूर्वी शिवकल्याणांना[६१] 'पत्र' लिहिलें व शिवकल्याणांनीं श. १६०३ मध्यें समाधि घेतली असें मानणें हास्यास्पद ठरेल. २२ वर्षें आगाऊ निर्वाण सांगणें पटूं शकतें म्हणून श. १५८१ विश्वासार्ह वाटतो.

पण अेक अडचण अशी येते कीं, मलिक कंबर मुडलगीस आला तेव्हां रंगबोधस्वामी हयात होते; व अिब्राहीम आदिलशहाचे ते समकालीन होते; असें मानतां येअील काय ? रंगबोध असतांना अद्वयबोधांनीं या दोघांना चमत्कार दाखविण्याचें कारण काय ? कीं हे चमत्कार रंगबोधांचेच पण कवि मात्र अैकीव माहितीवरून अद्वयबोधांचे म्हणून देतो ?

रंगबोधांनीं अद्वयबोधांच्याकरवीं हे चमत्कार करविले असण्याची शक्यता नाकारतां येणार नाहीं. स्वतः अद्वयबोधांनीं कृष्णराव पंडिताचा वादांत पराभव केला नाहीं तर आपले बंधु पूर्णबोध यांच्या कडून करविला हें ध्यानीं घेण्यासारखें आहे.

अशा तऱ्हेनें १५ व्या शतकापासूनचा कालखंड असलेलें हें 'देशिकचरित्र' जुन्या चरित्रवाङ्मयांत अेक महत्वाची भर ठरण्यासारखें आहे. हें चरित्र ओवीबद्ध असल्यामुळें 'काव्य' म्हणूनहि मान्यता मिळण्यासारखें आहे. प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें हें दुसरें 'गुरुचरित्र' आहे. किंबहुना कवीला आपल्या ग्रंथास 'गुरुचरित्र' असेंच नांव द्यावयाचें असावें. परंतु त्या नांवाचा ग्रंथ असल्यानें 'गुरू' या अर्थाचा 'देशिक' शब्द त्यानें निवडला असावा. शिवाय त्याचें नांव 'गुरू' च असल्यानेंहि 'गुरू' हा शब्द ग्रंथनामांत येऊं देण्याची दक्षता कवीनें घेतली असावी.

---

६१. हे शिवकल्याण नित्यानंदाचे पुत्र व शिष्य नसून भिन्न आहेत.

# 'रंगबोधिनी' : अेक अध्याय

मराठींत अनेक गीताटीका आहेत. वामनपंडितांनीं म्हटल्याप्रमाणें[१] जो तो आपल्या मताप्रमाणें गीतार्थ सांगतो. त्यांतहि पुन्हां 'भावार्थ' कीं 'यथार्थ' हा प्रश्न आहेच. या प्रश्नामुळेंच गीताटीकेंत काव्य अधिक येऊं नये, तर शुद्ध तत्त्वज्ञान यावें; अशी आवश्यकता व अपेक्षा निर्माण झाली. मराठी टीकांपुरताच विचार केला तर 'यथार्था' वर भर देणारा पहिला कवि वामनपंडितच असा समज होण्याचा संभव आहे. 'यथार्थदीपिका' या नांवांतील अभिनिवेशहि हा समज बळकट करणारा ठरेल.

परंतु आज ज्या अेका अप्रसिद्ध गीता टीकेसंबंधीं मी लिहीत आहे, तिच्यावरून हें स्पष्ट होअील की ज्ञानेश्वर आणि वामनपंडित यांच्यामधल्या काळांत असा अेक कवि होऊन गेला की ज्याला मूळ गीता यथार्थ स्वरूपांत मराठींत

---

१. परी अजी भगवंत जी ! । या कलियुगामाजीं ।
जो तो गीतार्थ योजी । मतानुरूप ।
'यथार्थदीपिका', १–६८.

आणावीशी वाटली. ‘यथार्थदीपिके’ चा उगम या उपलब्ध टीकेंत आहे, असें मी म्हणत नाहीं. अेकच अध्याय हातीं लागल्यानें तसें विधान करावयास सबळ पुरावा माझ्याकडे नाहीं. पण भावार्थाबद्दलचें असमाधान व यथार्थाबद्दलचें प्रेम या दोन्ही गोष्टी ‘यथार्थदीपिके’पूर्वीच्या या टीकेंत दिसतात हें सांगितलें पाहिजे.

हस्तलिखिताचा कागद बराच जुना वाटतो. अक्षराच्या वळणावरून प्रतहि अर्वाचीन वाटत नाहीं. ८"×४" आकाराच्या कागदावर सर्व मजकूर असून अेकूण आठ पानें आहेत. पहिल्या पृष्ठावर ‘ ॥ इति टिका पदछेद प्रथमोध्याय ॥ ’ व अखेरच्या पृष्ठावर ‘ ॥ इति श्री पदछेदटिकायां प्रथमोध्याय समाप्त ॥ ’ असे उल्लेख आहेत. लेखनांत अशुद्धें बरींच आहेत. ऱ्हस्वदीर्घांचा विवेकहि कांहीं ठिकाणीं नाहीं. अनुस्वार, मात्रा, उकार अित्यादींचा लोप वा स्थलांतरहि पुष्कळ जागीं आढळतें. संस्कृत तर फारच अशुद्ध आहे. मुळांत ग्रंथ बराच मोठा असावा. त्यावरून पहिला अध्याय तेवढा नकलला गेला असें दिसतें. मिळालेलें हस्तलिखित ही कवीच्या हातची मूळ प्रत नव्हे हें स्पष्ट केलें पाहिजे.

मुडलगीच्या स्वामींचीं हस्तलिखितें चाळतांना आणखी कांहीं अप्रसिद्ध प्रकरणा बरोबर हें हस्तलिखित मिळालें. स्वामींच्या संग्रहीं तरी या टीकेचे उर्वरित अध्याय नाहींत. एक तरी मिळाला हीहि समाधानाचीच बाब आहे. म्हणून मिळालेला अध्याय विचारार्थ पुढें ठेवत आहे.

टीकेचा प्रारंभ गणेश, सरस्वती, गुरु, सच्चिदानंद, आणि वेदव्यास यांच्या नमनानें होतो.[२] तेथें कवीचें वा त्याच्या गुरुचें नांव येत नाहीं. नमनाचा हा मजकूर प्रत करणाऱ्यानें देखील लिहिला असेल. पण कवि नमन न करतांच अेकदम ‘ धृतराष्ट्र बोलता जाला ’ असा प्रारंभ कसा करील ?

टीकेच्या मध्यभागींहि कोठें कवीचें नांव येत नाहीं. ‘ फलश्रुति ’ सांगून झाल्यावर मात्र कवि स्वतःचें नांव ‘रंग’ व गुरूचें नांव ‘सहजबोध’ असल्याचें

---

२. श्री गणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥
श्री सच्चिदानंदाय नमाः ॥ श्री वेदव्यासाय नमाः ॥ श्रीरामदयाकरः ॥

जातां जातां सांगतो.[३] टीकेला 'पदछेदटीका' म्हटल्याचा उल्लेख वर आहेच. अध्यायसमाप्तीच्या गद्य मजकुरांत वरील निर्देशाबरोबरच 'रंगबोधनिति' असें टीकेचें नांव स्पष्ट दिलें आहे.[४]

हे 'रंग' म्हणजेच मुडलगीच्या परंपरेंतील (पहिले) रंगबोध. यांनीं गीता-टीका लिहिल्याचें धुंडिराज सांगतो व टीकेचें नांव तोहि 'रंगबोधिनी' असेंच देतो.[५] या टीकेच्या कर्त्यासंबंधीचा हा बाह्य पुरावा महत्वाचा आहे. 'रंग' म्हणजेच रंगबोध; हें याहून अधिक सिद्ध करण्याची जरूरी नाहीं. सहजबोध या गुरुनामावरूनहि ही गोष्ट उघडपणें कळणारी आहे. रंगबोधांचीं अनेक पदें मझ्या संग्रहीं आहेत. त्यांतहि कवीच्या नांवाचा उल्लेख 'रंग' असाचआढळतो.[६] रंगबोधांचें चरित्र 'देशिकचरित्रां'त आलें आहे.[७] त्यांच्या परंपरेबद्दलहि मी अन्यत्र लिहिलें आहे;[८] म्हणून पुनरुक्ति टाळतों.

---

३. सहजबोधि रंग बोधुनि बोले सकळा जना ।
येथुनि अतिज्ञान करुनि जाईल त्या निजीच्या खुणा ॥

४. इति श्रीमद्भगवद्गीताटीकायां पदछेद प्राकृत भाष्येयां रंगबोधेन विरचितायां रंगबोधनिति समाख्यायां प्रथमोध्याया ॥

५. श्रीरंगबोधस्वामी । विलसे मठ मुडलगिरी मुक्तग्रामीं ।
श्रीमद्भगवद्गीता मनमोदीणी । टीका केली श्रीरंगबोधीणी ॥

६. सहजबोधरती लागली रंगा तुजविण आन न मानी रामा ॥
सहजबोधि रति रंग मुराला ॥ सहजबोधी रंग धाला ॥
रंग सहजबोधीं लक्ष संपादी ॥ सहजबोधीं बरवें रंगासि
महदानंद फावे ॥ सहजबोधी बहु रंग बोधी ॥

७. 'देशिकचरित्रा'वरील माझ्या लेखांत मीं तें थोडक्यांत दिलें आहे.

८. 'मुकुंदराजांची परंपरा'. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर १९५८.

‘ देशिकचारित्रांत ’ ‘ रंगबोधिनी ’चा उल्लेख नसला तरी रंगबोधांचा गीतेचा व्यासंग मोठा असल्याचें कवीनें सांगितलें आहे. रंगबोधांच्या पत्नी लक्ष्मीबाअी यांनीं पीतांबरावर सर्व गीता उतरावेल्याची कथाहि येथें आठवते. यावरुन गीतेवरचें उभयतांचें प्रेम ध्यानीं यावें. रंगबोधांसंबंधींचे निर्देश हा स्वतंत्र विषय आहे. येथें फक्त त्यांच्या काळासंबंधीं लिहितों.

रंगबोधांनीं सहजबोधांचे नातू शिवकल्याणबोध यांना लिहिलेली ‘निर्याण पत्रिका’ माझ्याजवळ असून त्यांत आपण केव्हां समाधिस्थ होणार हें सांगितलें आहे.[९] विकारी संवत्सर, कार्तिकमास, शुद्ध चतुर्थी रविवार हा योग श. १५८१ मध्यें येतो. श. १५२१ मध्यें कार्तिक शु. ४ ला रविवार येत नाहीं. तर शनिवार येतो.[१०] आणि याच्याहि मागें श. १४६१ पर्यंत जाणें केवळ हास्यास्पद आहे.

कारण ज्यांना हीं ‘पत्रिका’ लिहिली आहे ते शिवकल्याणबोध श. १६०३ मध्यें समाधिस्थ झाले. या शकाला आधार त्यांनीं रंगबोधांना लिहिलेल्या पूर्ण ‘निर्याणपत्रिकेंत मिळतो.[११] याचा अर्थ श. १६०३ पुढें रंगबोधांचा निर्याण-शक नेता येणार नाहीं व अनेक कारणांमुळें शक १५८१ मागें रेटतां येणार नाहीं. म्हणून रंगबोध श. १५८१ मध्येंच समाधिस्त झाले असें म्हटलें पाहिजे.

यावरून ‘रंगबोधिनी’ श. १५८१ पूर्वी केव्हांतरी लिहिली गेली असें सिद्ध होतें. नेमका शक देणें अवघड असलें तरी तर्काला अेक जागा आहे. माझ्याकडाले अध्यायाच्या शेवटीं क्षय संवत्सरांत कृष्णातीरावरील गलगले येथें

---

९. विकारी नाम वत्सरी समाप्ती । दक्षणायन शरदर्ती ।
कार्तीक शुद्ध चतुर्थी । रवि दिवा ॥ १४ ॥

१०. पिले जंत्री.

११. गुणखगरसमिंदू वछरीं दुर्मतीसी ।
शरदऋतुसितपक्षीं विजयाश्वीन गासीं ॥

ग्रंथ संपल्याचा निर्देश आहे.[१२] येथें फक्त संवत्सरनाम व लेखनस्थल दिलें असलें तरी हा उल्लेख कवीचा कीं प्रतकाराचा हें कळण्यास मार्ग नाहीं.

कवीचाच असें मानलें तर श. १५४८ हा 'रंगबोधिनी' चा लेखनकाल मानावा लागेल. त्यापूर्वी श. १४८८ मध्यें क्षय संवत्सर असूनहि तो शक पत-करतां येणार नाहीं. कारण तेव्हां रंगबोधांचा जन्महि झालेला नसेल. आणि नंतरचा श. १६०८ हा शकहि विचारांत घेण्यासारखा नाहीं. कारण रंगबोधांचें श. १५८१ मध्येंच निर्याण झालें.

हा कालनिर्देश प्रतकाराच्या हातचा मानावयाचा झाल्यासहि ही प्रत फारतर श. १६०८ मधली आहे असें म्हणतां येईल. ही प्रत कोणाची असावी याचा अंदाज ' गलगलें ' या स्थानोल्लेखावरून सहज करतां येण्यासारखा आहे. गलगलें गांवीं गोविंदबोध नांवाचे रंगबोधांचें अेक शिष्य होते.[१३] हा कालो-ल्लेख मूळ ग्रंथाचा मानल्यास गोविंदबोधाकडील वास्तव्यांत केव्हांतरी श. १५४८ मध्यें ही टीका रंगबोधांनीं लिहिली असावी. प्रतकारानेंच केलेला हा उल्लेख असेल तर ही प्रत गोविंदबोधांचा मुलगा ज्ञानबोध यानें केली असावी. ज्ञानबोध हा गोविंदबोधांना वयाच्या ७५ व्या वर्षी रंगबोधांच्या कृपेनें झालेला मुलगा. म्हणजे ज्ञानबोधाचा जन्म श. १५८१ पूर्वी केव्हांतरी झालेला. श. १५४८ मध्यें तो जन्मला नव्हता व श. १६६८ मध्यें हयात नव्हता असें मानण्यांत चूक होणार नाहीं. ( या दोन्ही वर्षी क्षय संवत्सर आहे ) म्हणून ही प्रत त्यानेंच श. १६०८ मध्यें केली असल्याची दाट शक्यता आहे. कारण गोविंदबोध त्यावेळीं हयात असणें संभवनीय नाहीं. अेवढी चर्चा करूनहि शेवटीं श. १५४८ हाच 'रंगबोधिनी' चा काळ मानण्याकडे मनाचा कल होतो.

'रंगबोधिनी' चा अेकच–पहिला–अध्याय हाताशीं असल्यानें गीतेकडे पाहण्याची रंगबोधांची दृष्टि कशी होती; या विषयीं अनुमान करण्यांत फारसा

---

१२. ॥ इति ग्रंथलीखिते क्षयनाम संवत्सरे कृष्णातिरें गलगले ग्रामें समाप्त॥

१३. 'देशिक चरित्रां'त यांची माहिती दिलेली आहे.

अर्थ नाहीं. पहिल्या अध्यायांत तत्त्वज्ञान असें कांहीं नाहीं. त्यामुळें गीतेचा रंगबोधांनीं लावलेला अर्थ समजण्याचें साधन नाहीं.

अध्यायाच्या शेवटीं फलश्रुति सांगतांना, "पश्चात्ताप म्हणजे ज्ञानाचें बीज. वैराग्यावाचून शुद्ध ज्ञान नाहीं. आणि ओश्वरी कृपेविना वरांग्य उपजत नाहीं. अशी दृष्टि साधुसंगती शिवाय लाभत नाहीं;" असें रंगबोध सांगतात.[१४] ही फलश्रुति वाचल्यावर श्रीधरस्वामींच्या 'सुबोधिनीं' तील अखेरच्या श्लोकाचें स्मरण होतें.[१५]

रंगबोध प्रथम श्लोकांतील प्रत्येक पदाचा मराठींत अर्थ देतात. (म्हणूनच 'पदच्छेद' टीका असें 'रंगबोधिनी' ला म्हटलें आहे.) त्यानंतर संस्कृत श्लोक व त्यावरील आपली श्लोकबद्ध टीका देतात. ही समश्लोकीच असल्यानें वामनपंडितांपूर्वींची समश्लोकी म्हणून तिला विशेष महत्व आहे. आणखी अेका गीता टीकेसंबंधीं लिहितांना "समश्लोकीचा पायंडा वामनपंडितानें पाडला असें त्याच्याहि पूर्वींची अेखादी समश्लोकी उपलब्ध होओीपर्यंत, आजतरी म्हणावयास

---

१४. येथ पश्चात्तापयुक्त असार्जुन दृढ राहिला ।
हाच पश्चाताप ज्ञाना बीज अहेति चांगला ॥
नव्हे वैराग्याचवाचुन ज्ञान शुद्धति निर्मळ ।
इश करुणादृष्टिविण वैराग्य ते नव्हे प्रांजल ॥ १ ॥
इशदृष्टि सुसाधुसंगतिवाचुनि न घडेच ते ।
म्हणुनि सधु ( ?- ) संगति सर्वदा अति निश्चीतें ॥
अर्जुनाते व तेच आहे यास्तव येथ प्रस्तुत ।
आधिक पश्चात्ताप जाला विमळ फाराति वस्तुत ॥ २ ॥

१५. स्वप्रागल्भ्यबलाद्विलोड्य भगवद्गीतां तदन्तर्गतं- ।
तत्त्वं प्रेप्सुरुपैति किं गुरुकृपापीयूषदृष्टिं विना ।
अम्बु स्वाञ्जलिना निरस्यजलधेरादित्सुरन्तर्मणी- ।
नावर्तेषु न किं निमज्जति जनः सत्कर्णधारं विना ॥

हरकत नाहीं; " असें मी म्हटलें होतें.[१६] यापुढें हा पायंडा पाडण्याचें श्रेय वामनपंडितांना देतां येणार नाहीं.

वास्तविक रंगबोध व वामनपंडित हे समकालीन. वामनपंडितांचा जीवन-काल श. १५२८ ते श. १६१७ असल्याचें के. प्रा. पंगु सांगतात.[१७] पंडितांच्या ग्रंथांचा क्रम निगमसार, कर्मतत्त्व, चित्सुधा, सिद्धांतविजय, अनुभूति-लेश, समश्लोकीगीता, चरमगुरुमंजरी, उपादान व यथार्थदीपिका; असा अस-ल्याचेंहि प्रा. पंगु लिहितात.[१८]

यापैकी पहिला ग्रंथ 'निगमसार' हा श. १५९५ मध्यें लिहिला गेला. 'यथार्थदीपिका' तर आयुष्याच्या अखेरीस रचली गेली. 'रंगबोधिनी' ही वामनपंडितांपूर्वीची कशी व कोणत्या अर्थानें हें विशद करण्यास अेवढा ऊहापोह केला.

रंगबोधिनी'च्या अंतरंगाचा विचार करीत असतांना कांहीं विवाद्य स्थळीं-पाशीं थांबावें लागतें. कांहीं शब्दांचे अर्थ भिन्न भिन्न तऱ्हेनें दिले जातात. अशा ठिकाणीं पूर्वींच्या व नंतरच्या संस्कृत-प्राकृत टीकाकारांनीं कोणते अर्थ दिले आहेत आणि रंगबोध त्यांत आपली म्हणून कांहीं भर घालतात काय हें पाहण्या सारखें आहे.

पांचव्या श्लोकांतील 'पुरुजित् कुंतिभोज' हीं दोन व्यक्तींचीं नांवें कीं एकाच व्यक्तीचें नांव हा वादाचा मुद्दा आहे. "तसेंच पुरुजित् कुंतिभोज हीं दोन पुरुषांचीं दोन नांवें नव्हेत. कुंती ज्या कुंतिभोज राजाला दत्तक दिली होती, त्याचा पुरुजित् हा औरस मुलगा असून कुंतिभोज हें त्याचें कुळनांव आहे; व तो धर्म, भीम व अर्जुन यांचा मामा होता असें वर्णन आहे;" असें

१६. 'दोन अप्रसिद्ध टीका', हा माझा लेख पाहावा.

१७. प्राचीन मराठी कविपंचक, पृ. ५७.

१८. उपर्युक्त, पृ. ५४.

लो. टिळक म्हणतात.[१९] तर डॉ. राधाकृष्णन् यांचें मत असें :—'Purujit and Kuntibhoja are two brothers. Sometimes Purujit Kuntibhoja is taken as one."[२०] नीलकण्ठ हीं दोन नांवें मानतो.[२१] ' ज्ञानेश्वरी ' प्रमाणेंच[२२] 'रंगबोधिनीं'त हीं दोन नांवें वेगळीं मानली आहेत.[२३]

यापेक्षां दहाव्या श्लोकांतील ' अपर्याप्तं ' व ' पर्याप्तं ' शब्द अधिक विवाद्य ठरले आहेत. लो. टिळकांच्या मतें, " .... या ठिकाणीं ' अपर्याप्त ' याचा = अमर्यादित, अफाट किंवा अगणित " याखेरीज दुसरा अर्थच संभवत नाहीं.... नुसत्या पर्याप्त शब्दाचा " पुरेसें, मोजके, ज्यांची गणती करितां येते " असा अर्थ होतो.[२४] डॉ. राधाकृष्णन् ' अपर्याप्तं ' साठीं unlimited व 'पर्याप्तं' साठीं limited असे शब्द वापरून, श्रीधराच्या मतें ' अपर्याप्तं ' चा अर्थ insufficient असल्याचें सांगतात.[२५] ' अपर्याप्तं ' चा 'असमर्थ ' असा अर्थ आनंदगिरि भाष्योत्कर्षदीपिका, श्रीधर व अभिनवगुप्ताचार्य देतात. तर ' बहु ' व ' अनंतं ' असा अनुक्रमें नीलकण्ठ व मधुसूदनसरस्वती देतात. ' पर्याप्तं ' चा ' समर्थं ' असा अर्थ आनंदगिरि आदि टीकाकार सांगतात; तर ' अल्पं ' व ' परिमितं ' असा अर्थ नीलकण्ठ व मधुसूदन देतात.

" ज्ञानेश्वरांनींहि या बाबतींत संस्कृत टीकाकारांना अनुसरून तसेच अर्थ केल्यानें, युद्धांतील जयाबद्दल मूळचा साशंक असणारा दुर्योधन, त्यांच्याकडून

१९. गीतारहस्य, पृ. ६०३.

२०. The Bhagavadgita, p. 82.

२१. धृष्टकेत्वादयः षट् ॥ ५ ॥

२२. हा कुंतिभोज पाहे । एथ युधामन्यु आला आहे ।
आणि पुराजितादि राये । सकळ जाणे ॥ १.१०० ॥

२३. पुरुजित् । पुरुजित् ॥ चेत्यपरं । आणिक ॥ कौंतिभोजाः। कौंतिभोज ।
....पुरुजित्तथा कौंतिभोजक राजा.... ।

२४, गीतारहस्य, पृ. ६०४.

२५. The Bhagavadgita, p- 83

भलताच आत्मविश्वास बाळगणारा व पांडवांबद्दल तुच्छता दर्शविणारा असा रंगविला गेला आहे," हें प्रा. पंगूंचें विधान[26] व ज्ञानेश्वरांनीं वापरलेले 'थोकडें' आणि 'वरिचिलेनि' हें पांडवसैन्याविषयींचे शब्द[27] विचार करण्यासारखे आहेत.

रंगबोध "अपर्यातं । तेहिंशी सांघाते झगडावयाकारणे असमर्थ ॥.... पर्यातं । समर्थ ॥" असा 'पदच्छेद' देऊन पुढें श्लोकांत अनुक्रमें 'दीन' व 'भव्य' हे शब्द वापरतात.[28] येथें ज्ञानेश्वर व वामनपंडित यांच्या अर्थाशीं त्यांचा स्पष्ट विरोध दिसतो. वामनपंडित लिहितात :

असमर्थ तयांचें तें समर्थ बळ आमुचें ।
जे सैन्य रक्षिलें भीष्में त्यांचें तो भीम रक्षिता ॥ [29]

आमचे वीर असे । म्हणूनी तें सैन्य असमर्थ दिसे ।
भीष्में रक्षिलें असें । समर्थ हें सैन्य आमुचें ॥ [30]

मोरोपंत तर वामनपंडितांचाच अनुवाद करतात :

असमर्थ तयांचें तें, समर्थ बळ आमुचें मला वाटे, ।
जें सैन्य रक्षिलेंसें भीष्में, त्यांचेहि भीम तो रक्षी ॥[31]

---

२६. ज्ञानेश्वरी अध्याय पहिला; टीपा व स्पष्टीकरण, पृ. ३५

२७. आतां येणेंसीं कवण भीडे । हे पांडवसैन्य कीर थोकडें ।
वरिचिलेनि अपाडे । दीसतसें ॥ १-११९ ॥

२८. तया भीष्मजीनेंच ते राखिलेसे ।
महाशैन्य ते आमुचे दीन दीसे ।
तया भिमसेनेंच ते राखिलेसे ।
महासैन्य त्याचेच हे भव्य भासे ॥ १० ॥

२९. समश्लोकी, १-१०

३०. यथार्थदीपिका, १-१८०.

३१. महाराष्ट्रकविवर्य मोरोपंतकृत स्फुट काव्यें, भाग २, पृ. ४५.

उद्धवचिद्घन मात्र रंगबोधांप्रमाणेंच या पदांचा अर्थ करून म्हणतात :

जे असमर्थ दळीं अमुचे विर भ्याड असंगर त्यांजप्रती ।
देउनियां धिर रक्षि महाविर भीष्म उभा पुढें सैन्यपती ॥
पांडवसैन्य तया परिपूर्तिस रक्षित भीम सहर्षमती ।
सैन्यविभाग करूं अपुला म्हण रचितसे बहु शीघ्रगती ॥[३२]

रंगबोध किंवा उद्धवचिद्घन यांचा अर्थ 'यथार्थदीपिके'च्या मताप्रमाणें[३३] 'व्यर्थ' ठरलातरी सर्वांनाच तो तसा वाटेल असें नाहीं. ' अमरकोशां ' तील ' पर्याप्तं ' चा अर्थहि उद्बोधक आहे.[३४]

या नंतर मतभेद आहे तो ' हृषीकेश ' व ' गुडाकेश ' या शब्दांच्या अर्थासंबंधीं. ' हृषीकेश ' साठीं ' इंद्रियाधीश ' व '....गुडाकेश ' साठीं ' माहा-मोहनिद्राजितु ' असे शब्द रंगबोध वापरतात.[३५] " हृषिकेश । हृषिके जे इंद्रिये जे त्याचा ईश ह्मणिजे नियंता तो हृषिकेश ॥' '....गुडाकेशेन । गुडाका जे निद्रा जे तिचा जो इश जो निद्राजित जो त्या अर्जुनानें ॥ ' अशी उकलहि ते करून दाखवितात. ' यथार्थदीपिकें 'त असाच अर्थ दिला आहे.[३६] पण पंडितांच्या या श्लोकावर टीका देतांना कै. वामन दाजी ओक लिहितात, "....परंतु अशा

---

३२. महाराष्ट्रकवि उद्धवचिद्घनकृत कवितासंग्रह : भगवद्गीता, १–१०.

३३. या श्लोकाचा अर्थ । प्रकारांतरें दिसे तो व्यर्थ ।
कीं आमुचें अपूर्ण असमर्थ । समर्थ सैन्य पांडवांचें ॥ १–१८४ ॥

३४. काम प्रकामं पर्याप्तं निकामेष्टं यथेप्सितम् ॥

३५. वदे संजयो भारता ये रितीने ।
माहामोहनिद्राजित्तु अर्जुनानें ॥
असा बोलिला इंद्रियाधिश जो तो ।
बऱ्या दोनि शैन्याचिमध्यें मी तो ॥ २४ ॥

३६. कीं तो अर्जुन डाकेश । गुडाका निद्रा, तिचा ईश ।
निद्रा भ्रांति तिचा प्रवेश । न घडे बुद्धींत अर्जुनाच्या ॥ १–२७१ ॥

प्रकारची 'गुडाकेश' शब्दाची व्याख्या घेतली असतां तिची संगति सदासर्वदा अर्जुनाच्या व्यवहाराशीं मिळेल असा नेम नाहीं. कारण अर्जुनाचीं कांहीं कृत्यें अदक्षताद्योतक आढळणार आहेत, तेव्हां 'गुडाकेश' हें नांव अर्जुनास अर्थानुरोधानें यथार्थपणें लागू पडत नाहीं; परंतु अर्जुनाव्यतिरिक्त इतरांस 'गुडाकेश' असें म्हणण्याचा व्यवहार नाहीं म्हणून तें विशेषनाम समजावें. पाश्चिमात्य गीर्वाणभाषाभिज्ञ पंडितांनीं प्रस्तुत शब्दाचा अर्थ कल्पनेनें बसविला आहे तो असा : गुडा म्हणजे गुळवेल, तिच्या गांठीसारखे ज्याचे केश गुंतले आहेत तो 'गुडाकेश'. हा अर्थ काल्पनिक असल्याकारणास्तव त्याजविषयीं जास्त लिहिण्याची आवश्यकता नाहीं. प्रस्तुत शब्दावर शंकरानंदसरस्वतीकृत गीतेवरील टीकेंत पुष्कळ मोठें व्याख्यान केलें आहे, त्यांत 'गुडाक' म्हणजे 'शिव' आणि 'ईश' म्हणजे 'स्वामी' यांचा बहुव्रीहि समास करून 'गुडाक आहे ईश ज्याचा तो' गुडाकेश, म्हणजे अर्जुन असा एक अर्थ काढिला आहे."[३७]

ज्याला 'गुडाकेश'चा काल्पनिक अर्थ असें कै. ओक म्हणतात, त्याला कांहीं आधारहि आहेत. 'अमरकोशां'त वनौषधिवर्गांत 'गुडा' हा शब्द येतो.[३८] क्षीरस्वामींची त्यावरील टीका,[३९] डॉ. राधाकृष्णनूनीं दिलेल्या "having the hair in a ball"[४०] या अर्थाशीं जुळती आहे. टिळक वेगळा अर्थ देत असले तरी, 'गुडाका+ईश' याऐवजीं 'गुडा+केश' असा पदच्छेद करतात.[४१] रंगबोध हे मधुसूदन[४२] आणि श्रीधर[४३] यांचाच अर्थ

३७. यथार्थदीपिका, भाग पहिला, पृ. २४.

३८. मिश्रेयाऽप्यथ सीहुण्डो वज्रः स्नुक् स्त्री स्नुही गुडा ॥

३९. गुडावृत्तत्वात्, गुहेत्यपपाठः; यच्छाश्वतः –गुडो
गोलेक्षुविकृती स्नुही गुडिकयोर्गुडा ॥

४०. The Bhagavadgita, p. 87.

४१. गीतारहस्य, पृ. ६०७. नीलकण्ठ 'घनकेश' असा अर्थ देतोच.

४२. गुडाकाया निद्राया ईशेन जितनिद्रतया अर्जुनेन .... ।

४३. गुडाका निद्रा तस्या ईशेन जितनिद्रेणार्जुनेन .... ।

सांगतात व तो मान्य होण्यासारखा आहे. 'भाष्योत्कर्षदीपिकें'त हाच अर्थ दिला आहे.[४४]

'हृषीकेश' या शब्दाच्या अर्थाबद्दल विशेष वाद होऊं नये. 'हृषी+केश' असा पदच्छेद टिळक करतात व "हृषी म्हणजे हर्षानें उभारलेले किंवा प्रशस्त ज्याचे केश तो कृष्ण" असा अर्थ लावतात. 'हृषीक' म्हणजे इंद्रिय असा अर्थ अमरसिंह देतो.[४५] 'हृष्यत्यनेन हृषीकम्' असें क्षीरस्वामी म्हणतात[४६] 'हृषीकेशः' शब्दावरील त्यांची टीका 'इंद्रियाधिश' या रंगबोधांच्या पदाची सार्थकता पटविणारीच आहे. या शब्दाचें स्पष्टीकरण 'हृषीकेशं इंद्रियप्रवर्तकत्वेन सर्वान्तःकरणवृत्तिज्ञमिति केचित्' (—भाष्योत्कर्षदीपिका); 'हृषीकेशं सर्वेषा-मिंद्रियाणां प्रवर्तकत्वेन परचित्ताभिज्ञम्' (—नीलकण्ठ), असें केलेलें आढळतें.

तेराव्या श्लोकांत येणाऱ्या शंख, भेरी, पणव, आनक आणि गोमुख या वाद्यनामांची थोडीशी चर्चा येथें अस्थानीं ठरूं नये. कारण या नांवांचें स्पष्टी-करण वेगवेगळ्या प्रकारें झालेलें आढळतें. सगळेच संस्कृत टीकाकार 'वाद्यविशेषाः' या एकाच शब्दांत वरील सर्व नांवांची बोळवण करतात. ज्ञानेश्वर शंख, भेरी, निशाण, मांदळ, टीविला आणि भोंगळ अशीं वाद्यांचीं नांवें देतात.[४७] वामनपंडित 'यथार्थदीपिकें'त[४८] शंख, भेरी, पणव आणि समश्लोकींत[४९] सर्व मूळ वाद्यनामांचाच निर्देश करतात. येथेंहि मोरोपंत

---

४४. गुडाकेशेन जिताज्ञाननिद्रेण ....।

४५. गोचरा इंद्रियार्थाश्च हृषीकं विषयींद्रियम्।

४६. हृषीकाणामिंद्रियाणामीशो वशित्वाद् हृषीकेशः!

४७. भेरी निशाण मांदळ। शंख टीविला भोंगळ।
आणि भासुर रणकोल्हाल। सूभटांचे ॥ १–१३३ ॥

४८. शंख भेरिया पणव। आणखी नाना वाद्यसंभव।
ध्वनि तुंवळ अभिनव। उत्पन्न जाला ॥ १–१९६ ॥

४९. तों वाद्यें शंखभेर्यादि पणवानक गोमुखें।
वाजवीलीं एकसरें, जाला तो ध्वनि तुंबळ ॥ १-१३ ॥

पंडितांनाच साथ देतात.[५०] उद्धवाचिद्‌घन भेरी, गोमुख, उंबर, शृंग व कहळा यांचा उल्लेख करतात.[५१]

रंगबोधांची टीका अशी : " शंखाः । शंख ॥ चेत्यपरं । आणिक ॥ भेर्यः । भेरि ॥ पणव । ढोल ॥ आनक । आनक म्हणिजे दमामा ॥ गोमुखः । गोमुख । वाद्यविशेष । सिंगें । " या पदच्छेदानंतर श्लोकांतहि ते सांगतात :

त्यावरि अति शंख भेरि दमामा सिंग सुढोल तो ।
एक वेळिंच वाजवीत जाहले स्वन घोर तो ॥

रंगबोध मूळ संस्कृत वाद्यनामांचे त्यांच्या काळचे पर्याय देत आहेत, ही गोष्ट महत्त्वाची वाटते.

या वाद्यांतील सूक्ष्म फरक ध्यानांत येऊंच नये, असे या वाद्यनामांचे अर्थ दिलेले मिळतात. उदाहरणार्थ :

दमामा — पु. १ मोठा नगारा; नौबत ( फा. दमामा ).[५२]

ढोल — पु. १ एक मोठें चर्मवाद्य; नगारा; भेरी; पडघम.[५३]

भेरीचा अर्थ तर मोठा नगारा, नौबत असा अनेक ठिकाणीं दिला आहे.[५४] मग भेरी, दमामा, ढोल यांत फरक कोणता ?

शंख आणि भेरी हे शब्द बहुतेक टीकाकारांनीं जसेच्या तसे वापरलेले असल्यानें ते बाजूस ठेवावयास हरकत नाहीं. उरले पणव, आनक आणि गोमुख.

---

५०. तंव शंख आणि भेरि पणवानक गोमुखादिकें वाद्यें.... ।

५१. भेरि भयंकर गोमुख उंबर शृंग अणी कहळा सदटे.... ॥

५२. महाराष्ट्रशब्दकोश, पृ. १६१४.

५३. उपर्युक्त, पृ. १४५४.

५४. अमरकोश, निर्णयसागर प्रत ( स. १९०६ ), पृ. २१; महाराष्ट्र-कविवर्य मोरोपंतकृत स्फुट काव्यें, भा. २, पृ. ४६; यथार्थदीपिका, भाग पहिला, पृ. १६.

वाद्यभेदांत अमरसिंह पणवाचा उल्लेख करतो.[५५] कै. ओक ' काल्ह् नांवाचें वाद्य ' असा या शब्दाचा अर्थ देतात.[५६] ' आनकः पटहोऽस्त्री स्यात् ' असें ' अमर कोशांत ' आढळतें व त्याचा अर्थ ' पडघें ' असा दिला आहे. या शब्दांवर "आ-अनित्यानकः । पणायत्यंतस्तंत्रीकः पणवः ।" अशी क्षीरस्वामी टीप देतात.[५७] पणव आणि आनक हीं चर्मवाद्यें असल्यानें निशाण व मांदळ हे अनुक्रमें नगारा ( कीं पडघम ? ) व मृदंग या अर्थाचे शब्द ज्ञानेश्वर वापरतात.

गोमुख हें तोंडानें वाजविण्याचें वाद्य असल्याचा समज ज्ञानेश्वरांच्या टीविला ( = नडगी ) आणि भोंगळ ( = तुतारी, पिपाणी, कर्णा ) या वाद्यनामांवरून दृष्टीस पडतो.[५८] मोरोपंतांच्या गीताटीकेंतील या श्लोकावर टीप देतांना संपादकांनीं गोमुख म्हणजे शिंगें कीं काय, अशी शंका प्रदर्शित केली आहे.[५९] उद्धवाचिद्घन ' शृंग ' असा शब्द वापरतातच. हेंच असें दाखवितां येईल :—

| | शंख | भेरी | पणव | आनक | गोमुख |
|---|---|---|---|---|---|
| ज्ञानेश्वर | ,, | ,, | मांदळ | निशाण | टीविला, भोंगळ |
| रंगबोध | ,, | ,, | ढोल | दमामा | शिंगें |
| वामनपंडित | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| उद्धवाचिद्घन | — | ,, | (उंबर ? ) | — | शृंग, गोमुख-कहळा |
| डॉ. राधाकृष्णन् | Conches | Kettledrums | Tabors | Drums | Horns[६०] |

५५. वाद्य–प्रभेदा–डमरू–मड्डु–डिण्डिम–झर्झराः ॥
मर्दलः पणवोन्ये च .... ॥

५६. यथार्थदीपिका, भाग पहिला, पृ. १६.

५७. The Namalinganushasana ( Amarakosha ), Ed. by K. G. Oka, p. 32.

५८. ज्ञानेश्वरी, अध्याय पहिला ( सं. पंगु ), पृ. ३९.

५९. महाराष्ट्रकविवर्य मोरोपंतकृत स्फुट काव्यें, भा. २, पृ. ४६.

६०. The Bhagavadgita, p. 84.

भाषाविशेषांमध्यें कांहीं शब्दांच्या अर्थच्छटांचा विचार करावयाचा असल्यानें येथें आणखीं कांहीं मूळ शब्दांच्या अनुवादाकडे लक्ष देणें बरें. प्रथम दोन पाठभेद नमूद केले पाहिजेत. अठ्ठाविसाव्या श्लोकांत ' समुपस्थितं ' असा पाठ टिळक व राधाकृष्णन् देतात. येथें दुसरा कांहीं पाठ असल्याचें ते सांगत नाहीत. रंगबोध मात्र ' समवस्थितं ' असा पाठ स्वीकारतात. हाच पाठ पणशीकरशास्त्रीहि देतात.[६१] डॉ. राधाकृष्णन् ४६ व्या श्लोकांतील ' क्षेमतरं ' वर ' Another reading is priyataram for kshemataram. ' अशी टीप[६२] देत असले तरी रंगबोध ' क्षेमतरं ' हाच शब्दप्रयोग वापरतात.

यानंतर शेवटच्या श्लोकांतील ' उपाविशत् ' संबंधीं थोडेंसें लिहिलें पाहिजे. ' रथोपस्थे ' म्हणजे ' मध्ये रथस्य ' ( आनंदगिरि ); ' रथोपस्थे रथस्योपरि ' ( मधुसूदन, भाष्योत्कर्षदीपिका, श्रीधर ) असे अर्थ टीकात दिलेले आढळतात. रंगबोध " रथोपस्थ | रथावरि ॥ " असें म्हणून पुढें ' रथास्यावरि ' असा शब्द योजतात. ' उपाविशत् ' शब्दाचें स्पष्टीकरण ' उपविष्टवान् ' (आनंदगिरि); ' उपविवेश ' (मधुसूदन, श्रीधर) असें केलेलें आढळतें. रंगबोध "उपाविशत् | प्रवेशता जाला " असा पदच्छेद देऊन पुढें श्लोकांत ' बैसला ' असा समर्पक शब्द वापरतात. या ठिकाणीं ज्ञानेश्वर मूळ अर्थापासून कसे व किती दूर जातात तेंहि पाहण्यासारखें आहे.[६३]

' रंगबोधिनी ' ही शिवकालाला जवळची असल्याचें भाषेवरूनहि कळून येण्यासारखें आहे. केवळ भाषाशास्त्रीय अभ्यास मांडण्याचें उद्दिष्ट नसल्यानें कांहीं बाबींचा उल्लेख करतों. पदच्छेदाच्या निमित्तानें गद्य व टीकेच्या निमित्तानें पद्य असे दोन्ही लेखनप्रकार 'रंगबोधिनीं'त असल्यानें त्या काळची भाषा अधिक

---

६१. Shrimad Bhagavd Gita, Ed. by W. L. Pansikar, ( Nirnaya-Sagar Prees, 1912 ), p. 22.

६२. The Bhagavadgita, p. 94.

६३. मग अत्यंत उद्वेगला | नधरे गहिवरू आला |
तेथें उडी घातली खाला | रथौनिया ॥ १-२६७ ॥

चांगल्या तऱ्हेनें कळूं शकते. अेरवीं केवळ काव्यांतील रूपांवर विश्वास ठेवणें बरेंच धाष्ट्यांचें वाटतें.

देखें, बोलों, वदों, बोलेन, सांगेन, पाहेन, नीर्दिसेतों, बोलतों, पाहेनि हीं प्रथमपुरुषी अेकवचनी; नव्हो, अइकतों हीं बहुवचनी; आणि आहेत, असेति, पाहेत, पाहेति हीं तृतीयपुरुषी बहुवचनी वर्तमानकाळाचीं रूपें आढळतात. अवधारि, पाहे, परिसे, जाग, स्थापी हीं आज्ञार्थी; झगडावे, जुझावे, प्रवर्तावे, पाहावें, जाणावें, हीं विध्यर्थी; आणि सोडिजे, करिजे, अपेक्षिजे, कांक्षीजते आशंकिजे, दुषिजेतिल, प्रदुषीजती, हीं कर्मणिरूपेंहि मीं टिपलीं आहेत. भूतकाळाचीं तृतीयपुरुषी अेकवचनी जाला, बैसला, सरिनला आणि अनेकवचनी जाले, जाहाले अशीं रूपेंहि मिळतात. पाहोन, मारून, मारोन बोलोन, देखोन, जाउन, टाकोन, परिसोनि, उचलुन, स्थापुन, मीलालियां, वर्तलिया, होत्साते, इछिते, राहिलिया, बैसलिया हीं कृदंतादि रूपें आणि आमतें, आपण्यां, मातें, आज्यातें, माम्यातें, नातातें, सासरियातें, सोईरियातें; मामियाते; कृपेनि, कुरुक्षेत्राचा, कालाचा, रथाचा, कुरूच्या अि. प्रत्ययसाधित विभक्तींचीं आणि प्रयोजनाकारणें, ज्ञानार्थाकारणें, युधाकारणें, व्युहरचने करून, नामेकरूनी, भागेंकरून, कृपेकरून, सेनेमाजि अशीं शब्दसाधित विभक्तींचीं उदाहरणें विपुल मिळतात. श्वेतअश्वेंसि, विषादेंसी हीं रूपें यादवकालाची आठवण करून देतात.[६४] ' अ ' चा ' आ ' होण्याची शिवकालीन स्वरप्रक्रिया ' माहा ', सारख्या शद्बांत दिसते. येक ( अेक ); प्रथमोध्याव ( प्रथमोध्याय ) या व्यंजनप्रक्रियेचें 'ये' (अे) हें उदाहरण विचार करण्यासारखें आहे.

मूळ संस्कृत श्लोकांत जेथें जेथें संबोधनें आहेत तेथें तेथें पदच्छेद करतांना रंगबोध ' ये ' हा शब्द आधीं घालतात. ' भो ' असा संस्कृत शब्द मुळांत ते गृहीत धरतात; तर कांहीं ठिकाणीं 'हे' अध्याहृत मानतात.[६५] अेखाद्याला

६४. यादवकालीन मराठी भाषा, पृ. १८१–८२.

६५. भो संजया । ये संजया । भो आचार्य । ये आचार्य ॥
हे अच्युता । ये अच्युता । हे कृष्ण । ये कृष्ण ॥

हांक मारतांना वापण ' अे ' असें म्हणतो. ' ये ' हें याच ' अे ' चें तत्कालीन रूप असावें. पण हें बोलीभाषेंत जास्त रूढ असावें. कारण श्लोकांत रंगबोध 'गा' आणि 'आगा' हेहिशब्द वापरतात.[६६]

सुटंका आणि भर्तसेनी हे शब्द अर्थदृष्ट्या चिंत्य असले तरी त्याहून कांहीं शब्दांच्या अर्थच्छटा महत्त्वाच्या वाटतात. अेखाद्या शब्दाचा अर्थविकास वा अर्थसंकोच कसा झाला हें पाहण्याकडे आज आपली दृष्टि वळत आहे. त्या दृष्टीनें ' वाळतें ' हा शब्दाचा केलेला उपयोग पाहण्यासारखा आहे.[६७]

' वाळतें ' हें ' परिशुष्यति ' या शब्दाचें भाषांतर. ' शोखते ' असा ( पदच्छेदांत ) रंगबोध अर्थ सांगतात. वामनपंडितांनीं ' वाळतें ' हाच शब्द वापरला आहे.[६८] श्रीधरस्वामींची ' शुष्यति निर्द्रवीभवति ' ही टीप रंगबोधांच्या पुढें असावी. आज ' तोंड वाळतें ' याचा अर्थ केवळ शुष्क होतें असा नाहीं. ज्ञानेश्वर ' वाळतें ' या शब्दा अैवजीं ' कोरडें होत ' असें म्हणतात.[६९] पुढें तिसाव्या श्लोकांतील ' भ्रमतीव ' या पदाचें ' भ्रमतें (च) ' असें स्पष्टीकरण करून टीकेंत मात्र रंगबोध ' भोंवतेंहि ' असा शब्द उपयोजितात.[७०]

अेखाद्याला कांहींतरी ' भोवतें ' म्हणजे काय तें आपणांस माहीत आहे. जुन्या मराठींतील ' फिरणें ' हा या शब्दाचा अर्थ भोंवरा, भोंवळ अशा शब्दांत शोधणें शक्य आहे. ' उध्दवगीतें ' तील ' भवसि ' हा शब्द येथें आठवतो.[७१] ' घतल्याहि ', ' घुतुनिया ', ' घतावयासि ' हे शब्द ' हन्तुं ', ' हत्वा ', यांच्यासाठीं आले व त्यांचे अर्थ पदच्छेदांत रंगबोधांनीं ' माराव्याकारणें ' 'मारोन' असें

६६. द्विजोत्तमा गा अमच्यांत शिष्ट जे .... (७)
ये आगा अवनिपति मग तदा .... (२०)

६७. .... तसें तोंडहि वाळतें येच कालि ॥ २८ ॥

६८. यथार्थदीपिका, १–२९६.

६९. देखें देह कांपत । तोंड असें कोरडें होत .... ॥ १–१९६ ॥

७०, .... तसें चित्त माझें सदा भोवतेंहि .... ॥ २० ॥

७१. इंद्रियाचां चाकवरां : क्षणें भवसि गरगरा ॥

दिले असले तरी जुने म्हणून महत्वाचें वाटावेत. संस्कृत ' घातय् ' पासून ते व्युत्पदितां येणें शक्य आहे.

' नासणें ' हें क्रियापद अनेक अर्थ व्यक्त करतांना दिसतें. "प्रणश्यंति । नाशतिल ॥ धर्मे नष्टे सति । धर्मनासला असतां ॥ .... प्रदुष्यंति । दुषिजेतिल ॥ स्त्रीषु दुष्टासु सत्सु । स्त्रिया नासल्या असतां ॥ "[७२] ' नाशलें ' असें रूपहि मिळतें.[७३]

' रंगबोधिनी ' मध्यें अनुष्टुभ् ( श्लो. १, २, ३, ४, १२, १३, १८, ४४, ४५ ); उपजाति ( वंशस्थ+अिंद्रवशा, श्लो. ७ ); भुजंगप्रयात ( श्लो. ५, ६, ८, ९, १०, ११, १४, १५, १६, १७, २४, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३८, ४२, ४३, ४६, ४७ ); शार्दूलविक्रीडित ( श्लो. १९, २०, २१, २२, २३, २५, ३२, ३३, ३४, ३६, ३७ ); अशीं चार वृत्तें वापरलीं आहेत. वृत्तनियमांकडे थोडेसें कवीचें व बरेंचसे प्रतकाराचें दुर्लक्ष झालेलें दिसतें. मुख्यतः ह्रस्वदीर्घांबाबत कांटेकोरपणा दाखविला गेलेला नाहीं. आपले बरेचसे कवी या दोषापासून अलिप्त नसल्यानें रंगबोधांना अपराधी ठरविण्यांत फारसें हंशील नाहीं. पंडित कवींपूर्वींची वृत्तरचना म्हणूनहि महत्व.

भाषाविशेषांतच जिचा विचार करतां आला असतां—अशी आणखी अेक गोष्ट म्हणजे ' रंगबोधिनीं ' तील संधिप्रकरण. वृत्तसौकर्यासाठींच मुख्यतः अशा संधींचा आश्रय करावा लागल्यानें, वृत्तांबरोबरच या भाषा विशेषासंबंधीं लिहिणें सोयीचें वाटतें.

कुमराणि, पांचाणिकी, धनुष्येति, पुरुजित्तसा, इर्षुपाजिवीतो, नकुलाणिकी, सुघोषाणिकी, नृपादपदाणि, सौभद्राणी, माश्याति, ठेलेसति, सुहृत्तसे, धार्तराष्ट्रांम्हीं,

७२. .... कुळसुधर्म आखंड नासतीं .... ॥
कुळसमूळ हे धर्म नासतां .... ॥ ४० ॥
.... स्त्रिया नासल्या आसता आखिला तों .... ॥ ४१ ॥

७३. .... उत्सन्न म्हणिजें नाशलें आहेत कुळधर्म कां ज्याचे ऐसें ॥
नाशले कुळधर्म ज्यांचे ऐ .... अतिदुर्जना .... ॥ ४४ ॥

केल्यातिदोषी, निश्चीताम्ही, होईलाणिक, असार्जुन, वदतार्जुन, शुद्धति, फारति इ. संधि मराठी वळणाचे नाहींत; तर कन्नडपद्धतीचे आहेत. कन्नडमध्यें अशा संधीस 'पदान्तसंधि' म्हणतात. या प्रकाराची व्याख्या शं. वि. जोशी पुढीलप्रमाणें देतात, "वाक्यांतील दोन शब्दांमध्यें जो संधि होतो त्याला 'पदान्तसंधि' म्हणतात."[७४]

रंगबोध हे मुख्यतः 'श्रीधरातें वाट पुसतु' निघालेले दिसतात. किंबहुना श्रीधरस्वामींच्या 'सुबोधिनी'चा मराठी अवतार करविणें हाच त्यांचा उद्देश दिसतो. पदच्छेद करतांना रंगबोधांच्यापुढें 'सुबोधिनी'च होती हें स्पष्ट आहे. 'समवस्थितं' चें स्पष्टीकरण करतांना "सम्यक म्हणिजे बरव्या प्रकारें-करून अवस्थित म्हणिजे राहिल्या" असें रंगबोध म्हणतात. 'सम्यगवस्थितं'चाच हा अनुवाद आहे. श्रीधर "अयनेषु व्यूहप्रवेशमार्गेषु" असें म्हणतात तर रंगबोध जवळजवळ तेच शब्द वापरतात. "व्यूहरचना मार्गांचा ठाईं". अशीं किती तरी उदाहरणें देण्यासारखीं आहेत.

श्रीधरस्वामी पुढील भागाची प्रस्तावना करतांना "पश्येत्यामित्यादिनवभिः श्लोकैः"; "भवानितिद्वाभ्याम्"; "तत इति पञ्चभिः"; "अथेति चतुर्भिः" इ. अशी पहिल्या अध्यायाची जणूं विभागणी करतात. येथेंहि रंगबोध "पश्येत्यादि नव श्लोके"; "त्यातेंच बोलतों भवानिति श्लोकेकरून"; "युद्धउत्सव पांच श्लोकिंहि बोलतो तुज सर्वेसा"; "तेथ अथेति चतुश्लोके करून"; असें म्हणून श्रीधरस्वामींचा मार्ग अनुसरतात.

पुढील श्लोकांची प्रस्तावना व चालू श्लोकावर टीका करतांना रंगबोध अन्य ग्रंथांतील अवतरणेंहि देतात. 'महारथाः' वर टीप देतांना ते पुढील श्लोक देतात :—

एको दशसहस्राणि योधयेद्यस्तु धन्विनाम् ।
शस्त्रशास्त्रप्रवीणश्च महारथ इति स्मृतः ॥

हा श्लोक बहुतेक संस्कृत टीकाकारांनीं दिला आहे. 'महारथांचें' हें लक्षण

७४. कन्नड—प्रबोध, पृ. १३१.

देण्यापूर्वी प्रतिविंध्यादिकांचा[७५] ते उल्लेख करतात. पुढें ३३–३७ या श्लोकांचें स्पष्टीकरण करतांना,

अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः ।
क्षेत्रदारहरश्चैव षडेते ह्याततायिनः ॥[७६]
....आततायिनमायांतं हन्यादेवाविचारयन् ।
नाततायिवधे दोषो हंतुर्भवति कश्चन ॥[७७]
....स्मृत्योर्विरोधे न्यायस्तु न्यायस्तु बलवान्व्यवहारतः ।
अर्थशास्त्राच्च बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः ॥[७८]

येणारे हे श्लोक श्रीधरस्वामींबरोबर अितरांनींहि दिले असल्यानें त्यांच्याशीं व मूळ ग्रंथांशीं असलेला कवीचा परिचय दाखवितात. रंगबोधांनीं दिलेला, ( ४३ व्या श्लोकावरील टीपेमधील ), श्लोक ( ' प्रायश्चित्तमकुर्वाणाः पापेषु निरता नराः ' ) श्रीधरस्वामीहि देतात. हे सर्व संदर्भ वामनपंडितांच्या 'यथार्थदीपिकें' तहि आढळतात. यामुळें अगदीं प्रारंभींच म्हटल्याप्रमाणें अेखादा तर्क करावासा वाटला, तरी आज तरी तो मनांतच ठेवला पाहिजे. रंगबोध व वामनपंडित यांच्यापुढें सारख्याच टीका होत्या; असें गृहीत धरूनहि मन निःशंक होत नाहीं. मराठी ' सुबोधिनी ' हेंच ' रंगबोधिनी ' चें यथार्थ वर्णन होअील. हेंच तीचें वैशिष्ट्य आणि हीच तिची मर्यादाहि.

---

७५. प्रतिविंध्यः सुतसोमः श्रुतकीर्तिस्तथापरः ।
नाकुलिस्तु शतानीकः श्रुतसेनश्च वीर्यवान् ॥ ( आदिपर्व–अ. ६७, श्लो. २८ )

७६. शुक्रनीति.

७७. मनुस्मृति, अ. ८, श्लो. ३५०–३५१.

७८. याज्ञवल्क्यस्मृति, अ. १, श्लो. २१.

# रंगबोधस्वामीकृत 'योगवासिष्ठटीका'

रंगबोधस्वामींनीं जशी गीतेवर टीका लिहिली होती, तशीच 'योगवासिष्ठा' वरहि लिहिली होती. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की या दोन्ही टीका आजवर अंधारांत राहिल्या. जवळ जवळ तीन शतकांनंतर त्या हातीं आल्या—पण त्रुटित स्वरूपांत! गीतेवरील टीकेचा—'रंगबोधिनी' चा परिचय मी पूर्वीं करून दिलाच आहे.[१]

प्रस्तुत टीकेचें हस्तलिखित जुनें असून १६"×१७" आकाराच्या पानांवर मजकूर लिहिला गेला आहे. स्वामींनीं सर्व प्रकरणांवर टीका लिहिलेली होती. परंतु 'शांबरिकोपाख्यान' तेवढें ('उत्पत्ति' प्रकरणांतील) संपूर्णस्वरूपांत उपलब्ध आहे. 'लवणोपाख्याना' चीं व 'स्थिति' प्रकरणांतील 'भार्गवोपाख्याना' चीं कांहीं पानें मिळालीं आहेत. येथें 'शांबरिकोपाख्याना' च डोळ्यांपुढें ठेवलें आहे.

---

१. पाहा :—'रंगबोधिनी' : एक अध्याय.

उपलब्ध प्रकरणांच्या आरंभीं व अखेरीस, विषयानुक्रम, गुरु, कवि, व टीकानाम यांवर प्रकाश टाकणाऱ्या ओव्या आढळतात. 'शांबरिकापोख्याना'च्या प्रारंभीं स्वामींनीं आपले गुरु सहजबोधस्वामी यांना नमन केलें आहे.

जगद्विलास हा तुझा । तु अद्वीय आत्मा माझा ।
सहजबोध गुरुराजा । स्वयंतेजा अनंता ॥ २ ॥

किंवा,

हे सहजबोधा आपलें । प्रसंनपण तुं दिधलें ।
जें जनवनि दाविलें । येकलें तुझें स्वरूप ॥ ९ ॥

असा गुरूंचा नामोल्लेख स्पष्टपणें स्वामींनीं केला आहे. गुरूच आपल्या मुखांतुन ही टीका वदवीत आहेत : आपण केवळ 'लेखकु' आहोंत असें म्हणतांना एकाच वेळीं टीकेचें नांव, स्वरूप व गुरुविषयींचा आदर-इतक्या गोष्टी स्वामी व्यक्त करतातः—

ऐसा तुं अकळकळा का । हे वशीष्टटिका ।
तु कराविसि जगन्नायका । मज लेखका करूनि ॥ २० ॥
जें वासिष्टरामायण । मोक्षोपाया पूर्ण ।
त्याचे तु टिपण । प्राकृतेंकरुन बोलविसी ॥ २१ ॥

'टिका', 'टिपण' हे स्वामींनीं वापरलेले शब्द महत्त्वाचे आहेत. विषयानुक्रम किंवा प्रकरणांची मांडणी लक्षांत येण्याच्या दृष्टीनें पुढील उतारे महत्त्वाचे आहेत :—

[१] या योगवासिष्टांत । (उ) त्पत्ति प्रकरण हो येथ ।
यांत सर्ग जाले सात । अतां प्रस्तुत आटवां ॥ २४ ॥
या उत्पत्ति प्रकरणि । गणिता पहिलेंपासोन ।
अकरां सर्ग समाप्तपणि । जाले कराणि तुम्ही हे ॥ २५ ॥
मागे बालकाख्याईका । त्याचि जालि टिका ।
त्या मिसे सकळिकां । तुझेत्व देखा प्रतिपादिलें ॥ २६ ॥

....यथ शांबरिकाख्यान । बाराव्या स्वर्गाचे निरोपण ।
जगासि तुझेपण । मनोविलास जाण बोलिजैल ॥ ३८ ॥

[२] शांबरिकोपाख्यान । हे तत्त्व कळावयालागुन ।
मनोविलास जग म्हणून । विवरोन सांगितलें ॥ ११६ ॥
हा सर्ग बारावां । तुज कथिला राघवा ।
संपुर्ण जाला आघवा । आईकतां बरवा मोह न पडे ॥ ११७ ॥
जालें शांबरिकाख्यान । संपूर्ण येथुन ।
याउपरि लवणाख्यान । होईल कथन रसाळ ॥ ११८ ॥
रंगसहजबोधि [ श ? ] रण । निवारुनि जन्ममरण ।
सर्वांचें माइकपण । राहे देखोन स्वानुभवें ॥ ११९ ॥
येथ आत्मा चिन्मुर्ति । अद्वितिय स्वयंज्योति ।
त्यांचा विलास हे जगति । सहज....थिचि ॥ १२० ॥
सहजबोधकृपेकरुन । हे शाबरिकोपाख्यान ।
टीकारुप....रोन । बारावा पुर्ण स्वर्ग जाला ॥ १२१ ॥
योगवासीष्ठकथनि । वाल्मीकिरामायेणिं ।
उत्पत्ति ते प्र [ करणी ? ] । शांबरिकोपाख्यानी संपली ॥ १२२ ॥
पहिलेहुन करितां गणित । द्वादश सर्ग समाप्त ।
केवळ उत्पत्तिप्रकरणांत । नव्यांत हा आटवा ॥ १२३ ॥
हे बोल्यासुम [ न ? ] । .... लागुन ।
रंगे केलें समर्पण । ईतुकेन कृत्तकृत्य ॥ १२४ ॥
इति श्री सहजबोध । पदारवींद लब्ध मकरंद ।
रंगबोधकृत वाशीष्टटीका .... । [ शांब– ? ] रिकोपाख्यान ॥

[३] म्हणून हें आख्यान । नववें सांगीतलें पुर्ण ।
जालें समाप्त ईतुकेन । प्रकरण तिसरें हें ॥ २११० ॥
यथ हें लवणाख्यान । नववें जालें पूर्ण ।
चितैकाग्रपण । साधोन पुडतों पुडति ॥ २१११ ॥

लवणोपाख्यान कथिलें । यणे तेरा सर्ग संपलें .... ॥ २११४ ॥
योग वाशिष्ट ग्रंथांत । नववें आख्यान समाप्त .... ॥ २११७ ॥
रंगसहजबोधि शरण । होतां लाहोन चिस्फुरण ।
सर्वपदिं जाला लिन । सद्भावें करुन सर्वत्र ॥ २१२२ ॥
योगवाशिष्ट ग्रंथांत । उत्पात्तिप्रकरणांत ।
लवणाख्यान संज्ञित । तेरावां समाप्त सर्ग जाला ॥ २१२३ ॥
वाल्मिकिय रामायणी । योगवाशिष्टकथनी ।
उत्पत्तिप्रकरणी । तेरावां पूर्णपणि सर्ग जाला ॥ २१२४ ॥
हा मोक्षापाय । असे यथा वाल्मिकिय .... ॥ २१२५ ॥
हे वोविपुष्पांजुळी । श्रीरामचेंद्रपदयुगळीं ।
रंगें होय आर्पिली । हों पाविली प्रीति यणें ॥ २१२६ ॥

इति श्रीमत्सहजबोधपदारविंद । लब्धमकरंद । रंगबोधकृत वाशिष्टटीकायां । उत्पात्तिप्रकरणे लवणोपाख्यानं नाम । त्रयोदशसर्ग ॥ आत्रोत्पात्तिप्रकरणं समाप्तं ॥

[४] सहजबोधा स्वयंज्योती । माझ्यामुखिचि तुंचि स्फुर्ति ।
योगवाशीष्टावरुति । तुझी स्फुर्ति टिकेचि ॥ १६ ॥
पुर्विं उत्पात्तिप्रकरण । केले समाप्त पुर्ण ।
आतां हे स्थिति प्रकर्ण । विवरोन सांगता ॥ १७ ॥
.... या स्थितिप्रकरणांत । पांच आख्यानें आहेत ।
तें कोण कोण हे मात । सांगीजेत असे पै ॥ २३ ॥
शुक्राख्यान दामाख्यान । तिजे भिमाद्याख्यान ।
चौथें दाशूराख्यान । उपदेशाख्यान पांचवें ॥ २४ ॥

रंगबोधस्वामी मूळ ग्रंथाचें नांव ' योगवासिष्ट ', ' वासिष्ट–रामायण ', ' मोक्षोपाय ' असें वेगवेगळ्या प्रकारें देतात. या ग्रंथाचा कर्ता कोण हा आजहि विवाद्य मुद्दा असला तरी स्वामींचा समज मात्र हा ग्रंथ वाल्मीकीचा आहे असा दिसतो. एवढेंच नव्हे तर ' वाल्मीकि रामायेणि ' हा स्वामींनीं वापरलेला शब्द चिंत्य वाटतो.

आपल्या टीकेला स्वामी ‘ वशीष्टटिका ’, ‘ टिपण ’, ‘ टिका ’, ‘ वाशिष्ट-टीकायां ’ अशा नांवांनीं संबोधतात. त्यामुळें तिला ‘ योगवासिष्ठटीका ’ म्हणणेंच सयुक्तिक ठरतें. परंतु स्वामींच्या शब्दप्रयोगांवरून ही ‘ बृहद्योगवासिष्ठा ’ वरील टीका आहे असा ग्रह होणें स्वाभाविक असलें तरी योग्य ठरणार नाहीं.

प्रकरणांचा अनुक्रम व सर्गसंख्या यांचे जे निर्देश आढळतात त्यावरून स्वामींनीं ‘ लघुयोगवासिष्ठ ’ च डोळ्यांपुढें ठेवलें आहे हें स्पष्ट होतें. ‘ शांबरिका-पाख्याना ’ च्या प्रारंभीं; ‘ उत्पत्ति ’ प्रकरणांतील ७ सर्ग संपले असून हें आख्यान म्हणजे ८ वा सर्ग होय; तर पहिल्यापसून गणना करतां ११ सर्ग संपून १२ वा सर्ग सुरू होत आहे असें स्वामी सांगतात. तर आख्यानाच्या अखेरीस १२ वा सर्ग संपला व पुढें ‘ लवणाख्यान ’ सांगितलें जाईल अशी सूचना देतात. ‘ शांबरिकोपाख्यान ’ म्हणजे ‘ उत्पत्ति ’ प्रकरणांतील एकूण ९ सर्गांपैकीं ८ वा सर्ग होय असें ‘ नव्यांत हा आटवा ’ या चरणांवरून कळतें.

‘ लवणोपाख्याना ’ च्या समाप्ति-निदर्शक ओव्यांत; ‘ उत्पत्ति ’ हें ३ रें प्रकरण संपल्याचें व १३ वा सर्ग आणि ९ वें आख्यान पूर्ण झाल्याचें सांगितलें गेलें आहे. ‘ नववें आख्यान ’ हा शब्दप्रयोग ‘ उत्पत्ति ’ प्रकरणातील ‘ नववा सर्ग, या अर्थीं वापरला गेला आहे असें म्हटलें पाहिजे.

‘ स्थिति ’ प्रकरणांतील पहिल्या-म्हणजे ‘ भार्गवोपाख्याना ’ च्या सुरुवातीस पुढें सांगितल्या जाणाऱ्या ५ आख्यानांचा उल्लेख आढळतो. या सर्व निर्देशां-वरून स्वामींनीं आपली टीका ‘ लघुयोगवासिष्ठा ’ वरच लिहिली हें त्यांनीं आधारास घेतलेल्या संस्कृत श्लोकांवरून सिद्धच होतें. उदाहरणार्थ, स्वामींचें १२४ ओव्यांचें ‘ शांबरिकोपाख्यान ’ ‘ लघुयोग-वासिष्ठां ’ तील १० श्लोकांवर आधारलेलें आहे. हेच श्लोक स्वामींच्या टीकेंत आढळतात.

‘ लघुयोगवासिष्ठा ’ तील प्रकरणांचा व प्रकरणान्तर्गत आख्यानांचा अनुक्रम असा आहे[२] :—

२. लघुयोगवासिष्ठ, निर्णयसागर, स. १९३७.

| प्रकरण | सर्ग | सर्ग–नाम |
|---|---|---|
| १ वैराग्यप्रकरणम् : | १ | वैराग्योत्पत्तिप्रतिपादनम् |
| | २ | जगद्दोषप्रकाशवर्णनम् |
| | ३ | वैराग्यवर्णनम् |
| २ मुमुक्षुव्यवहारप्रकरणम् : | १ | मुमुक्षुव्यवहारवर्णनम् |
| ३ उत्पत्तिप्रकरणम् : | १ | उत्पत्तिप्रकरणार्थदर्शनम् |
| | २ | मण्डपोख्याने लीलोपाख्यानम् |
| | ३ | सूच्युपाख्यानम् |
| | ४ | ऐन्दवोपाख्यानम् |
| | ५ | इन्द्रोपाख्यानम् |
| | ६ | चित्तोपाख्यानम् |
| | ७ | बालकाख्यायिकोपाख्यानम् |
| | ८ | शाम्बरिकोपाख्यानम् |
| | ९ | लवणोपाख्यानम् |
| ४ स्थितिप्रकरणम् : | १ | भार्गवोपाख्यानम् |
| | २ | दामाद्युपाख्यानम् |
| | ३ | भीमाद्युपाख्यानम् |
| | ४ | दाशूराख्यानम् |
| | ५ | अदेशाख्यानम् |

टीकेंतील उपलब्ध भागाचा इतक्याच प्रकरणांशीं संबंध येत आहे. मूळ अनुक्रम जसाच्या तसा टीकेंत सांभाळला गेला आहे. यावरूनहि स्वामींची ही टीका 'लघुयोगवासिष्ठा' वरीलच आहे हें उघड होतें.

मराठींत 'योगवाशिष्ठटीका' खूप आहेत. परंतु बहुतेकांना आधार आहे तो 'लघुयोगवासिष्ठसारा' चा. " त्या टीकाकारांपैकीं बहुतेक सर्व टीकाकारांनीं लघुयोगवाशिष्ठसार हा छोटासा ग्रंथ आपल्या टीकेचा विषय केला आहे. हरिदास शांतानंद व चिन्मयदत्त ह्या दोन कवींपैकीं हरिदास शांतानंदानें आपली

टीका लघुयोगवासिष्ठांतील श्लोकांचा पदपदाभिप्राय सांगण्याच्या हेतूनें लिहिलेली आहे;"[३] असें डॉ. य. वि. परांजपे सांगतात. डॉ. तुळपुळ्यांनींहि म्हटलें आहे : "एखाद्-दुसऱ्या टीकेसच काय तो 'लघुयोगवासिष्ठ' हा या ग्रंथाचा बृहत्संक्षेप आधारभूत झालेला आढळतो."[४]

तेव्हां सध्यां तरी उपलब्ध असलेल्या दोन 'लघुयोगवासिष्ठटीकां'त रंगबोधस्वामींच्या टीकेनें महत्त्वाची भर पडत आहे. एवढेंच नव्हे तर या दोन टीकांत कालदृष्ट्या ती पहिली ठरण्याची शक्यता आहे. रंगबोधस्वामी श. १५८१ मध्यें समाधिस्थ झाले एवढें निश्चितपणें आपणांस माहीत आहे. प्रस्तुत टीका ही त्रुटित स्वरूपांत मिळाल्यामुळें स्वामींच्या या 'योगवासिष्ठटीके'चें लेखन केव्हां झालें हें सांगतां येणें कठीण आहे. 'रंगबोधिनी' या त्यांच्या गीता टीकेचा संभाव्य काळ श. १५४८ हा असावा असें मी म्हटलें आहे.[५]

स्वामींनीं प्रथम गीताटीका लिहिली कीं 'योगवासिष्ठटीका' लिहिली हें ठरविण्यासहि आज हातांशीं निर्णायक पुरावा नाहीं. अनुमानच करावयाचें झाल्यास—गीताटीका प्रथम हातावेगळी झाली असावी असें मानतां येईल. कारण श. १५४८ ते १५८१ या ३३ वर्षांच्या कालखंडांत स्वामी स्वस्थ बसले असतील असें वाटत नाहीं. ६००० श्लोकांच्या 'लघुयोगवासिष्ठा'वर टीका करण्यास त्यांना पुष्कळ वर्षे लागलीं असावींत आणि त्या दृष्टीनें निर्याणापूर्वींच्या या ३३ वर्षांपैकीं कांहीं वर्षे त्यांनीं या कार्यांत वेंचलीं असावींत. योगवासिष्ठाच्या मानानें लहान असलेल्या गीतेवरील आपली टीका त्यांनीं प्रथम लिहिली असावी. श. १५४८ ते १५८१ या कालखंडांत केव्हांतरी प्रस्तुत टीकेचें लेखन झालें असावें. हें अनुमान आहे असें वर म्हटलेंच. परंतु श. १५८१ च्या पुढें या टीकेचा काळ जात नाहीं हीं गोष्ट स्पष्ट आहे. आज ना उद्यां स्वामींच्या टीका-लेखनाचा काळ निश्चित करतां येईल.

---

३. योगवासिष्ठ आणि संतवाङ्मय, पृ. ३५५.

४. माधवस्वामीकृत योगवासिष्ठ, भाग १, प्रस्तावना, पृ. ३.

५. पाहा :—'रंगबोधिनी' : एक अध्याय

हरिदास शांतानंद व चिन्मयदत्त यांच्या टीकांचें लेखन केव्हां झालें तेंहि येथें पाहिलें पाहिजे. गुरुपरंपरेच्या व्यतिरिक्त या कवीच्या कालासंबंधीं किंवा चरित्रासंबंधीं कांहींच माहिती या पोथींत आढळत नाहीं;[६] असें चिन्मयदत्तासंबंधीं डॉ. परांजप्यांनीं म्हटलें आहे. चिन्मयदत्ताच्या काळासंबंधीं अधिक संशोधन होणें जरूरीचें आहे.

हरिदास शांतानंदानें आपली टीका ' शके १६१० वैशाख शुद्ध ७ गुरुवार ' रोजीं संपविल्याचें सांगितलें आहे.[७] " ही टीका हरिहराचार्यांच्या लघुयोगवासिष्ठावरील योगेश्वर यांच्या स्वात्मानुभव नामक टीकेच्या आधारानें शक १६१० वैशाख शुद्ध ७ गुरुवारीं संपविली आहे; "[८] असें म्हणून या रचनाकालास श्री. गो. का. चांदोरकरांनीं आपली मान्यता दिली आहे. परंतु हा काल डॉ. तुळपुळयांना ' थोडा घोटाळ्यांत टाकणारा ' वाटतो. " ग्रंथाचा रचनाकाल ' संवतु सोळा शत दशमीं ' असा कवि देतो; तो थोडा घोटाळ्यांत टाकणारा आहे. कारण हा हरिदास ज्योतिपंतदादा महाभागवतांचा समकालीन आहे याबद्दल मतभेद नाहीं; "[९] असें डॉ. तुळपुळे म्हणतात.

हरिदास शांतानंदाच्या काळासंबंधीं येथें अधिक चर्चा करावयाचें कारण नाहीं. डॉ. तुळपुळयांना तो श. १६१० नंतरच्या काळांतील वाटतो. भाव्यांनीं त्याच्या ग्रंथरचनेचा शक असलेली वेगळीच ओवी दिलेली असून तिच्यांत १६१० हाच शक दिलेला असला तरी ' वैशाख शुद्ध १० भृगुवासर ' असा वेगळाच दिवस दिलेला आहे.[१०]

---

६. योगवासिष्ठ आणि संतवाङ्मय, पृ. ११९.

७. वैशाख शुद्ध सप्तमी । भृगुवासर पूर्व यामीं ।
संवत्सोळा शत दशमी । ब्रह्मत्व ब्रह्मीं प्रतीष्ठा ॥

८. श्रीज्ञानेश्वर महाराजांचें योगवासिष्ठ, प्रस्तावना पृ. १६.

९. माधवस्वामीकृत योगवासिष्ठ प्रस्तावना, पृ. २३.

१०. महाराष्ट्र–सारस्वत, पृ. ६९६.

कालोल्लेख सदोष आहे. कारण श. १६१० मध्यें वैशाख शु. ७ स गुरुवार येत नाहीं. तर शनिवार येतो. आणि शु. १० ला सोमवार येतो.[११] परंतु यामुळें शकाबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. कारण हरिदासानें शकाचा उल्लेख निःसंदिग्धपणें केला आहे.

चिन्मयदत्ताच्या भाषेवरून त्याची टीका श. १५८१ पूर्वींची ठरेल असें वाटत नाहीं; त्यामुळें रंगबोधस्वामींच्या टीकेस पहिली ' लघुयोगवासिष्ठटीका ', मानण्यास-निदान हरिदास शांतानंदाच्या टीकेपूर्वी रंगबोधस्वामींनीं आपली टीका लिहिली असें मानण्यास—प्रत्यवाय नाहीं. उपलब्ध ' लघुयोगवासिष्ठटीकां ' त स्वामींची टीका जुनी ठरते. हें या टीकेचें महत्त्व विसरून चालणार नाहीं.

' बृहद्योगवासिष्ठा 'त[१२] उत्पत्तिप्रकरणांमधील सर्ग १०४ ते १०९ म्हणजे ६ सर्गांत ' शांबरिकोपाख्यान ' आलेलें आहे. तेथें ' शांबरिकोपोख्यान ' हें नांव दिलेलें नसून या आख्यानाला ' इन्द्रजालोपाख्यान ' असें म्हटलें आहे. मूळ कथेच्या विस्ताराची कल्पना पुढील कोष्टकावरून येईल :-

| सर्ग | सर्ग-नाम | | श्लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १०४ | इन्द्रजालोपाख्याने नृपव्यामोहः | | ४९ |
| १०५ | ,, | राजावबोधः | २८ |
| १०६ | ,, | चाण्डालीविवाहवर्णनम् | ७२ |
| १०७ | ,, | आपद्वर्णनम् | ४८ |
| १०८ | ,, | अकाण्डवर्णनम् | ३० |
| १०९ | ,, | चण्डालत्वापगमवर्णनम् | ३१ |

एकूण २५८ श्लोकांचा हा मूळ कथाभाग आहे. हीच कथा ' शांबरिकोपाख्यान ' या नावानें ' लघुयोगवासिष्ठा 'च्या ८ व्या सर्गांत फक्त ९० श्लोकांत

११. An Indian Ephemeris, by L. D. S. Pillai, Vol. VI, p.178

१२. योगवासिष्ठ, सं. वा. ल. पणशीकर, निर्णयसागर, स. १९११.

दिलेली आहे. याच संक्षिप्त कथेच्या आधारें रंगबोधस्वामींनीं ‘शांबरिकोपाख्यान’ लिहिलें आहे : खरें म्हणजे पुढें बसलेल्या श्रोत्यांना ‘ सांगितलें ’ आहे.

कथेची रूपरेषा अशी :— पूर्वी उत्तरापांडव नांवाच्या देशांत हरिश्चंद्र-कुलोत्पन्न असा लवण राजा राज्य करीत होता. त्याच्या यशोपुष्पांतील परागां-मुळें पर्वताशिखरें शुभ्र झालीं होतीं. त्याला कुटिलपणा माहीत नव्हता. उद्दामपणा तर त्यानें पाहिलाहि नव्हता. असा तो लवण राजा अेकदां सभास्थानीं सिंहासना-वर बसला असतां अेक ऐंद्रजालिक [ गारुडी ] तेथें आला व राजाला अभिवादन करून म्हणाला : “ महाराज मी अेक जादूचा खेळ करून दाखवतों. तो आपण पाहावा. ”

ऐंद्रजालिकानें आपल्या हातांतील मोरपिसांची कुंचली हवेंत फिरवितांच तेथें एक अश्वपालक एका देखण्या घोड्यासह आला. राजा त्या घोड्याकडे पाहतां पाहतांच दोन मुहूर्त ध्यानासक्त झाला. नंतर भानावर आलेल्या राजानें सभासदांनीं विचारल्यावर घडलेला वृत्तांत सांगितला. तो असा :— राजा त्या घोड्यावरून एका वनांत गेला. तेथें खूर फिरून थकल्यावर एका जांभळीच्या फांदीला तो लोंबकळून राहिला. त्याच्या खालून घोडा निसटून गेला. तेथें अन्नापाण्यावाचून, थंडींत कुडकुडत त्याला रात्र काढावी लागली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या पित्याचें जेवण नेत असलेली एक चांडाळकन्यका त्याला दिसली. त्यानें तिच्याकडे अन्नाची याचना केली. परंतु तिनें राजास पति होण्याची अट घातली. राजानें कबुली दिली. ती त्याला घरीं घेऊन आली. नंतर त्यांचा विवाह झाला. राजानें चांडाळांच्या सहवासांत बराच काळ घालविला. त्याला चार अपत्येंहि झालीं.

परंतु पुढें अनावृष्टि व दुर्भिक्ष्य यांच्यामुळें त्या चांडाळांची दुर्दशा झाली. बायकोमुलांसह लवण राजा घराबाहेर पडला. अत्यंत लाडक्या अशा लहान मुलाची भुकेमुळें झालेली अवस्था पाहून राजानें अग्निप्रवेशासाठीं चिता रचली. तिच्यांत तो उडी टाकणार इतक्यांत तो देहभानावर आला.

राजानें हा वृत्तांत सांगितला व तो बोलावयाचें थांबला. एवढ्यांत तो शांबरिक ( गारुडी ) गुप्त झाला. सभासद म्हणाले; " महाराज, हा द्रव्याची इच्छा असणारा गारुडी नव्हे. संसारस्थितीच्या बोध करणारी ही दैवी मायाशक्ति असावी. संसार हा मनोविवर्त आहे. हेंच यावरून स्पष्ट होतें. "

रंगबोधस्वामी प्रथम संस्कृत श्लोक देतात आणि त्यांतील पदाचें स्पष्टीकरण करून श्लोकार्थ सांगतात. आपल्या ' रंगबोधिनी ' ला त्यांनी ' पदच्छेदटीका ' म्हटलें होतें. प्रस्तुत टीकाहि ' पदच्छेदटीका ' च होय. परंतु ' रंगबोधिनी 'मध्यें पदच्छेदासाठीं स्वामींनीं गद्याचा आश्रय घेतला होता : येथें त्यांनीं तसें केलेलें नाहीं. सर्वत्र ओवीचाच वापर त्यांनीं केलेला आहे.

यद्यशः कुसुमोत्तंसपांडुरस्कन्धमण्डलाः ।
सर्वे शैला विराजन्ते हारा प्रोद्धूलिता इव ॥ ३–८–९ ॥

या श्लोकावरील टीका पाहा :—

उत्तरा[१३] शब्दे घननिळा । सेखर[१४] असे बोलिला ।
मस्तकिं खोविला । पुस्पसेला सोभार्थ तों ॥ ९५ ॥

तुरा मा ऐसे प्राकृति । ज्यास कांहि म्हणती ।
जो सीरि खोविति । तो रघुपति सेखरा ॥ ९६ ।

जा लवनाचें यश । संलक्षण जें कुशमोतीस ।[१५]
तेहि करून अशेशे । बहुवस श्री रामा ॥ ९७ ॥

पांडुर म्हणिजे ढवळ । आहे स्कंदमंडळ ।
ज्याचें का सर्वकाळ । ऐसे सैल[१६] सर्व ते ॥ ९८ ॥

---

१३. लेखनप्रमाद–' उत्तंस ' हवें.

१४. शेखर.

१५. कुसुमोत्तंस.

१६. शैल.

कुशमोतंशेकरून । जे परागाचें पतन ।
त्या पतनापासून । स्कंदमंडॆळ आपण शूभ[१७] होति ॥ ९९ ॥
ऐसे प्रसीद्ध आहे । या लोकामाजि पाहे ।
ऐसे प्रकारिचें पर्वत हे । कैसे स्वयें सोभति ॥ १०० ॥
प्रोधुळी तया बोलें । आत्यंत विमल केलें ।
जाणों हारच काय चांगलें । ऐसे सोभले पर्वत ॥ १०१ ॥
ज्याच्या किर्तिने । दिगंतरच अनुदिने ।
व्यापिलें सर्वगुणे । ऐसा जाणणे तात्पर्यार्थ ॥ १०२ ॥

रंगबोध स्वामींची ही टीका-पद्धति संस्कृत 'व्याख्ये'च्या जातीची आहे. 'योगवाशिष्ठा' वरील संस्कृत टीका अथवा व्याख्या स्वामींच्या हाताशीं असाव्यात; त्यांचा त्यांनीं गाढ अभ्यास केला असावा असें वाटतें. (महीधराच्या टीकेचें हस्तलिखित मला स्वामींच्या संग्रहांत आढळलें हीहि गोष्ट येथें नमूद करण्यासारखी आहे).

'वासिष्ठचंद्रिकाव्याख्ये' मधील उपरिनिर्दिष्ट श्लोकावरील टीका अशी आहे :[१८] "उत्तंसः शेखरः। यथाहुः क्षीरस्वामिनः— 'शेते शिरसि शेखरः। उत्तंसोऽपी' ति । यस्य लवणस्य यशांस्येव कुसुमोत्तंसास्तैः पाण्डुराणि शुभ्राणि स्कन्धमण्डलानि येषां ते यद्यशः कुसुमोत्तंसपाण्डुरस्कन्धमण्डलाः । प्रसिद्धं हि लोके कुसुमोत्तंसैः परागपतनात्स्कन्धमण्डलानि पाण्डुराणि भवन्तीति । प्रोद्धूलिता विमलीकृताः । दिगन्तव्याप्तकीर्तिरिति तात्पर्यार्थः ॥ ९ ॥"

स्वामींचें लक्ष भावार्थापेक्षां यथार्थाकडे अधिक असल्यानें प्रत्येक शब्दाचें स्पष्टीकरण झालें पाहिजे असें त्यांना वाटतें. असें केल्याशिवाय त्यांचें स्वतःचेंच समाधान होत नाहीं असें दिसतें.

---

१७. 'शुभ्र' हवें.

१८. लघुयोगवाशिष्ठ, पृ. २३५

स्वामी जरूर तेथें स्पष्टीकरणासाठीं विस्तारहि करतात. 'शांबरिकोपाख्या-नां'त अशींहि कांहीं स्थळें आहेत. उदाहरणार्थ,

अनेनातिविलोलेन दूरं नीतोऽस्मि वाजिना ।
भोगाभ्यासजडेनाज्ञो मुग्धः स्वमनसा यथा ॥ -३-८-३०

या श्लोकावर स्वामींनीं विस्तृत टीका केली आहे; [ ओव्या ३११ ते ३६६ ]. 'भोगाभ्यासजड' व 'मुग्ध' या पदांचें स्पष्टीकरण करतांना, स्वामी अशा विषयी माणसांचें चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें करतातः—

विशयसूख टाकुन । वैराग्य आचरोन ।
साधावें अन्य कोण । सूखगहन मुर्खि पै ॥ ३३१ ॥
विषयसूखाला तत्वता । जोडा त्रिभूवनिं धुंडितां ।
न दिसे दृष्टि पडतां । मुर्खीं त्यागता कां केलि ॥ ३३२ ॥
वौसिकसूकसागर । हाच पुरुशार्थ थोर ।
मातिच्या उदरिं तोचि नर । तो अपार विषय भोगी ॥ ३३३ ॥
जेणे विचित्र विषयसूख । भोगीलें शूकचंदनादिक ।
नुतना युवति अनेक । तोचि लोक धन्य पैं ॥ ३३४ ॥
वेचो अपार द्रव्यासी । लागे तितुकि अमुपेंसी ।
परि भोगु युवतेसी । येणे आम्हासी मान्यता ॥ ३३५ ॥
रात्रि आणिक दीवस । सेजे होउन युवतिस ।
जावों नेदि कदेस । जिवाहुन विशेष मानुनि ॥ ३३६ ॥
ते जरि महिस चाले । आग वेडविति खालें ।
प्राणे विते वेचलें । तिचेनि बोलेंकरुनि ॥ ३३७ ॥

अशा स्पष्टीकरणांत ते 'गीते'सारख्या ग्रंथाचाहि आधार घेतात. विषयी माणसांचें वर्णन केल्यावर 'जड' या पदाचा अर्थ सांगतांना ते लिहितात :—

स्त्रीसंगेकरून । काम चढे प्रबळोन ।
तेथ होता प्रतिकुळपण । खवळोन क्रोध य ॥ ३४२ ॥

क्रोध यतां अपार । नाटवेच आपपर ।
मग मोह होय अपार । न कळे विचार कांहींचि ॥ ३४३ ॥
मिं करतो यय काय । हे स्मरणच उडोन जाय ।
मग बुद्धि भ्रंश होय । जड होय तैंच तो ॥ ३४४ ॥

या ओव्यांना पुढील श्लोकांचा आधार आहे :—

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
[१९]स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥

स्वामींनीं केलेल्या विस्ताराच्या मुळाशीं कल्पनाशक्ति व निरीक्षणशक्ति आढळते. मुळांत चांडालकन्यका राजाला म्हणते,

" राजन्याचनमात्रेण मत्तो नाप्नोषि भोजनम् " ३-८-४८ ॥

परंतु, स्वामी तिच्याकडून वेगळाच युक्तिवाद वदवितात :—

तुं उत्तम भूपाळ । आम्हि आधम चांडाळ ।
आमचा स्पर्शहि केवळ । असे विटाळ तुह्मासी ॥ ५४९ ॥
आमचे होता दरशन । तुह्मा सचस्नान ।
मां आमचे हातिचे अन । तुह्मा स्वीकरण नव्हेची ॥ ५५० ॥

स्वामींच्या काळांतील अस्पृश्यतेचेंच प्रतिबिंब या ओव्यांत पडलें आहे.

चांडाळ आपल्याला कधीं एकदां मुलगी देतो असें लवण राजाला झाल्याचें मुळांत नाहीं. आणि हा माणूस आपल्या घरांत राबतो आहे तेव्हां त्याला मुलगी द्यावी असा विचार चांडाळाच्या मनांत आल्याचेंहि मुळांत नाहीं. परंतु,

आजि उदियां । देईल तनया ।
मज लग्न करूनीया । देईल म्हणूनीयां गुंतला ॥ ६८३ ॥

---

१९. श्रीमद्भगवद्गीता, अ. २ श्लो. ६२-६३.

आणि

म्हणति हा प्राणि । कष्टतो आमचा सदनिं ।
यास कन्या देउनि । ग्र्यामात करूनि ठेवावा ॥ ६८५ ॥

या ओव्या तत्कालीन व्यवहाराचा स्पर्श झालेल्या आहेत.

७० व्या श्लोकांतील ‘कलत्रचिंताहततया’ या पदावर स्वामींनीं ९ ओव्यांची टीका केलेली असून त्यांत गृहस्थाच्या चिंतांचें करुणरम्य चित्र रेखाटलें आहे :—

त्या स्त्रिपुत्रांस । पाहिजे खावयास ।
लेवया नेसावयास । उत्तमाउश बहुत पैं ॥ ७४५ ॥

किरू तें मेळवावें । जोडावया जावें ।
द्रव्याढ्या सेवावें । अर्जावें तयासी ॥ ७४६ ॥

आतां कोण मिळेल । द्रव्याढ्य आणि दयाळ ।
तेणे द्रव्य मिळेल । हे न करिता चालेल संसार कसा ॥ ७४७ ॥

कैसा द्रव्याच्या कोडि । मिळतिल फाडोवाडि ।
काय खातिल हे बापुडिं । कोण्या परवडि वांचतिल हें ॥ ७४८ ॥

कन्या जालि उपवर । ईस पाहिजे वर ।
बरवें पाहिजे वर । द्रव्य अपार जोडे तें [ सें ? ] ॥ ७४९ ॥

तैसेंच कुमारांचें येथ । वीव्हावोत्साह अद्भूत ।
करावया निमित्त । द्रव्य बहुत पाहिजे ॥ ७५० ॥

लज्ञार्थ [ ? ] संपादावा । पुढें संसारहि चालावा ।
ईतुका रुका मेळवावा । हे माहादेवा कैसे करिसी ॥ ७५१ ॥

पुढें काळवेळ कठिण । ग्रंथिसहि असावें धन ।
तें काळेंकरून । आपणालागुन ये कामा ॥ ७५२ ॥

आपत्कालि रुका । कोण देईल फुका ।
आतांच सकळिका । सविवेका सांचावे ॥ ७५३ ॥

८३ व्या श्लोकावरील टीकेंत उपाशी मुलाच्या बापाचें हृद्गत व्यक्त झालें आहे. स्वामींच्या सहृदयतेचा व अथांग सहानुभूतीचा साक्षात्कार या ओव्यांत होत आहे असें वाटतें :—

या दुर्भिक्षाखालें । खाण्या कांहि न मिळे ।
हे बालासी नकळे । भूमि लोळे आक्रंदत ॥ ८३० ॥

आतां कैसें समजाउं । यास मि काय देउं ।
यास देखोन मज बहु । दुःखे जाउं पाहे प्राण ॥ ८३१ ॥

आमचे करंट कपाळ । आम्हीं दरिद्रि केवळ ।
आमच्या पोटि हे बाळ । कां शूशीळ[20] जन्मलें ॥ ८३२ ॥

बाळे जें मागति । त्यासी कां न होति ।
आमचा पोटि श्रीपति । कां जन्मति बाळके ॥ ८३३ ॥

....दरिद्रपणाचे जीणें । त्यापरिस बरें मरणे ।
हें कोणे देखणे । अक्रंदणें लेकराचें ॥ ८३७ ॥

रंगबोधांच्या या 'लघुयोगवासिष्ठटीके'चा भाषादृष्ट्या विचार करतांना लक्षांत येणाऱ्या कांहीं गोष्टींचा केवळ निर्देश करतों. विस्तृत विवेचन करणें आवश्यक असलें तरी तें येथें शक्य नाहीं.

व्याकरणदृष्ट्या कांहीं रूपांचा विचार करतांना पुढील गोष्टी टिपण्यासारख्या वाटल्या :—

(१) क्रियापदें : होवे, होवा, पावीनलें, परियस, जाणिजस, बाभिजे-तसे, नेईजेंतसे, बोलिजति, किजेत, म्हणिजेतसे, बोलिजैल, देखि-जेत, नेदितसे, ( न ) न्हाये, विचारिजे.

(२) विभक्तिरूपें : आपला सभेलागुन; कैसा प्रकारिचा; लवण-रायाचा चिरित्रिं; आपला नयनेकरुनि.

---

२०. सुशील.

(३) भाववाचकनामें : अश्चिर्यता, तुझेत्व, ईयत्तापण, लोलुपता, श्लाव्यपण, हाहाकारता.

स्वरप्रक्रिया व व्यंजनप्रक्रिया यांचा विचार करतांना पुढील गोष्टी ध्यानांत येतात :—

अ > आ : आवघे, आघट, आर्थ, आवधारिं, आवतरोन, माहांत, आत्यंत, आवलिळा, आथवा, साहा, आकस्मात, आश्वातें, आगा, आवबोधन, आंग, आरण्यातें, डाहाळी.

आ > अ : अशंका, अख्यान, पवे.

ए > 'य' : यकवार, येक.

ओ > 'व' : वोदन, वोडवलें.

थ > त : सभास्तान.

ठ > ट : टेला, टाई, टेवा, कोटून, पाटविलें, टेवों, मोटि, जरट, उटोनि, आटवा, उटाउटि, वासिष्ट.

ढ > ड : पुडे, पुडति, वोडवलें, पडियंता.

श > स : देस, सेखर, सेला, सीरि, सैल, सोभति, सील, सावकासें, सीखर, अहर्नेसि, सेजे, जीवेस्वराच्या, परमेस्वराचि, सेत, सीदोरि, सेवटि, तेजोरासी, सोचिसि.

स > श : शोलिव, ध्यानाशक्त, शूख, श्वमनें, शूरम्य, श्नान, वशीष्ट, शुचिति.

श > ष : विषद, विषाळ, षोधुनि.

ष > श : पुरुश, निशेशे, अशेशे, शट्पद, मेशोन्मेश, पूरुशार्थ, विशयालागी, प्रकर्शेकरून, तृशा, वरशत.

ष > स : पुस्प, गोस्पद, रुसेश्वर, दुस्कृति, मिसे.

स > ष : मांष.

पुष्कळ ठिकाणीं द्वित्ताचा अभाव असल्यानें पिछिका, परिछिन, पृछा, तुछे, वित्पन, प्रसंनपण, अन, दतचित, बूधि, प्रबुध अशीं रूपें आढळतात.

आईंद्रजालिक, परियाकुल, अह्लाद अशीं कांहीं स्वरभक्तींचीं उदाहरणेंहि मिळतात. शब्दसंग्रहामध्यें, अनारिसें, विंदाण, वेधावें, कहि, मा, तां, बहुसाल, पडियंता, गुंति, असे कांहीं जुने शब्द सांपडतात. लोंबकळणें या अर्थी वळकंबणें, वोळकंबणें हीं क्रियापदें स्वामी वापरतात.

रंगबोधस्वामींच्या ' लघुयोगवासिष्ठटीके ' चें स्वरूप थोडक्यांत असें आहे. तत्वज्ञान व काव्य यांचें मनोज्ञ मिश्रण मुळांतल्याप्रमाणें टीकेंतहि आहे. या दोन अंगांचें अधिक विवेचन प्रस्तुत टीकेच्या प्रकाशन करतांना करण्याची उमेद आहे. रंगबोधस्वामींच्या चरित्राविषयीं[२१] व गुरुपरंपरेविषयीं[२२] मीं पूर्वीं लिहिलें असल्याने येथें त्या गोष्टींची चर्चा केलेली नाहीं.

---

२१. पाहा :— ' देशिकचरित्र '.

२२. मुकुंदराजांची परंपरा, महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर १९५८

# अद्वयबोधांची कविता

मराठींत लिहिलेली कितीतरी काव्यरचना अजून अंधारांत आहे. त्या काव्यांचा व कवींचा नामोल्लेखहि अर्थात् आपल्या वाङ्मयेतिहासांत आढळत नाहीं. (असें वाङ्मय शोधण्याहून नवीन वाङ्मयेतिहास लिहिण्याला आपण सध्यां बरेंच महत्व देत आहों, हें या संदर्भांत ध्यानांत घेण्यासारखें आहे.) अशा अनेक अज्ञात कवींपैकीं आणखी अेकाचा परिचय मी करून देत आहे.

या कवींचें नांव 'अद्वयबोध'. मराठी संतकवींत ही अेक नवी भर. यांच्या गुरूंचें नांव रंगबोध. मुडलगी नांवाच्या ( बेळगांव जिल्हा ) गांवांत रंगबोधांचा मठ आहे. अद्वयबोध हे या मठाच्या परंपरेंतील होत. ही परंपरा महत्वाची असली तरी तिच्यासंबंधीं मी अन्यत्र लिहिलें असल्यानें येथें तिची चर्चा करीत नाहीं. फक्त अद्वयबोधांच्या कवितेसंबंधीं कांहीं विचार मांडून त्यांचीं दोन लहान प्रकरणें देतों.

व्यक्ति म्हणून अद्वयबोधांकडे पाहिलें कीं नतमस्तक व्हावें अितकी त्यांची थोरवी आहे. 'देशिकचरित्रां' त त्यांचें चरित्र येतें. त्यावरून अद्वयबोधांचा अधिकार किती मोठा होता हें कळतें.

ते जनकाप्रमाणें विदेही होते. यवन राजानें पाठविलेल्या मांसाचीं फुलें त्यांनीं केली; मलिककंबराच्या क्षुधित सैन्याला अर्ध्या भाकरीनेंच तृप्त केलें; कृष्णराव पंडिताचें गर्वहरण केलें; असे कितीतरी चमत्कार त्यांच्या जीवनांत आढळतात. म्हणून

श्री सद्‌गुरू अद्वयबोध माझा । कृपाळु हा पुर्ण त्रैलोक्यराजा ।
शरणागता उद्धरी सत्वरेने । देतो तयाला निजात्मठाणें ॥

किंवा

अद्वयाचा महिमा कोण्ह वर्णी हो तत्वता ।
मांसाचिहि पुष्पें जाहली घडि न लगता ॥

असें त्यांच्या शिष्यप्रशिष्यांनीं म्हटलेलें आढळतें. हरिबोधानें आपल्या 'गुरूपरंपरा-स्तोत्रां'त केलेलें अद्वयबोधांचें वर्णन मुळांतून पाहण्यासारखें आहे. तो म्हणतो :—

त्यांचा* सुत शिष्य अद्वयबोध । तुटला द्वैताचा कंद ।
प्रमाणातीत सिद्ध । अनंदरूपी ॥
वेडे वेडे चार करी । महिमा न कळे अवधारी ।
अविंधें धरोनियां करी । उपाधि मांडिली ॥
घालिती बंधनामाझारी । बेडी कुलुप अवधारी ।
कवाडें लाविती करीं । कोंडिती तयासी ॥
सप्तरोज नसे अन्नपाणी । अखंड स्मरण करोनी ।
रंग श्रीरंग आठउनी । ध्यान मांडिलें ॥
तेव्हां कारागृह तुटला । कुलुपावुनि निघाला ।
अदृश्य होउनि आला । आपुल्या नगरासी ।
नमन केलें अविंधें । महिमा न कळे अगाध ।
पूर्णब्रह्म महासिद्ध । म्हणती तेव्हां ॥

या 'स्तोत्रा'वरून अद्वयबोध अनंदरूपी, बालोन्मत्त पिशाचवृत्तीचे महासिद्ध होते, असें समजतें. मृतास जीवंत केल्याचे चमत्कारहि त्यांच्या नांवावर आहेत.

---

* रंगबोधांचा

अद्वयबोध हे गृहस्थाश्रमी संत होते. त्यांच्या पत्नीचें नांव राधाबाई. पतीला साजेल अशीच ही स्त्री होती. आपले पति अद्वयबोध व त्यांचे गुरु रंगबोध यांच्याविषयीं तिच्या मनांत केवळ आदरच होता असें नव्हे तर तिला भक्तीचें रहस्य सांपडलें होतें असें तिच्या अेका पदावरून वाटतें. तें पद मुद्दाम देतों:—

मुक्तीचा तोडर । भक्तीपाईं रूळे ।
भक्ताचे सोहळ । देव भोगी ॥ १ ॥
देवा भक्ता दोघां । बुरी काही नाही ।
देव भक्तापाईं । लागतसे ॥ २ ॥
सायोज्यादी सांदी । जाहालीया बींदी ।
भक्ताचीया मांदी । दाटलीया ॥ ३ ॥
जेथं भक्त आहे । तेथं दव माये ।
विरूनीया जाये । मोकळली ॥ ४ ॥
मुक्तीहुनी भक्ती । अगळी मानली ।
गोपाळु वाहीली । दोनी खांदीं ॥ ५ ॥
आपुलं पोटीचं । घालुनीयां पोटी ।
देव भक्ताकंठी । माळ घाली ॥ ६ ॥
आले गेले सर्व । संपादुनी घरी ।
देव भक्ता करी । कुंरवडी ॥ ७ ॥
भक्तीबीणं देवा । नकळे म्हणहुनीं ।
देवच अपणं । भक्त जाला ॥ ८ ॥
अद्वये श्रीरंग । देवभक्त येक ।
केल हा वीवेक । माहादेवं ॥ ९ ॥
राधा म्हणे देव । जाला सुप्रसंनं ।
काये होय न्युन । तया ठायां ॥ १० ॥

यावरून अद्वयबोध-राधाबाईंचा संसारहि 'पद्मपत्रमिवांभसा' वृत्तीनें चालत असावा हें ध्यानीं यावें. अद्वयबोधांची व राधाबाईंची समाधि मुडलगी येथेंच मठांत आहे.

व्यक्ति म्हणून अद्वयबोध संत होते. पण याहून वाङ्मयदृष्ट्या महत्वाची गोष्ट म्हणजे ते कवि होते. त्यांची कविता बरीच असावी. (१) अद्वयशतक (२) श्रीरंगश्रीविलास व (३) कांहीं पदें अेवढीच कविता मला आज तरी उपलब्ध झाली आहे. अजूनहि कांहीं रचना अज्ञात असावी.

गुरुसंबंधींचा आदर, ब्रह्मानंदाचा अनुभव आणि भक्तिमहिमा हाच या काव्याचा विषय आहे. त्याच्या जोडीला कल्पना, अल्पाक्षरत्व हेहि गुण आहेत. तात्विक विषयावरील कविता असूनहि ती रूक्ष नाहीं.

'अद्वयशतक' हें अद्वैत-कल्पना मांडणारें प्रकरण आहे.

> जेगी जेग द्रूप । परमात्मा नादत ।
> येकला संतत । दुजा नाहीं ॥ १२ ॥
> येकीच आनेक । आनेकीच येक ।
> अपुर्व कौतुक । ज्याचं तोची ॥ १३ ॥

हें अद्वैत कवीला सांगावयाचें आहे.

गुरुचरणावर 'लोळणा' घालून कवीनें गुरूस,

> करी रंगबोधा । सौंसारा वेगळं ।
> हीत तें आपुलं । दावी मज ॥ ३० ॥

अशी प्रार्थना केल्यावर,

> अैकुनी अद्वये । पुत्राची विनवणी ।
> सत्कृपा नयेनी । अवलोकीलं ॥ ३१ ॥

आणि 'बोध प्रबोधीला'. हा बोध मुख्यतः 'तत्वमसि' या महावाक्याचा आहे. वासनाक्षय म्हणजे मुक्ति :—

> वासनानिर्मुक्ती । याच नाव मुक्ती ।
> येर सर्व भ्रांती । मायापुर ॥ ५८ ॥

किंवा

तेज तेजी मीळे । आहंता मावळे ।
समाधी सोहळे । निर्वीकल्प ॥ ८० ॥

ही 'पुर्णस्थीती' म्हणजेच भक्ति. भक्त हा

जीवन्मुक्तस्थीती । वर्ते लोकाचारी ।
परी तो अंतरी । अनासक्त ॥ ८६ ॥

असा असतो. तो आसक्त असतो तें फक्त गुरुचरणीं. अमानत्वादि लक्षणेंहि कवि येथें सांगतो. 'स्वानंद सुखाची खूण' 'अद्वयशतकां'त दिसते. 'सच्चिदानंद पदत्रयविवरण' असेंहि या प्रकरणाचें स्वरूप आहे. प्रारंभीच्या ओव्यांत काव्य-सौंदर्याचें चांगलें दर्शन घडतें.

'अद्वयशतका'वर पडलेली 'विवेकसिंधू'ची छाप विचार करण्यासारखी आहे. आडीपीडी, नातळे, भडस, मीनणें अि. शद्ब 'विवेकसिंधूं'तील पुढील ओव्यांचें स्मरण करून देतातः—

जन्हि रुइचिये झाडी । भरति गधाचिया कावडी ।
तन्हि डिंडावेयाचि **आडपाडी** । कां पडो द्यावी ॥ १–१४ ॥
श्वपचाचिये घरिंचा पाकु । जन्हि जाला अपाड रसिकु ।
तथापि सदाचार लोकु । तयासि **नातळेच** कीं ॥ १–२० ॥
तें ब्रह्मरसाची मूस । ज्ञानरत्नांची मांदुस ।
गुरूसीं स्फुरे **भडस** । उपदेशविषयीं ॥ १–६५ ॥
येवं विशयेरूपा भूतांसि । च्यारि च्यारि **मीनलीं** यकेयेकासि
॥ ३–८७ ॥

'अद्वयशतकां'तील कांहीं ओव्या व 'विवेकसिंधूं'तील ओव्या यांच्यांतील शब्द, दृष्टांत अगर विचार यांच्या साम्याचीं कांहीं उदाहरणें मीं टिपलीं आहेत :—

| 'अद्वयशतक' क्रमांक | 'विवेकसिंधु' |
|---|---|
| ८२, ८३ | हें महावाक्याचें रहस्य । जें जीवेश्वराचें **सामरस्य** ।<br>जेणें उपजे विरस । संसारसुखासी ॥ १–४३ ॥ |

| 'अद्वयशतक' क्रमांक | 'विवेकसिंधु' |
| --- | --- |
| ७६ | **आतीत अनागत वर्तमान** । जें तांपसियासि उठे प्रपंच-ज्ञान ॥ ११-४२ ॥ |
| ९५, ९६ | जो श्रीगुरूचा अनुग्रहितु । **तेणें सेवावा येकांतु** । तेथ चिंतावा गुणातीतु । परम पुरूष तो ॥ १-५० ॥ |
| ४० | द्रष्टा द्दश्ये दर्शन । हे त्रिपुटी जेथ क्षीण ........ ॥ २-७ ॥ |
| २४ | हें गुणत्रयेबंधन । जीवासि पडिलें गहन । तंववरि न चुके जन्ममरण । कल्पकोटी ॥ ६-७६ ॥ |
| ७० | जैसें **बाबुळिया** मूळ । उदकचि निर्मळ । तेथिचि गोडी हिरोनि खडुळ । तेंचि तें करीं ॥ ७-१२१ ॥ जैसें उदक **बाबुलियेतें** व्यालें । तेण्हेंचि तें कवललें । तैसें आज्ञानें आवरलें । बुझियें निजरूप ॥ १०-३२ ॥ |
| ७५ | जें जें मनें मांडीजे । तें तें सकळ सांडीजे । सांडलेया उरे जें । तेंचि जाण आपण पां ॥ १८-६४ ॥ |

यावरून 'विवेकसिंधू'शी अद्वयबोधांचा चागलाच परिचय होता असें दिसतें. अर्थात् ' शतक ' लिहितांनां तें सर्वच तत्वज्ञान सांगण्याचा हेतु नव्हता हें स्पष्ट दिसतें. ही छाप पदांवर व ' श्रीरंग श्रीविलास ' स्तोत्रावरहि कांहींशी आहे. शृंगारिक रूपकांची प्रेरणाहि कवीस

पुरुषाचेनि सुंदरा । जाली ते गुरोदरा ।
पंचवीस कुमरा । प्रसवती जाली ॥ ७-१२७ ॥

असल्या अेखाद्या ( मुकुंदराजांच्या ) ओवीवरुन मिळाली असेल. ( अर्थात् अशीं रूपकें जुन्या वाङ्मयांत पुष्कळ मिळतात. ) अद्वयबोध हे मुकुंदराजांच्या परंपरेंतील. म्हणून हें स्वाभाविकच वाटतें.

'अद्वयशतक' हें 'उपनिषदांचें निर्मथन' किंवा 'वेदशास्त्राचा मथीतार्थु' असल्यानें 'एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति', 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म', 'सर्वं खल्विदं ब्रह्म', 'पुरुष एवेदं सर्वं', किंवा 'नेह नानाऽस्ति किंचन' या वचनांचे पडसाद त्यांत आढळतात. गीतेचें अध्ययन तर त्यांत जाणवतेंच. पण मुकुंदराजांचा अद्वयबोधांवरील प्रभाव सूचक आहे. म्हणून त्याचा ऊहापोह केला.

'अद्वयशतका'च्या दोन प्रती मिळाल्या. अगदीं जुन्या कागदावर लिहिलेलीच प्रत संहितेसाठीं वापरण्या सारखी आहे. दुसरी प्रत ही अगदींच अलीकडे झालेली असली तरी तिच्यांतील पाठभेद महत्वाचे आहेत.

'**श्रीरंग श्रीविलास**' हें लहानसें 'स्तोत्र' आहे. श्रीरंग म्हणजे श्रीकृष्ण व कवीचे गुरु रंगबोधहि. अशा श्लिष्ट अर्थानें हा शद्व येथें योजिलेला आहे. या अर्थानें हें अेक 'गुरुस्तोत्र' हि आहे. पण त्यालाहि तात्विक बैठक आहे. 'श्री' हा शब्दहि द्वयर्थी वापरला आहे. 'श्री' म्हणजे लक्ष्मी. रंगबोधांच्या पत्नीचें नांवहि लक्ष्मीच. तेव्हां असा हा 'श्लिष्ट'-'विलास' आहे.

पुरुष आणि प्रकृति यांचें हें रूपकात्मक वर्णन आहे असें त्यांतील तात्विक भागाबद्दल सामान्यतः म्हणतां येअील. ही प्रकृति 'परा' आहे, तर श्रीरंग 'पुरुषोत्तम' आहे. पण याहून या प्रकरणांतील 'मधुराभक्ती'ची छटा अभ्यासण्यासारखी आहे.

श्रीवल्लभाची अतिवल्लभा हे । श्रीनायेकाची अतिनायका हे ॥
श्री लाजुनीया निजेभोग आंग । समर्प्पुनि तोषवि श्रीरंग ॥
पाठिकडुनी पसरूनी बाहे । पोटाळुनी श्रीमुख चुंबिताहे ॥
तरी श्रिये चोरूनिया श्रियेसी । श्रीरंग भोगी मन मानलीसी ॥

हे उल्लेख या दृष्टीनें विचारांत घेण्यासारखे आहे.

अद्वयबोधांचीं **पदें** बरींच आहेत. त्यांत गुरूबद्दल

श्रीरंगा जय श्रीरंगा । भवतापत्रयभंगा । परमात्मा निःसंगा ॥
सच्चित्सुखबोधा । स्वानंदकंदा । तारि अद्वयबोधा ॥........

मज लागलें तयाचें पिसें । अहं सोहं हरूनि तोची बसे ॥
हृदंबरी सहज स्वप्रकाशे । अद्वयवेशे रंगनाथु ॥ ........

असे भावोद्‌गार आहेत.

धांव रे धांव रे श्रीरंगा । पतितपावना । दीनदयाळा शंकरा ॥
बुडालों बुडालों संसारी । मोहसागरी । हात देउनि आपुला काढी बाहेरी ॥

असा धावा आहे. आणि

अद्वय विनवणी । ऐसे अैकोनि । आलि धावोनि रंगजननी ॥

गुरुकृपा लाभल्यावर झालेल्या आनंदाचें वर्णन अनेक पदांत आहे. त्यांतील कांहीं भाग देतों:—

सद्‌गुरु श्रीरंग माझा बिंबला नयनि । तेजी चंद्रसूर्यतारा गेलिया लपोनि ।
आटलें मृगजळ होतां जागरि जागणें । स्वप्निंच सुखदुःख जेविं जागत्या न बाणे ।
मायात्रिपुटि गाटि सुटलि मावळलि आहंता । सबाह्याभ्यांतरी आवघि श्रीरंगाचि सता ।

........ रंगकृपें स्वानंदु जाला । अधीष्टानि रंगलि चित्कळा ॥
माझा मज विस्मयो वाटला । बोलिं बोल गुतोनि राहिला ॥
दुःखार्णवा संसारा आटणी । तया तेजें जाहलि साजणी ॥
जिवीं जीवा जाहाले मिळणी । अद्वय हा श्रीरंगाचे चरणी ॥

'स्वानंदमंटपीं' हा ब्रह्मानंदाचा सोहळा चालला तेव्हां सकळांना 'अवतणें' आहे :—

ब्रह्मानंदाचा सोहळा । आजि सकळा । देउ सुखाचे अवतणे बाळागोपाळा ॥

हाच आनंद रूपकांतूनहि असा व्यक्त झाला आहे :—

बोधवाफा आलि स्वामिकृपाबीज साडें ।
स्वात्मफळ पीक निजसुख सुरवाडें ॥
पीक आले हाता गे काय आता चिंता ।
अद्वयरंगी सहज जगन्नाथ कृपा होता ॥

पण याहून, प्रिया-प्रियकरांचीं रूपकें बऱ्याच पदांत आढळतात. म्हणून मधुरा-भक्तीची छटा अद्वयबोधांच्या कवितेंत आहे असें म्हणावें लागतें. कांहीं उदाहरणें देतों :—

सुमन माझें रातलें रंगी । विटले पुर्ण विशय संगीं ॥
माझें मजच नवल वाटताहे । जन विजन व्यापक मीच होये ॥

यांत ही छटा फारच फिकी आहे.

....मग मि उगालि मिनालि त्यांसि रति गे । अद्वयबोधा श्रीगुरू रंग यति गे ।
....सुमनसेजें चांग भोगलेणि निज आंगि ।
तुज आळंगिता आंग हारपले आंगि ॥
मिंच प्रिया प्रिय तुंचि मिं तुझें अर्धांग ।
माझें तुझें ऐक्य तेथें विसावला योग ॥
....पदरिं धरूनि वोढिलें परते नेलें ।
हात अंबरा घातलें कांहि न बोले ॥
स्वस्थानि स्तन धरूनि मज क्षेम दिल्हे ।
सोहं प्रबोध मटमटा चुंबन केलें ॥
सुरतसंभोगी रातलें मीठी नुखले ।
सचित्सुखि सर्वदां मन मोहिलें ॥

या पंक्ति वाचून अद्वयबोधांनीं अध्यात्माला शृंगाराची जोड आपल्या पदांत दिली आहे; एवढें तरी म्हणावेंसें वाटतें.

हांडगा हा पति माझा कैसा सये गे ।
मागें पुढें आखंड उभा राहे गे ॥
ऱ्यान्हि घरचि धरूनि द्वारि राहे गे ।
उतरडिचे आवघे त्या ठावें आहे गे ॥

अशा पदांतहि ( शृंगाराप्रमाणेंच ) रुपकांद्वारा तत्वज्ञान मांडलें आहे. अशा शारीरिक वर्णनांत

नयनि नयन घालुनिया पाहिन तूतें ।

हृदयि हृदय घालोनि आळंगी मातें ॥

या अिच्छेची तृप्ति ओथंबली आहे· हा आनंद

मनासि मन मिनलें । एकचि एक येकलें

सुखासि सुख भेटलें । स्वामि जीवीं जीवन गुतलें ॥

...जीवनि जीवन मीनलें । प्रेम न माथ गगनि ॥

अशा स्वरुपाचा आहे·

अद्वयबोधांच्या पदांत नामभक्तीवर भर आहे· ते म्हणतात,

...आष्टांग योगभ्यास । करणें न लगे सोस ॥

...ऊर्ध्व समीरण उठविला । प्राण ब्रह्मांडि नेला ॥

मागुति परतोनि आणिला । नेणे नित्यसुखाला ॥

....योग मी नेणें । याग मि नेणें ॥

योगयाग कांहीं नको· नाम तेवढें हवें:—

....नामाविणें आम्हा काम सांगसील काई ।

नाइके मि दिव्य देतो आहे तुझ्या पाई ॥

....सकळ साधनसार । नामचि पैलपार ॥

....नाम योग्याचं जिव्हार । नाम नीजाचं मंदीर ॥

....नाम नाशे माहादोशे । नामाचा आम्हा विश्वास ॥

पण हें नाम कोणाचें ? अद्वयबोध हे रामाचे उपासक होते असें दिसतें· वास्तविक त्यांचे वडील व गुरु रंगबोध हे पंढरीचे वारकरी, पांडुरंगभक्त होते· पण ‘ रामकृष्ण हरि ’ हा मंत्र जपणाऱ्या भागवतांना रामाचें कसें वावडें असेल ? म्हणून

द्वैतदुःखें जाजावलो धाव वेगी रामा ।

पतीतपावन नाम तुझें तारि येउनि आम्हा ॥

अशी प्रार्थना त्यांनीं रामाला केली आहे·

रघुराज हृदई भरला । तेणें भवजलनिधि अंतरला ॥
दुःखशोक समुहि सरला । तणें समुळ श्रमहि हिरला ॥

अशी रामकृपाहि त्यांना लाभली आहे. त्यामुळें त्यांना

अनुदिन रामस्मरण करि रे ।
तामसपण हे मनातिल टाकुनि रामस्मरण करि रे ॥

असा बोध अितरांना करावासा वाटतो.

रामाअितकेंच गुरूचें नामहि त्यांना आदरणीय वाटतें.

तुझ्या नामं पावले पार । सनकादीक थोर ॥
नामाविण हा सौंसार ।वाटे दुस्तर फार ॥

असे ते गुरूला उद्देशून म्हणतात. अद्वयबोधांनीं कांहीं कन्नड पदेंहि लिहिलीं आहेत.

'अद्वयशतक' म्हणजे खरोखर 'शत मुक्तीकांची माळा' आहे. त्यांत अद्वैत तत्वज्ञानाचें सारच उतरलें आहे. 'श्रीरंग श्रीविलास' म्हणजे अद्वयबोधांचा प्रतिभाविलास आहे. श्रीरंगरंगांत मन, घन, जन आणि वन रंगवून टाकण्याचें सामर्थ्य या लहानशा प्रकरणांत आहे.

....प्रकाश दीपकळे । भेद नाहीं ॥
....निरुपम अनुभव । सुस्वाद नैवद्य ॥
....स्वानंदमंटपी । सकळासि सोहळा ॥
....तुजविण क्षण मज युगवत गमे ।
हे तुज न कळें काय रे रंगा ॥
....सैंधवाचा गोळा । सिंधुमाजि मिनला ॥
नामरुपक ळा । नुरे जेथं ॥

असें कल्पनासौंदर्य या कवितांत आढळतें. 'अनुभवाविण काहि बोलु नये' या दंडकामुळें बोललें गेलेलें सारेंच मोलाचें ठरलें आहे.

अशी ही अद्वयबोधांची कविता. त्यांच्या जन्ममृत्यूचे शक कांहीं उपलब्ध नाहींत. पण कांहीं आधार मिळतात त्यावरून स्थूलमानानें त्यांचा काळ ठरवितां येणें शक्य आहे. पुढें मागें त्यांचा नक्की काळ सांगणें शक्य होअील असें वाटतें.

अद्वयबोधांच्या कवितेंत काळाचा निर्देश कोठेंच नाहीं. 'देशिकचरित्रां'त विजापूरच्या यवन राजाशीं व मलिक कंबरशी त्यांचा संबंध आल्याच्या कथा आहेत. त्या काळ ठरविण्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत.

मलिक कंबराचा काळ (स. १५४६–१६२६) विचारांत घेतां अद्वयबोध १६ व्या शतकाच्या मध्यास होऊन गेले असावेत असें वाटतें. त्यांचे गुरु रंगबोध श. १५८१ मध्यें व पुत्र शिवबोध श. १६२८ मध्यें समाधिस्थ झाले असें म्हणण्यास आधार आहेत. यावरून अद्वयबोधांचा निर्याणकाल या दोन शकांमधील आहे; असें म्हणतां येतें. आणि तो १६ व्या शतकाचा उत्तरार्ध असावा.

विजापूरचा यवन राजा म्हणजे अिब्राहीम आदिलशहा ( स. १५८०–१६२७) हा असेल तर मलिक कंबरची व त्याची कथा कालदृष्ट्या अद्वयबोधांच्या चरित्रांत व्यवस्थित बसूं शकते. अद्वयबोध हे रामदासांचे समकालीन होते असें म्हणावयास हरकत नाहीं. कदाचित् ते समवयस्कहि असतील. रंगबोधांनींहि रामदासांची कीर्ति अैकली असावी. ते समाधिस्थ व्हावयाच्या सुमारास शिवाजीमहाराज व रामदास यांचीं नांवें ( व स्वराज्यहि ) सर्वत्र पसरावयास लागलीं होतीं. अद्वयबोधांच्या कवितेंतील रामभक्ति हा रामदासांच्या पसरत चाललेल्या कीर्तीचा पडसादहि असूं शकेल. याबाबत निर्णायक पुरावा हातीं नाहीं तोंवर १६ वें शतक हाच अद्वयबोधांचा काळ मानणें आवश्यक आहे. भाषेवरूनहि ही रचना अितकी जुनी वाटतेच.

# चंद्रात्मज रुद्र*

चंद्रात्मज रुद्र हा मराठींतील एक चांगला पण उपेक्षित कवि आहे. मराठी महाभारतासंबंधीं लिहितांना त्याचा त्याचा उल्लेख करणें अपरिहार्य व्हावें अशी कवि म्हणून त्याची थोरवी आहे.

कै. शं. श्री. देव, कै. गो. का. चांदोरकर आणि कै. ज. र. आजगांवकर या संशोधकांनीं चंद्रात्मज रुद्रासंबंधीं थोडें फार लिहून ठेवलें आहे. कै. त्र्यं. गु. काळे यांनीं त्यांच्या 'समालोचकां'त या कवीसंबंधीं एक लेख लिहिल्याचें आजगांवकर सांगत असले तरी प्रयत्न करूनहि सदर लेख हातीं आला नाहीं.

उपरिनिर्दिष्ट मंडळींचा भर विशेषतः चंद्रात्मज रुद्राच्या काव्यावर दिसतो. त्याच्यासंबंधींची अधिक माहिती यापैकीं कोणास फारशी मिळालीहि नाहीं व

---

* 'Studies in Education and Culture in honour of Shri. D. C. Pavate' या ग्रंथांतील 'A Marathi Follower of Kumara Vyasa' या माझ्या इंग्रजी लेखाचा हा विस्तृत अनुवाद आहे.

त्यांनीं तसा प्रयत्नहि केलेला दिसत नाहीं. पूर्वसूरींच्या संशोधनाचा आढावा घेत कांहीं कविचरित्रविषयक नवीन माहिती देण्याचा हा प्रयत्न आहे. त्याच्या काव्यकृतींसंबंधीहि नवीन कांहीं सांगतां येईल असें वाटतें.

कवि स्वतःचा सर्वत्र ' चंद्रात्मज ' असाच उल्लेख करतो; व न चुकतां ' व्यंकटेश ' हें गुरूचें नांव सांगतो.[१] माझ्याकडील त्याच्या कांहीं कृतींत तो अशींच नांवें देतो. ' उद्योगपर्वा 'त तो स्वतःचें नांव ' चंद्रात्मज रुद्र ' असें सांगतो.[२] यावरून, " यांसच 'रुद्र' म्हणत काय ? कां हे भिन्न आहेत ? " ही के. चांदोरकरांची शंका[३] अनाठायीं वाटते. ( यालाच ' रुद्रमुनि ' म्हट-ल्याचें मी पुढें सांगणार आहे. )

' चंद्रात्मज रुद्र ' हेंच नांव मानल्यावर अनेक प्रश्न उपस्थित होतात. नांवांतील या दोन्ही पदांचा सूक्ष्म विचार आवश्यक ठरतो. चंद्रात्मज म्हणजे चंद्रा + आत्मज कीं चंद्र + आत्मज ? कवीच्या वडिलांचें नांव ' चंद्र ' असें होतें कीं आईचें ' चंद्रा ' असें होतें ?

या प्रश्नाचें उत्तर कवीनेंच देऊन ठेवलें आहे. आपल्या आईचें नांव ' वाराणसी ' असल्याचें तो सांगतो.[४] आणि एका कन्नड कृतींत स्वतःचें नांव ' चंद्रनंदन ' असें देतो.[५] "( चंद्रात्मज रुद्र ) यांनीं ' उद्योगपर्वांत ' आपल्या पित्याचें नांव ' दुंदुभी ' दिलें आहे," हें चांदोरकरांचें विधान[६] गैरसमजावर आधारलेलें आहे.

---

१. महाराष्ट्र-कवि-चरित्र, भाग २ रा, पृ. ३८.

२. व्यंकटेश गुरुपदाचा रंक । चंद्रात्मज रुद्र नामक ॥....

३. संतकविकाव्यसूची, पृ. ३५.

४. माता वाराणसी देख । पवित्र आणि पतिव्रता ॥

५. ( प ) दरज चंद्रनंदन गोपितार्थव प्रगटिसिद कन्नडदि विनयदली.

६. संतकविकाव्यसूची, पृ. ३५.

ज्या ओवीचा[७] आधार चांदोरकर घेतात तिचा देवांनीं लावलेला अर्थच बरोबर असून असून ' चंद्र ' हें त्याच्या (कवीच्या) पित्याचें नांव हें देवांचें मत[८] मान्य होण्यासारखें आहे. कारण आनकदुंदुभि म्हणजे वासुदेव व वासुदेव ज्याचा पिता त्या कृष्णाची कृपा झाल्यानें ग्रंथारंभ करतां आला; असा या ओवीचा अर्थ कोणासहि पटण्यासारखा आहे.

चंद्र हें कवीच्या पित्याचें नांव ठरल्यावर नुसतें ' चंद्र ' असें नांव त्या काळीं रूढ होतें काय कीं ' रामचंद्र ' या नांवाचा हा संक्षेप आहे ? दुसरीहि शक्यता गृहीत धरली पाहिजे. कारण ' रामचंद्रतनय ' व ' रामचंद्रात्मज ' अशींहि कविनामें आढळतात.[९] त्यांचा ' चंद्रात्मज ' या नांवाशीं तरी निकटचा संबंध दिसतो. हा संबंध ताणावयाचाच झाला तर ' रामचंद्र ' व ' रामचंद्रप्रभु ' या कवींशीं[१०] जोडतां येणें शक्य असलें तरी इष्ट नाहीं.

' चंद्र ' हें नांव कोठें आढळतच नसतें तर ' रामचंद्र ' कडे धांव घेणें अटळ होतें. एकनाथांच्या चरित्रांत एका ' चंद्रभटा ' चा निर्देश आढळतो. एकनाथ व जनार्दनस्वामी तीर्थाटण करीत असतां ' चंद्रनामा द्विजवरा ' च्या घरीं उतरले. ' चतुःश्लोकी भागवता'वरील त्याच्या रसाळ व्याख्यानामुळें एकनाथांस सदर ग्रंथावर टीका करण्यास जनार्दनस्वामींनी आज्ञा केली. अशी

---

७. जयाचा पिता आनकदुंदुभी । म्हणोनि गर्जे वेददुंदुभी ।
त्याचा कृपानुग्रह ग्रंथारंभीं । होता आरंभी कवित्वा ॥

८. श्री रामदासी संशोधन, खं. २, पृ. २६९–७०.

९. A Discriptive Catalogue of thc Marathi Manuscripts and Books ( Saraswati Mahal ). Vol. III, pages 255, 259, 278.

१०. Ibid, pages, 252, 254, 278, 282.

कथा स्वतः एकनाथ,[११] महिपति,[१२] भावे,[१३] आजगांवकर[१४] व फाटक,[१५] यांनीं दिली आहे.

"पुढें 'चांदबोधला' या नांवानें ते (चंद्रभट) प्रसिद्धीस आले असें महीपतींनीं लिहिलें आहे...चंद्रभट तेच हे 'चांदबोधले' या गोष्टीस महीपतींच्या या लेखाशिवाय दुसरा आधार नाहीं;" असें आजगांवकरांनीं स्पष्ट लिहिलें आहे. "जनार्दनपंत आडवळणीं जाऊन ज्या चंद्रभटाकडे चतुःश्लोकी भागवत ऐकतात व एकनाथांचे लिहिण्याप्रमाणें 'स्वानंदीं उत्पलित' होतात, व पुढें ज्या चंद्रभटाची समाधि राजदरबाराच्या प्रमुख ठिकाणीं बांधतात तो कोणी साधा ब्राह्मण नसून तें चांदबोधलेच होते आणि हे शेखमहमद व एकनाथांचा शिष्य मुकुंदराज सांगतात त्याप्रमाणें जनार्दनपंतांचे गुरु होते यांत शंका नाहीं;" हें वा. सी. बेंद्रे यांचें म्हणणें[१६] विरुद्ध पुराव्यापुढें टिकणारें नाहीं. चंद्रात्मज रुद्राशीं संबंध असूं शकणाऱ्या 'चंद्र' नांवाची चर्चा करतांना याहून अधिक खोलांत न शिरणें बरें.

'चंद्राजीपंत' असें नांव श्रीधर कवीच्या वंशावळींत आढळतें.[१७] चंद्र, चंद्रभट्ट आणि चंद्रकवि हीं नांवें[१८] कर्नाटकात रूढ होतीं; हें आर्. नरसिंहाचार्यांच्या वाङ्मयेतिहासावरून स्पष्ट होतें. यांतील चंद्र व चंद्रभट्ट हे १० व्या अगर ११ व्या शतकांइतके जुने असल्यामुळें आणि १५ व्या शतकांतील चंद्रकवि

---

११. चतुःश्लोकी भागवत, ११७-१२१.

१२. भक्तलीलामृत, १४ : २३-७६.

१३. महाराष्ट्र-सारस्वत पृ. २५५-२५६.

१४. श्री एकनाथ महाराजांचें चरित्र, पृ. ३१.

१५. श्री एकनाथ वाङ्मय आणि कार्य, पृ. ७५.

१६. तुकाराम महाराज यांचे संतसांगाती, पृ. ८१.

१७. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. ५७२.

१८. History of Kannada Literature, pages, 2, 19, 22.

हा लिंगायत असल्याकारणानें चंद्रात्मज रुद्राशीं नांवापलीकडे त्यांचा कांहीं संबंध नाहीं. या साऱ्या चर्चेचा निष्कर्ष ' चंद्र ' हें नांव तत्कालीं रूढ होतें, इतकाच आहे.

' रुद्र ' हें कवीचें नांव. ' रुद्रोपंत ' हें नांव बरेंच प्रचारांत होतें. 'रुद्र' नांवाचे कवीहि आढळतात. चंद्रात्मजांस रुद्र म्हणत काय याबद्दल साशंक असणाऱ्या चांदोरकरांनीं " वर दिलेले चंद्रात्मज रुद्र ते हेच " असें एका ' रुद्रा ' बद्दल म्हटलें आहे.[१९] तंजावर येथील सरस्वती महालांत ' रुद्र ' व 'दासरुद्राजी' नांवाच्या कवींचीं पदें असल्याचें कळतें.[२०]

' उदास ' या नांवापुढें, " चंद्रात्मज, चंद्रतनय ह्यांचें नांव उदास म्हणून होतें, त्यांचे हे शिष्य कीं काय ? " अशी शंका चांदोरकरांनीं व्यक्त केली आहे.[२१] चंद्रात्मजांचें नांव 'उदास' होतें या म्हणण्याला त्यांनीं आधार दिलेला नाहीं. एका ' उदासा'चा ' श्रीसमर्थप्रतापांत ' गिरिधरांनीं उल्लेख केला आहे.[२२] 'उदास' कवीबद्दल पुन्हां चांदोरकर बुचकळ्यांत पडतात:—"श्रीसमर्थ स्वतःस उदास, उदासदास वगैरे म्हणवीत असत तेच हे काय ? " दास, उदास हीं समर्थांचीं नावें असल्याचें गिरिधरहि सांगत असले[२३] तरी येथेंहि चांदोरकरांची प्रश्नव्याकुलताच व्यक्त होते. चंद्रात्मज ( उदास ), चंद्रात्मज, आणि रुद्र हे त्यांचे तीन कवि एकच आहेत; भिन्न नाहींत.

---

१९. संतकविकाव्यसूची, पृ. ९३.

२०. A Descriptive Catalogue of the Marathi Manuscripts and Books, Vol. III, pages, 112, 174.

२१. संतकविकाव्यसूची, पृ. ११.

२२. उदास नामा प्रेमळ दास | देशांतरीं ज्याचा वास |
लोटांगणी येत दर्शनास | सप्तऋषि दुर्गींहूनि अधिष्ठानीं ||१०-४४||

२३. श्रीसमर्थप्रताप, २१–५.

चंद्रात्मज रुद्राच्या स्थळकाळावर व जीवनावर 'देशिकचरित्रां'तील एक ओवी कांहींसा प्रकाश टाकते. ग्रंथारंभीं इतरांबरोबर हा चरित्रकार चंद्रात्मज रुद्राला पण वंदन करतो.[२४] त्यावरून— (१) चंद्रात्मज रुद्र हा शिवबोधाचा चुलतभाऊ होता; (२) अगाध लीला करणारा मुनि म्हणून प्रसिद्ध होता; आणि (३) तो 'विवेकसिंधू'चें नित्य श्रवण करीत असे; इतक्या गोष्टी कळतात.

'देशिकचरित्र' हें गोकाक तालुक्यांतील मुडलगी येथें होऊन गेलेल्या 'स्वामीं'चें चरित्र आहे. त्यासंबंधीं पूर्वी मीं विस्तारानें लिहिलेंच आहे.[२५] या स्वामींशी असणारा चंद्रात्मज रुद्राचा संबंध स्पष्ट करण्यासाठीं प्रथम स्वामींची वंशावळ देतो :—

कोनेरिबोध
|
रंगबोध (१)
|
अद्वयबोध — पूर्णबोध
|
शिवबोध (१)
|
रंगबोध (२)
|
शिवबोध (२)

'शिवबोध' हें नांव वंशावळींत दोनदां येतें. म्हणून (१) व (२) असें पुढे आंकडे घालून 'रंगबोधां' प्रमाणेंच दोन शिवबोधां'तील फरक दाखविला

२४. शिवबोधाचा चुलतबंधू । चंद्रात्मज रुद्रमुनी प्रसिद्धु ।
ज्यांची लीला अगाधु । श्रवण विवेकसिंधु निरंतर ॥ १-२० ॥

२५. पाहा :—'देशिकचरित्र'.

आहे. चद्रात्मज रुद्र हे पहिल्या शिवबोधांचे चुलतभाऊ असतील काय? म्हणजे ते पूर्णबोधांचे पुत्र ठरतील.

'उद्योगपर्वा'च्या सद्गुरुस्तवनांत कवीनें वापरलेलें 'पूर्णचंद्रा' हें संबोधन शुद्ध रूपकात्मक आहे कीं तो पूर्णबोधांचा निर्देश आहे? 'बोधकला', 'बोधसुधा' हे शब्दहि असेच सूचक मानावयाचे का?

पण 'पूर्णबोध' हें त्याच्या पित्याचे व गुरूचें नांव मानणें शक्य नाहीं. कारण 'चंद्र' हें त्याच्या पित्याचें व 'व्यंकटेश' हें त्याच्या गुरूचें नांव असल्याचें निर्विवाद आहे. आणखीहि एक अडचण; पूर्णबोध व पहिले शिवबोध यांचें गोत्र भारद्वाज[२६] तर चंद्रात्मजाचें गोत्र वसिष्ठ हें[२७] आहे.

दुसऱ्या शिवबोधांचें गोत्र वसिष्ठ आहे. कारण दुसरे रंगबोध हे पहिल्या शिवबोधांचे पुत्र नसून जामात होत. या रंगबोधांचें मूळ नांव 'संगमनाथ' व गोत्र वसिष्ठ होय. गोत्राबरोबरच चंद्रात्मज रुद्राचें कुलदैवत[२८] जे 'संगमेश्वर' तेंच या दुसऱ्या रंगबोधांचें असलें पाहिजे हें 'संगमनाथ' या नांवावरून उघड होतें. हा संगमेश्वर म्हणजे श्री बसवेश्वरांचा 'कूडलसंगम' होय. आपल्या कवीनें म्हटल्याप्रमाणें हें 'स्थान पवित्र उत्तमोत्तम' असून बागलकोटपासून सुमारें पन्नास मैल दूर आहे. कवीविषयीं तेथें कांहीं माहिती मिळेल म्हणून तेथें जाऊन आलों. पण त्याबाबत निराशाच पदरीं आली.

---

२६. स्वामींचें भारद्वाज गोत्र ........ ॥ देशिकचरित्र, ५-२९

२७. वर्णामाजी अग्रवर्ण । ऋग्वेद शाखा अश्वलायन ।
वसीष्ठ कौंडिन्य मैत्रावरुण । त्रिप्रवर गोत्र वसिष्ठ ॥
—उद्योगपर्व, १२-१७७.

२८. तो कुलदेव संगमेश्वर । आदिगुरु परात्पर ।
कपिला संगमीं निरंतर । वास अनादि ज्यासीं ॥
प्रत्यक्ष भासे कैलास परम । कृष्णामलापहारीचा संगम ।
स्थान पवित्र उत्तमोत्तम । शिव सार्वभाम जे स्थळीं ॥

चंद्रात्मज हा दुसऱ्या शिवबोधांचा चुलत बंधू होता हें मान्य व्हावयास हरकत नाहीं. ‘ देशिक चरित्रां’त सांगितल्याप्रमाणें होसुरास ( मल्लिकार्जुन ) कुलकर्ण्यांकडे ‘ भीमातीराहुनी ’ कोणी आप्त आले होते. संगमनाथ ( म्हणजेच दुसरे रंगबोध ) हा त्यांचा मुलगा. पहिल्या शिवबोधांनीं त्याला त्याच्या आई-वडिलांकडून मागून घेतलें. आणि पुढें त्याला आपली मुलगी दिली.

मुडलगीच्या सध्यांच्या स्वामींकडून अशी कथा ऐकावयास मिळाली कीं, संगमनाथास मागून घेतांना त्याच्या आईस स्वामींनीं ‘अष्टपुत्रा सौभाग्यवती भव’ असा आशीर्वाद दिला आणि तो अक्षरशः खरा झाला. या अष्टपुत्रांपैकींच ‘ चंद्र ’ एक होय. या घराण्याचा वंशवृक्ष असा देतां येईल.




आज याहून अधिक माहिती उपलब्ध झालेली नाहीं. त्यामुळें चंद्रात्मज रुद्राच्या ‘ अगाध लीला ’संबंधींहि कांहीं सांगतां येत नाहीं. त्याचें ‘विवेक-सिंधू’चें श्रवण मुडलगीच्या स्वामींशीं निकटचा संबंध दाखविणारेंच आहे. कारण स्वामींची परंपरा ही मुकुंदराजांची परंपरा आहे. हें मी सिद्ध केलेच आहे.[२९] आपल्या कवीच्या निश्चित स्थळाचा बोध झाला नाहीं तरी त्याचा शोध ‘ भीमा-तीरावर ’ आज ना उद्यां लागूं शकेल. म्हणूनच गोदातीरावरील[३०] चंद्रभटाशीं

२९. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, आक्टोबर-नाव्हेंबर-डिसेंबर १९५८.

३०. गोदावरी उत्तर तीरीं । चौयोजनीं चंद्रगिरी ।
श्री जनार्दन तेथवरी । दैवयोगें फेरी स्वभावें गेलों ॥
तो अतिदीर्घ चंद्रगिरी । तळीं चंद्रावती नगरी ।
स्वयें चंद्रनाम द्विजवरीं । वस्ती त्याचे घरीं सहज घडली ॥

— ‘ चतुःश्लोकी भागवत ’.

'एकनाथ भागवतपरायण' या उक्तीमुळें कवीचा संबंध जोडावासा वाटला तर तो ' बादरायणसंबंध ' ठरेल. 'देशिकचरित्रा'च्या मंगलाचरणांत चंद्रात्मजाजवळच ' आत्यास्वामी, रंगनाथ ' आल्यानें चंद्राजीपंतांशीं त्याचा संबंध आहे कीं काय असें वाटलें तरी त्यांत फारसा अर्थ नाहीं.

देव[३१] आणि चांदोरकर[३२] यांनीं थोड्याफार फरकानें चंद्रात्मज रुद्राची पुढीलप्रमाणें गुरुपरंपरा दिली आहे:–दत्तात्रय–अद्वैतानंद–परमात्मानंद-योगेश्वरानंद –हंसानंद –अमृतानंद –ब्रह्मानंद –विमळानंद –चिदानंद –प्रसन्नानंद –रामानंद–व्यंकटेश–चंद्रात्मज.

चांदोरकर कवीच्या गुरूचें नांव 'व्यंकटनाथ' असें देतात. हे 'व्यंकटेश' किंवा 'व्यंकटनाथ' कोण व कोठले याचा कांहींचं उलगडा होत नाहीं. तंजावर येथील सरस्वती महालाच्या वर्णनात्मक ग्रंथसूचींत[३३] वेंकटेशपति, व्यंकटगिरि प्रभु, वेंकटेशगिरि आणि वेंकटेश यांच्या कृतींचे उल्लेख आढळतात. यांपैकीं कोणी कवीचा गुरु असण्याचा संभव आहे.

चंद्रात्मज रुद्राचा काळ स्थूलमानानेंच ठरवितां येणें शक्य आहे. तो मुक्तेश्वराला वंदन करतो.[३४] परंतु नंतरच्या कवींचा उल्लेख करीत नाहीं. " यावरून प्रस्तुत कवि मुक्तेश्वरांनंतर थोड्याच वर्षांनीं होऊन गेला असावा, असें वाटतें; " हा आजगांवकरांचा अभिप्राय[३५] सर्वमान्य होण्यासारखा आहे. प्रा. द. सी. पंगूंनीं मुक्तेश्वराचा काल श. १४९५–९६ ते श. १५६७–६८ असा

---

३१. श्रीरामदासी संशोधन, खं. २, पृ. २६९–७०.

३२. संतकविकाव्यसूची, पृ. ३५.

३३. Vol. III, pages, 23, 105, 135, 51, 176.

३४. मुक्तीचा ईश्वर मुक्तेश्वर । साहित्यरत्नांचें भांडारागार ॥............

३५. महाराष्ट्र-कविचरित्र, भाग २ रा, पृ. ३७.

दिला आहे.[३६] म्हणजे या कालामागें चंद्रात्मज रुद्रास नेतां येणार नाहीं. त्याचा उल्लेख करणारें 'देशिकचरित्र' श. १७०७ मधील असल्यामुळें या शकाच्या *अलीकडे त्याला ओढतां येणार नाहीं.*

याहून कालनिर्णयाचें एक साधन म्हणजे चंद्रात्मज रुद्राच्या चुलत्याचा— दुसऱ्या रंगबोधांचा-माहीत असलेला काळ. पहिले शिवबोध श. १६२८ मध्यें समाधिस्थ झाले. त्यापूर्वी संगमनाथाची भेट झाली. तेव्हां या मुलाचें वय साधारणपणें आठ वर्षांचें मानलें तर संगमनाथ ऊर्फ दुसरे रंगबोध यांचा जन्म श. १६२० च्या सुमारास झाला असें म्हणतां येईल. यानंतर आपल्या कवीच्या वडिलांचा – चंद्र यांचा – जन्म. यावरून चंद्रात्मज रुद्राचा जन्म श. १६४० च्या आसपास केव्हांतरी झाला असावा असें मानण्यांत अडचण नाहीं.

( दुसऱ्या ) शिवबोधांहून तो वयानें थोडासा लहान असावा. हे शिवबोध श. १७०१ मध्यें स्वर्गवासी झाले असें त्यांचा भाचा धुंडिराज म्हणतो.[३७] याच शकाच्या आगेमागे चंद्रात्मज रुद्राचा अंत झाला असावा. 'देशिकचरित्रा'च्या लेखनकाळीं आपला कवि हयात नसावा या तर्कास आज तरी बाधक आधार नाहीं. चंद्रात्मज रुद्र हा त्याच्याकाळीं 'मुनि' म्हणून प्रसिद्ध होता; कवि म्हणून माहीत नव्हता हेंहि ध्यानांत घेण्यासारखें आहे. तेव्हां श. १६४० ते श. १७०० हा चंद्रात्मज रुद्राचा काळ ठरवावासा वाटतो.

चादोरकरांनीं श. १६००–१६५० च्या सुमारास हा कवि झाल्याचें म्हटलें आहे. म्हणजे ज्या शतकाच्या प्रथमार्धांत हा कवि होऊन गेला असें

---

३६. प्राचीन मराठी कविपंचक, पृ. २३. मला हा कालनिर्णय मान्य नाहीं. कारण मुक्तेश्वरांचा जन्म श. १५३१ मध्यें झाला असें माझेंहि मत आहे. परंतु येथें या वादास जागा राहूं नये म्हणून कै. पंगूंच्या मताप्रमाणें काल दिला आहे.

३७. विकारी नाम संवत्सरीं । चैत्र वद्य सप्तमी सौम्यवारीं ।
आली असतां कन्यागती । कृष्णा वेणीसी भागीरथी ॥

त्यांना वाटतें, त्या शतकाच्या उत्तरार्धांत या कवीस मी नेऊन ठेवतों. त्यांनीच या कवीच्या 'गोकर्णमाहात्म्या'चा लेखन शक १६८७ दिला आहे व हाच शक श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरांतील 'उद्योगपर्वा'च्या प्रतीचा असल्याचें देव लिहितात. या प्रती कवीच्या हातच्या—किमान त्याच्या काळच्या—असाव्यात असें मला वाटतें.[३८]

महाभारत लिहिणारा कवि म्हणूनच चंद्रात्मज रुद्र अनेकांना माहीत आहे. चांदोरकर 'गोकर्णमाहात्म्य' व 'महाभारत' हे ग्रंथ त्याच्या नांवापुढें देतात. 'महाभारत' म्हणजे संपूर्ण कीं कांहीं पर्वें याचा खुलासा ते करीत नाहीत. "यांनीं आपल्या उद्योगपर्वांत मुक्तेश्वरांस नमन केलें आहे"; ही त्यांची माहिती या 'महाभारतां'त 'उद्योगपर्व' तरी असल्याची खात्री पटविणारी आहे.

या कवीनें 'उद्योगपर्व' तेवढें लिहिलें असा कित्येक विद्वानांचा समज आहे. "कानडी ग्रंथावरून मराठींत उद्योगपर्व रचणारा चंद्रात्मज रुद्र ( १६०४ );" असें भावे लिहितात.[३९] "चंद्रात्मज रुद्र यानें उद्योगपर्व रचिलें आहे;" असें डॉ. नांदापूरकर म्हणतात.[४०] वा. दा. ओकांनाहि चंद्रात्मजाचें १७ अध्याय व १७५० ग्रंथसंख्या असलेलें 'उद्योगपर्व'च माहीत होतें.[४१] काळ्यांनीं पाठवून दिल्यामुळें आजगावकरांना या कवीचें 'भीष्मपर्व' पाहतां आलें. "यावरून कवीनें संबंध महाभारतावर मराठी कविता केली आहे कीं, एकदोन

---

३८. श. १६८७ हा या ग्रंथांच्या रचनेचाच काळ असला पाहिजे. प्रत्यक्ष ग्रंथ पाहिल्याखेरीज निश्चित मत देणें कठीण आहे.

३९. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. ५०४. भावे श. १६०४ हा काळ कोणत्या आधारावर देतात हें स्पष्ट होत नाहीं. अर्थात् हा काळ मला मान्य नाहीं.

४०. मराठी महाभारतांचें स्वातंत्र्य, पृ. २.

४१. मोरोपंतकृत महाभारत, उद्योगपर्व, पृ. ३३३.

पर्वेंच उतरलीं आहेत, याचाहि निर्णय करितां येणें शक्य नाहीं; " या आजगांवकरांच्या मताशीं[४२] मी सहमत आहे.

"मुक्तेश्वरी भारत पूर्ण करण्याची खटपट" करणाऱ्या कवींत डॉ. तुळपुळे[४३] चंद्रात्मज रुद्राचा समावेश करतात. तर 'मुक्तेश्वरी कवितेसारखी कविता करण्याचें ध्येय' चंद्रात्मज रुद्रानेंहि डोळ्यापुढें ठेवल्याचा समज आजगांवकरांनीं करून घेतला आहे. "'चंद्रात्मज कवीच्या कवितेचा थाट मुक्तेश्वरी झोंकाचा दिसतो"; हें या समजाच्या मुळाशीं कारण आहे. पण हा समज बरोबर नाहीं.

मुक्तेश्वरास 'साहित्यरत्नांचें भांडारागार' असें आपला कवि म्हणतो. त्या अर्थीं मुक्तेश्वराबद्दल त्याच्या मनांत आदरभाव वसत होता हें कबूल केलें पाहिजे. पण त्याचें स्फूर्तिस्थान वेगळें होतें. मुक्तेश्वर किंवा कोणताहि संस्कृत कवि त्याच्या डोळ्यांपुढें आदर्श म्हणून नव्हता. "आपणास संस्कृतचा अभ्यास नाहीं, कर्नाटककवि कुमारव्यासांच्या आधारें आपण ग्रंथ लिहीत आहों;" असें चंद्रात्मजानें प्रारंभींच सांगितलें आहे.[४४] या निवेदनाची दखल घेतली असेल तर ती भाव्यांनीं. आजगांवकरांनीं ही ओवी उद्धृत करूनहि या कवीचें वेगळेंपण मान्य केलें नाहीं.

चंद्रात्मज रुद्रानें मुक्तेश्वराचें अनुकरण केलें असें म्हणण्यापूर्वी मुक्तेश्वरावर कोणाचा परिणाम झाला असावा याचा विचार केला पाहिजे. मुक्तेश्वराच्या 'सभापर्वा'तील काहीं ओव्यांचें कुमारव्यासाच्या 'उद्योगपर्वा'तील एका उताऱ्याशीं शं. बा. जोशी[४५] यांनीं दाखविलेलें साम्य चिंतनीय आहे. कुमारव्यास

---

४२. महाराष्ट्र-कविचरित्र, भाग २ रा, पृ. ३६.

४३. महाराष्ट्र-सारस्वत, पुरवणी, पृ. १०४३ ( येथें 'चंद्रात्मज, रुद्र,' या कवीच्या नांवांत स्वल्पविरामानें अनर्थकारक कामगिरी केली आहे ! )

४४. मज संस्कृति नाहीं अभ्यास । कर्नाटक कवि कुमार व्यास ।
त्याचेनि आधारें ग्रंथविलास । प्रारंभिला हा हेतु ॥

४५. मऱ्हाटी संस्कृति : कांहीं समस्या, पृ. १०४.

आणि मुक्तेश्वर यांचा तुलनात्मक अभ्यास झाल्याखेरीज एखादा निष्कर्ष काढणें घाईचें ठरेल. मुक्तेश्वरास कन्नड चांगलें येत असावें अशी माझी समजूत आहे. एकनाथांना तरी येत होतें असें मानावयास त्यांच्या नांवावर असलेल्या कांहीं कन्नड कृतींचा आधार आहे.[४६] चंद्रात्मज रुद्र व मुक्तेश्वर यांच्यांतील साम्याचें हें एक संभाव्य कारण नजरेआड करून चालणार नाहीं.

कवीचें ' उद्योगपर्व ' धुळ्याच्या श्री समर्थ वाग्देवता मंदिरांत आहे.[४७] ' भीष्मपर्व ' आजगांवकरांच्या संग्रहीं असावें असें वाटतें. चौकशी करूनहि निश्चित कांहीं कळलें नाहीं. धुळ्याच्या संग्रहांतच ' चंद्रावळी ' नांवाचें त्याचें १०३ श्लोकांचें प्रकरण आहे.[४८] चांदोरकरांनीं ' गोकर्णमाहात्म्य ' नांवाचा ग्रंथ चंद्रात्मजाच्या नांवावर दिल्याचा उल्लेख वर अलाच आहे. 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या सूचींत चंद्रात्मजकृत ' श्रीखंड्याचें चरित्र ' असें नांव दिलें गेलें आहे.[४९] परंतु भावे[५०] मात्र लिहितात :—" ' श्रीखंड्याचें चरित्र ' वगैरे आख्यानें गाणारा प्रभुनंदन (१६३३) " ........हा ' मुद्राराक्षसा'चा प्रताप असणेंहि शक्य आहे !

चंद्रात्मज रुद्राचीं कांहीं पदेंहि मला मुडलगी येथें उपलब्ध झालीं असून वानगीदाखल त्यांतील दोन देतों. विषय तात्त्विक असला तरी शैली पाहाण्या-सारखी आहे.

पद १

आहे आहे आहे सर्वाभुती पाहे स्वात्मरूप सखया
त्याहुनि जाण दुज नसे त्रीजगी हेंचि वोप सखया ||

---

४६. या विषयासंबंधीं मी थोडेंसें विवेचन केलें आहे. ('विवेक चिंतामणि' प्रस्तावना, पृ. ८६–८७.)

४७. बाडांक ११७८.

४८. बाडांक १२०१.

४९. महाराष्ट्र–सारस्वत, पुरवणीसह, पृ. १०९६.

५०. उपर्युक्त, पृ. ५०४.

१५५६ चंद्रात्मज रुद्र

ब्रह्म क्षेत्रि वैस्य शुद्रादी करूनि नाना याती सखया
सान थोर बहुरंग जोती मोती तोय स्वांती सखया
तंतु पटी घटी मृतीका हाटक बहुधाकृती सखया
यापरि स्थावर जंगम सचिदानंदमूर्ती सखया ॥ १ ॥
ना कळे जरी ऐस तुज गुरुवरा शरण जाई सखया
उंच निच शेवा न म्हणतां मदभावे फार काही सखया
करूनि लीनपण श्रीदेशिक कृपा लाहि सखया
सांप्रदायक्रम बोधसुधारस आमर होयी सखया ॥ २ ॥
सहजीं सहजि मग ब्रह्म सदोदीत तुचि होसी सखया
विश्वाकार मीची प्रती ती तुजलागी होय ऐशी सखया
बुद्बुद फेन तरंग सकळ येक अंबुरासि सखया
चंद्रसुत म्हणे सद्गुरु व्यंकटधिशेवेसि सखया ॥ ३ ॥

## पद २

भवांबुधितारक गुरुवर हो । भासत दुस्तर हो ॥ धृ ॥
ममता व ( र्ति ) मोहजल ( जे ) । खोल भयंकर हो ॥ १ ॥
मीपण लाटा कामादिक जे । जाचिती जळचर हो ॥ २ ॥
चंद्रात्मज प्रभू व्यंकटराजे । पार करि पर हो ॥ ३ ॥

याखेरीज त्याच्या ' दत्ताष्टका'चे शेवटचे तीन श्लोक मला मिळाले आहेत. वरील दोन पदांत त्यानें स्वतःचा उल्लेख ' चंद्रसुत ' व चंद्रात्मज प्रभू ' असा केला आहे तर ' दत्ताष्टकांत ' तो स्वतःचें नांव ' चंद्रात्मजु ' असें देतो.[५१]

चंद्रात्मज रुद्रानें मराठीप्रमाणें कन्नडमध्येंहि रचना केली आहे, ही गोष्ट सांगण्यासारखी आहे. मराठी व कन्नड या दोन्ही भाषांत सारख्याच प्रभुत्वानें

५१. ....तद्रुपगुरु व्यंकटेश चरणांभोजी मीलिंदाकृति ।
झुंकारि ईति अष्टभाव सरिसी चंद्रात्मजु सांप्रती ॥

काव्यलेखन करणारे कवि थोडे नाहींत. आपला कवि त्यांचा अग्रणी शोभावा इतक्या योग्यतेचा आहे.

मला त्याचीं दोनच त्रुटित ( कन्नड ) प्रकरणें मिळालीं. प्रकरणांचीं कांहीं पानें मिळालीं असें म्हणणें अधिक बरोबर दिसेल. दोन्हीहि संस्कृत कृतीं-वरील टीका आहेत. एक 'मनीषापंचका'वरील. ही टीका म्हणजे ६ श्लोकांचें प्रकरण दिसतें. त्याच्या शेवटच्या ओळी[५२] तेवढ्या मिळाल्या.

दुसरी टीका 'महिम्नस्तोत्रा'वरली आहे. प्रारंभीं :-"श्रीगणेशाय नमः श्री शारदा गुरु प्रसंनानंदवरदो भव ॥ महिम्न सटीक । लेखन प्रारंभ ॥ भामिनी-षट्पदी छंद ॥" असा गद्य मजकूर आहे. नंतर कवि गणपति, शारदा, गुरु, संगमेश्वर व सज्जन यांना नमन करून टीकेस सुरुवात करतो.[५३]

टीकेच्या शेवटीं, गूढ असलेल्या या स्तोत्राचा अर्थ आपण यथामति स्पष्ट करीत असल्याचें सांगून तो गुरूच्या व आपल्या नांवाचा उल्लेख करतो.[५४] मुडलगी मठांतच मला 'उद्बोधप्राज्ञ' नांवाचा भामिनीषट्पदी छंदांतील कन्नड ग्रंथ मिळाला. ग्रंथाचा विषय वेदांत आहे. त्यांत कवीचें नांव कोठेंच आढळत नसलें तरी चंद्रात्मज रुद्राचें कन्नडवरील प्रभुत्व, वेदांताविषयीं लिहिण्याचा अधिकार आणि भामिनीषट्पदीवरील प्रीति पाहता हा ग्रंथहि त्याचाच ठरण्याचा संभव आहे.

---

५२. (प) दरज चंद्रनंदन गोपितार्थव प्रगटिसिद कन्नडदि विनयदली ॥ ६ ॥
इति श्री मनिषापंचकसहटिका संपूर्ण श्रीगुरुनाथार्पणमस्तु ॥

५३. वंदनेय माडुवेनु गणपगे । छंद दिंदलि शारदंबिगे ।
कुंदनोडदे ( ....? .... ) नंदगुरुपदके । इंदुधर शिवसंगमेश्वर ।
निंदसले दयपडदु ऐक्यद मंदिरद लेप्पवरु सज्जनरिगे नमिसुवेनु ॥ १ ॥

५४. गूढविदु अर्थदि यथामति । गूंडिदलि कन्नडिसि स्तोत्रव ।
रूढिसिदे भामिनिय गतियलि षट्पदंगळनु ॥
रूढियोळ् गुरु व्यंकटेशनु । गाड चंद्रात्मजन हृदयदि ।
मूडिनुडिसिदनेंदु बिन्नविसिदनु विनयदली ॥ ३९ ॥

मला उपलब्ध झालेली ही सर्व कन्नड रचना देवनागरी लिपींत आहे; हेंहि सांगण्यासारखें आहे.

चंद्रात्मज रुद्राच्या समग्र काव्याचें[५५] संकलन व संपादन करून तें प्रकाशांत आणतांना त्याच्या काव्याचा सांगोपांग अभ्यास मांडतां येईल. तोंपर्यंत आधींच मर्यादा घालून घेतल्याप्रमाणें त्याच्या चरित्रासंबंधीं व कृतीसंबंधीं नवीन कांहीं सांगण्याकडेच लक्ष दिलें आहे.

---

५५. समग्र काव्य मिळविणें जवळजवळ अशक्यच आहे. उदाहरणार्थ, चंद्रात्मज रुद्राचीं कांहीं प्रकरणें कोंकणांत एका गृहस्थास मिळालीं असल्याचा उल्लेख आजगांवकरांनीं केला आहे. हा उल्लेख १९१३ मधील. कोंकणांतील त्या गृहस्थास कोठें शोधावें बरें ?

# ‘ श्रीम रित्र ’ : ऐतिहासिक अंग

गुर्लहोसूर येथें चिदंबर दीक्षित हे मोठे अवतारी पुरुष होऊन गेले. त्यांचीं चार चरित्रें आज उपलब्ध आहेत. त्यांतील तीन मराठी व एक संस्कृत. पहिल्या चरित्राचा परिचय करून देणें हा या लेखाचा मुख्य हेतु असला तरी त्याचें महत्व सांगण्याच्या दृष्टीनें बाकीच्यांचा ओझरता परिचय करून द्यावासा वाटतो.

पहिलें चरित्र हें कालानुक्रमेंहि पहिलेंच आहे हें प्रथम सांगून दुसऱ्याकडे वळतों. तें स्वामींचे परम भक्त राजाराम यांनीं अभंगांच्या रूपानें लिहिलें आहे. हे अभंग मला पाहावयास मिळाले असले तरी सर्वच काळजीपूर्वक वाचतां आलेले नाहींत. म्हणून राजारामकृत चिदंबर-चरित्राची फक्त उल्लेखापुरतीच दखल घेतों.

आज ज्या चारित्राबद्दल मी लिहीत आहे, त्याचा कवि आणि राजाराम हे दोघेहि स्वामींचे समकालीन होते. एवढेंच नव्हे तर अंतेवासी होते. असें असूनहि राजारामकृत चरित्र हें कालानुक्रमें दुसरें कां ठरतें तें स्पष्ट करतों.

राजाराम हा स्वामींकडे श. १७२७ त श्रावण वद्य चतुर्दशीस आला व त्याच्या कवित्वाचा प्रारंभ श. १७३४ त पौष वद्य त्रयोदशीस झाला; असें स्वतः

राजारामानेंच सांगितलें आहे.[१] यावरून (व पुढें असलेल्या कवि-चरित्रावरून) राजारामकृत चरित्र दुसरें ठरतें.

तिसरें चरित्र हें संस्कृतमधील. त्याचें नांव 'चिदंबरमाहात्म्य'. त्याचा कवि रामचंद्र नांवाचा, भोज देशपांड्यांचा पुत्र, विश्वामित्र गोत्री, व मार्कंडेयीच्या तीरावर राहणारा आहे. चिदंबरांनीं स्वप्नांत आदेश दिला व त्यांच्या बदर्याश्रमांत राहणाऱ्या नातावानें–मार्तंड दीक्षितांनीं–आज्ञाकेली म्हणून कवीनें ही ग्रंथरचना केली.[२]

कै. आजगांवकरांनीं 'रामचंद्र भोजराव देशपांडे' या नांवाखालीं माहिती दिली आहे ती यांचीच.[३] यांचा जन्म श. १६९९ मध्यें व मृत्यु श. १७७८ मध्यें झाला. त्यांच्या संस्कृत व मराठी ग्रंथांची यादी आजगांवकरांनीं दिली असून त्यांत 'चिदंबरमाहात्म्य' नाहीं. त्यांनीं मुरगोडास जाऊन स्वामींचें दर्शन घेतलें व त्यांच्यावर एक संस्कृत आरती व एक स्तोत्र रचल्याचें आजगांवकर सांगतात.

चवथें चरित्र हें पुन्हां मराठी. हें आठ वर्षांपूर्वी प्रसिद्धहि झालें आहे. कर्त्याचें नांव सांबदीक्षित (स. १८५२–१९०८). हे स्वामींचे पणतू.

---

१. शके ते सत्रासे सत्तावीस साली । दुष्काळ पडीली उज्याडी ते ॥....
शके सत्रासे चौतीस । नाम साजे अंगीरस ॥ ........

२. चिदंबरस्य पौत्रेण श्रीशंकरसुतेन च ।
मार्तंडदीक्षितेन बदर्याश्रमवासिना ॥
विदुषान्यायमीमांसापारगेण सुसाधुना ।
अधीताध्यात्मशास्त्रेण कृपयाज्ञापितोऽम्यहं ॥
भोजपुत्रो देशपांड्ये मार्कंडेयी तटे वसन् ।
विश्वामित्रकुलेजातः पद्मतीर्थे सुपावने ॥
स्वप्ने चिदंबरादिष्टस्तथा वै शंकरेण च ।
रामचंद्र इति ख्यातो अशास्त्रज्ञातिमूढधीः ॥

३. 'महाराष्ट्र-कविचरित्र', पृ. २१२–२२४.

( चिदंबरस्वामी–काशीनाथ–ललिता–सांबदीक्षित· ) यांच्या वडिलांचें नांव राम व आजोबांचें विश्वेश्वर दीक्षित· ही माहिती स्वतः सांबदीक्षितांनीं दिली आहे·[४] त्यांनीं स्वामींचें संस्कृत चरित्र व 'लोकापुरमाहात्म्य' हे ग्रंथहि लिहिल्याचें कळतें·

याखेरीज शिवशास्त्र्यांनींहि ( स्वामींचें समकालीन ) संस्कृत चरित्र लिहिल्याचे उल्लेख असले तरी तें उपलब्ध नाहीं· कांहीं स्तोत्रें मात्र मिळतात· अशी ही चिदंबर–चरित्रांची पार्श्वभूमि· आणि एक गोष्ट सांगावयास हवी : राजारामाचें नांवहि ( पहिल्यांत व ) 'चिदंबरमाहात्म्यांत' नाहीं· या संस्कृत चरित्राचा कवि पहिल्या चरित्रकाराचेंहि नांव घेत नाहीं ! आणि सांब दीक्षित हीं नावें घेऊन 'चिदंबरमाहात्म्या'चा उल्लेख करीत नाहींत· ( ते बऱ्याच कथा या संस्कृत कृतीवरून मात्र घेतांना दिसतात ! ) असें कां व्हावें याचा उलगडा पुढील कांहीं पानांत आढळण्यासारखा आहे·

पहिल्या चरित्राचें नांव 'श्रीमच्चरित्र'· 'श्रीचिदंबर-चरित्र' असें नांव न देतां हेंच नांव आपण कां निवडलें तें कवि विस्तारानें सांगतो· सर्व शब्दांत 'श्री' हा शब्द श्रेष्ठ आहे; लक्ष्मी, शोभा, ज्ञान यश इत्यादींचा वाचक आहे; आणि स्वामींचें 'श्री' हें नांव प्रचारांत आहे : असें कवीचें स्पष्टीकरण आहे·[५]

आपल्या ग्रंथाला कवि 'ब्रह्मगिरी', 'जान्हवी', अशींहि नांवें देतो· तीं आत्मप्रौढीहून सार्थच वाटावींत· कारण ग्रंथाचा विस्तार विचारांत घेतां त्यांची यथार्थता पटते· ग्रंथात एकूण ४ पाद आहेत· पहिल्यांत २७, दुसऱ्यांत ४९, तिसऱ्यांत ४४ व चवथ्यांत १९ अध्याय आहेत· शेवटीं निर्याणकथेचे ३ अध्याय वेगळे आहेत· एवढा विस्तार व्हावयाचें जें कारण–विद्वत्ता–तें

४· 'श्रीचिदंबरचरित्र', अ· १ ओ· २७–३०·

५· श्री शब्द हा मुख्य होय सर्व शब्दांत श्रेष्ठ ही ॥
लक्ष्मीशोभा ज्ञान यशश्री सुवाचक शब्द हे ।
वर्तती जनि ही रूढी श्री चिदंबरस्वामितें ॥

काविविषयक विचारांत येणार असल्यानें बाजूस ठेवून पाल्हाळास जबाबदार धरलें पाहिजे. आणि ' गाथा सर्व कथा त्यजी निजकथा अर्थी वदे तत्वता ' ही श्रोत्यांची विनंति कवीनें मनावर घेतलेली नाहीं, हें मान्य केलें पाहिजे. स्वामींच्या सान्निध्यांत राहून, त्यांना दाखवून लिहिलेलें[६] हें स्वामींचें पहिलें चरित्र अनेक दृष्ट्या महत्वाचें आहे. तत्पूर्वी कवीविषयीं थोडा विचार करणें आवश्यक आहे.

' श्रीमच्चरित्रा 'च्या कवीचें नांव सखाराम त्र्यंबक गर्दे. नाना या नांवानेंहि ते ओळखले जात. कवीनें स्वतःबद्दल दिलेली माहिती अशीः— आडनांव गर्दे, धामापूरचा सोमेश्वर हा वंशदेव, जेजुरीचा खंडोबा हें कुलदैवत, गुहागरची दुर्गा ही कुलस्वामिनी, गोत्र जमदग्नि, शाखा शाकल.[७] कवि आपली वंशावळ अशी देतोः— केशव ( मनिकर्णिका ) — कृष्णदेव ( रुक्मिणी ) — त्र्यंबक ( आनंदी ) — सखाराम. कवीची आई आनंदी ही कोणा ' मयूरपंडीत काश्यपगोत्री ' याची सुपुत्री.[८]

कवीचा जन्म केव्हां व कोठें झाला याची माहिती मिळत नाहीं. कवि ' कुटुंबसह ' वेणुग्रामीं ( म्हणजे बेळगांवास ) कारागृहांत असल्याचें सांगतो.

---

६. ग्रंथि या कुठे केधवां तरी । येक दुसरी श्लोक हो जरी ।
स्वामि ऐकती लेख पाहती । अध्यया यया पूर्ण देखती ॥

७. श्रीदुर्गा त्रिपुरांबिका परशिवा अस्मत्कुलस्वामिणी ।
जीचे स्थानभुमी गुहागरि वसे सिंधूतिरी कोंकणी ॥
श्रीसोमेश्वर जो परेश भगवन् आराध्य धामापुरी ।
श्री मेलार महा अराध्य अधुना मल्लारि जो जेजुरी ॥

८. प्रपितामहा केशव । पितामहा कृष्णदेव । त्र्यंबकस्वयमेव । पिता होय ॥
मनिकर्णिका केशवजाया । रुक्मिणी होय कृष्णभार्या ।
आनंदी त्र्यंबकस्त्रिया । जननी माझी ॥
मयूरपंडीत काश्यपगोत्री । आनंदी होय तयास पुत्री ।
सदाचार पवित्री । वांदिजे ऐसी ॥

सांब दीक्षित मात्र कवीस ' सांगली'च्या तुरुंगांत ठेवतात. नारायण यतींनीं त्याची मुक्तता ( चिदंबरस्वामींच्या आदेशावरून ) केली.[९]

कारागृहांत असतांनाच दृष्टांत झाल्यावरून कवीनें दोन अध्याय लिहिले. या अध्यायांचा रचनाकाळ कवीनेंच श. १७२१ चा माघ महिना असा दिला आहे.[१०] तुरुंगांत चरित्र लिहायला ' ना कागद, ना लेखणी ' अशी अवस्था. ' तेव्हां गोमयि नीर ते मिळवुनी ' चरित्र लिहावें लागलें. सुटका झाल्यावरहि चार दिवस अधिक तुरुंगांत राहून कवीस हें सर्व उतरून घ्यावें लागलें !

कवि तुरुंगांत कां पडला, ' कुटुंबसह ' म्हणजे तो विवाहित होता काय, हे प्रश्न आज तरी अनुत्तरित राहतात. मुक्तता झाल्यावर तो स्वामींच्याकडे आला व हयातभर तेथेंच राहिला असें दिसतें. बहुतेक सर्व चरित्र त्यानें स्वामींच्या सान्निध्यांतच लिहून काढलें. कांहीं अध्यायांअखेर त्यानें दिलेले रचनाशक पाहण्यासारखे आहेत :—

| पाद | अध्याय | शक | संवत्सर |
|---|---|---|---|
| १ | ४ | १७२२ | रौद्र.[११] |

९. ' सखाराम ' या नांवानें रचलेल्या अभंगांत कवि म्हणतो —
मल्लारिवचनी तात माझा चाले । चिदंबर बाळवयें तेव्हां ॥
तयाच्या चरणीं अस्मत्पिता देख । नाम तो त्र्यंबक लीन होय ॥
यावरून गर्दे कुटुंबहि मुगोंडासच असावें असें वाटतें. नारायण यतींचा उल्लेख करूनहि आपल्या कारावासाबद्दल येथें कवि कांहींच लिहीत नाहीं.

१०. सत्राशावरि येकवीस तधि तो सिद्धार्थि नामाद्ब हा ।
.... शालीवाहन नाम माघ महिना अध्या ( य ) समाप्ती करी ।

११. नूनद्विसहस्रा लिशताद्बसंख्या । येती वरी बाविस त्यास संख्या ।
शालीवहान शक राजभद्री । चरितार्थ जालें तधिं अद्ब रौद्रीं ॥

| पाद | अध्याय | शक | संवत्सर |
|---|---|---|---|
| १ | ७ | १७२३ | दुर्मति.[१२] |
| २ | ३८ | १७२९ | प्रभव.[१३] |
| ३ | ४ | १७३१-३२ | शुक्ल, प्रमोद.[१४] |
| ३ | २२ | १७३८ | धाता.[१५] |
| ३ | २९ | १७३९ | ईश्वर.[१६] |

यांपैकीं तिसऱ्या पादांतील २२ व्या अध्यायाखालच्या उल्लेखावरून हा भाग स्वामींच्या निर्याणानंतर ( श. १७३७ ) ‘ म्हैसाळ ’ येथें लिहिला गेला

---

१२. सत्राशावरि वीस हा क्रम बरा तीनागळी शोभला ।
वर्षाची अभिधा खुणेस समजा दुर्मत्य नामाथिला ॥

१३. स्वस्ती श्रीनृप शालिवाहन शका संख्याहि सत्तोशते ।
एकोन् त्रिंशति अंक तो प्रभव हे अद्वा असें नाम तें ॥

१४. सत्ताशावरि येकतास अणखी बत्तीस या हो शकीं ।
शुक्लाद्वा धरूनी प्रमोद अवधी जाली कथा ईतुकी ॥

१५. शाखा शाकल जा असी उपभिदा गर्दे असे बालती ।
कृष्णातीरि असेच वस्ति कविची म्हैसाळि या प्रस्तुती ॥
माघी कृष्ण चतुर्दशी शिवदिनी धाताभिदा वत्सरीं ।
जालें मंगलसार गुर्विचरिता श्रोते अणा अंतरी ॥

धाता संवत्सर श. १७३८ मध्यें आहे. माघ वद्य १४ ला सोमवार मात्र येत नाहीं. शनिवार येतो.

१६. अमर कल्याणपुरी | हेच मुर्गोड भूवरी |
ईश्वर नाम संवत्सरी । ग्रंथ श्रीपदी मंगल हा ॥
अंकत्रीमुनिइंदु या शकि विभूशालीवहानाख्य हे ।
श्रीमद्रामजयंति वार गुरुचा नक्षत्र तै पुण्य हे ॥

असें स्पष्ट होतें. स्वामींच्या निर्याणानंतर कवि ब्रह्मानंदांकडे गेला. त्यांनीं 'गुरुचरित्र' गाण्यास सांगितलें. 'श्रीमद्दत्तचि हा चिदंबर असें जाणे मनीं पूर्ण रे' हे उद्गार सांत्वनपरहि असतील.

चवथ्या पादाचा सर्व भाग श. १७३९ चैत्रानंतरचा आहे. तो केव्हां संपला याचा निर्देश आढळत नाहीं. मला मिळालेली प्रत केव्हां पूर्ण (?) झाली, ती कवीच्या हातची कीं अन्य कुणाची याचाहि बोध होत नाहीं. प्रतींत खाडाखोड, अक्षरांचे बदल बरेच आहेत.

श्रीमच्चरित्र' हें जवळ जवळ दोन तपांच्या 'लेखनकामाठी'चें फळ आहे. ही तपश्चर्या खरोखरच मोठी. कवीनें आपला व स्वामींचा एके ठिकाणीं संवाद दिला आहे; त्यांतून त्याच्या व्यापारी पेशाचें दर्शन झालें तरी त्याची अनन्य भक्तीहि दिसून येते.[१७]

कवीची विद्वत्ता दांडगी, बहुश्रुतता मोठी, याचा प्रत्यय सर्व ग्रंथभर येतो. शिवरात्रीकथा, गुरुचरित्र, सुंदरकांड, इत्यादि 'इतिहास कथा आख्यानें' सांगून त्यानें ग्रंथ भरघोस केला आहे. संधि मिळाली कीं ज्ञानाच्या प्रदर्शनाची हांव जुन्या कवींना सुटे. आपला कवीहि याला अपवाद नाहीं. हा दोष नव्हे. 'जानन्नपि मेधावी'चा नियम कवींनांहि कां?

संगीत, छंदःशास्त्र, ज्योतिष, पत्रलेखन, उपनयन, वास्तुशास्त्र इत्यादी-बद्दल तो असलेली माहिती देतो. स्वामींनीं 'गुरुपुर' वसविलें तेव्हांचें वर्णन करतांना त्यानें घराचे नकाशेसुद्धां काढले आहेत. त्यानें मुख्य वृत्त वापरलें आहे-

---

१७. व्यापारी तुम्हि भिक्षु हे अम्हि असो प्रापंचि निर्वाह हा ।
लोकीका रिति चालणे नचि घडे हे योग्य नोहे पहा ॥
राजाश्रई लावुनि तुज देवूं । प्रपंच निर्वाह सुखेच होवू ।
विज्ञप्ति केली तधि मी गुरूतें । तवाश्रया अन्यहि धिग्मनाते ॥
अभंगांतः— सद्धर्म आचारे करी तूं व्यापार । देईं अन्नवस्त्र आम्हालागी ॥
हेची माझी आज्ञा वाहोनीया शिरी । वर्ते तूं शरीरी सखारामा ॥

शार्दूलविक्रीडित. त्याच्या जोडीला तो आर्या, ओव्या, चूर्णिका, सवायाहि आणतो. ' संस्कृत मी नेणें ' हा सांकेतिक विनयहि त्याच्याजवळ आहे. वामनपंडिताप्रमाणें आपल्या रसिकांना ( म्हणजे श्रोत्यांना ) त्यानें अनेकदां ' टी ' पार्ट्याहि दिल्या आहेत ! त्याला कन्नड चांगलें येत असावें. कैंगेरि म्हणजे रक्तांबु, हुबळी म्हणजे पुष्पलतिका ! हावनूर म्हणजे सर्पग्राम, हीं संस्कृतीकरणाचीं उदाहरणें पुरेशीं आहेत. गीता, योगवासिष्ठांतील सप्तभूमिका, अपरोक्षानुभूति इत्यादि वरील त्याची टीका त्याचा वेदांताचा व्यासंग दाखविते. विद्वत्व आणि कवित्व यांचा संगम ' श्रीमच्चरित्रां'त दिसतो.

कवि स्वामींची वंशावळ देतो :— नागेश ( गंगा ) – शंकर ( कृष्णा )– त्रिमलदेव ( अंबा ) – मल्लारि ( लक्ष्मी ) – चिदंबर. सांब दीक्षित व रामचंद्र भोजो देशपांडे हीच वंशावळ देतात. त्रिमल ऐवजीं त्र्यंबक, असा नांवाचा बदल आढळतो. कृष्णा हें नांव शंकराच्या पत्नीचें म्हणून गर्दे देतात. तर तें त्रिमलाच्या पत्नीचें म्हणून दिलेलें अन्यत्र आढळतें.

पूर्वजविषयक सर्व वृत्तांत तिन्ही चरित्रांत सामान्यतः सारखाच आहे. मल्लारि उर्फ मार्तंड दीक्षितांच्या जन्म-शकाबद्दल कोणत्याच चरित्रांत उल्लेख नाहीं. सांब दीक्षितांच्या ग्रंथाला जोडलेल्या गद्य प्रस्तावनेंत मात्र, " जमखंडी जवळील गोठे ग्रामांत जोशी घराण्यांत मल्हारभट नांवाचे एक श्रेष्ठ तपस्वी व महानुभावी इ. स. १७०५ सालीं जन्मास आले "; असा निर्देश आहे.

मल्लारि दीक्षितांच्या निर्याणाचे शक १७१५ व १७१० असे अनुक्रमें गर्दे[१८] व सांब दीक्षित[१९] देतात. ( त्यांना ९० वर्षांचें आयुष्य लाभलें

---

१८. सत्राच्यावरि पंधरा उजुगणा शकास अंकांक हे ।
शालीवाहन हा नृपोत्तम तधीं त्या ज्येष्ठ वद्यांत हे ।
अद्धाते परिधाविनाम वदले पूर्णानवम्यांतिथि ।
पावे तै स्वरुपीच मल्लअरि हा जो अर्चिरादीपथी ॥
श. १७१४ त परिधावी संवत्सर आहे. शक चालू व संवत्सर गत असा प्रकार येथें दिसतो.

१९. शके सत्राशें दहा । ज्येष्ट शुद्ध नवमी पहा ।
प्रभातीं योगिराज महा । निजानंदीं बैसले ॥

हाहि समज नमूद करण्यासारखा आहे. ) वार दिलेला नाहीं. पण दिलेला तपशील व अन्यत्र दिसणारा माहितीचा अचूकपणा पाहतां श. १७१५ हाच मल्हारि दीक्षितांचा निर्याण शक मानावा असें वाटतें.

या मार्गें ९० वर्षे म्हणजे श. १६२५ हा जन्मशक मानावा लागेल. वर उद्धृत केलेला. श. १६२७ (स. १७०५) हा सांब दीक्षितांनीं सुचविलेल्या श. १६२० पेक्षां अधिक विश्वसनीय म्हटला पाहिजे.

चिदंबरस्वामींच्या जन्माबद्दलच नव्हे तर जन्मदिनाबद्दलहि सर्व चरित्रकारांत एकवाक्यता आढळते. म्हणून श. १६८० कार्तिक वद्य षष्ठी, सोमवार हा स्वामींचा जन्मकाळ वादातीत आहे. हीच गोष्ट निर्याणाबद्दल. श. १७३७ पौष शुद्ध चतुर्थी (बुधवार) हा सांब दीक्षितांनीं दिलेला काळहि मान्य करण्यासारखा आहे. असा स्पष्ट उल्लेख गर्दे आणि देशपांडे करीत नाहींत.

स्वामींच्या लीळांचें समीक्षण करणें येथें शक्य झालें नाहीं तरी 'श्रीमच्चरित्रां' तील त्यांच्या संचाराचा, ठिकठिकाणी केलेल्या वास्तव्याचा तपशील म्हणजे आलेखा सारखा आहे. अधून मधून येणारे कालोल्लेखहि महत्त्वाचे आहेत.

श. १७१५ त मार्तंड दीक्षित (स्वामींचे वडील) वारले. तेव्हां स्वामींचें वास्तव्य मुरगोडास होतें. तेथील देसायानें लिंगोपंत नांवांच्या ब्राह्मणाची हत्त्या केल्यानें स्वामींनीं तें गांव सोडलें. कारण जेथें ब्रह्महत्त्या होते तेथें १२ वर्षे तरी राहूं नये असें शास्त्रवचन आहे. हा प्रसंग श. १७२० च्या सुमारास घडला असावा. नाना गर्दे हे तुरुंगांत श. १७२१ च्या माघ महिन्यांत होते. त्याच सुमारास देवलापुरांत स्वामींना भेटून आलेले नारायण यति कवीस कारागृहांत भेटतात. यावरून श. १७२१ त स्वामी देवलापुरास आले होते असें सिद्ध होतें. ते देवलापुरांत एक वर्ष राहिले असें कवि अन्यत्र म्हणतो.[२०]

मुर्गोडांतून स्वामी जे बाहेर पडले ते देवलापुर, कुसेगल, हुबळी, हिपरगी, पडघानुर, शिरहट्टी, कुंदगोळ, अशी जवळजवळ बारा वर्षांची भ्रमंती करून

२०. मुर्गोड संन्निध देवलाख्यपुर । तेथें चिदंबर राहे अब्द ॥

श. १७३० च्या अखेरीस गुर्लहोसुरास परत आले. त्यांच्या या भ्रमणाचा तपशील देशपांडे व सांब दीक्षित जरासा वेगळा देतात असें वाटलें तरी हा फरक महत्वाचा नाहीं. सर्पग्राम, मिश्रीकोट, धारवाड, लक्ष्मेश्वर, तेरदळ, यादवाड या गांवांनाहि स्वामींनीं भेट दिल्याचें गर्दे सांगतात. तिन्ही चरित्रांतील गांवांचे उल्लेख एकत्र करून एक 'स्थानपोथी' बनवितां येईल. प्रत्येक गांवांतील लीळांचे एकत्रीकरण झालें तर दुसरें 'लीळाचरित्र' तयार होईल. सध्यां 'श्रीमच्चरित्र' हें स्वामींचें अधिकृत चरित्र कसें आहे, तें पाहतांना त्याचें ऐतिहासिक अंगच विचारांत घ्यावयाचें आहे. त्या दृष्टीनें कांहीं गांवें व कांहीं प्रसंगच डोळ्यांपुढें ठेवले आहेत.

विवेचनाच्या सोयीच्या दृष्टीनें या चरित्राचे तीन कालखंड मानतां येतील. प्रारंभापासून देवलापुरांतील वास्तव्यापर्यंतचा पहिला, भ्रमंतीचा दुसरा आणि नवलगुंदहून परत आल्यावर निर्याणापर्यंतचा तिसरा. स्थूलमानानें :—(१) श. १६८०–१७२२ (२) श. १७२२–१७३० (३) श. १७३०–१७३७.

देसायानें (मुरगोंडच्या) ब्रह्महत्या केल्याचा उल्लेख वर झालाच आहे. या काळांत टिपूचा, करवीरकरांचा व आणि धोंडजी वाघाचा उपद्रव कर्नाटकास फार झाला. त्याचे पडसाद चिदंबर-चरित्रांतहि उमटले आहेत. टिपूचा उल्लेख 'श्रीमच्चरित्रां'त आहे. पण त्यानें स्वामींच्या पत्नीस (सरस्वती) त्रास दिल्याची व त्यामुळें त्याचे डोळे गेल्याची कथा देशपांडे[२१] व सांब दीक्षित[२२] सांगतात, तिचा आढळ 'श्रीमच्चरित्रां'त होत नाहीं. लिंगोपंतांना (स्वामींचे श्वशुर) 'कुटुंबसहित' धरून नेल्याचें (कोणी नेलें त्याचा निर्देश नाहीं) व

---

२१. तदा तेन मुरावास्य पुरं सर्वमवेष्टयन् ।
दिक्षितस्य गृहं गत्वा तत्स्वं हृतमनेकधा ॥
श्रीमत्सरस्वती बाला हृता तेन कुबुद्धिना ।
तस्य नेत्रांधमागत्य तदश्वा बहवो मृताः ॥

२२. 'श्री चिदंबरचारित्र', अ. ८ ओ. ८२–९३.

त्यावेळीं 'स्वामीपत्नी' माहेरीं असल्याचें गर्दे सांगतात.[२३] इतका भाग खरा आहे. टिपूचे डोळे जाणें ही कथा नंतरची. हा प्रसंग टिपूच्या नरगुंदवरील मोहिमेवेळचा. टिपूची व स्वामींची भेट झाली नव्हती, परंतु त्याला केलेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप झाला होता असें शृंगेरीच्या शंकराचार्यांच्या पत्रावरून दिसतें.[२४]

करवीरकरांच्या मोहिमांतील हुबळी लुटण्याचा व सावनूरच्या लढाईचा प्रसंग स्वामींशी निगडित आहे. रत्नाकरपंत राजाज्ञांनीं हुबळीस जमलेल्या तीन मठाधीशांना लुटण्याचा घाट घालून स्वामींचा रोष ओढवून घेतला. ही कथा (देशपांडे मात्र देत नाहीत) ऐतिहासिक दृष्टया खरी आहे.

रत्नाकरपंत भेटीस आल्यावर 'तुला अगस्ति भेटेल' असें सांगून धोंडोपंत गोखल्यांना भेटतांच स्वामींनीं 'अगस्ति' म्हणून हांक मारली. हा प्रसंग काव्यात्मक असूनहि काल्पनिक नाहीं. पुढें सावनूरच्या लढाईत धोंडोपंत गोखल्यांनीं रत्नाकरपंतांचा मोड केला. (सांब दीक्षित म्हणतात त्याप्रमाणें करवीरच्या लढाईत नव्हे.)

रत्नाकरपंत व स्वामी यांचीं भेट श. १७१९ च्या माघांत झाल्याचें दिसतें. बाबा काळे लिहितातः- "महाराजांनीं जुने हुबळीस मोर्चे लाविले आहेत. नवे हुबळीस नागवावें ही दृष्टि धरली आहे. दीक्षितबावाहि तेथें आहेत."[२५] "दीक्षितबावांचे व शामभट्टबावांचे क्षोभानें रत्नाकरपंताची दुर्दशा झाली;" असेंहि इतिहासांत नमूद आहे.[२६]

---

२३. लिंगापंत यया कुटुंब सहिता नेती धरोनी अरी ।
स्वामीपत्नी तदा लघूवय असे होतीच ते माहेरि ॥

२४. "टिपूस आपल्या दुष्कर्माबद्दल पश्चात्ताप झाला आहे. आपणांस भेटावयास तो घाबरतो. आपण त्याला द्याल ती शिक्षा भोगावयास तो तयार आहे."—'श्री चिदंबरचरित्र', प्रस्तावना

२५. ऐ. ले. सं. पत्र नं. ४१५८. श. १७१९ माघ व. ३०.

२६. उपर्युक्त, पत्र नं. ४५४५. श. १७२० आश्विन शु. १०.

धोंडी वाघाबद्दलची माहितीहि गर्दे बरोबर देतात. तो स्वामींच्या आश्रयास मुर्गोडास आला होता. स्वामींच्या उपदेशाप्रमाणें चांगलें वर्तन न केल्यानें त्याचा नाश झाला. वाघाशीं झालेल्या युद्धांत पुन्हां धोंडोपंत गोखल्यांचा संबंध येतो. वाघाशीं अखेरचा सामना देण्यापूर्वी स्वामींचें दर्शन घेण्यास धोंडोपंत देवलापुरास आले होते.[२७] (श. १७२२ आषाढ). स्वामींनीं दिलेल्या प्रसादाचा त्यांनीं स्वीकार केला नाहीं.[२८] तो बापू गोखल्यांनीं घेतला. ( धोंडोपंत श. १७२२ च्या आषाढांत धारातीर्थीं पतन पावले. वाघाचा निकाल पुढें लौकरच लागला. हा भाग गर्दे सांगत नाहींत. बापू गोखल्यांनीं धोंडजी वाघास मारलें ही सांब दीक्षितांची कथा अनैतिहासिकच म्हटली पाहिजे. कारण हें श्रेय इंग्रजांचें. बापू गोखले वेल्स्लीबरोबर होते हें खरें. )

देवलापुरांत येण्यापूर्वी ' सत्यागिरि ' व ' मनोळी ' यांच्या दरम्यान करवीरच्या शिवछत्रपतींची व स्वामींची भेट झाली होती. परशुरामभाऊंची कैद व सुटका, बाजीरावाची राज्यावर स्थापना, याहि गोष्टी स्वामी मुर्गोडास असतांनाच घडल्या ही माहितीहि बरोबर आहे.

देवलापुरांत भटलेल्या नारायण यतींवर थोडासा प्रकाश पडला पाहिजे. हे दत्तसांप्रदायी होते. चिदंबर व ते अभिन्न असें कवि म्हणतो. पूर्वी त्यांचा वास पुण्यांत होता असें देशपांडेहि म्हणतात. नंतर ते कृष्णातीरीं ( कुरुंदवाडीं ) आले. यांनींच कारागृहांत कवीस भेट दिली व त्याची सुटका केली. वाघाचा कांटा काढणें, राजापुरांत गुप्त गंगा प्रकट करणें इ. त्यांच्या लीला कवि सांगतो.

---

२७. पत्र नं. ५७६०. श. १७२२ भाद्रपद व. १२.

२८. " श्री दीक्षितस्वामी देवलापुरीं आहेत. दादा गोखले यांस आग्रहानें दर्शन जाले. फल देते समयीं वाघाकडून आल्यावर घेईन म्हणोन तसेच गेले. "

या नारायण यतींचें निर्याण श. १७२७ त झालें.[२९] काशीकर नांवाच्या त्यांच्या शिष्यानें नंतर यतींची समाधि बांधली.[३०]

हे यति करवीरच्या शंकराचार्यांचे बंधु होते;[३१] ही देशपांड्यांनीं दिलेली माहिती महत्त्वाची आहे. 'विद्यानृसिंह भारती' असें नांवहि ते देतात. या पीठावर येणाऱ्यांचीं दोनच नांवें एक :—विद्यानृसिंह भारती व दुसरें-विद्याशंकर भारती. नारायण यतींचे बंधु शोधण्यासाठीं त्या काळांतील करवीर पीठाची परंपरा[३२] अभ्यासणें जरूरीचें आहे :—

विद्यानृसिंह-भारती ( नांदेडकर ) समाधि श. १६९८ ( स. १७७६ )
विद्याशंकर-भारती ( बाबदेवभट्ट लाटकर ) श. १७१५ ( स. १७९३ )
विद्यानृसिंह-भारती ( यज्ञेश्वरशास्त्री पुणेकर ) समाधि श. १७३० ( स. १८०८ )

या पुढील परंपरा पाहणें आवश्यक नाहीं. कारण श. १७२७ मध्यें नाराथण समाधिस्थ झाले.

यावरून यज्ञेश्वर शास्त्री पुणेकर हेच या नारायण यतींचे बंधु ठरतात. ते 'नृसिंहभारती' आहेत व 'पुणेकरहि' आहेत. 'गुरुपरंपरास्तोत्रां'त याच नांवानें त्यांचा उल्लेख आहे.[३३]

---

२९. नगकरमुनिइंदू होय शकास संख्या ।
मधु असित वसंती आमतीथीस आख्या ॥ ........

३०. याच काशीकरांचा उल्लेख राजाराम असा करतो :-
त्यावरी आलो श्रीपादस्थळासी । नृसिंहवाडीसी कृष्णातीरी ॥
काशीकरस्वामी तेथें आग्रह करूनी । घेतले ठेवोनि आठ दिवस ॥

३१. तद्बंधु करवीरस्य गुरुपीठस्य तत्पदे ॥ ........
शंकराचार्य नाम्नोस्य सद्गुरो कृपया द्विजः ॥ ........
कर्तुं समर्थो गुरुराट् नृसिंह यति भारती ॥ ........

३२. 'श्रींचें जीवनचरित्र', उपोद्घात, पृ. २७.

३३. पुणेंकरोपनामानं विद्यानरसिंह भारतीम् । ........

‘श्रीमच्चरित्रां’तहि कथांचा क्रम सर्वत्र बरोबर आहे असें म्हणतां येत नाहीं. नारायण यतींच्या भेटीनंतर ‘परशूराम पुत्र हरीच्या’ बोलावण्यावरून स्वामी कुसेगलास गेले; वाटेंत छत्रपतींची भेट व पुढें हुबळीस रत्नाकरपंताची कथा घडली, हा क्रम कालदृष्ट्या चुकीचा आहे. देवलापुरांत येण्यापूर्वीच या गोष्टी घडल्याचें यापूर्वीं स्पष्ट केलेंच आहे. श. १७२४ श्रावणांत स्वामी कुसेगलास होते.[३३अ]

हिपरगी येथें स्वामींचें कुलदेवत खंडोबा. त्याच्या दर्शनार्थ ते श. १७२५ मध्ये गेले.[३४] याहि बाबतींत वाद नाहीं. तेथें स्वामी एक महिना राहिले असें देशपांडे सांगतात. (‘मासमेकं तत्र वसन्’). नंतर शिरहट्टी येथें स्वामींचें वास्तव्य दोन वर्षें झालें.[३५] याच काळांत दुष्काळ पडला असें गर्दे म्हणतात. श. १७२६ व श. १७२८ अशीं वर्षें दुष्काळाचीं म्हणून अनुक्रमें राजाराम व सांब दीक्षित देतात. (श. १७२८ मधील दुष्काळांत स्वामी बेडसुरास आल्याची मल्लाची कथाहि सांगतात.) शिरहट्टींत असतांना दुष्काळ पडला तो स्वामींनीं निवारला ही कथा दोघां समकालीनांनीं (स्वामींच्या) दिलेली म्हणून अधिक विश्वसनीय वाटते. याच वास्तव्यांत दोन घटनांचें वर्णन येऊन जातें. एक रास्त्यांच्यावर झालेल्या बाजीरावाच्या गहजबाचें. माधवराव रास्त्यांना रायगडावर

---

३३ अ. हरि त्र्यंबक परचुरे याचें कुसेगलाहून मिरजेस पत्र, नं. ६४१३, श. १७२४ श्रावण कृ. ३ :—

“ कुसेगलास श्रावण शु. ७ सुलग्नीं आलों. वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री दीक्षित बाबांचें सुमुहूर्तें दर्शन घेतलें. ”

३४. श्रोते सर्वही ऐका शालीवाहन या शकीं ।
सत्रा शतावरी देखा पंचविंशति अद्ब तें ॥
वत्सरी रुधिरोद्गारी कन्ये गुरु तधि अला ।
त्या अद्बीं वर्तले हे हो श्रीमन्मल्लारि दर्शन ॥

३५. शिरहट्टी नाम ग्रामीं राहिला द्वय अद्ब तो ॥

ठेवल्याची हकीकत कवि सांगतो. (पण हा प्रसंग ता. ३ ऑ. १८०१ मधला ). सांगण्याचें कारण रास्ते सुटून आल्यावर स्वामींना भेटावयास आले. पण रास्ते व स्वामी यांची भेट मुर्गोडास झाली असें रास्त्यांच्या पत्रांवरून वाटतें.[३६] याच सुमारचीं मुर्गोडाहून लिहिलेलीं रामचंद्र आप्पांचीं पत्रेंहि स्वामी मुर्गोडास असल्याचें सांगतात.[३७]

शिरहट्टी येथेंच आप्पा देसाई निपाणीकर स्वामींच्या भेटीस आल्याचें दिसतें. या भेटीचें सविस्तर वर्णन कवि करतो. देशपांडेहि देसायाची कथा सांगतात. स्वामींच्या कृपेनें त्याला ऐश्वर्य प्राप्त झालें, असें म्हटलें गेलें आहे. या भेटीचा उल्लेख करणारें कवीच्याच हातचें एक पत्रहि उपलब्ध आहे.[३८] त्यावरून ही भेट श. १७२७ मार्गशीर्षांत झाली हें स्पष्ट होतें.

' पर्शूरामसुतें अधी अवंतिलें जी कुंदगोळीं वसा ' म्हणून स्वामी कुंदगोळास आले. येथेंच ' शेषाचली व्यंकटराजे ' कौतुक केलें. राजारामास दर्शन झालें. हा प्रसंग श. १७२७ श्रावण व. १४ मधला.[३९] स्वामी कुंदगोळांत २ वर्षे राहिले.[४०]

नंतर नवलगुंद[४१] येथेंच स्वामींनीं यज्ञ केला. त्याचें वर्णन करण्याकारितां कवि ' यज्ञचंपू ' हा वेगळाच भाग करतो. यज्ञाचा प्रारंभ श. १७२९ च्या

---

३६. पत्र नं. ६८७२ श. १७२६ आषाढ शु. ४.

३७. पत्र नं. ६८५६ श. १७२६ ज्येष्ठ व. २.
पत्र नं. ७११५ श. १७२६ कार्तिक शु. २.

३८. " रा. आपा देसाई श्रीदर्शन घेऊन गरगच्या सुमारें धारवाडाअलीकडे आले. "—पत्र नं. ७१२७ श. १७२७ मार्गशीष व. ११.

३९. श्रावण तो मास वद्य चतुर्दशी । आलो स्वामीपाशी कुंदगोळा ॥

४०. भरतां द्वयाद्व गुरु तो मग कुंदगोळस्थान तै सोडी ॥

४१. " श्री दीक्षितस्वामी नवलगुंदास आले. पाण्याचे सोयीकरितां आले आहेत. घडल्यास मुंजीही कराव्यात असा बेत आहे. " पत्र नं. ७१५३ श. १७२८ वैशाख व. १२. ( यावरून श. १७२८ च्या वैशाखांत स्वामी नवलगुंदास आले होते, हें सिद्ध होतें. )

चैत्राच्या प्रारंभीं झाला.[४२] यज्ञांत बापू गोखले अन्न वाढत होते असें कल्पित वर्णन (सांब दीक्षितांप्रमाणें) गर्दे करीत नाहींत. (यज्ञाच्या वेळीं बापू गोखले वासोट्याच्या मोहिमेवर होते !).

नवलगुंद येथें 'मुंजीहि करण्याचा बेत' असला तरी मृत्युंजय व वररुचि या पुत्रांचे विवाह केल्याचें कवि सांगतो. सांब दीक्षित काशीनाथाची मुंज तेथें झाल्याचें लिहितात. (गर्दे ही मुंज पुढें गुर्लेहोसुरास करतात !)

पण येथें घडलेला महत्त्वाचा प्रसंग म्हणजे बाजीरावानें घेतलेलें स्वामींचें दर्शन. तिन्ही चरित्रांत हा प्रसंग आहे. "श्रीमतांची स्वारी आश्वीन शु. १३ त्रयोदशीस निघावयाचा निश्चय झाला. श्री कुमारस्वामींचें दर्शनास परभारे जाऊन दर्शन घेऊन नंतर स्वामींचें दर्शन घेऊन स्वारी माघारीं येणार असा निश्चय ठरला आहे;"[४३] असें बापू गोखले स्वामींना लिहितात. देशपांडेहि 'स्कंदस्य दर्शनार्थं' बाजीराव निघाल्याचें व नंतर 'मायूरपुरा'स[४४] आल्याचें सांगतात. भेट झाल्यावर बापू गोखले लिहितातः—"विशेष श्रीमंताची स्वारी नवलगुंदास येऊन स्वामीचे दर्शनाचा योग जाल्याचें समजण्यांत आलें........".[४५] कार्तिक कृष्ण ११ असा दिवसहि गर्दे देतात.[४६] बाजीरावाच्या दैनंदिनींत कार्तिक ११ ते मार्गशीर्ष ४ असा ९ दिवसांचा नवलगुंदास मुक्काम दिला आहे. त्याच्याशीं वरील दिवस जुळता आहे. भेटीचा तपशील मात्र भिन्न आहे. तो सध्यां बाजूस ठेवूं.

---

४२. अंकाते नवदोान ही मुनिशशी शकास संख्याक्रमें |
चैत्रादौ प्रभवाद्धि नंद तिथि हे आलीच आनुक्रमें ||

४३ लेखांक १७८ क्र. ४०. श. १७२९ आश्विन शु. ११.

४४. 'मायूरपुर' हें नवलगुंदचें संस्कृत रूप. 'नविलु' या कन्नड शब्दाचा अर्थ 'मयूर'.

४५. लेखांक १८६ क्र. ८९. श. १७२९ मार्गशीर्ष शु. ८.

४६. कृष्णैकादशि कार्तिकी तधिच घे श्रीमद्गुरुदर्शना ||

श॰ १७३० मार्गशीर्षांत स्वामी नवलगुंदहून गुर्लहोसूरास आले असें एका पत्रावरून कळतें.[४७] नवलगुंदीं स्वामींचें वास्तव्य ३ वर्षें झालें.[४८] प्रथम ते मुर्गोडास आले. नंतर 'गुर्लहोसूर' वसविण्यांत आलें.

निर्याणकथेंत बाजीरावाची पदच्युति, गंगाधरशास्त्र्याचा खून, इंग्रजांच्या वाढत्या कारवाया यांचें वर्णन आहे. हें चिन्ह स्वामींना बरें दिसेना. त्यांनीं अवतार संपविण्याचें ठरविलें. श॰ १७३७ मध्यें त्यांचें निर्याण झालें.

निर्याणानंतरच्या कथाभागांत स्वामींच्या पुत्राबद्दल येणारी हकीकत चिंत्य वाटते. शंकर व मृत्युंजय यांच्या मनांत कौटिल्य असल्याचे उद्गार स्वामींनीं काढल्याचें कवि सांगतो.[४९] शंकरबद्दल कवीचें मत चांगलें दिसत नाहीं. त्यानें स्वामींचें दर्शन शेवटीं घेऊं दिलें नाहीं,[५०] त्याच्यामुळें पिंडास काकस्पर्श झाला नाहीं;[५१] असें कवि म्हणतो. शंकरनें 'होसुरीं' जाऊन 'पश्वादि धनवस्तु' आणल्या असेंहि कवि सांगतो. दिवाकर आणि काशीनाथ मुर्गोडींच राहिले.

ही हकीकत कोणीच देत नाहींत. राजाराम तर शंकर व मृत्युंजय यांना (इतर पुत्राप्रमाणेंच) ईश्वरी अवतार मानतो. 'दिवाकर – बंधविमोचना'ची कथा देशपांडे व सांब दीक्षित देतात. ती ऐतिहासिक महत्त्वाची असली तरी 'श्रीमच्चरित्रां'त नाहीं. ही घटना गर्दे यांच्यानंतर घडली असावी. किंवा 'श्रीमच्चरित्रा'चा तेवढा भाग उपलब्ध झालेली प्रत, चिदंबर–चरित्र संपूनहि, अपूर्णच वाटते. 'आतां येथुनि ते कथूं' असें कवि म्हणतो, याचा अर्थ अजून कांहीं अध्याय असावेत.

---

४७. लेखांक २१७ क्र. ९४. श. १७३० मार्गशीर्ष शु. ११

४८. अद्वत्रयें त्या नवलाख्यगुंदीं .... ||

४९. कौटिल्य आहे मनि शंकराचा | मृत्युंजयाच्या मनिं तेवि साचा ||

५०. श्रीमद्दर्शन शंकरें द्विजजना कोणा घडोना दिले |
त्याते ब्राह्मण तैं अयुक्त वदती येथें न ते लीहिले |

५१. बोले शंकर मी दिवाकरपदीं वर्तेन सर्वस्वही || ....

' श्रीमच्चरित्रा 'च्या ऐतिहासिक अंगावरच मुख्यतः लक्ष केंद्रित केलें आहे. त्याचें सामाजिक अंगहि महत्वाचें आहे. अनेक वस्त्रें, भूषणें, खाद्य पदार्थ, यांची नांवें कवि देतो. तत्त्वज्ञानाकडेहि लक्ष ( काव्यांगाप्रमाणेंच ) पुरवितां आलें नाहीं. चरित्राचा तपशील तर बाजूलाच राहिला.

अखेरीस खऱ्यांचीं कांहीं विधानें दुरुस्त करतों. खरे लिहितातः—"बावांचें साधुत्व आणि त्यांनीं केलेले चमत्कार हा केवळ श्रद्धेचा विषय आहे........त्यांना दोघी स्त्रिया होत्या आणि दोघींनाहि मुलें होत नसत, त्यामुळें बावा नेहमी कष्टी असत आणि बावांच्या साधुत्वावर त्यांच्या दोघा बंधूंची सहकुटुंब चंगळ चालत असे........".[५२]

कोणत्याहि साधूच्या चमत्कारावर विश्वास ठेवण्यास श्रद्धा हवी याबाबत वाद नाहीं. पण या चमत्कारांना इतिहासाचेंहि अधिष्ठान आहे. ते निराधार नाहींत. स्वामींच्या पत्नींना ' मुलें होत नसत ' हें खरें नाहीं. दिवाकर, शंकर, मृत्युंजय, मार्तंड, भास्कर व काशीनाथ असे सहा पुत्र व एक कन्या इतकीं मुलें स्वामींना – दोन्ही स्त्रियांपासून – होतीं. मार्तंड दीक्षितांना त्यांच्या हयातींत कांहींचें मुख पाहावयास मिळालें होतें; म्हणजे तीं ' कष्टी ' होण्याइतकीं उशीरांहि झालीं नव्हतीं. बावांच्या साधुत्वावर चंगळ चाललीच असेल तर ती एका ' बंधू 'ची : कारण स्वामींना दोन बंधु नव्हतेच मुळीं !

( स्वामींची श्रेष्ठता न कळल्यानें ) धोंडजी वाघहि स्वतःला स्वामींचा शिष्य म्हणवितो, याचें खऱ्यांना आश्चर्य वाटतें. सज्जन-दुर्जन, पुण्यात्मे-पापी या सर्वांना स्वामींनीं जवळ केलें. ममतेनें वागविलें, उद्धाराची दिशा दाखविली. यांत स्वामींचा उपहास करण्यासारखें काय आहे ? स्वामींची ममता, विनोद-बुद्धि, मार्मिक बोलण्याची पद्धति, स्वतःचीं वस्त्रें स्वतःच धुण्याइतकी साधी राहणी या साऱ्या गोष्टी अभ्यसनीय वाटतात.

---

५२. ऐ. ले. सं. भाग. १४, पृ. ७५२४.

# विठाबाअीचे अभंग

विठाबाअी[१] म्हणजे मराठींतल्या जुन्या कवयित्रींत अेक नवी भर. जनाबाअी बहिणाबाअी, यांच्याच परंपरेंतली. विठाबाअीचें दैवतहि विठ्ठल. पण तिनें आपला विठ्ठल 'चिदंबरीं' पाहिला.[२] आणि त्याच्यावर भक्तिभावानें आपली अभंग-वाणी व गाणीं उधळलीं.

विठाबाअीनें चार हजार अभंग व कांहीं पदें लिहिलीं अशी माहिती मिळते. मला मात्र सहाशेच अभंग व सहासात पदें मुष्कीलीनें पाहावयास मिळालीं. विठाबाअीची सर्व रचना अेका गौडाच्या घरीं पूजेंत आहे. अभंगांच्या त्या बाडाची पूजा केल्यानें आपल्या घरांत कोणी बालविधवा होत

---

१. राजारामाच्या चरित्राबद्दल व अभंगांबद्दल अन्यत्र लिहितांना विठाबाअीचा थोडाफार परिचय मी करून दिला आहे.

२. म्हणोनीया मीच अवतरीलो समज ।
चिदंबर नाम धरुनीया ॥
जाहले चिदंबर पांडुरंग तोची ॥

नाहीं, अशी श्रद्धा असल्यानें तें झाड कोणास मिळतहि नाहीं ! ते उतरून आणावे लागले.

विठाबाओीच्या अभंगांचें स्थूलमानानें असें वर्गीकरण करतां येअील :— (१) आत्मचरित्रपर. (२) चिदंबरस्वामीविषयक. (३) भक्तकथा. (४) नाम-महिमा. अंतरींचा उमाळा स्वभावें बाहेर आल्यानें सारेच अभंग हृदयस्पर्शी वाटतात. 'नाम उरमें वीणा करमें' फिरणाऱ्या विठाबाओीचा स्वर क्वचित् तारस्वर वाटला तरी तिच्या वीणेचे मंद्र झंकार कानांत अधिक काळ घुमतात.

विठाबाओीनें आपला जन्मवृत्तांत सविस्तर कथन केला आहे. तिच्या आओीचें नांव संतूबाओी व वडिलांचें नांव रामप्पा नायक व गांव पंढरपूर असल्याचें कळून येतें.[३] हे दोघेहि विठ्ठलभक्त होते. परंतु संतान नसल्यानें दुःखी होते. विठ्ठलानें स्वप्नांत दृष्टांत दिल्यावर त्यांनीं नवस केला व त्याप्रमाणें अपत्याचें नांवहि ठेवलें.[४]

विठाबाओीचा जन्म श. १७१४ मध्यें आषाढ वद्य चतुर्दशी, मंगळवारीं पहांटे झाला.[५] पांचव्या वर्षांपासूनच तिला विठ्ठलाची गोडी लागली. 'चवदा वय होता' आओी-बाप 'लग्न करावें' म्हणूं लागले. लेकीनें 'लग्न नको'

---

३. माझे आइचे नांव संतुबाई जाणा ।
सांगते हो खूणा तुम्हालागी ॥
पिताचे हो नांव रामप्पा नायक ।
दोघे होते देखा पंढरपुरी ॥

४. मुलगा होवो मुलगी होवो आम्हालागी ।
नाव ठेवीतो तुझेची विठ्ठला रे ॥

५. नाव ठेवीती मजसी विठाबाई म्हणून ।
जन्मशके सत्रासे चवदा जाण ॥
आषाढ हो मासी वद्य चतुर्दशी ।
मंगळवारी पाहटे प्रहरासी ॥

असें म्हणून त्यांच्या जवळ पदर पसरला. पण तरीहि अळेंवळें त्यांनीं विठाबाअीचें लग्न लावून दिलें.

माहेरसासर दोन्हीहि पंढरपुरांतच. सासरीं तिला 'बहुत दुःख' भोगावें लागलें.

भ्रतारा हो मजसी वोढतो येकांती ।
भोगावे मजसी म्हणुनीया ॥
ओढोनीया बहुत मारीतो मजसी ।
मध्यरात्री जाणा समयासी ॥

असा पतिप्रेमाचा ( ! ) अनुभवहि आला. त्यामुळें विठाबाअी घराबाहेर पडली आणि रानोवनीं फिरू लागली. हातांत विठ्ठलाची मूर्ति घेऊन तिनें डोंगर पालथे घातले.[६]

करुणा येवुदे आई तुझे मी लेकरू । परदेशी मज करुनी टाकलेसी ॥

असें आक्रंदनहि केलें.

आयुष्य माझें गेले वाया सर्व जाण । नाही स्मरण तुझे किंचीत रे ॥

असा अनुतापहि व्यक्त केला. आपली 'शेवटील वेळ' आल्याचें कळवळून सांगितलें.[७] पण शेवटी विठाबाअीची 'विठाबाअी धांवोनीया आली'. आणि सर्व 'व्यथा निवाली'.

विठ्ठलानें दृष्टांत दिला :—

म्हणोनीया मीच अवतरीलो समज । चिदंबर नाम धरुनीया ॥
कुंदगोळी असतो ब्राह्मणवेषेने । जावे ह्या वाटेने म्हणती मजसी ॥
राजाराम भक्त माझे येईल येथे । तुकाराम जाण प्रत्यक्ष तो ॥

---

६. तैसेच निघाले रानामाजी पूर्ण । मुखी विठ्ठलचूर्ण धरोनीया ॥
मूर्ती घेवोनी होती आले डोंगरावरती । वाट नाही दिसती कोठे मजसी ॥
७. देहबहुत क्षीण आज उद्या प्राण । जाऊ पाहतो प्राण पांडुरंगा ॥
विठाबाईची आली शेवटील वेळ । कैसे म्हणु दयाळ तुला देवा ॥

चिदंबरनाम गात फीरतो जाण । अवतार पूर्ण नामदेव ॥
येईल हो आता कुंदगोळी जाणेसी । हेची वाट त्यासी खूण जाण ॥
त्याचाबरोबर जावे तुवा तेथे । सांगोनी अद्रश्य होती देव ॥

रात्री हा दृष्टांत. तर सकाळीं काय आश्चर्य ! राजारामाची दिंडी वाटेवर हजर ! टाळमृदंगांचे आवाज कानावर आले. आणि राजारामाचे चरण पाहिल्यावर तिची विदेही अवस्था झाली.[८] पुढें दोन महिने दिंडीबरोबर ती गांवोगांव फिरली. आणि मग कुंदगोळ येथें प्रत्यक्ष स्वामींचें दर्शन झालें. तो दिवस गुरुवार, कार्तिक शुद्ध अेकादशीचा होता.[९] या प्रसंगाचें वर्णन विठाबाअीनें विस्तारानें केलें आहे. स्वामींच्या दर्शनानें 'देहांतुनी नोघाले मीच जाणा' अशी तिची विदेही स्थिति झाली.[१०] हातांतल्या मशालीचे जाळ कारवेपर्यंत लागले तरी विठाबाअी शांत राहिली होती.

भानावर आल्यावर तिला पूर्वजन्मांचें स्मरण झालें. आपण जनाबाअी होतों, तेव्हां चिदंबर विठ्ठल होते; राजाराम नामदेव होते; असें विठाबाअीला आठवलें.[११]

---

८. विठाबाई म्हणे देहभाव गेले । चरण देखीले जेव्हा राजाराम ॥
उठवीती मजसी हस्त दोनी धरुनी । स्वामीपासी न्हेती मजसी जाण ॥
९. मध्यरात्री आलों कार्तीक हो मासी । शुद्ध येकादशी जाणावा तो ॥
गुरुवारी मध्यरात्रीचे समयासी । कुंदगोळ द्वारासी राहिलो ते ॥
१०. विदेहाने चरणी लोळु लागले जाण । आलींगीती पूर्ण स्वामी मजसी ॥
देहासी हो मीठी मारीली स्वामीनी । स्वास फुंकती तोंडी देहालागी ॥
११. विठाबाई म्हणे स्मरण आले जैसे । जनाबाई म्हणुनी सर्व माझे ॥
जनी असती माझे पाठी । उभा राहसी जगजेठी ॥
विठ्ठल राई रखुमाई । चिदंबर सावीत्री सरस्वतीबाई ।
नामदेव राजाराम । अैसे धरोनीया नाम ॥

' पंढरीनाथा चिदंबर रूप दावीलें आता ' या आपल्या गोंड पदांत पूर्वजन्मांतल्या अशाच स्मृति विठाबाओनें सांगितल्या आहेत.[१२]

चिंदबर हे नृसिंह, राम, कृष्ण व पांडुरंग होते; तर राजाराम हे प्रल्हाद, अंगद, उद्धव व नामदेव होते; व आपला त्यांच्याशीं जन्मोजन्मींचा संबंध आहे असेंहि विठाबाओ आवर्जून सांगते. ' तुकाराम जाहले राजाराम अशीहि तिची श्रद्धा आहे. चिदंबर हें तिचें दैवत तर भक्तराज-राजाराम तिचे गुरु. या दोघांबद्दल तिला कमालीचा आदर आहे. चिदंबरस्वामींचें व राजारामाचें चरित्र सांगतांना याच कल्पनांचा तिनें पुनरुच्चार केला आहे.

पूर्वजन्माचें तिला स्मरण झालें, पण याहि जन्माचें विस्मरण होऊं नये म्हणून तिचे आओबाप व भ्रतार धुंडत धुंडत कुंदगोळास आले. भ्रतार तर तिच्यावर खवळला व मारण्यास अंगावर धावून आला. तेव्हां त्याला तिनें सुनावलें:—

तुझी सत्ता आहे देहावरी समज । माझेवरी तुझी कींचीत नाही ॥
देह नव्हे मी माझे देह जाण । समजती मी देह अहंभाव ॥

आणि स्वामीचरणीं ती तल्लीन झाली. सर्वांना वाटलें ती मेली आणि दुर्गंधी सुटली म्हणून आओबाप-भ्रतार सारेजण पंढरपुराला पळून गेले ![१३]

---

१२. हीरण्यकश्यपाचे वेळी । पद्मीनी नामे दाशीचे कुळी ॥
दुसरा जन्म ऐका अत्ता । मंथरा नामे लाथ दिधली माथा ।
कुब्जा नामे माझा । जन्म जाहला उद्धव नामे तुझा ॥
....नामयाची जनी जाहले । भेटी दीधली मला रूपविठ्ठलें ॥

१३. मेली म्हणती मजसी नोळखती पूर्ण । विदेहस्थीती जाण नेणती मूर्ख ॥
देह पडता जवळी येवोनी पाहतो । दुर्गंधी हो वास हाताचा तो ॥
पदर लावोनी नाकी भ्रतार पळतो । गावी आपुल्या जातो पंढरपुरा ॥

क्रमांक ....२५५.... नोंद दि ...२५-१०-८०



तेव्हां राजारामानें उद्गार काढले : 'त्रय गेले तुझे देहाचे हो जाण.' स्वामींनी वरदहस्त मस्तकीं ठेवला तेव्हांतिने अेवढेंच मागितलें:—

मन जाते जेथे दु:ख दाखवी तेथे । नामावाचुनी वाचा बंद करी ॥

पुढें स्वामींच्या सेवेंत तिचें सर्व आयुष्य गेलें. तिला आयुष्यहि भरपूर लाभलें असावें, असें तिनें स्वामींचा जो धांवा केला आहे त्यावरून वाटतें. तसले कांहीं अभंग पाहण्यासारखे आहेत:—

तुजवीण चैन नाही चिदंबरा । यावें बा सत्वरा चिदंबरा ॥
विठाबाईचा अंत कीती पाहासी देवा । लवकरी हो यावा स्वामीराया ॥
का नये करुणा स्वामी ब्रह्मपूर्णा । कृपेचा तू राणा म्हणवीसी ॥
धावा करीतो स्वामी रात्रदीस तुझे । का नये रे माझे करुणा तुला ॥
विठाबाईचा अंत जवळी आला स्वामी । कुठे गेला तुम्ही चिदंबरा ॥

विठाबाईचा अंत केव्हां व कोठें झाला ही माहिती उपलब्ध नाहीं. तिचा अधिकार मोठा असावा असें तिच्या अभंगावरून आणि हरी, नीळा इ. शिष्यांना केलेल्या उपदेशावरून वाटतें. पूर्वजन्मीं ती जनाबाओी असावी असेंहि वाटावयास लावणाऱ्या खुणा तिच्या अभंगांत आहेत. तिच्या आत्मचारित्रपर अभंगाचें स्वरूप असें आहे.

चिदंबरस्वामींचे आओी-वडील, त्यांची तपस्या, त्यांचा पूर्वजन्म, त्यांना झालेला दृष्टांत व अेकदम आठ वर्षांचा पुढें राहिलेला लोकोत्तर पुत्र; या साऱ्याची माहिती भक्तिभावानें विठाबाओीनें दिली आहे.[१४] स्वामींचा जन्म

---

१४. चिदंबरक्षेत्री मल्हार दीक्षीत । जाती तपस्यास सहीत सती ॥
मल्हार दीक्षीत भक्तीसामर्थ्याने । सगुण केले जाणा विठ्ठलासी ॥
देव बोले तेव्हा हसत हो त्याना । अवतारा घेतो तुमचा उदरी ॥
विठाबाई म्हणे मागीले जन्माची । आठवण वसुदेव देवकीची ॥
लोकीकाकरीता गर्भ धरी लक्ष्मी । नसे वेदना त्याना तीळभरी ॥
अष्टवर्षात्मक प्रगटोनी राहती । साष्टांगे करीती उभयताना ॥
देवकीचे वेळी इछा तुमचे आई । बाळलीला पाहावी म्हणोनीया ॥
म्हणुनी सांगुनी नारायण तेव्हा । बाळरूप जाहले मंगळवारी ॥

केव्हां झाला[१५] हें तिनें दिलें आहे. स्वामींच्या बाललीलांचें वर्णन विठाबाअीनें फारसें केलें नाहीं. ‘राजारामानें तें करून ठेवलें आहे’, असें ती म्हणते. मातीचा हत्ती स्वामींनीं (लहानपणींच) जिवंत केला व त्यामुळें लोक घाबरे झाले म्हणून पित्याच्या सांगण्याप्रमाणें पुन्हां मृत्तिकारूप केला अशी अेक लीला विठाबाअीनें दिली आहे.[१६]

चिदंबरांचे पूर्वावतार पुन्हां सांगतांना त्यांत पुन्हां परशुराम, वामन, पांडुरंग इ. अवतार सांगितले आहेत.[१७] चिदंबरांचे अद्‌भुत असे चमत्कार फारसे तिनें वर्णिलेले नाहींत. भक्तांच्या कथांमध्यें मेलेल्याला जीवंत केल्याचें अेरवादें वर्णन आढळतें.[१८] किंबहुना भक्तकथांतच स्वामींचें चरित्र तिनें वर्णन केलें आहे. म्हणून भक्तांकरवीं स्वामींनीं चमत्कार करविले असें म्हटलें तर मात्र बरेच बहुविध चमत्कार आपणांस दिसतात.

---

१५. विठाबाई म्हणे शके सांगते ऐका । सोळाशते ऐंसी जाणावा तो ॥
बहुधान्यनाम सवत्छर जाणा । अवतार पूर्णब्रह्म जाणा ॥
कार्तीक हो वद्य षष्ठी तीथी जाणा । प्रातकाळी दोन प्रहरी जाणा ॥

१६. मातीचा हो हत्ती पूजोनी स्वामीनी । सजीव करोनी घरी आले ॥
होसुरीचे लोक घाबरे होवोनी । आले परतोनी पिताजवळी ॥
मल्हार दीक्षीत पाठवीती तेथे । शकेत सोळासे नवदीत ॥
स्वामी चिदबंर आले तया स्थळा । पाहती ते वेळा हत्तीलागी ॥
पाहता क्षणी हत्ती आपुल्या त्या स्थळा । होत जैसे तैसे मृत्तीकारूप ॥

१७. सहस्त्रार्जुनाकरीता जाहला परशुराम । निक्षत्री धरीत्रीकेलीजाण ॥
बलीकरीता झाला वामन अवतार । घातीला हो धूर पाताळांत ॥
पुंडलीकासाठी उभा जगजेटी । चंद्रभागातटी पांडुरंग ॥

१८. सुशीलम्मेची कथा.

स्वामींचें ध्यान अखंड करीत असल्यानें तिच्या शब्दांत देखील तें रूप सगुण साकार होऊन आजहि पाहावयास उरलें आहे. त्या रूपाचें दर्शन आल्हादक आहे.[१९] खरें पाहूं गेल्यास तिचे सर्वच अभंग स्वामींविषयक आहेत. लौकिकदृष्ट्या आपण वर्गीकरण करावयाचें अितकेंच !

विठाबाअीच्या अभंगांत भक्तकथांचा भाग अधिक आहे. तें स्वाभाविक-हि आहे. भक्तांच्या कथा न सांगतां स्वामींचें चरित्र तरी कसें सांगतां येणार ? भक्तांच्या कथांनाहि रंगत येते विरोधी भक्ति करणाऱ्यांमुळें ! राजाराम, नीळा, हरि व सुशीलम्मा या भक्तांच्या कथानां जनार्दनशास्त्री, विश्वंभर देशपांडे व सुब्बराज या मंडळींनीं विरोधानें खुलावट आणली आहे.

राजाराम हा ह्या सर्व भक्तांत अग्रणी. विठाबाअीला त्याच्याबद्दल अत्यंत आदर आहे. त्याचें गांव बाभुळगांव; आअीबाप हरीशींग—लक्ष्मी; रजपूत वंश; दोघेहि विठ्ठलभक्त; अशी माहिती विबाअी देतें.[२०] त्यांच्या पोटीं राजारामाचा जन्म शके १६९० मध्यें फाल्गुन वद्य द्वितीयेला झाला.[२१]

बाभुळगांवांतव द्वारकादास म्हणून अेक सिद्धयोगी होते. त्यांच्या आश्रमांत भागवताचा पाठ अैकण्यास राजाराम जात असे. ध्रुवाख्यानाचा मनावर खोल परिणाम होऊन त्यानें देवाचा अगदीं ध्यास घेतला. तेव्हां द्वारका-दासांनीं 'तुला चिदंबर भेटेल' असें आश्वासन दिलें.[२२]

---

१९. शुभ्रवस्त्रधर शुभ्राचिराधर । भक्ताभयकर स्वामी ॥

२०. दंडकारण्याभीतरी गोदावरी तीरी । बाभुळगांव ग्राम येक जाण। ॥
तया ग्रामी राहती रजपूत ते वंशी । हरीशींग लक्ष्मी जाणा ॥
अनुसुयाप्रमाण लक्ष्मी होती जाण । दोघे विठ्ठलभक्त पूर्ण होते ॥

२१. जन्म आला पुत्र माहाभगवदभक्त । फाल्गुणपक्ष वद्य द्वितीया ॥
शकेत सोळाशे नवदीत जाण । विठाबाई म्हूण सांगते जाण ॥

२२. तेव्हा बोलताती द्वारकादास । भेटेल तुजस चिदंबर ॥
काही काळ गेल्यावरी हो तुजसी । घडुन येईल योग समज ॥

पुढें 'स्वस्त चित्ती' राहून राजारामानें गृहस्थाश्रमधर्म पत्करला. कृष्णा व राधा अशा दोन स्त्रिया त्याला होत्या त्यानें कांहीं काळ हुसंगाबादेस शिले-दारीहि केली. पण मनाला शांति नव्हती. तेलंगदेशाचा कृष्णभट्ट म्हणून एक ब्राह्मण त्याच्याकडे आला व त्यानें चिदंबराकडे जावयास सांगितलें.[२३]

राजारामाचें नोकरींत तर मनच नव्हतें. म्हणून कृष्णभट्टाचें बोलणें पटून त्यानें नोकरी सोडून दिली. कर्नाटकदेशीं जावयास निघतांना 'वाटेंत हो बहुत चमत्कार झाले.' त्याचें वर्णन स्वतः राजारामानें केलें आहे. हा वृत्तांत विठा-बाअीहि देते:—

पंढरपुरी गेले प्रार्थीले वीट्टला । चिदंबर कोण सांगे मला ॥
रात्री हो द्रष्टांती विठ्ठल सांगती । रूप होवोनी बोलती चिदंबराचे ॥
मीच अवतरीलो चिदंबररूपे । जावे तुवा तेथे कर्नाटक ॥
विठाबाई म्हणे आनंद निघाले । कुंदगोळी आले स्वामीजवळी ॥

स्वामींनीं वरदहस्त ठेवल्याबरोबर राजारामाला गतजन्मांचें स्मरण झालें. राजारामच पूर्वीं प्रल्हाद, अंगद, उद्धव, नामदेव, तुकाराम होते; असें विठाबाअीनें वारंवार म्हटलें आहे. राजारामाच्या काव्याबद्दल विठाबाअीचा अभिप्राय येथें लक्षांत घेणें महत्वाचें आहे. राजारामानें अेकंदर दीडलाख अभंग व 'बहुत ग्रंथ केले जग उद्धारीले' असें विठाबाअी म्हणते.

राजारामानें गुर्ल्होसूरला स्वामींची मूर्ति करवून घेतली व चालवीत बाभुळगांवीं आणली.[२४] तेथेंच राजारामाचें पुढील आयुष्य व्यतीत झालें असावें.

---

२३. राजारामासी दोघी कृष्णा राधा नामे । होत्या हो कामीनी ॥
चाकरीस जाती हुसंगाबादेसी । शीलेदारी काम करीता जाण ॥
वीठाबाई म्हणे तेलंगदेशाचा । कृष्णभट्ट ब्राम्हण आला तेथे ॥
चिदंबराचे खूण सर्व सांगतो जाण । अवतारपूर्ण श्रीकृष्ण तो ॥
जावे तुवा तेथे चरण देखता त्याचे । होईल तुमचे शांती जाण ॥

२४. मूर्ती हो करवीती गुर्ल्होसुरी जाण । चालवीता आणीती बाभुळगांवा ॥

पण राजारामाचा समाधि मात्र बेळगांवजवळ शहापूर येथें आहे. स्वतः विठाबाई ही बाभुळगांवास कांहीं काळ होती.[२५]

नीळा व जनार्दनशास्त्री यांची कथा वेधक आहे. नीळा हा 'करवीर' जवळील खेड्यांतला शेतकरी होता. अेकदा अकस्मात त्याची व विठाबाईची भेट झाली. तिनें त्याला स्वामींच्या नांवाचा बोध केला व विदेही होण्यास सांगितलें.[२६] अशा त्या नीळाच्या शेतांत जनार्दनशास्त्री नांवाचे पढिक विद्वान् शिष्यासह फिरतां फिरतां हुरडा खावयास आले. शास्त्रीबोवांना शास्त्रें व पुराणें मुखोद्गत होतीं. त्यामुळें 'दारुण गर्व' उपजला होता. 'चिदंबर' हें नांव अेकून त्याचा जळफळाट होत असे.

नीळानें त्यांना नमस्कार केला, बसविलें. आणि हातवर दाणे चोळून अग्नीशिवाय हुरडा तयार केला. मुखीं स्वामींचें नांव होतें. शास्त्रीबुवांना हा मूर्खपणा वाटला.[२७] पण ते दाणे हातावर पडतांच शास्त्रीबुवांचे हात भाजले. 'अग्नीवाचुनी कैसे हुरडा झाला रे नीळा' असें त्यांनीं विचारल्यावर गुरूशिवाय खरें ज्ञान होत नाहीं असें नीळानें त्यांना सांगितलें व त्यांच्या शिरावर हात ठेवला. तेव्हां शास्त्रीबुवांना खरें ज्ञान म्हणजे काय तें समजलें व त्यांनीं नीळाचे पाय धरले.[२८] 'विदेह लक्षण' असें असतें; असें विठाबाई म्हणते.

---

२५. बाभुळगांवी त्याचा संगे होते जाण । ऐका तुम्ही पूर्ण मन करुनी ॥

२६. विठाबाई म्हणे जीवंत मरावे । चीरंजीव राहावे विदेहीने ॥

२७. अग्नीविणे दाणे चोळुनीया पाही । घ्यावे म्हणतो पाही सर्वालागी ॥
ऐकोनीया शास्त्री रागेने बहुत । मूर्ख म्हणतो शेतकरीस जाणा ॥

२८. नीळा बोले तेव्हा शास्त्र शिकले तरी । पुराण वाचले तरी जन्मभरी ॥
तीर्थयात्रा फीरता न समजती गूढ । गुरुपाय दृढ धरील्यावीण ॥
म्हणुनीया त्याचे शिरी जाण नीळा । हस्त ठेवीतो डोळा सर्व पाहती ॥
ज्ञान जाहले त्यास सर्व येकंदर । चरण धरीतो नीळायाचे ॥

हरीची कथा जरा वेगळी आहे. सातार्‍याकडे हा होऊन गेलो. त्याचें लक्ष लहानपणींच देवाकडे वळलें. वडील नव्हते. आओीनेंहि त्याची वृत्ति ओळखली. 'बहुत वय' झालें. विठाबाओीकडे येऊन तो अभंग शिकला व दिंडीपताका घेऊन घराबाहेर पडला. गांवोगांव फिरूं लागला.[२९]

फिरतां फिरतां तो सोलापूरला आला. तेथें विश्वंभर देशपांडे म्हणून श्रीमंत पण स्वामींचा द्वेष करणारा गृहस्थ राहात होता. ही दिंडी दिसूं नये म्हणून त्यानें दारें बंद केलीं. भजन कानीं पडूं नये म्हणून 'कानी घालीतो तेल कापूस तो.'

लोक विचारीती हरीसी हो जाण । देशपांड्या नाही आला जाण ॥
ऐकोनीया हरी ऐसे म्हणतो जाण । आज पंद्रा दिनी येतो समोर ॥

हें झालें आणि पंधरा दिवसानीं गांवोगांव फिरून हरीची दिंडी पुन्हां सोलापुरात आली तर काय आश्चर्य ! समोरून देशपांड्याची प्रेतयात्रा येत आहे. हरी म्हणाला, 'देशपांडे आला पहा ?[३०]

सुशीलम्मेची कथा ही हरीच्या कथेंतीलच उपकथा आहे. श्रीरंगपट्टण येथें सुब्बराज व सुशीलम्मा हें जोडपें राहात होतें. त्यांना संतान नव्हतें. सर्व उपाय हरले. हरीची दिंडी आलेली पाहून तिनें पतीच्या नकळत जाऊन हरीचे पाय धरले. तेव्हां चिदंबर नाम न सोडण्याचा तिला हरीनें उपदेश केला.[३१]

---

२९. माझाकडे आला अभंग शिकला । दिंडी सुरू केली ॥
टाळवीणा जाण पताका पीवळा । म्हणु लागला हरी चिदंबर ॥
३०. देशपांडे जाणा मरण पावला तेथे । त्याचे यात्रा आली समोर ते ॥
हिकडूनीया निघे भजन मंडळी । तिकडूनीया प्रेत सावकाराचे ॥
विठाबाई म्हणे म्हणतो हरी जाण । देशपांडे आला पाहा तेथें ॥
३१. चिदंबरनाम सोडु नये जाण । सदोदित चूर्ण धरी मनी ॥
मनाने न सोडी स्वामीपाय नाम । हेची औषध तुजसी पुत्राकरीता ॥

पतीला आवडणार नाहीं म्हणून पण मनापासून सुशीलम्मेनें गुप्तभक्ति केली. तिला पुत्रलाभहि झाला. रामेश्वराला गेलेला हरी 'मुरगोडास उत्छव' म्हणून परत पट्टणास आला. हें कळल्यावर त्याला घरीं न्यावें अशी तिला अिच्छा झाली. पण 'भ्रताराचा धाक' ! म्हणून तिनें मुलास विष घातलें व मूल मेलें. हा अधर्म वाटला तरी धर्मच होय.[३२] पति आल्यावर शोक करूं लागला, तेव्हां तिनें श्रीरंगाच्या देवळांत जाऊन तिथल्या संताला शरण जावें, भवरोगाचा वैद्य तेथें आहे; असें सांगितलें.[३३] सुब्बराज नास्तिकाचा आस्तिक झाला; अश्रद्धाचा सश्रद्ध झाला. हरी घरीं आला. पुत्र तरीहि जीवंत होअीना. आतां मात्र त्याचा बांध फुटला. बायकोला मारावयास तो धांवला. मुलाच्या प्रेताला लाथ लागली. कळवळून शवाला त्यानें मिठी मारली. आणि चिदंबरनाम म्हणूं लागला. देहभान गेलें. आणि स्वामींनीं प्रत्यक्ष येऊन पुत्र उठविला.[३४] सुब्बराज स्वामींच्या चरणावर लोळूं लागला. सुशीलम्मेला स्वामींनीं हात देऊन वर उठविलें. आनंदी आनंद झाला.[३५]

विठाबाअीनें शास्त्रें पुराणें पढलेलीं नाहींत. पण तिला त्यांचें रहस्य कळलें आहे; वळलें आहे—असें तिच्या अभंगावरून जाणवतें. हें रहस्य म्हणजे

---

३२. विठाबाई म्हणे अधर्म तो धर्म । जेणे नारायण वश्य होय ॥

३३. दुःख केले तरी न होतो जीवंत । भवरोगाचे वैद्य येथे आहे ॥
जावे तुम्ही शरण संताला हो आधी । उठेल हो पुत्र तेव्हा तुमचा ॥

३४. स्वामी तेथे आले प्रत्यक्ष हो पूर्ण । हात फीरवीती सर्व बाळावरी ॥
वरदहस्त जेव्हा लागला बाळासी । जीवंत हो जाहला तात्काळाची ॥

३५. बाळ सजीव जाहले सुब्बराव पहातो । लोळोनी मागतो क्षमा जाण ॥
सुशीलम्मा हो उठीली स्वामीचरणी पडली । उठवीती स्वामी हस्त धरुनी ॥
विठाबाई म्हणे आनंदे आनंद । सर्व ब्रह्मानंद नाचताती ॥

नामाचें महत्व· नामसंकीर्तन· पण द्रव्यासाठीं केलेले नव्हे ![३६] भावाशिवाय नाम म्हणजे दगडावर पाऊस ![३७] हाच भाव अन्यत्र आहे· :—

विठाबाई नामी नसता प्रेमरंग । काय भजनी रंग नाचोनीया ॥
भाव नसता राग ताल स्वर जाण । संस्कार नसता प्रेत समजा पूर्ण ॥
भक्ती नसता भजन कीर्तन हे सारे । असे व्यर्थ........ ॥
विठाबाई म्हणे मनावीण जाण । जीबेवीत साखर तैसे ताण ॥

भावाबरोबरच ‘ विदेही ’ होऊन नाम घेण्यावर—विठाबाअीचा अधिक भर आहे:—

विठाबाअी सांगत खूण । विदेही गर्जा नाम जाण ॥
कोटी कोटी नाम करीता देहानें । न चुके बंधन समजा आधी ॥
विदेह प्रेमाने येक नाम घेता । आनंदाश्रु जाता नयनी सदा ॥
विदेहाने नाम म्हणणारे वीरळ । भेटी होणेसी गांठी पुण्य पाहिजे ॥
नाम म्हणता देही न भेटतो जाण । म्हणता विदेही प्रत्यक्ष ते ॥
स्वामी नाम विदेह धरी । देहसंबंध दूर करी ॥
विठाबाई म्हणे नाम चिदंबर । विदेह अंतर शोधोनी म्हणा ॥
जडदेह सोडोनी विदेहाने जाण । उच्चारावे पूर्णचिदंबर ॥

असे कितीतरी अभंग आढळतात· भावाचे दोन प्रकार व वाणीचेहि दोन प्रकार विठाबाअीनें सांगितले आहेत·[३८] नामाचा महिमा योगापेक्षा व

---

३६· विठाबाई म्हणे कलयुगीं कीर्तन । पैशाशी नर्तन करीताती ॥
३७· भावेवीण नाम घेता चिदंबर । दगडावरी प्रजन्य तैसे जाणा ॥
३८· भावामाजी दोन प्रकारीचे जाण । देहभान विदेहीभान जाण ॥
ऐसे वाणीमदे दोन वाणी जाण । देह आणी विदेहवाणी समजा ॥
देहवाणी म्हणजे इंद्रियाने निघते । ऐका सांगते खूण तुम्ही ऐका ॥

ज्ञानापेक्षा अधिक आहे असेंहि विठाबाअी म्हणते.[३९] भक्तीचें सामर्थ्य सांगतांना तिला मीराबाअीचें स्मरण होतें.[४०] चोखामेळा, गोराकुंभार, रोहीदास चांभार, सावंतामाळी, तुकाराम, इ. भक्तांबद्दलहि तिनें आदर व्यक्त केला आहे. ज्ञानदेवादि संतांबद्दलचा पुढील अभंग ह्या आदराची कल्पना देअील:—

प्रत्यक्ष तो विष्णु असे ज्ञानेश्वर । उद्धव अवतार नामदेव ॥
निवृत्ती तो हर ब्रह्म तो सोपान । ऐसे अवतार बहुत जाण ॥

विठाबाअींच्या अभंगांतील भक्तीची रसाळता अंतःकरण ओलें करणारी आहे.

पण प्रसंगीं तिच्या अभंगांत आवेशहि आढळतो अशा अभंगांत समाजाचें तिचें निरीक्षण आहे व तिला वाटणारी चीडहि आहे. पुढील अभंग त्या दृष्टीनें नजरेखालून घालण्यासारखे आहेत:—

संतासी भेटता अंग चोरीतो जाण । वेश्या सुरा उरा आळंगीतो ॥
देवाकरीता पैका देता रडे रुस्का । वीषयालागी फुका लुटीतसे ॥
कोडीयाचे बहुत आहे गोरेपणा । अहंकारी ज्ञान तैसे समजा ॥
विठाबाई म्हणे तोंडावरी थुंका । जातो यमपुरी भोगावया ॥
नकळे जया भक्तीचे महीमान । त्याने ब्रह्मज्ञान बोलु नये ॥
विठाबाई म्हणे ज्यासी नाही भक्ती । त्याने भगवे हाती धरु नये ॥

---

३९. कलीयुगी हो नामापेक्षा मोठे नाही । योगयागयज्ञ त्रणतुल्य ॥
योगयाग वर्ज करी । नाम वीदेही हो धरी ॥
नादबिंदु नको पाही । इडा पिंगळा नको काही ॥
ब्रह्मरंध्र नको शोधुं । आसन नको कधी घालु ॥
नको भ्रमरगुंफा पाही । नको चवद चक्र काही ॥
हृदई कमळ नको आठउ । कुंडलीनी नको शोधु ॥
यम अहो जाण। भागवतामदे मुख्य । नाम म्हणता सख्य होते त्यासी ॥
४०. मीराबाईचे वीण नाम घेता जाण । अमृत हो पूर्ण जाहले जाण ॥

काय गातो अर्थ त्यांनाच कळेना । राग गातो नाना आळवोनी ॥
विठाबाई म्हणे जळो त्यांचे तोंड । व्यर्थ व्याली रांड त्यासी समजा ॥
परस्त्रीगमन कदापी न करा । त्यापेक्षा बरा नपुसक ॥
घरोघरी गुरु जाण । ज्ञान सांगणार पूर्ण ॥
शब्दज्ञान ते सांगती । अधोगती दोघे जाती ॥

विठाबाओी दृष्टांत देते तेहि घरगुती व कुणबाऊ जीवनांतील असतात.[४१] तिच्या अभंगांत ज्ञानाचा दिमाख नाहीं, पण भावाचा फुलोरा आहे.

विठाबाओीचे अभंग मला तरी मोलाचे वाटतात. तिची अभंग—वाणी प्रबल आणि प्रेमळ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामागें अनुभवाचें बळ आहे.

---

४१. विठाबाओी म्हणे धान्याबरोबर । धाटचारा जाण येतो समजा ॥
तैसे धाटीचारा सिटा समजा जाण । नाम धान्य मुख्य समजा पूर्ण ॥
दुधापासुनी ताक ताकापासुनी लोणी । लोणीपासुनी तुपस्वाद ॥
विठाबाई म्हणे निराकार दूध । आकार हे तूप नाही म्हणुनी ॥
अभंग हे दूध मन हे रवी जाण । घुसळीता मीळते लोणी जाण ॥

# 'गुरुमाळिका' : अेक अध्याय

मराठी वाङ्मयांत 'चरित्रकार' महीपतीचें नांव अजरामर झालें आहे. आणखी अेका महीपतीचा परिचय करून देऊन त्याच्या चरित्राच्या उपलब्ध भागावर कांहीं प्रकाश टाकत आहे.

हे महीपति म्हणजे कर्नाटकांतील प्रसिद्ध संत महीपतिस्वामी काखंडकी. ' गुरु-महीपति ' असें अंकित धारण करणारे 'महीपति-दास' ते हेच.[१] काखंडकी गांवचे म्हणून गांवाचेंच नांव आडनांवाप्रमाणें वापरलें जाऊं लागलें. याच गांवीं महीपतींचें वृंदावन आहे.

महीपतींचे समकालीन संत, त्यांचा काळ आणि त्यांनीं केलेली वाङ्मयीन कामगिरी विचारांत घेणें जरूर असलें तरी प्रारंभीं, उपलब्ध झालेल्या हस्तलिखिताच्या आधारें मिळणारी माहितीच पाहणें योग्य वाटतें.

हस्तलिखित किती जुनें आहे तें सांगतां येत नाहीं. कागद फार जुना नसला तरी प्रत शंभर वर्षांपूर्वी केली असावी असा अंदाज आहे. अेका पृष्ठावर वॉटर मार्कमधील 'British Make' अशीं अक्षरें स्पष्ट दिसतात.

---

१. 'Haridasas of Karnatak' Appendix, p. IV.

अध्याय चतकोर कागदावर लिहिला असून तशीं अेकूण १७ (पाठपोट ३४) पृष्ठें मजकूर आहे. उपलब्ध अध्यायांत २२१ ओव्या आहेत. अध्यायाच्या शेवटीं ग्रंथाचें, कवीचें आणि अध्यायाचें नांव येतें.

ग्रंथनामासंबंधीं व कवीसंबंधीं पुढें चर्चा करीत असल्यानें येथें अध्याय-समाप्तीचा निर्देश उद्धृत करून कांहीं विचार मांडतों. अध्यायाच्या अखेरीस असा गद्य मजकूर आहे : "इति श्री गुरुमाळिका ग्रंथ ॥ ३ अध्याय समाप्तः॥ इति श्री परमहंसपरिव्राजकाचार्य छद्‌गुरु रुचिरानंद तत्छिष्ये रचित महिपति गुरु परमहं (स?) भास्कर मुद्राधारिणे बाछा विजयपुरागमनोनाम प्रथमोध्याया रिति॥ छुभं• भवतु राजादिराज गुरुमहिपतिराज समर्थरितीति ॥ अथ द्वितीयोध्याय प्रा ॥"

यांतील व्यक्तिनामें बाजूस ठेवलीं तर प्रश्न येतो हा अध्याय कितवा? तिसरा कीं पहिला? संपूर्ण ग्रंथ मिळेपर्यंत हा प्रश्न अनिर्णीतच राहणार. अेक उत्तर सुचतें तें असें कीं : मूळ ग्रंथांत अनेक गुरुंचीं चरित्रें असल्यानें (हा तर्क ग्रंथाच्या नांवावरून) महीपतींच्या भक्तानें त्यांतील महीपति-चरित्राचाच भाग नकलला असावा. त्या ग्रंथांत महीपति-चरित्राचे अध्याय अेकाहून जास्त असल्यानें त्यांतील पहिल्यास 'प्रथमोध्याय' म्हटलें असावें. आणि अध्याय-समाप्तीच्या जागीं मुळाप्रमाणेंच 'तिसरा अध्याय समाप्त' असा उल्लेख केला असावा.

तेव्हां मिळालेला अध्याय 'तिसरा' आणि 'पहिला' दोन्ही असण्याची शक्यता आहे. मुळांतील 'चौथा' व महीपति-चरित्राचा 'दुसरा' अध्याय मात्र लिहावयाचा राहून गेला असें दिसतें. 'अथ द्वितीयोध्याय प्रा.' हा उल्लेख ज्या प्रमाणें या गोष्टीचा द्योतक आहे, त्याप्रमाणें महीपतींचें 'लौकिक' चरित्रच पहिल्या अध्यायांत आलें आणि 'अलौकिक' असें 'महीपति-स्वामीं'चें चरित्र यावयाचें राहिलें; यावरून आणखी कांहीं अध्याय महीपति-चरित्राला 'गुरुमाळिका'-कारानें दिले असले पाहिजेत हें स्पष्ट होतें. कमींत कमी आणखी अेक अध्याय तरी असावा.

मंगलाचरणावरून कवि विष्णु-दास असल्याचें स्पष्ट दिसतें. विष्णूच्या अनेक अवतारांना विविध रूपांना तो नमन करतो. मंगलाचरणाच्या ओव्या शैलीच्या दृष्टीनेंहि पाहण्यासारख्या आहेत :—

जयजयाजि रुक्मिणिकांता । जगज्जीवना गोपिनाथा ॥
पुराणपुरुषा मन्मथताता । गोविंदा अच्युत नरहरे ॥ १ ॥
कमललोचना करुणाकरा । करवीरपालका कमलावरा ॥
कंजनाभा भुवनसुंदरा । शंकरमित्रा वैकुंठपति ॥ २ ॥
वृंदावनविलासा हृषिकेशि । वृजजनप्रिया गोकुळवासि ।
त्रिभुवनपालका गुणराशि । नकळे श्रुतिसि महिमा तुझि ॥ ३ ॥

या ओव्यांतील मार्दव विष्णूचें 'सुकुमार' स्वरूप वर्णन करणारें आहे. हा विष्णूहि ' शंकरमित्र ' आहे. पण त्याचें ' उग्र ' स्वरुप 'बोध्यरूप' व ' कलंकि ' अि. अवतार यांचेंहि स्मरण कवीस होतें:—

क्षीराब्धिवासा शेषशयना । कंसातंका करुणाघना ।
पुतनारि शकटभंजना । अगबगमर्दना गोपाळा ॥ ४ ॥
मधुकैटभारि मुरमदना । मछकूर्मवराह वामना ।
क्षत्रियातंका रेणुकानंदना । प्रल्हादपालना नरहरे ॥ ५ ॥
रावणांतका रामचंद्रा । पांडवपालका यादवेंद्रा ।
बोध्यरूपा गुणसमुद्रां । कलंकि उपेंद्रा तु झाहालासि ॥ ६ ॥

संदर्भ-समृद्धि हें या मंगलाचरणाचें वैशिष्ट्य प्रथमच डोळ्यांत भरतें. विष्णूच्या अनेक अवतार-कथा कवि जातां जातां वाचकांपुढें उभ्या करतो. ही विष्णुभक्ति ( कृष्णभक्ति असेंहि म्हणावयास हरकत नाहीं ) चरित्रनायक हा ' दास ' असल्यामुळें चरित्राला उठावदार पार्श्वभूमि देते. कारण कर्नाटकांतील 'दास' परंपरा विठ्ठलभक्तांची आहे.

मंगलाचरणाच्या शेवटी कवि सांगतो कीं सद्गुरूनें येऊन ' मस्ताकि हात ठेविले ' आणि म्हटलें :—

मग म्हणे सावध होई । जवळि घे लेखणि आणि शाई ।
संतचरित्र लिहित जाई । मि तुज पाहि साह्य असे ॥ १२ ॥

असा ' दृष्टांत ' झाल्यानेंच कवीला लेखनाची स्फूर्ति आली. ' कर्ता करविता सद्गुरु थोर ' असें तो म्हणतो. येथें त्यानें दिलेले दृष्टांत जुनेच असले तरी समर्पक वाटतात :—

मृदंग वाजे बहु सुंदर । परि अंगकला नव्हे साचार ।
वाद्य करितो वाजविणार । नानाप्रकार नाद उठति ॥ १५ ॥
कि जैसे खांब सूत्र बाहुलि । सूत्रा दोरे खेळति चांगलि ।
परि चालविता नर गुप्तचालि । नाचविलि तैसि नाचति ॥ १६ ॥

आपल्या गुरूचें नांव कवि येथें घेत नाहीं. पण गुरुबद्दलचा त्याचा आदर चांगलाच व्यक्त झाला आहे.

जुन्या कवींच्या चारित्रांना पुराणाचेंच स्वरूप आलेलें दिसतें. महीपति-चरित्र देखील महीपति-पुराण बनतें कीं काय असें प्रारंभीं वाटतें. प्रत्यक्ष चरित्राला कवि अशी सुरुवात करतो :— " कलियुगांत फार पापें होऊं लागलीं म्हणून धरा कंपित झाली. (भूकंपावर केलेली ही कल्पना रम्य आहे.) गौतमीचें स्वरूप घेऊन ती अिंद्राकडे गेली. अिंद्र सर्व देवासह ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेव सर्वांना घेऊन विष्णूकडे गेला. विष्णूनें सर्वांना अभय देऊन जय-विजयांना पृथ्वीवर अवतरण्यास सांगितलें.

लाउनि सर्वत्र भक्तजनि । जनासि तुष्टवि मत्कीर्तनि ।
नाममहिमा प्रगट करुनि । ध्यानि मनि अखंडत्व ॥ २४ ॥

अशी कामगिरी त्यांना दिली गेली. आणि जय-विजय पृथ्वीवर आले." या कथेवर पडलेली पुराणाची छाया अपरिचित वाटणारी नाहीं.

जय-विजय पृथ्वीवर आले असें कवीनें सांगितलें तरी जयाचें पुढें काय झालें तें कळत नाहीं. ' अगाळि ' नांवाच्या गांवांत कोनेरपंत नांवाचे ब्राह्मण गृहस्थ राहात. त्यांच्या पोटीं विजयानें जन्म घेतला. त्याला ' महीपति ' असें नांव ठेवलें गेलें.

मुलगा सुलक्षणी होता. म्हणून पित्याला फार हर्ष झाला. महीपति पांच वर्षांचा झाला. उपनयन करावयाचें, पण शक्ति नाहीं. मनांत विचार आला :—

विजयपुर शहर थोर । बाछाइ वस्ति मातबर ।
सरदार आणि सावकार । उदमिदार तेथें वसति ॥ २८ ॥

तेथें जाऊन राहावें. वाटेंत दोन वस्त्या करून सहकुटुंब कोनेरपंत विजापुरास गेले.

तेथें सहामहिन्यांत सर्वांशीं स्नेह जोडून त्यांनीं महीपतीचा ‘ वृतबंद ’ केला. ‘ विद्याभ्यास सिकउनि ’ सद्गुणी केलें. महीपतीनें तारुण्यांत प्रवेश केला तशी कोनेरीपंतांची ‘ अवदशा ’ संपली. कवि म्हणतो,

जैसा उगवता शशांक । तस्कर होय पराङ्मुख ।
तैसा उदय होता दैवार्क । दरिद्रकालोख निरसलि ॥ ३४ ॥

महीपतीची कीर्ति वाढवावी असेंच असेंच ‘ देवाचे चिंति ’ होतें. म्हणून रुक्मिणीवरानें त्याचा संसारभार ( लग्नाचें वर्णन कवीनें केलेलें नाहीं, ) वागविला. रोजगार लावला. कवि सांगतो :—

प्रथम खवासखानाचे पदरि । राहुनि सर्व दंदा अवरि ।
यजमानकृपा होता भारि । बज्यायत् स्वारि करितसे ॥ ३७ ॥

पण महीपतींच्या मनांत कधींच गर्व उपजला नाहीं. श्रावण किंवा पुंडलिका-प्रमाणें ते आअीवडलांची सेवा करीत. देवद्विज, अतिथि यांचा परामर्श घेत. ‘ संसारि असोनि परमार्थ ’ साधीत.

अेक दिवस धन्यानें बादशहाकडे जाऊन हिशेब समजावून देण्यास महीपतींस सांगितलें. ‘ महिपतिराव ’ गेले. त्यांना पाहून बादशहा ‘ मनि तोषला. ’ त्यानें आपल्या मुत्सद्यांना बोलावून त्यांचें काम करावयास सांगितलें.

बाछाव म्हणे मुछदिप्रति । हा बालक जैसा बृहस्पति ।
यासि पाहोनि माझि वृत्ति । झालि तृप्ति तनुमनेसि ॥ ४६ ॥

अेवढेंच नव्हे तर 'याशि रक्षावे स्वगृहि' अशी आज्ञा केली. कचानें संजीवनी आणली त्याप्रमाणें महीपतींनीं सांगितल्या कामांत यश आणलें म्हणून धन्याला आनंद झाला. त्यानें 'वेतन अधिकोतरि चडविले.'

दुसऱ्या दिवशीं दरबारांत बादशहानें खावासखानाकडे महीपतीची मागणी केली. आणि 'महिपातिराव राहिले दरबारि'. आधींच कर्णासारखा दाता. त्यांत दुर्योधनानें त्याला अभिषेक केला. मग याचक तृप्त होणार नाहींत तर काय ? 'अैसे तीसवर्षपर्यंत' महीपतींनीं कारभार केला. लहान थोरांना सारखेंच वागविलें.

'लोकापुरां'त भास्करस्वामी म्हणून अेक अधिकारी पुरूष होते. ते 'सारवाड' ग्रामीं आले. त्यांच्या दर्शनासाठीं लोक तिष्ठत आणि दर्शन होतांच वसंत आल्यावर कोकिळांनीं आनंदित व्हावें तसें आनंदित होत. अनेक जणांच्या अिच्छा पुरविणारे 'कल्पवृक्ष' किंवा 'चिंतामणि' असा त्यांचा लौकिक सर्वत्र पसरला.

महीपतींची पत्नी 'तिमाबाइ' पुत्रप्राप्तीसाठीं भास्करस्वामींचें नित्यदर्शन घेऊं लागली.

महीपतींचा नित्यक्रम सुरूच होता. अेक दिवस बादशहाचें बोलावणें आलें म्हणून जात असतां वाटेंत अेका 'नंग्या' फकीरानें त्यांनां जवळ बोलावलें. जवळ बसवून घेतलें. रत्नाची परीक्षा करावी तशी महीपतीची परीक्षा त्यानें चालविली.

फकीरानें महीपतींचें 'पवित्र' हातांत घेतलें आणि खंदकांत नेऊन टाकलें. महीपति त्याच्या चेहऱ्याकडे 'टकमाकिं' पाहूं लागले. आणि कामाला निघून गेले. परत येतांना फकीरानें विचारलें 'पवित्र पाहिजे ?' त्या खंदकांतून त्यानें तीन 'पवित्रें' काढलीं. या कथेला झालेला 'परतत्वस्पर्शु' मुळांतून पाहण्यासारखा आहे :—

फकिर बोले रायालागुन । तुझे पवित्र घे वळखुन ।
म्हणता अंतरि संतोषेन । स्ववस्तुखुण पाहतसे ॥ २९ ॥

तीनि पवित्र येकसारखा । पाहता देहस्मृति हरपलि देखा ।
दृष्टि जडुनि ते लटिका । लाविले टकमक वस्तुसि ॥ ३० ॥
जैसे सच्चिदानंदपद । पाहता नाममात्र त्रिविध ।
परि ते अखंडत्व अभेद । भेदाभेद पै नाहि ॥ ३१ ॥
गोडि मृदु आणि शुभ्र । तीनि मिळुनि येक साखर ।
शुभ्रप्रकाश सितळाकार । परि येकचि चंद्र जाणिजे ॥ ३३ ॥
जैसे पाहता तिनि पवित्र । रायाचे सुवळे अज्ञानसूत्र ।
हृदयि उगवला ज्ञानमित्र । अपपर हे तंत्र नाटवेचि ॥ ३४ ॥

अिकडे असें घडलें तर तिकडे भास्कर स्वामी ‘ तिमंवा ’ ला सांगत होते कीं पतीला घेऊन लौकर ये. पण तिनें शंका विचारली. ‘ माझेनें कैसे येतिल पति ? ’ कारण पति ‘ तमोमति ’ असल्याचें ती म्हणते.

महीपतींच्या मनांत ‘ वैराग्य ’ उत्पन्न झालें. ते फकीराचे चरण धरूं लागले पण :—

तो फकीर म्हणे आम्ही यवन । तुम्ही अहो शुद्ध ब्रांह्मण ।
धरू नये आमचे चरण । अयोग्यपण अम्हासि ॥ ४६ ॥
आता तुम्ही मनि अनुताप उपजला । तरि सद्गुरु पाहिजे केला ।
तुज योग्यवंत आम्ही योजला । ऐक वहिला सांगेन ॥ ४७ ॥

असें म्हणून फकीरानें ‘ सारवाड ’ गांवीं ‘ भास्करयती ’च्याकडे जावयास महीपतींस सांगितलें.

रात्रीं पति-पत्नींच्या भेटींत फकीर आणि भास्करस्वामी यांची हकीकत परस्परांना समजली. तिमंवानें यतींनीं बोलीवल्याचें पतीस सांगितलें. महीपतींना फकीराच्या बोलण्याची प्रचीति आली.

दुसऱ्या दिवशीं बादशहाची परवानगी घेऊन उभयता ‘सारवाड’ला गेले. स्वामींच्या दर्शनानें महीपतींना फार हर्ष झाला. प्रसादाचें दूध पिऊन अंतः-करणांत ज्ञान उद्भवलें मी-तूंपण हरपलें.

जैसे लवण सागरि मिळाला । तो सागराचि होवोनि ठेला ।
मग लवच नाहि उरला । समरसला स्वस्वरूपि ॥ १८६ ॥
तैसा भास्कर आणि महिपति । येकरूप झाले आत्मज्योति ।
बाहेत्कार तयाचि प्रकृति । जनासि भासति प्रथकार्यक ॥ १८७ ॥

स्वामींनीं 'मौळि स्पर्शोनि वरदकर । ब्रह्मसाक्षात्कार दाखविला.' दोन गुणी पुत्र होतील, असा आशीर्वाद तिमंवालाहि मिळाला.

दोन प्रहरांत यावयास सांगितलेले महीपति कां आले नाहींत हें पाहावयास बादशहानें हुजऱ्या पाठविला. हुजऱ्याबरोबर महीपतींनीं पत्र पाठविलें:— "आम्ही गुरुचरणीं आता लीन झालो. कारभार आतां पुरे. जमा झालेलें द्रव्य आपण राजभांडारांत ठेवावें."

बादशहा उद्विग्न झाला. त्यानें 'तुमचें धन आम्हाला नको' असें कळविल्यावर महीपतींनीं पत्नीस सांगितलें:—"घरीं जाऊन धान्य लुटव. अश्व, उंट, वृषभ, दासी इ. सर्व दे आणि ब्राह्मणाला गृहदान करून टाक". तिमंवानें त्याप्रमाणें केलें. 'भवरोग निरसला.'

बादशहा स्वतः महीपतींचें मन वळविण्यास आला. पण त्याला निराश होऊनच परतावें लागलें.

येथेंच अध्याय संपतो. कवि पुढील अध्यायाची प्रस्तावना करतो:—

आता येथुनि कीर्तिचा अभिनव । पुढिले अध्याइ एका अपूर्व ।
संताचे महात्म असे अपूर्व । धरुनि भाव हृदयांतरि ॥ २१९ ॥

बोधामृताचें रसायन प्राशन करवून, आशातृष्णादि कफपित्त महीपतींच्या शरीरांतून गुरुवैद्यांनीं काढलें, त्यांचें 'लौकिक' जीवन संपविलें. 'महिपतिरायां'चें चरित्र या अध्यायांत आलें आहे, 'महीपतिस्वामीं'चें चरित्र असलेला अध्याय अजून उपलब्ध झालेला नाहीं; अशी हुरहूर वाटली तरी 'महीपतिस्वामीं'चें दर्शन 'महिपतिरायां'त कवीनें चांगल्या तऱ्हेनें घडविलें आहे हें कबूल केलें पाहिजे.

उपलब्ध झालेल्या अध्यायाचें वाङ्मयीन मूल्यहि विचारांत घेण्यासारखें आहे. जुन्या चरित्रवाङ्मयांत (आणि त्यामुळें वाङ्मयेतिहासांत) नवी भर पडत आहे. अशा चरित्रांत काव्यगुणांची फारशी अपेक्षा आपण करीत नसलों तरी या अध्यायांतील यमकानुप्रास, दृष्टांत यांचें सौंदर्य आणि प्रसंग व व्यक्ति यांचें चित्रण लक्षांत राहण्यासारखें आहे. आपणांस माहीत असलेल्या महीपति ताहराबादकरांखेरीज आणखी अेका महीपतीचा परिचय या अध्यायामुळें होत आहे, हें याचें खरें महत्व.

वाङ्मयीन दृष्टीबरोबरच अैतिहासिक दृष्टीनेंहि या अध्यायाचें मूल्यमापन होणें अगत्याचें वाटतें. कारण महीपतींच्या जन्ममृत्यूचे शक, त्यांचें वाङ्मया याबद्दल अगर स्वतःबद्दल कवि कांहींच माहिती देत नाहीं. विजयपूरचा हा बादशहा कोणता? भास्कर स्वामी व नंगा फकीर यांच्याबद्दल आणखी कांहीं माहिती मिळते काय? 'गुरुमाळिकें'त आणखी कोणाचीं चरित्रें असतील? अशा कांहीं प्रश्नांचीं उत्तरें शोधल्यावर हें मूल्यामापन यथार्थ ठरू शकेल.

या मराठी अध्यायावर आणि परंपरागत माहितीवर आधारलेलें महीपति स्वामींचें संक्षिप्त चरित्र 'कीर्तनगळ संग्रह' (महीपति व त्यांचें चिरंजीव कृष्णराव यांच्या पदाचा संग्रह) या पुस्तकांत आढळतें. त्यांत दिलेली उत्तरायुष्याची हकीकत परंपरागत माहिती व 'महीपति स्वामी स्तवन' यां सारखीं प्रकरणें यांच्या बळावर दिलेली आहे. तीहि पाहिली पाहिजे.

भास्करस्वामींच्याकडे महीपति गेले, येथेंच मराठी अध्यांय संपतो. भास्करस्वामी हेच शेवटीं गुरु झाले असें आपणांस वाटलें तरी सत्य निराळेंच आहे. त्यांनीं महीपतींना ब्रह्मानंदाचा अनुभव आणून दिला तरी पाठविलें मात्र दुसऱ्याच अधिकारी माणसाकडे.

अखेर महीपतींचे खरे गुरु झाले ते 'प्रल्हाद-कृष्णाचार्य'. 'उमरजी आचार्य' म्हणून हे आणि यांचें घराणें प्रसिद्ध आहे. कृष्णेच्या तीरावर 'कोल्हार' येथें हे राहात. महीपति त्यांच्याकडे गेले ते तेथेंच राहिले. तेथेंच

एका शमीवृक्षाखालीं त्यांनीं देह ठेवला. त्यांच्या मृत्यूचा शक उपलब्ध नसेला तरी तिथि उपलब्ध आहे. ते मार्गशीर्ष शु. प्रतिपदेस समाधिस्थ झाले.

त्यांच्या अस्थि काशीस नेऊन गंगेंत टाकण्यासाठीं गोळा केल्या गेल्या. पण त्यांचें पाणी होऊन तें कृष्णेस मिळालें. जिथें गुरु, तिथें काशी असेंच जणु स्वामींनीं सिद्ध केलें.

निर्वाणानंतर पुत्र कृष्णराव याच्या स्वप्नांत येऊन स्वामींनीं दृष्टांत दिला : "मी ज्या शमीवृक्षाखालीं तप करीत असें तेथें द्वादशक्षेत्रांतील शालिग्राम आहेत. ते बाहेर काढून काखंडकीस स्थापावेत व तेथें वृंदावन बांधावें". यावरून त्यांचें निर्वाण कोल्हार येथें झालें व काखंडकींत त्यांचें वृंदावन आहे, असें स्पष्ट होतें. तेथें प्रतिवर्षी कार्तिक वद्य दशमीपासून मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपर्यंत उत्सव होतो.

भास्करस्वामींनीं महीपतींनां प्रल्हाद कृष्णाचार्यांकडे का पाठविलें असावें हा विचारहि महत्वाचा आहे. आपला कवि भास्करांचा उल्लेख 'यति' किंवा 'अवधूत' असा करतो. म्हणजे ते शंकराचार्यपंथीय 'अद्वैती' होते. आणि महीपतींचें घराणें तर वैष्णवांचें—म्हणजे द्वैती. यासाठीं 'द्वैती' घराणें म्हणून प्रसिद्ध असलेल्या उमरजी आचार्यांकडे महीपतींना त्यांनीं पाठविलें.

मराठी अध्याय व परंपरागत माहिती यांत कांहीं फरकहि आढळतो. आपला कवि 'महीपति' असेंच नामकरण झाल्याचें सांगतो. पण त्यांचें मूळ नांव 'गुराचार्य' असल्याचें कळतें. (या नांवावरूनहि घराण्याचें तत्वज्ञान ध्यानीं येतें). मराठी अध्यायांत सांगितल्याप्रमाणें 'तुकंवा' ही महीपतींची बहीण नसून भावजय (थोरल्याभावाची बायको) असा समज आढळतो. पण महीपतींनां थोरला भाऊ असल्याचा उल्लेखहि आमचा कवि करीत नाहीं.

महीपतींच्या पहिल्या लग्नाची हकीकतहि उपलब्ध अध्यायांत नाहीं. 'ऐगळि' गांवच्या शानभोगांच्या अकुलत्या एका मुलाशीं महीपतींचें पहिलें लग्न झालें. ही मुलगी सुंदर होती पण पंगु होती. तिच्याशीं कांहीं दिवस त्यांनीं संसार केला. एक मुलगाहि झाला. त्याला आजोबांच्या संपत्तीचा वारस करून

व तेथेंच ठेवून महीपति अेकटेच विजापुरास आले. कारण त्यांचे आअीवडील तेव्हां विजापुरांत रहात होते. नंतर महीपति राजदरबारीं मान्यता पावल्यावर त्यांचा दुसरा विवाह झाला. हीच ‘तिमंवा’ किंवा ‘त्रिवेणी’.

‘तिमंवा’ला दोन पुत्र होतील असा आशीर्वाद कवि भास्करस्वामीं कडून देवावितो. पण पुढील अध्याय न मिळाल्यानें या विषयींची जिज्ञासा अतृप्त राहते. परंपरा असें सांगते कीं देवराय आणि कृष्णराव हे त्रिवेणीपासून झालेले दोन पुत्र होत.

निर्याणसमयीं महीपतींनीं देवरायास आपली ‘लेखणी’ दिली. तिच्याच बळावर त्यानें जालवादीची देसगत व ‘डोणी’ शिवाजीचा लौकिक मिळविला. तर कृष्णरावानें मिळालेला ‘तंबोरा’ कथाकीर्तनांसाठीं वापरला. अेकाचे वंशज ‘कुळकर्णी’ झाले तर दुसऱ्याचे हरिदास झाले.

महीपातिस्वामींच्या चरित्राविषयीं अितिहासाची साक्ष काढली तर अनेक चरित्रां प्रमाणें महीपतिचरित्राला केवळ पुराणाचें स्वरूप आलेलें नाहीं हेंच ध्यानीं येतें. भास्कर स्वामी आणि शानंगा फकीर यांचीं नांवें कदाचित अितिहासांत कोठेंच आढळणार नाहींत. (हा निर्वाळा अितिहासकारांनीं द्यावयाचा) पण विजापूरच्या परिसरांत तीं अपरिचित नाहींत.

भास्करस्वामींचा विचार करता ही अेक औतिहासिक व्यक्ति होती; हें मान्य करावें लागतें. ‘लोकापूर’ हें गांव रामदुर्ग जवळ आहे. आणि तेथें अेक मठ आहे; असें अैकतों. ‘सारवाड’ हें गांव विजापूर जवळ असून तेथें भास्करस्वामींची सामाधीहि आहे. आणि त्याहूनहि महत्वाची गोष्ट म्हणजे महीपतींनीं कांहीं पदांत भास्करस्वामींचें नांव व त्यांनीं घडविलेला अमृतानुभव यांचें वर्णन केलें आहे.

फकीराचा उल्लेख आपला कवि ‘नंगा’, ‘नग्गिशा’, ‘शानंग्गी’ असा करतो. ‘शा नंगा वाली (किंवा वली)’ म्हणून हा त्या भागांत प्रसिद्ध आहे. ‘नंगी’, नांवाची त्याला अेक बहीण होती असें म्हणतात. ‘राजकिल्या’ जवळील खंदकापाशीं याची (विजापुरांत) कबरहि आहे.

हा द्वंद्वातीत होता. याची विरतित तर अशी होती कीं बादशहाचा शिरपेंच रस्त्यांत पडला होता. त्याचा स्पर्श 'अंगुष्टास' झाला म्हणून त्यानें अंगुष्टच कापला ! ही कथा मराठी अध्यायांतहि विस्तारानें दिली आहे. त्यानें खंदकांत फेकलेलें महीपतींचें 'पावित्र' (तें पवित्र होतें म्हणूनच फकीरानें त्याला स्पर्श केला); ही दरबारी मोहोर होती; ही गोष्ट आपला कवि सांगत नाहीं. तीहि महत्वाची आहे.

चरित्रांत उल्लेखिला गेलेला 'बाछा' किंवा 'बाछाव' विजापूरचा महमंद आदिलशहाच असला पाहिजे. याचें अेक गमक असें कीं महीपतींनीं 'तीस वर्षं पर्यंत कारबार केला', हा उल्लेख.

महीपतींनीं अेकाच बादशहाच्या अमदानींत अितकीं वर्षे नोकरी करणें हें महमंद आदिलशहाच्या बाबतींत जास्त संभवनीय वाटतें. त्याचीहि कारकीर्द तीस वर्षांचीच आहे. पण याहून महत्वाचा भाग म्हणजे खवास खानाचा उल्लेख.

त्याचा विचार करण्यापूर्वीं महंमद आदिलशहाचा विलासी व रंगेल स्वभाव, कर्तबगारी, 'गोलघुमट' बांधविणारी कलादृष्टि यांचें स्मरण होतें.[२] तसेंच शहाजी भोसले, मुराररावं अशा हिंदूनां त्याने दिलेला आश्रय महीपति हे त्याच्याच पदरीं असण्याची शक्यता-नव्हे, खात्री पटवितें महीपति' महंमद आदिलशहाच्या पदरीं कोण म्हणून होते हा प्रश्नहि उपस्थित होतो.

खवासखान हें नांव थोडेंसें गोंधळ उडविणारे आहे. याच नांवाचा शेरशहाचा सेनापति होता. दुसऱ्या अली आदिलशहाचा याच नांवाचा अेक सरदार होता. हाच शिवाजीवर जयसिंगा बरोबर चालून आला होता.[३]

महीपतींचा ' यजमान ' असलेला खवासखान या दोहोहून भिन्न आहे. " विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील मुहमदाचा हा अेक प्रधान. याचें मूळ नांव दौलतखान. इब्राहीम वारला तेव्हां यानें मोठ्या युक्तीनें मुहंमदला राज्य

२. 'मध्ययुगीन चरित्रकोश, (पृ. ६४९)

३. ' मुसलमानी रियासत ' भाग १ला, पृ. २७५.

मिळवून दिले म्हणून यास ' खवासखान ' असा किताब देण्यांत आला. ( शिव भारत प्रस्ता. ७५ ) "; अशी माहिती श्री. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव देतात.[४]

" मुहंमद पहिल्यापासूनच याच्या दुवर्तनास व गर्विष्ठ स्वभावास कंटाळला होता " असेंहि ते पुढें म्हणतात. या ' कंटाळण्या ' चें रूपांत शेवटीं खवीस-खानाच्या वधांत झालें. रियासतकार कारण वेगळे देतात. " सन १६३५ सालीं विजापुरचा दिवाण खवासखान व त्याचा अंकित मुरारपंत व हे दोघेही आपणास भारी आहेत, असें समजून आदिलशहानें दोघोंचाहि वध करविला. ह्या खवास खाननें शहाजहान बादशहास विजापुरावर येण्याविषयीं सूचना पाठविली होती.[५]

हा हिंदुधर्माचा अभिमानी असून महीपतींचें पुराण अैकून त्यांनां यानें घरी बोलावलें व ' कर्णिक ' म्हणून नेमलें. ' कारकून ' ( खवासखानाचा ) असा निर्देश बादशहा करतो.

खवासखानाचा वध स. १६३५ त झाला. याचा अर्थ स. १६३५ पूर्वींच महीपतींची ' नोकरी ' सुरू झाली. अध्यायांत् तरी बादशहा व खवास-खान यांचे संबंध चांगले दिसतात. यावरून तो नुकताच गादीवर आला तेव्हांचा — म्हणजे स. १६२६ मधला — महीपतीच्या व त्याच्या भेटीचा प्रसंग असावा.

स. १६५६ मध्यें महंमद आदिलशहा वारला. त्यापूर्वीं काहीं दिवस महीपतींची व भास्कर स्वामींची भेट, नोकरीचा त्याग अि. घटना घडल्या असाव्यात. महीपतीचा अहंमद आदिलशहाशीं असलेला संबंध व त्यांचा काळ यावर प्रकाश टाकणारा खवासखानाचा उल्लेख महत्वाचा आहे. म्हणूच त्याचा अितका विस्तृत चर्चा करावीशी वाटली.

---

४. ' मध्ययुगीन चरित्रकोश ', पृ. २८१.

५. ' मुसलमानी रियासत ', भाग १ला, पृ. २७२.

महीपति आदिलशहाचे दिवाण होते असा समज आढळतो. पण अितिहासांत हीच नोंद नव्हे तर महीपतींचें नांवहि येत नाहीं. हा समज रूढ होण्यास पुढील ओव्या कारणीभूत झाल्या असाव्यात :—

तो ( महीपति ) आहेत बहुत चतुर । आम्ही देतो त्यासि यख्त्यार ।
आमचे दरबारि अैसा मोहर । नाहि निर्धार या सृष्टि ॥ ५२ ॥
सन्मान करुनिया भारि । आनंदे आणिला राजदरबारि ।
राजहस्ते वस्त्रालंकारि । देविलि यखत्यारे संतोषे ॥ ५४ ॥

यावरून दरबारांत मानाचें स्थान व अधिकार महीपतींना प्राप्त झाला असें दिसते.

मुस्तफाखान, खवासखान, मुल्लामहंमद हे महंमद आदिलशहाचे प्रमुख मुसलमान दरबारी दिसतात. मुराररराव हा हिंदुहि प्रारंभी त्याच्या प्रमुख दरबारी होता. त्याच्या पदरीं असलेल्या ब्राह्मणांत उदाराम[६] व ढुंढिराज[७] हीं प्रसिद्ध नांवें आहेत. महीपति हें नांव कोठेंच कसें येत नाहीं ? ( अेखाद्यास महीभूजः शद्बांत ' महीपति ' आढळला तर संस्कृतच ' कच्चें ' ठरावयाचें ! )

बरें महीपति हे शहाच्या खास विश्वासांतले म्हणून शहाजीकडे ' अमात्यांनां ' पाठवितांनां त्यांत तरी त्यांचा समावेश व्हावयास हवा होता. पण तेथेंहि महीपतींचें नांव येत नांही.[८] यावरून ' दिवाण ' किंवा ' मंत्री ' अशा तऱ्हेचें राजकीय अधिकार स्थान महीपतींनां मिळाले नसावें. शहाचे ते ' खासगी कारभारी ' असावेत. म्हणूनच राजकीय घडामोडी सांगणाऱ्या अितिहासांत त्यांच्या नांवाची नोंद झालेली नाहीं. राजवाड्यांत ते उर्दूत पुराण सांगत असेंहि म्हणतात. ' सत्पुरुष ' म्हणूनच मुख्यतः त्यांना शहानें आश्रय दिला असावा; अशांच्या सहवासाची अपेक्षाच नेमणुकीच्या मुळाशीं दिसते.

---

६. ' शिवभारत ', ४.२५.

७. उपर्युक्त, ४-३१.

८. उपर्युक्त, ९-२९.

महंमद आदिलशहा व महीपति समवयस्कहि असावेत. त्यामुळें सख्याचीहि भावना शहाच्या मनांत प्रथम दर्शनीच निपजली असावी. कारण शहा राज्यावर बसला तेव्हां पंधरा वर्षांचा होता.[१] महीपतींचें वयहि तेव्हां जवळ जवळ तितकेंच असावें. थोडे कमीहि असेल असें ' हा बालक जैसा बृहस्पति ' या शहाच्या उद्गारावरून वाटते. तेव्हां ' मित्र ' या नात्यानें अेका वेगळ्या अर्थी महीपति हे आदिलशहाचे ' मंत्री ' किंवा ' दिवाण ' —खाजगी कारभारांत— होते असें म्हणतां येअील. ' बुसातिने सलातीन ' किंवा ' मुहम्मदनामा ' या ग्रंथांत महीपतींचा शोध घेणें जरूरीचें आहे.

'गुरुमाळिका' हें नांव विचार करण्यासारखें आहे. कवीच्या मनांत त्याला गुरुप्रमाणें असलेल्या कांहीं संतांचीं चरित्रें या ग्रंथांत सांगावयाचीं होतीं असें दिसतें. महीपतिस्वामी, रुक्मांगदस्वामी, जक्कप्पय्या, राघवेंद्रस्वामी या रागी, रोगी, योगी, त्यागी व भोगी म्हणून प्रसिद्ध असलेल्या संतांचीं चरित्रें या ग्रथांत आलीं असावींत असें वाटतें.

याचें अेक कारण म्हणजे वरील संत हे जवळ समकालीन होते. आणि दुसरें व महत्वाचें कारण म्हणजे वरील संतांपैकीं दोघांचीं चरित्रें तरी 'गुरु-माळिकें'त अंतर्भूत झालीं आहेत.

'गुरुमाळिकें'तील अेक संत-चरित्र चार वर्षांपूर्वींच प्रसिद्ध झालें आहे. त्याला नाव मात्र 'रुक्मांगदचरित्र' किंवा 'गुरुवंशावळी' असें दिलेलें आढळतें. या नांवांबरोबर आणखी कांहीं नांवें देतांनां आपल्या ग्रंथास कवि 'गुरुमाळिका' हेंहि नाव देतो. कवीचे गुरु रुक्मांगदस्वामी (म्हणजेच रूचिरानंद) यांचें हें १३ अध्यायीचरित्र आहे.

---

१. ' राधा माधव विलास चंपू ', प्रस्तावना, पृ. ५६. :— " शक १५४९ च्या अश्विनांत इभ्राहिम आदिलशहा वारला व त्याचा पंधरा वर्षांचा महंमदशहा हा मुलगा मसनदीवर बसला."

आणि दुसरें चरित्र महीपतिस्वामींचें त्याचा अेकच अध्याय आपणांस उपलब्ध होत असला तरी महीपति-चरित्रहि रुक्मांगद-चरित्राप्रमाणेंच विस्तृत असावें असाहि विचार मनांत येतो. आणि अितरहि उपरिनिर्दिष्ट संतांचीं चरित्रें असलेले 'गुरुमाळिके'चे आणखी कांहीं अध्याय सांपडण्याची आशा वाटते.

'गुरुमळिकें'तील (संभाव्य) नांवावरूनहि महीपतींचा काळ १७ वें शतक असल्याचें स्पष्ट होतें. श्री. करमरकर व श्री. कलमदानें अि. स. १६५० असा काळ सांगतात[१०] तो स्थूलमानानें समाधीचा असावा.

ग्रंथाचें व कवीचें नांव अध्यायाच्या अखेरीस असें येतें:—

ऐसे गुरुमाळिकाग्रंथ । वदला रूक्मजदास यतार्थ ।
जो श्रद्धायुक्त भागवति भावार्थ । यासि काळ यतार्थ न बाध ॥२२१॥

येथें कवि आपलें नांव 'रूक्मजदास' असें देतो. 'रूक्मांगदचारित्रां' तहि हेंच नांव कवि देतो. हे 'रूक्मज' म्हणजे रूक्मांगदस्वामी किंवा रुक्मिणीपंडित यांचाच उल्लेख कै. भावे 'रूक्मण्णापंत' असा करतात.[११]

अध्यायसमाप्तीच्या गद्य मजकुरांत मात्र कवीचा उल्लेख 'रूचिरानंद-शिष्य' असा आढळतो. रूचिरानंद हें रूकमांगदांचेंच नांव आहे. उपदेशानंतर त्यांचें नवें नांव 'रूचिरानंद' असें ठेवण्यांत आलें. ज्ञानानंद-वासुदेवानंद-राघवानंद-सुरानंद-गौरानंद-रूचिरानंद-(राजीवानंद) अशी ही अेक निराळीच आनंद-परंपरा आहे. आपल्या गुरूला नमन करतांनां रूक्मजदास 'रूचिरानंद' असें नांव अनेक वेळां अन्यत्र वापरतो.

पण हा रूक्मजदास कोण ? व त्याचा काळ कोणता ? महीपतींचें संक्षिप्त चरित्र देतांनां कन्नड पुस्तकांत मराठी अध्यायाचा कर्ता म्हणून

१०. 'Haridasas of Karnatak', (Appendix, p. IV)

११. 'महाराष्ट्र सारस्वत', (पृ. ५१२).

'राजीवानंद' असें नांव देण्यांत आलें आहे. हा रूक्मजदास म्हणजे राजीवानंद हा समज कसा निर्माण झाला तें सांगणें कठीण आहे. राजीवानंद हे रूक्मांगदांचे पट्टशिष्य होते, हेहि कारण या मागें असेल.

रूक्मजदास आणि राजीवानंद अेक नव्हेत हा विचार ठामपणें मांडावासा वाटतो. ज्या अध्यायाचें कर्तृत्व राजीवानंदास द्यावयाचें त्या अध्यायांत कोठेंहि हें नांव येत नाहीं, आणि अन्यत्र या दोन्ही व्यक्ति अेक असें म्हणावयास आधार मिळत नाहीं.

या उलट या भिन्नव्यक्ति असल्याचे संदर्भ 'रूक्मांगद चरित्रां'तून हवे तितके काढून देण्यासरखे आहेत.

त्या चौघामाजी अग्रगणी । केवळ विज्ञानाची रत्नखाणी ।
राजीवानंद परम गुणी । गुणागुणी विरहित ॥

असे उद्‌गार[१२] राजीवानंद स्वतःबद्दल काढणें शक्य नाहीं. आणि राजीवानंदांच्या प्रयाणाबद्दलचा तपशीलवार कालोल्लेख[१३] तर खात्रीच पटविणारा आहे. रूक्मजदास राजीवानंद नव्हे, हें सांगतां आले तरी याहून त्याची अधिक माहिती आज तरी देता येत नाहीं.[१४]

रूक्मजदास हे कोण, कोठले हे जेथें माहीत नाहीं तेथें त्यांच्या जन्म मृत्यूची चर्चाच आज संभवत नाहीं. ते रूक्मांदांचे शिष्य होते. आणि रूक्मांगदांचा काळ श. १५३२ (?) ते श. १६३२ मानला जातो. रूक्मज-

---

१२. 'रूक्मांगद चरित्र' अ. १३–ओ. १३

१३. उपर्युक्त, अ. १३–ओ. ९३

१४. उपर्युक्त, अ. १२–ओ. १०५; अ. १२–ओ. १११; अ. ९–ओ. ७, यांवरूनहि राजीवानंदही कवीहून निराळी व्यक्ति असल्याचें सिद्ध होतें. अ. २–ओ. १३८ मधील 'पुढें जें सांगेल राजीवानंद जाण' या चरणाने दोघांच्या अभिन्नतेची कल्पना पसरली असावी.

दास राजीवानंदानीं श. १६७९ मध्यें समाधि घेतल्याचें सांगतो. म्हणजे 'रुक्मांगद चरित्रा'चा काळ तरी श. १६७९ च्या मागें निश्चित नेतां येत नाहीं. १८ व्या शतकाच्या ( अिसवीसनाच्या ); अखेरीस 'गुरुमाळिका' ग्रंथाची रचना झाली असावी असें यावरुन म्हणतां येअील. आणि रुक्मजदासाचा काळ १८ वें शतक असा सामान्यतः मानता येअील.

असें मानण्यांत अेक मुख्य अडचण अशी, कीं रूक्मजदासानें सत्तरी (किंवा साठी) उलटल्यावर लेखणी हातांत धरली असें म्हणावें लागेल. रूक्मांगद स. १७१० मध्यें समाधिस्थ झाले तेव्हां शिष्य बनायला रूक्मजदास जाणता तरी हवा आणि त्यानंतर स. १७५७ (राजीवानंदांचें प्रयाण) पर्यंत तो साठीच्या घरांत तरी असावा. साठी उलटल्यावर माणूस लिहूं शकत नाहीं असे मला म्हणावयाचें नाहीं. त्याला गुरुप्रमाणेंच दीर्घायुष्य लाभलें असेल तर ही शंका निर्माण होणारहि नाहीं 'रूक्मांगदचरित्रा'चा अभ्यास मांडतांना या प्रश्नाची सविस्तर चर्चा मी करीत आहे; म्हणून येथेंच थांबतों.

'गुरुमाळिके'चा उपलब्ध अध्याय महीपतिस्वामींशीं मराठीचा नवा संबंध जोडत आहे. तसा त्यांचा मराठीशीं जुनाच संबंध. त्यांची मराठी रचनाहि प्रकाशांत आणण्याची उमेद आहे. ते चतुर्भाषाविशारद होते. संस्कृत, पर्शियन व कन्नडबरोबर त्यांना मराठीहि चांगलें येत होतें. त्यांच्या मुलाचीं कृष्णरावाचीं कांहीं मराठी पदें आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ३५७५६ दि: ....../मीलॉ


# कवि अलमखान : थोडी चरित्रपर माहिती

मुस्लिम कवींपैकीं अलमखान या मराठी कवीचा परिचय सरदार मुजुमदारांनी करून दिला-सुमारें अर्धशतकापूर्वी.[१] त्यानंतर डॉ. तुळपुळ्यांनीं त्याचें एक पद देऊन व मुजुमदारांच्या लेखाचा उल्लेख करून एवढेंच म्हटलें : "या कवीचा काळ निश्चितपणें कळत नाहीं, परंतु त्याची भाषा दोन-अडीचशें वर्षांमागील दिसते. याचा गुरु कोणी नागेश्वर म्हणून असावा."[२]

भाव्यांनीं अलमखानाचा निर्देशहि केलेला नव्हता-तो डॉ. तुळपुळ्यांनीं साक्षेपानें केला. पण या कवीचा परिचय झाल्यापासून उलटलेल्या अर्धशतका-एवढ्या प्रदीर्घ काळांत त्याच्याविषयीं, त्याच्या काळाविषयीं, गुरुविषयीं-एकंदर चरित्राविषयीं अधिक विचार होऊं शकला नाहीं. आवश्यक त्या साधनांच्या व प्रयत्नांच्या अभावीं असें झालें असावें.

अलमखानाविषयीं थोडी चरित्रपर माहिती देतां येईल असें साधन मला उपलब्ध झालें आहे : तें म्हणजे 'नागेशलीलामृत' हा हस्तलिखित, अप्रसिद्ध

१. भा. इ. सं. मं. इतिवृत्त, श. १८३७, पृ. २७९.

२. महाराष्ट्रसारस्वत-पुरवणी, पृ. १०७४.

ग्रंथ. वडवाळ येथील नागेश किंवा नागनाथ यांच्या लीला वर्णन करणारा हा ग्रंथ श. १७७० मध्यें भास्कर ऊर्फ भानजी त्र्यंबक देशपांडे यांनीं लिहिला आहे.[३] या ग्रंथांत नागेशांच्या अनेक भक्तांचीं चरित्रें आलीं आहेत—त्यांत अलमखानाचाहि समावेश आहे.

'नागेशलीलामृता'च्या ३९ व्या अध्यायांत 'अलंमखान अख्यान' आलें आहे. तेथें दिली गेलेली अलमखानाविषयींची माहिती पाहून तिचा इतिहासाशीं व इतरांनीं दिलेल्या माहितीशीं कितपत मेळ बसतो हें पाहणें योग्य ठरेल.

अलमखानाचें मूळ गांव 'माहापूर'—विंध्याद्रीच्या पैलप्रदेशांतील, चार भावांमध्यें तो सर्वांत लहान होता :

विंध्याद्री पैल प्रदेसी | अलंखा माहापूरवासी |
चवघे बांधव सुखेसी | माजि गुणरासी धाकुटा हा ‖ ४० ‖

पहिल्यापासूनच त्याची वृत्ति प्रपंचाविषयीं उदासीन होती. परंतु त्याचे भाऊ त्याला प्रेमानें पोषीत होते.

एकादां थोरल्या भावाची बायको डोक्यावर पाण्याची घागर घेऊन येत होती. त्या वेळीं खेळत असलेल्या अलमखानाचा तीर त्या घटला लागला व छिद्र पडलें. त्याला वाईट वाटलें. आतां घरीं जाऊन भावजय भावाला काय सांगेल कोणास ठाऊक, असें वाटून तो उदासला व त्यानें घर सोडावयाचें ठरविलें.

ऐसे असता येके दीनी | माथा जलघट भरोनी |
येत होती निज स्थानी | प्रिया कामिनी जेष्ठाची ‖ ४९ ‖
क्रीडत होता अलंखान | उर्ध्वतीर मारिला तेण |
मागुता परते धाव पुरुन | तो लागला जाण घटासी ‖ ५० ‖
घटालागी छिद्र पडले | हे अलंखाने विलोकिले |
म्हणे अवचिता वाईट जाले | मनी मानिले खेदकारी ‖ ५१ ‖

---

३. अज्ञानसिद्धांसंबंधीं लिहितांना या ग्रंथाबद्दल मी विस्तृत चर्चा केली आहे.

की हे आता बंधूसी । काय सांगल न कळे कैसी ।
कदापि न राहू या स्थलासी । ऐसा मानसी उदासला ॥ ५२ ॥

[ या घटनेचा तात्त्विक अन्वयार्थ ध्यानांत घेणें जरुरीचे आहे. मुळांत उदासीन असलेल्या अलमखानाला घट फुटण्याची ही व्यावहारिक घटना निव्वळ व्यावहारिक न वाटतां तिचा तात्त्विक संदर्भ व त्याचबरोबर जीवनाचें क्षणभंगुरत्व त्याच्या मनांत उत्कटतेनें जागें झालें. ]

भावजयीनें नवऱ्याकडे तक्रार तर केलीच नाहीं, पण एवढ्या क्षुल्लक ( तिच्या दृष्टीनें ) घटनेमुळें दिरानें घर सोडण्याचा निश्चय करावा, याचें तिला वाईट वाटलें—तिनें त्याच्या जाण्याला विरोध केला. परंतु, अखेर अलमखान बंधुवर्गाचा निरोप घेऊन ' दक्षिणेस ' आला.

असो निघोनि उदास । अलंखा आला दक्षिणेस.... ॥ ६० ॥

वनांत ' फळेंमुळें ' खाऊन राहूं लागला.

एकदां एका वनांत तो पहुडला असतांना तेथें मृगयेसाठीं कल्याणचा ' राम ' राजा आला. पण त्याला शत्रूंनीं वेढलें. सैन्य कमी असल्यानें रामराजाचा पराभव होऊ लागला, हें पाहून अलमखानाला दया आली व त्यानें बाणानें राजाच्या शत्रूंना जर्जर केलें.

कल्याणचा रामनृपती । मृगयेसी आला वनाप्रती ।
तव परचक्रे वेढलें निगुती । संग्राम करिता परस्पर ॥ ६३ ॥

....यवनकुलावतंस । दुरोन पाहे तयास ।
दीनदयेचेनि उल्हास । परचकात भीडतसे ॥ ६६ ॥

हस्तलाघव अलौलिक । बाणे भेदिले सकळ लोक ।
महावीर पाहोनि रणमंचक । सुखी निशंक पहूडले ॥ ६७ ॥

राजाला मोठा चमत्कार वाटला. त्याला अधिकार देऊं केला. पण अलमखानानें सांगितले, ' नरसेवा ' हेच माझें काम. राजा म्हणाला, ' मी

तुमची सेवा करीन.' राजानें त्याला सन्मानानें वाड्यांत नेलें. 'तोषवी वैभव देउनी.' पण अलमखान अधिकच उदासीन झाला.

एक दिवस अलमखान एकटा असतांना तेथें नागेश संन्यासरूपानें प्रकट झाले. अलमखानानें त्यांचा सत्कार करून त्यांचें नांव-गांव विचारलें-कशाची इच्छा आहे म्हणून विचारले. नागेशांनीं सारें सांगितलें; कांहीं नको; फक्त 'कवित्व' पुढें चालव, हेंच सुचविलें. हा प्रसंग मुळांतूनच पाहण्यासारखा आहे :

येकटा अस्ता अलंखान । तथें संन्यासरूप घेउन ।
प्रगटलें नागेश निधान । देदीप्यमान स्वरूप ॥ ७३ ॥

येवून उठिला पाहोनी । वेगळे बैसवी सन्मानुनी ।
म्हणे जी निवास कोणे स्थानी । कोणे कारणी अगमन ॥ ७४ ॥

म नीच यवन जाती । आपण च्यातुर्थाश्रमी अहेती ।
मज दासावरी कृपा निगुती । करून दिलेती दर्शन ॥ ७५ ॥

ईच्छा असेल अपुले मनी । ते सांगा मजलागुनी ।
देईन छाट्यादि करूनी । ईछीत वचनी तोषवावें ॥ ७६ ॥

स्वामी ऐकोनि बोलत । स्छान वढवाळ अलयात ।
काही इछा नाही मनात । ऐक निश्चित सुपुण्या ॥ ७७ ॥

तुवा ईश्वरपरायण । केलेसि काव्य पावन ।
तरी तु पावसी समाधान । होचि खूण सांगो आलो ॥ ७८ ॥

स्वामींना छाटी द्यावी म्हणून अलमखान आंत गेला व बाहेर येऊन पाहतों तर स्वामी अदृश्य झालेले. द्वारकांना त्यानें विचारलें. पण स्वामी आल्याचा ज्यांना पत्ता नव्हता, त्यांना गेल्याचा कुठून असणार? मग अलमखान वडवळास आला. तेथें त्यानें देवळांत कोणी संन्यासी आहे काय, याची चौकशी केली. पण लोकांनी सांगितले कीं, तेथें कोणी संन्यासी राहात नाहीं. अलमखानाने देवळांतून हलावयाचें नाही, असा निर्धार केला. त्या रात्रीं त्याचा

' मुख्याश्व गुप्त होवोनी गेला. ' वैराग्याची आज्ञा स्वामींनीं केली, हें अलमखान मनांत उमजला. त्यानें रामराजाला पत्र लिहून सर्व सेवक परत पाठविले.

नागेशांनीं संतुष्ट होऊन पुन्हां संन्यासी-रूपानें अलमखानाला दर्शन दिलें व 'मुगळीकडे विहरण करी' अशी आज्ञा केली. अलमखान आज्ञेप्रमाणें मुगळी येथें आला. त्याचें भजन पाहून म्लेंछ त्याची निंदा करूं लागले. एवढेंच नव्हे तर दस्तागिराच्या फकिरांनीं त्याचा छळ मांडला. पायांत तप्त बेडी घालून दाखविण्याचा चमत्कार करून या छळाला त्यानें जणूं पायबंद घातला :

तयासी म्लेंछी निंदिती । हा कां करितो असी भक्ती ।
काय वेंगळ अमुची स्थिती । येणे रिती सोडिली ॥ १०४ ॥

दस्तागिराचे फकिर । तिहीं छेळिला भक्तवर ।
तयासि म्हणे गुरुकिशोर । चरणी साचार काय त्याला ॥ १०५ ॥

येरु बोलती तातडी । दस्तागिराची आहे बेडी ।
भक्त म्हणे तुमची भुषण बेडी । बेडि चोखडी वेगळी ते ॥ १०६ ॥

देहाभिमानाचे चरणी । विवेक बेडी सदृढपणी ।
घालिजे बेडी सुदेखणी । येर ते भूषणीं दांभिक ॥ १०७ ॥

देहाभिमान गळाला । हे मज अता दावा कळा ।
म्हणेनि चमत्कार सहज केला । भक्ते स्वलीला तये वेळी ॥ १०८ ॥

बेडी अग्नित घालुन । पुढे केली तप्त करून ।
म्हणे घाला देहाशा सोडून । ऐकता वचन बोलती ते ॥ १०९ ॥

अम्हालागी घाला म्हणता । तुम्हीच घालून दावा आता ।
अलंखान जाला घालिता । बेडी तत्त्वता अपुले पाई ॥ ११० ॥

' महत्वयोगे उपाधी परम ' म्हणून अलमखानानें समाधि घ्यावयाचें ठरविलें. मुगळीकरांना ' भू ' देण्याविषयीं त्यानें सांगितलें. अशा महाभक्ताचा वियोग होऊं नये म्हणून त्यांनीं उशीर लावला. म्हणून अलमखान करळी क्षेत्राला

गेला. तेथें अनंतचैतन्याचे शिष्य अगजीमहाराज यांच्याजवळ अलमखानानें समाधि घेतली.

मुगळीकरांनी आज्ञापालन केलें नाहीं म्हणून त्यांच्या गांवांत सगळीकडे सर्प निघूं लागले. अमलखानाची प्रार्थना करतांच मारुतीच्या देवळांतुन एक महाभुजंग निघाला व जेथें अलमखान बसत असे तेथें गुप्त झाला. त्याच जागीं समाधि बांधून लोकांनीं उत्सव केला. मुगळी तेथील ही 'प्रसादसमाधि' होय. 'नागेशलीलामृता' मध्ये मिळणाऱ्या अलमखानाच्या चरित्रपर माहितीचें स्वरूप असें आहे.

अलमखानाविषयीं अन्यत्र कोठें कांहींच माहिती मिळत नाहीं. अशा परिस्थितींत मिळणारी ही माहिती महत्त्वाची आहे. या माहितीच्या ऐतिहासिकतेविषयीं शंका घेण्याचें मला तरी कारण दिसत नाहीं. कांहीं निर्देश अधिक पारखून घेण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ, कल्याणच्या रामनृपतीचा निर्देश. हा 'राम' कोणी नृपति नसावा, तर कल्याणच्या अधिकाऱ्यांपैकीं कोणी असावा. हा रामदेवरावहि असूं शकणार नाहीं : कारण अलमखान आणि देवगिरीचा रामदेवराव यांच्यांत कालदृष्ट्या फार अंतर आहे. विजयनगरच्या रामराजाशींहि त्याचा संबंध जोडणें शक्य नाहीं. त्यामुळें हा निर्देश–विशेषतः 'नृपति' हा शब्द–अचूक वाटत नाहीं. पण 'दस्तगिराचे फकिर' हा उल्लेख ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. बगदाद येथें अब्दुल कादर जिलानी नांवाचे प्रसिद्ध सय्यद होऊन गेले– स. ११६५ मध्यें. ते 'पीर–ई–दस्तगीर' म्हणून ओळखले जात असत. त्यांनींच फकिरांच्या ३२ पंथांपैकीं कादिरी या पंथाची स्थापना केली;[४] त्यांच्या अनुयायापैकीं कांहीं फकीर करळी येथें होते, हें इतिहासाला धरून आहे असें मानतां येईल.

आतां करळी व मुगळी या स्थलांसंबंधीं थोडेंसें. 'मुगळी करळी प्रांत' असा या प्रदेशाचा उल्लेख 'नागेशलीलामृत'–कारानें केला. 'मुगळी' ला 'जार्ज मुगळी' असें अनेक ठिकाणीं म्हटले आहे. अनंत चैतन्यांचे शिष्य अगजीमहाराज यांची कथा सांगतांना करळी गांवाबद्दल माहिती दिली आहे :[५]

४. Dictionary of Islam, p. 118.

५. नागेशलीलामृत, अध्याय २९.

ऋषीचें स्थान निर्मळ । अचळबेट म्हणोनि स्थळ.... ॥ ९९ ॥

पवित्रस्थळ ते अचळबेट । म्हणसी ऐसे अहे कोट ।
तरी ते सांगतो ऐक स्पष्ट । श्रवणी निकट मन ठेवी ॥ १०० ॥

मूळूज तरमूड चोखट । ग्राम यामाजि अचळबेट.... ॥ १०१ ॥

अचळबेटीं उत्तम । करळी नामे जाले ग्राम ।
करळीनाथासी निसीम । भक्त परम भजताती ॥ १०५ ॥

तेव्हां अचळबेट म्हणून प्रसिद्ध असलेलें पवित्र स्थळ, करळीनाथाचें स्थान व अगजीमहाराजांचें समाधिग्राम असें हें करळी गांव आहे. वरील ओव्यांत 'करळी' हें गांव कोठें आहे, हें सांगतांना 'तरमूड' हा शब्द जो आला आहे तो महत्त्वाचा आहे. तरमूड नांवाचें गांव हुमणाबाद तालुक्यांत, बिदर जिल्ह्यामध्यें आहे. उमरगा ते उस्मानाबाद या रस्त्यावर उमरग्याहून चार मैल अंतरावर करळी हें गांव लागतें. करळीच्या पुढें दोन मैलांवर तरमूड आहे. येथून पुढें दोन मैलांवर मुगळी हें गांव आहे. या प्रदेशांत 'मुगळी' या नांवाचीं चारपांच गांवें आहेत. त्यांपैकीं 'जाजर मुगळी' येथें अलमखानाचें वास्तव्य होतें. 'नागेशालीलामृतां'त 'जाजर' चें 'जार्जे' हें चुकीचें रूप लेखनदोषामुळें झालेलें आहे. तेव्हां करळी व जाजर मुगळी हीं दोन्ही गावें हुमणाबाद तालुक्यांत आहेत. यांपैकीं करळी हें मुगळीच्या मानानें बरेंच लहान गांव असून तेथें अगजीअप्पाची समाधि व अलमखानाचें थडगें आजहि आहे.

अलमखानाचा गुरु कोण, असा प्रश्न सरदार मुजुमदारांपुढें, त्याचीं पदें देतांना, उभा राहिला. आपल्या टिपणाला त्यांनीं 'अलमखान गुरु नागेश्वर' असें नांव दिलें खरें. पण ते म्हणतात : "याचा गुरु नागेश्वर हा कोण असावा!"[६] मुजुमदारांना अलमखानाच्या कांहीं पदांखेरीज व त्याच्या गुरुनामाखेरीज इतर माहिती उपलब्ध नव्हती. पण त्यानंतर अगदी अलीकडे 'मुसलमानांचीं जुनी

---

६. भा. इ. सं. मं. इतिवृत्त, श. १८३७, पृ. २७९.

मराठी कविता' या लेखांत 'अलमखाना' बद्दल प्रा. अ. का. प्रियोळकरांनीं लिहिलें आहे. मुजुमदारांनीं दिलेली मिरीकर-संग्रहांतील ३ पदें व त्यांच्या जोडीला श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरांतील २ पदें तेथें दिलेलीं आहेत. पदें देण्यापूर्वी प्रा. प्रियोळकरांनीं लहानसें प्रास्ताविक लिहिलें असून त्यांत ते म्हणतात : "या कवितांतील निर्देशावरून हा कवि सिद्धनागेश्वर किंवा वरदनागेश्वर याचा शिष्य दिसतो. यापलीकडे त्याची वैयक्तिक माहिती उपलब्ध नाहीं."[७] अलमखानाचे गुरु वडवाळसिद्ध नागेश हे होत : या सत्याच्या जवळ येत असतांना प्रा. प्रियोळकर गोंधळांत पडले आहेत. वडवाळसिद्ध नागेशासंबंधीं आधीं बराच गोंधळ आहे. तो नाहीसा करण्याचा प्रयत्न मीं 'कवि अज्ञानसिद्ध' या माझ्या लेखांत केला आहे.[८] पुन्हा येथें कांहीं गोष्टी स्पष्ट करतों.

'वरदनागेश' हें कवीचें नांव नव्हे : तें ग्रंथनांव आहे. या नांवापुढे कंसांत 'अज्ञान नागेश' हें नांव देऊन चांदोरकर (व प्रियोळकर ?) हीं दोन नांवें एकाच व्यक्तीचीं मानतात असें दिसतें. 'वरदनागेशी' हें नांवहि बरोबर नाहीं. तें 'वरदनागेश' असेंच हवें. तंजावरच्या सरस्वती महालाच्या ग्रंथ-सूचींत 'वरदनागेश' असेंच नांव दिलें आहे. क्र. ३५३ व ३५४ अशा दोन प्रती तेथें आहेत.[९] कर्त्याचा निर्देश 'गुरुदेव (नागेशशिष्य) कृत' असा आहे; तोहि बरोबर नाहीं. ११ व्या प्रसंगांतील १४६ व्या ओवींतील 'अज्ञान शिष्याचें ज्ञानें' या शब्दप्रयोगाकडे दुर्लक्ष झाल्यानें ही चूक झाली आहे. 'गुरुशिष्यसंवाद' या नांवाचा स्वतंत्र ग्रंथ नाहीं. 'वरदनागेश' हा गुरुशिष्य संवादात्मकच ग्रंथ आहे. हा ग्रंथ वडवाळसिद्ध नागनाथ-कृत नसून तो अज्ञानसिद्ध नागेशाचा आहे. वडवाळसिद्ध नागनाथ व अज्ञानसिद्ध या दोन भिन्न व्यक्ति आहेत : ते गुरु-शिष्य आहेत. "वडवाळसिद्ध नागनाथ व हा एकच असावेत,"

---

७. मराठी संशोधन पत्रिका, एप्रिल १९६३, पृ. ३७.

८. पाहा—'कवि अज्ञानसिद्ध'.

९. सरस्वती महाल—ग्रंथसूचि, भाग १, पृ. १०६—१०७.

हा वरदनागेश (अज्ञाननागेश) याच्याबद्दलचा प्रा॰ प्रियोळकरांचा समज बरोबर नाहीं.[१०] प्रियोळकर अज्ञानसिद्धाचें अस्तित्वच नाकारीत आहेत. त्यांनींच उद्धृत केलेली 'वरदनागेशां' तील ओवी व तिचा प्रियोळकरांनीं लावलेला अर्थ तपासून पाहूं :

हें सद्‌गुरु नागनाथें । उपदेशिलें **अज्ञान** शिष्यातें ।
ज्ञान प्रबोधुनी जाणिवेतें । विज्ञानी विगुंतविले ॥

या ओवींतील 'अज्ञान' शब्दाचा चांदोरकर-देवांनीं चुकीचा अर्थ-तो शब्द विशेषनाम आहे-असा लावला, असें प्रियोळकरांचें म्हणणें आहे. तेथें 'अज्ञान' हें विशेषण आहे, असें प्रियोळकर मानतात. क्षणभर प्रियोळकरांचें म्हणणें मान्य करूं. म्हणजे पहिल्या चरणाचा अर्थ असा होईल:— "हें सद्‌गुरु नागनाथानें अज्ञान शिष्याला उपदेशिलें." 'वरदनागेशा'चा कर्ता स्वतः नागनाथ असेल तर तो स्वतःला 'सद्‌गुरु' म्हणवून घेईल काय ? 'नागनाथें' असा स्वतःचा तृतीयपुरुषी, तिऱ्हाईतपणें उल्लेख करील काय ? शक्य नाहीं. 'अज्ञान' हें श्लिष्ट पद आहे. हें प्रथम विशेषनाम आहे. नंतर श्लेषासाठीं त्याचा विशेषणपर अर्थ घ्यावयाचा आहे. 'अज्ञान शिष्यातें' या शब्दांमागें 'मला' हा शब्द अध्याहृत आहे; त्यामुळें हा प्रथमपुरुषी, उल्लेख आहे. 'वरदनागेश' हा ग्रंथ अज्ञानसिद्ध नागेशांचा आहे, याबाबत मला तिळमात्र संशय नाहीं. तीच गोष्ट 'संकटहरिणी शिवग्रंथा'ची[११] या ग्रंथाचें कर्तृत्व व त्याचा श॰ १३१३ हा काळ यांच्याबद्दलहि मीं निःसंदिग्ध विवेचन केलें आहे. प्रा॰ प्रियोळकर श॰ १३१३ हा काळ मुद्रणदोषानें पडलेला असावा व खरा काळ श॰ १६१३ असावा, असें मानतात. १६१३ च कां ? ३ च्या जागीं १ ते ९ पर्यंतचा कोणताहि आंकडा

---

१०. प्रा॰ प्रियोळकर 'वडवाळ' हा शब्द वेगळा करून 'सिद्धनागनाथ' असा शब्द वापरतात. म्हणजे शब्द तोडण्यांत चूक करतात. 'वडवाळ-सिद्ध नागनाथ' असें नांव दिलें पाहिजे.

११. ही 'हरिणी' नाहीं : ग्रंथनाम 'संकटहरणी' असें आहे.

येऊं शकेल. अलमखानाच्या गुरुबद्दल लिहितांना प्रा. प्रियोळकरांच्या मनांत उडालेल्या गोंधळाचें स्वरूप असें आहे. वडवाळसिद्ध नागेशाला श. १६१३ इतकें अलीकडे ओढणें केवळ हास्यास्पद आहे, त्यामुळेंच १६१३ या शकाच्या आधारावर अलमखानाचा काळ ठरविणें योग्य वाटत नाहीं. "यावरून अलमखानाचा काळ इसवी सन सतराव्या शतकाची अखेर किंवा १८ व्या शतकाचा आरंभ हा असावा", या प्रियोळकरांच्या विधानांतील 'यावरून'या शब्दाला माझा आक्षेप आहे. अलमखानाच्या काळाचा विचार इतर साधनांच्या आधारें करावयास हवा. त्याच्या समाधिस्थळासंबंधीं अधिक माहिती व त्याच्या कालनिर्णयाचीं साधनें याची चर्चा सवडीनें. सध्यां अलमखानाचे गुरु वडवाळसिद्ध नागेश हेच होत[१२] व त्यांची खरी समाधि करळी येथें असून प्रसादसमाधि मुगळी येथें आहे, असें निःसंदिग्धपणें म्हणून थांबतों.

---

१२. वडवाळसिद्ध नागेश व अलमखान यांच्या काळांत अंतर आहे. पण त्यावरून त्यांचा गुरुशिष्यसंबंध नाकारावयाचें कारण नाहीं. कारण बऱ्याच उत्तरकालीन असलेल्यांना कालदृष्ट्या आधींच्या व्यक्तींनीं गुरुपदेश केल्याचीं उदाहरणें थोडींथोडकीं नाहींत.

# 'सुक्त मुक्तावळी' : एक जैन ग्रंथ

मराठींतील जैन वाङ्मयाचें संशोधन अजून व्हावें तितकें झालेलें नाहीं· कांहीं ग्रंथ उपलब्ध झालेले दिसले तरी बरीच रचना अजून अंधारांत आहे· ही रचना प्रकाशांत आल्याखेरीज मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास पुरा होऊं शकणार नाहीं·

अलीकडेच माझ्या हातीं आलेल्या कांहीं जैन ग्रंथांतील एका कृतीचा परिचय येथें करून देत आहे· माझ्या समजुतीप्रमाणें ही कृति अप्रसिद्ध असून तिचा उल्लेख वाङ्मयेतिहासांत कोठेंहि आढळत नाहीं·

मला मिळालेल्या ग्रंथाचें नांव ' सुक्त मुक्तावळी ' असें असून हस्तलिखित फारसें जुनें नाहीं· Water mark मध्यें कंपनीचें नांव व बहुधा १८१८ हा सन असा अस्पष्ट मजकूर आढळतो·[१] त्यावरून हें हस्तलिखित १८१८ पूर्वीचें नाहीं हें स्पष्ट होतें· ग्रंथाच्या शेवटीं " संपूर्ण ॥ संवत् १९०६ कार्तिक वद्य ३० बुधवारे ॥ संपूर्ण ॥ " असा लेखनकाल दिलेला आहे·

---

१· (S....ANS & Co 18..8) एवढेंच वाचता येतें· सन १८२८ किंवा १८३८ असेल·

मोडकांच्या जंत्रीप्रमाणें वर्ष, तिथि व वार यांचा मेळ जमतो.[२] शालिवाहन शक १७७१ मध्यें म्हणजे इंग्रजी पद्धतीप्रमाणें १४ नोव्हेंबर १८४९ रोजीं या प्रतीचें लेखन झालें. हा कालोल्लेख ग्रंथरचनेचा नसून प्रत केव्हां केली हें सांगणारा आहे.

'सुक्त मुक्तावळी' असें नांव प्रारंभीं व अखेरीस आढळतें. १२ १/२" × ५ १/२" आकाराची ही पोथी सुस्थितींतील असून कोल्हापूरला मिळाली.

'सुक्त मुक्तावळी' हा मराठींतील स्वतंत्र ग्रंथ नसून 'सूक्ति मुक्तावली' अथवा 'सिंदूरप्रकर' या संस्कृत ग्रंथावरील ही टीका आहे. मूळ ग्रंथाच्या कवीचें नांव सोमप्रभाचार्य. "Other works of a didactic poetry are the S'hrṇgārvairāgyatarngiṇi and the Sindūraprakara of Somaprabha";[३] असा त्यांच्या काव्याचा व त्यांचा उल्लेख आढळतो. 'कुमारपाल प्रतिबोध' व 'सुमतिनाथ चरित्र' हे त्यांचें आणखी दोन ग्रंथ आहेत.

"Sūktimuktāvali is a short poem of 100 Verses, didactic in nature like Bhatrihari's Nitis'hataka. It is very popular among the Jains. It is also known as Sindūraprakar or Somas'hataka";[४] अशी मूळ ग्रंथाबद्दल माहिती मिळते. 'कुमारपाल-प्रतिबोधा'च्या मुनिराज जिनविजयसंपादित अवृत्तींत प्रा. गोरे यांनीं दिलेलाच मजकूर सांपडतो.[५]

---

२. Chronlogical Tables, Compiled by Balaji Prabakar Modak, 1889, P. 302

३. The Jainas in the History of Indian Literature, by Dr. Maurce Winternitz, P. 10.

४. Selections from the Kumārapāl pratibodha, edited by N. A. Gore, Introduction, P. 6.

५. Kumārapāl pratibodha, Gaekwad's Oriental Series No. XIV, edited by Munirāj Jina-Vijaya, Introduction P. VI.

सोमप्रभाचार्यांचा जन्म प्राग्वाट किंवा पोरवाढ नांवाच्या वैश्य जातींत झाला. 'कुमारपाल प्रतिबोधा' चा रचनाकाल संवत् १२४१ हा आहे. त्यापूर्वी 'सूक्ति मुक्तावली' लिहिली गेली असें मानलें जातें. म्हणजेच सुमारें आठशें वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या संस्कृत ग्रंथावरील ही मराठी टीका होय.

'सुक्तमुक्तावळीं'त अजितदेव–विजयसिंह–सोमप्रभ अशी कवीची परंपरा दिलेली आहे.[६] पुढील मूळ संस्कृत श्लोकाचा तिला आधार आहे :—

अजभयजित देवाचार्य पटोदयाद्रि ॥
द्युमणी विजयसिंहाचार्यपादारविंदे ॥
मधुकरसमतांयस्तेन सोमप्रभनै ॥
व्यरचिप मनुप्राज्ञा सुक्तिमुक्तावलीयं ॥

( श्लोक जसाच्या तसाच दिला आहे. )

मराठी ग्रंथांत एकूण २१ अध्याय असून त्यांची विभागणी पुढील-प्रमाणें आहे: —

| अध्याय | नांव | ओव्या | श्लोक |
|---|---|---|---|
| १ | नीतीदृष्टांत कथनरूप श्लोक | ६७ | ७ अखेर |
| २ | अर्हद्‌भक्तिनिरूपण | ७५ | १२ ,, |

६. अजितदेव धर्माचार्य । संपुर्ण गुणकीर्ण गुणवर्य ।
पट्टाद्रिवरि उदयसुर्य । मेरुधैर्य शोभत ॥
द्वादशतप सार्वभौम । शास्त्रसुधाब्धी पुर्ण सोम ।
सर्वजनप्रियाभिराम । शांतधाम वीराजे ॥
विजयसिंव्ह चरणकमळीं । मधुकरायमान सदाकाळीं ।
सुधारस सेवी हृदयकमळीं । बंधा जुळी लक्षीत ॥
ऐसा जो सोमप्रभ यतीवर । हा ग्रंथ केला सुधासार ।
सुक्त मुक्तावळी सुंदर । नाम प्रवर विराजे ॥
अ. २१ ओ. ५३–५६

| अध्याय | नांव | ओव्या | श्लोक |
|---|---|---|---|
| ३ | गुरुभाक्ति निरोपण | ६६ | १५ अखेर |
| ४ | जिनमत नाम | ५० | २० ,, |
| ५ | जिनसंगति निरूपण | ५८ | २४ ,, |
| ६ | अहिंसाव्रत निरूपण | ६५ | २८ ,, |
| ७ | सत्यव्रत निरूपण | ६२ | ३२ ,, |
| ८ | अचोरीव्रत निरूपण | ६२ | ३६ ,, |
| ९ | ब्रह्मव्रत निरूपण | ६५ | ४० ,, |
| १० | पंचअणूव्रत निरूपण | ६२ | ४४ ,, |
| ११ | अक्रोधव्रत निरूपण | ६६ | ४८ ,, |
| १२ | मानकषाय निरूपण | ६२ | ५२ ,, |
| १३ | मायाकषाय निरूपण | ६२ | ५६ ,, |
| १४ | लोभकषाय निरूपण | ७० | ६० ,, |
| १५ | सौरजन्यगुण निरूपण | ६१ | ६४ ,, |
| १६ | गुणीसंग निरूपण | ६६ | ६८ ,, |
| १७ | इंद्रियदमन निरूपण | ६८ | ७२ ,, |
| १८ | दानफल निरूपण | १४१ | ८० ,, |
| १९ | तपाचार निरूपण | ६२ | ८३ ,, |
| २० | भावना निरूपण | ९८ | ९० ,, |
| २१ | वैराग्य निरूपण | ५७ | ९४ ,, |

अध्यायांच्या नांवांवर दृष्टिक्षेप टाकला की थोडक्यांत जैन-तत्त्वज्ञान सांगणारा हा ग्रंथ आहे हें लक्षांत येतें. किंबहुना मुळांतील एका श्लोकाचा विस्तार या ग्रंथांत झाला आहे असें वाटतें.

भक्ति तीर्थकरे गुरौ जिनमते संगेच हींसानृत्ये ॥
स्तेया ब्रह्म परिग्रहा व्युपरमं क्रोधाद्यरीणां जयं ॥

सौज्यन्यं गुणिसंगमिंद्रियदमं तपो भावनं ॥
वैराग्यं च कुरु स्वानिवृत्ति पथे यद्यस्तगंतुमनः ॥

या ८ व्या श्लोकांतील विषयच वेगवेगळ्या अध्यायांत विभागून सुबोधपणें मांडण्याचें कौशल्य मराठी कवीनें दाखविले आहे.

पंथीयांच्या पठणांत असणाऱ्या एका लोकप्रिय 'शतका' वर मराठींत टीका लिहिणाऱ्या कवींचें नांव ग्रंथांत कोठें आढळत नाहीं हें दुर्दैव होय. टीकेच्या प्रारंभीं कवीनें स्वतःचा, गुरुचा वा स्वकुलविषयक असा कांहीच उल्लेख केलेला नाहीं.

ग्रंथाच्या अखेरीस ''इतिश्री सुक्तमुक्तावळीणां सटीक महाराष्ट्र भाषा संपूर्ण'' असा मजकूर व पुढील 'गुरुस्तुति श्लोक' आहेत:—

नमो नम्र जीना नंदस्पंदीने माघनंदीने ॥
जगत्प्रसीद्ध सिद्धांत वेधीने चीत्प्रमोदीने ॥ १ ॥

सीत्धांतसार सर्वेश्व कोशावासेक मुर्तये ॥
नमः श्री माघनंदाख्या विश्ववीख्यातकीर्तये ॥ २ ॥

यञा न तमसालुप्ता मार्गो रत्नत्रयात्मकः ॥
तत्प्रकाशासमर्थाय नमोस्तु कुमुदींदुवे ॥ ३ ॥

संसार दुःभीताया स्वात्मोय सुखसेवीना ॥
रत्नत्रयपवीत्रय नमोस्तु कुमुदींदुवे ॥ ४ ॥

जीनवाक्यार्णवोद्भुतं रत्नत्रय सुनीर्मलं ॥
चीत्पदाचार्य शोभाय नमोस्तु कुमदींदुवे ॥ ५ ॥

या श्लोकांत दोन नांवें आलेलीं आहेत. माघनंदि किंवा माघनंद आणि कुमुदींदु हीं तीं नांवें होत. या दोघांना गुरु म्हणून कवि नमस्कार करतो. हे दोघेहि त्याचे गुरु असतील किंवा माघनंदि (द)–कुमुदींदु–कवि अशी त्याची परंपरा असेल. परंतु हे श्लोक सोमप्रभाचार्यांचे कीं मराठी कवीचे ?

प्रश्न मोठा गुंतागुंतीचा आहे. मराठी टीकेचा २१ वा अध्याय ९४ श्लोकांच्या अखेरीस संपतो. मुळांत तर १०० श्लोक आहेत. त्यामुळें गुरु-स्तुतीचे म्हणून पुढे आलेले संस्कृत श्लोक जमेस धरल्याखेरीज १०० श्लोकांची भरती होऊं शकत नाहीं. त्यामुळे गुरुस्तुतिपर श्लोक सोमप्रभाचार्यांचे मानावेत असें वाटूं लागतें.

असें मानण्यांत अडचण ही की अजितदेव–विजयसिंह–सोमप्रभाचार्य अशी विश्वसनीय परंपरा आपल्यापुढें असतांना माघनंदि (द) व कुमुदींदु यांना त्यांचे गुरु कसें म्हणावयाचे? या दोन व्यक्ति ऐतिहासिक आहेत काय? त्यांचा व सोमप्रभाचार्यांचा काळ सारखाच आहे काय?

कारंजा शाखेच्या पट्टावलींत माघनंदि हें नांव सांपडतें. त्या शाखेंतील पहिल्या आचार्यांची-अमरकीर्तींची-माहिती देतांना टीपेंत प्रा. विद्याधर जोहरापूरकर लिहितात : “इन के पूर्व गुप्तिगुप्त, कुंदकुंद, मयूरपिच्छ, गृध्रपिच्छ, जटासिंहनंदि, लोहाचार्य, उमास्वाति, माघनंदि, मेघनंदि, जिनचंद्र, प्रभाचंद्र, विद्यानंद, अकलंक, अनंतकीर्ति, माणिक्यनंदि, नेमिचंद्र और चारुकीर्तिका उल्लेख है”.[७] यामरून माघनंदींची अधिक विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं हेंच लक्षांत येतें.

कुमुदींदु म्हणजे कुमुदचंद्र काय? तसें मानावयास हरकत नसावी. कुमुदचंद्र हें नांव कन्नडमध्यें असलेल्या नेसर्गी–शिलालेखांत मिळतें. “इसका समय भी बारहवी सदी माना गया है”.[८] कालदृष्ट्या हे कुमुदचंद्र सोम-प्रभाचार्यांना जवळचे असले तरी ‘बलात्कार गण–प्राचीन–कालपटां’त माघनंदि (द) व सोमप्रभ यांचीं नांवें येत नाहीत. त्यामुळें या कुमुदचंद्रांचा ‘सुक्त मुक्तावळी’ काराशीं कांहीं संबंध असेल असें वाटत नाहीं.

दुसरे कुमुदचंद्र कारंजा शाखेंत होऊन गेले. हे देवेंद्रकीर्तींचे पट्टशिष्य होते. “आप ने शक १५२२ की वैशाख सुदी १३ को तथा शक १५३५ की

७. भट्टारक संप्रदाय, पृ. ७१

८. ” ” पृ. ४५

फाल्गुन शुक्ल ५ को कोई मूर्तियां स्थापित की .... आपने ब्रह्मवीरदास को पंचस्तवनावचूरि की एक प्रति दीथी ";[१] असें त्यांच्याविषयीं कळतें. हें फारच उत्तर कालीन असल्यानें सोमप्रभांशीं त्यांचा संबंध नाहीं.

वरील विवेचनावरून संस्कृत ग्रंथाच्या कर्त्याचा माघनंदि (द) व कुमुदींदु या व्यक्तींशीं संबंध नसावा असें वाटतें. मराठी टीका लिहिणाऱ्या कवीचा असणें संभवनीय आहे. परंतु मराठींत टीका लिहिणाऱ्या कवीनें गुरुस्तुतीचे श्लोक संस्कृतमध्यें लिहिण्याचें कारण ध्यानांत येत नाहीं. मूळ संस्कृत कृति उपलब्ध न झाल्यानें हे श्लोक तेथेंहि आहेत काय या प्रश्नाचा उलगडा होत नाहीं.

बलात्कार गणाच्या कारंजा शाखेतील कुमुदचंद्राचा काळ संवत् १६५६–१६७० असा आहे. (म्हणजे शके १५२२–३६). त्यांच्यानंतर गादीवर आलेल्या धर्मचंद्रांच्या पार्श्वकीर्तिनामक शिष्यानें ‘सुदर्शनचरित’ नांवाचा मराठी ग्रंथ लिहिला आहे. त्यामुळें ‘सुक्त मुक्तावळी’ चा कर्ता कुमुदचंद्रांचा शिष्य असणें अशक्य नाहीं.

‘सुक्त मुक्तावळी’ चा काल शके १५२२ ते शके १७७२ यामध्यें केव्हांचा तरी मानावयास हवा. “ज्ञानवर्णी कर्मक्षयार्थ गांधी पांनाचंद अमरचंद लखीतं गांधी कुबेर पांनाचंद स्वपठनार्थे ल. खु. छ”; या ग्रंथसमाप्तीच्या मजकुरावरून प्रत-लेखकाचें नांव कुबेर पांनाचंद गांधी असें असल्याचें कळतें. कवीचें नांव पांनाचंद अमरचंद गांधी असेल काय ? एरवीं ‘लखी’तं (लिखितं) या शब्दाचा दुसरा अर्थ कोणता ? ‘सुक्त मुक्तावळी’चा कवि कोण हें नक्की कळत नाहीं असेंच म्हटलें पाहिजे.

विषय तत्वज्ञानाचा असून काव्यमय पद्धतीनें तो मांडला गेला आहे. कवीची वर्णनशैली प्रसन्न आहे. तो देत असलेले दृष्टांत विषय मनावर ठसविण्यास मदत करतात. उपमा, उत्प्रेक्षा, रुपक यांचा तो भरपूर प्रमाणांत वापर करतो. नमुन्यादाखल कांहीं भाग देण्याचा मोह होतो.

---

१. ,, ,, पृ. ७२

पार्श्वनाथांच्या चरणांना नमन करतांना कवीनें त्यांच्या नखप्रभेचें केलेलें वर्णन असें:—

नखे दीसताती सुंदर । उठती कीरणाचे बहुभार ।
की उगवले बहु भास्कर । प्रभा अपार फाकली ॥ १–४ ॥

जिन-मताची थोरवी कवि पुढीलप्रमाणें सांगतो :—

पर्वतामाजि मेरू भूधर । अमरलोकी जैसा शचिवर ।
कि उडगणामाजी प्रकाश भास्कर । तैसे जिनमत ॥ ४–२६ ॥
जिनमत भद्रहस्ती केवळ । कुमार्गवृक्ष उपडीत सकळ ।
न राहे मिथ्यात मूळ । ऐसे करीत ॥ ४–४१ ॥
आशातृष्णा या सर्पिणी । निसिदिनी डंकिती अंतःकर्णी ।
निर्विष करावया गारूड मणी । तैसे जिनमत ॥ ४–४७ ॥

जीववध करून पुण्य मिळतें असें म्हणणाऱ्यांचा उपहास करतांना कवि लिहितो:—

अग्नीमाजी उपजे कमळ । कीं मध्यरात्री उगवे अर्कमंडळ ।
तरीच जीव वधुनि पुण्यफळ । प्राप्त होय ॥ ६–४७ ॥
सर्प मुखी अमृत मीळे । की वीश प्राशिता होय रोग निर्मळ ।
तरीच प्राणी वधुनि पुण्यफळ प्राप्त होय ॥ ६–४८ ॥

रूपकांची वाण तर या कवीला कधींच पडत नाहीं :—

परिग्रह मदनमत्त कुंजर । उपडोनि टाकी निजधर्म तरूवर ।
भ्रांती चढवी विशोरग क्रूर । दुर्धर अही ॥ १०–६ ॥
कृपाकमळलता कोमळ । जळ आटता दहन करी अनळ ।
तैसा परीग्रह दावानळ । जाळी धर्मदृम ॥ १०–७ ॥
क्षमाकल्पवल्लीचे अंकुर । दया नदीतटी विराजे सुंदर ।
निर्मूळ करी परिग्रह-महापूर । सागरा मीळवी ॥ १०–८ ॥

मूढाचें लक्षण सांगतांना मूर्ख मनुष्य सुवर्णपात्रांत धूळ भरतो; चिंतामणि कावळ्यापुढें टाकतो; किंवा चिंतामणि टाकून गार वेचतो; अमृतानें पाय

धुतो; कल्पवृक्ष उपडून ' धतूर ' लावतो; अशा कांही कल्पना येतात. अलंकारांचा वापर करूनहि ग्रंथाची भाषा कृत्रिम होत नाही; तर विषयांच्या स्पष्टीकरणाला ती उपकारक झालेली आढळते.

' सुक्तमुक्तावळीं ' तील भाषेचा विचार करतांना पुढील कांही रूपें लक्ष वेधून घेतात :—

क < ख : पाख

ख < क : असंक्य

ख < ष : सुषे, सुषाभिलासी, शाषा.

ष < ख : कखाय

ट < ड : कुडूंब, पडळ

ठ < ट : टकवावया, उटे.

ढ < ड : काडील, काडी, वाडउनि.

श < ष : पाप, सारांष, अतिषय

ष < श : विशोरग, वीश

श < स : अहीर्णिसी, वस्य, सोभे, सस्त्र, सिव, असक्य, प्रसंसा, सीघ्र

स < श : शिमा, दाश, शोडीले, शिता, अलश्य, श्नेह

ष < स : अभीलास

ल < ळ : मुक्तावळी

ळ < ल : शील

व्यंजन प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचीं अशी कांही रूपें वर टिपलेलीं आहेत. जैनांच्या मराठी ग्रंथांचा भाषादृष्ट्या विचार करतांना मुख्यतः महाप्राणत्व (Aspiration) व महाप्राणत्वलोप (De-aspiration) या प्रवृत्तींचा अभ्यास करणें आवश्यक आहे. म्हणून इतर विशेयांचा उल्लेख न करतां त्या प्रवृत्तींचीं वेचक अशी कांही उदाहरणें दिलीं.

'सुक्त मुक्तावळी' तील तत्त्वज्ञानाचा भाग हा स्वतंत्र लेखाचा विषय असल्यानें तो बाजूस ठेवला आहे. सोमप्रभाचार्यांच्या मूळ संस्कृत कृतीशीं या टीकेची तुलना करणें आवश्यक आहे. परंतु मूळ कृतीच उपलब्ध न झाल्याने तसें करणें शक्य झालें नाही. या ग्रंथाचें संपादन करीत असतांना हें सर्व करण्याचा माझा विचार आहे. या अप्रसिद्ध जैन ग्रंथाचा स्थूल परिचय करून देण्याचाच उद्देश डोळ्यांपुढे होता.

# ‘ सिंहासनबत्तिशी ’ ची एक प्रत

परंपरेनें चालत आलेल्या लोकप्रिय ग्रंथां पैकीं ‘ सिंहासनबत्तिशी ’ हा एक होय. या विक्रम-कथांनीं कथेच्या क्षेत्रांत लोकप्रियतेचा वेगळाच विक्रम प्रस्थापित केला, असें म्हणतां येईल. लहानांपासून थोरापर्यंत आणि अशिक्षितांपासून सुशिक्षितां-पर्यंत सर्वांना या कथासंग्रहानें गेलीं कित्येक शतकें मोहिनी घातली. कथा सांगणें आणि ऐकणे ही मानवी मनाची एक मूलभूत प्रवृत्ति आहे. आणि त्यांत विक्रमासारख्या उदार व साहसी राजाच्या या कथा. त्यामुळें विभूति-पूजनाच्या ( Hero-Worship ) वृत्तीला येथें बराच अवसर होता. साहजिकच या कथांनीं जन-मनाची पकड घेतली. आपल्या पंथाचा प्रसार करण्यासाठीं माध्यम म्हणून त्यांचा वापर करावा, असें जैनांना वाटलें तें या कथांच्या गुणवैभवामुळें. ( ‘ सिंहासनबत्तिशीं ’ तील कथा मूलतः जैन आहेत कीं ब्राह्मणी आहेत, हा डॉ. वेबर व डॉ. एड्गर्टन यांच्यांतील वाद सध्यां आपण बासूस ठेवूं )

मराठींत ‘ सिंहासनबत्तिशीं ’ च्या—स. १८१४ ते १८७९ या कालखंडांत सात आवृत्त्या प्रसिद्ध झालेल्या दिसतात. कै. स. आ. जोगळेकरांनीं स. १९५४ मध्यें हा ग्रंथ ‘ प्रसाद ’ प्रत म्हणून प्रसिद्ध केला आहे आणि त्याला विवेचक

प्रस्तावनाहि जोडली आहे. या प्रस्तावनेंत त्यांनीं डॉ. एड्गर्टन यांच्या अधिकृत 'सिंहासनबत्तिशी' चीहि माहिती दिलेली आहे.[१] या पार्श्वभूमीवर मी माझ्याकडील 'सिंहासनबत्तिशी' च्या एका प्रतीसंबंधीं कांहीं लिहिणार आहें.

मला उपलब्ध झालेली ही प्रत म्हणजे एका जुन्या बाडांतील कांहीं भाग आहे. $६\frac{१''}{४} \times ८\frac{१''}{४}$ आकाराच्या चतकोर कागदांवर लिहिलेला हा मजकूर एकूण ७४ पृष्ठांचा (पाठपोट) आहे. त्यांतील पहिलें पृष्ठ गहाळ झालेलें असून हस्ताक्षर एकाचेंच नाहीं. शेवटच्या पृष्ठावर प्रतीचा धनी, लेखनकाल व स्थल आणि प्रतकार यांचा निर्देश आहे. तो असा : "ईदं पुस्तकं बत्तिसपुतळी लीखिते सखाराम बपुजी भाट्ये. उपाध्ये मौंजे अडीवरे तालोके अजनवेल प्रात परशराम क्षत्र हली वस्ती कीले सज्जनगड उर्फ परली प्रात वाई देश नजीक शाहुनगर कीले सातारा श्री शाहु छत्रपती शके १७४८ व्ययनाम संवत्सरे पौष शुा। १२ मंगळवार सन १२३६ समप्त."

या मजकुरावरून, सखाराम बापूजी भाट्ये यांची ही प्रत आहे व तिचें लेखन श. १७४८ मध्यें पौष शु. १२ स. मंगळवारीं समाप्त झालें, हें स्पष्ट होतें. दिलेल्या लेखनकालांत संवत्सर, मास, तिथि व वार यांचा मेळ बसतो. म्हणजे इंग्रजी तारखेप्रमाणें ९ जाने. १९२७ रोजी या प्रतीचें लेखन संपलें.[२]

भाट्ये हे भटके दिसतात. ते मूळचे अडिवरें येथील. नंतर कांहीं काळ ते सज्जनगडावर होते आणि त्यानंतर ते हुबळीला आले व तेथेंच हें प्रत-लेखन संपलें, असें पुढील उल्लेखावरून कळतें : "हस्ताक्षर सखाराम बापूजी भाट्ये

---

१. 'सिंहासनबत्तिशी', प्रस्तावना, पृ.४–५.

२. बा. प्र. मोडक यांची 'शक व सन यांची तिथि व तारिखवार जंत्री,' पृ. २४५.

परळीकर हली वस्ती जीर्ण पुस्पलत ग्राम निसबत आणाजी त्रीमल तत्सुत तीमाजी आणाजी सर्व ग्रामलेखक प्रगणे रायर हुबळी. ”[३]

प्रस्तुत प्रतीचें वेगळेंपण मी जोगळेकरांची ‘ प्रसाद ’प्रत तुलनेसाठीं घेऊन सांगणार आहे. ‘ प्रसाद ’प्रतीपूर्वीच्या छापील अथवा इतर हस्तलिखित प्रती व डॉ. एड्गर्टन यांची अधिकृत आवृत्ति डोळ्यांपुढें ठेवून हें वेगळेंपण सांगावयास हवें, याची मला जाणीव आहे—पण सध्यां ‘ प्रसाद ’ प्रतीपुरतीच ही तुलना मर्यादित ठेवली आहे. या दोन प्रतींतील सारखेपणा व फरक येथें दाखवावयाचा आहे.

‘ प्रसाद ’ प्रतींतील प्रास्ताविक हस्तलिखितांत नाहीं. परंतु ‘ सिंहासन-बत्तिशी ’च्या कांहीं प्रतींत आढळणाऱ्या भर्तृहरि व अमरफळ, विक्रम व अग्निवेताळ आणि विक्रम व सिद्धसेन दिवाकर या कथा—पहिली कथा जयानें सांगितलेली म्हणून—दिल्या आहेत. यामुळें दोन्ही प्रतींतील कथा-क्रम भिन्न झालेला आहे. ‘ प्रसाद ’ प्रतींतील १ ते १५ या कथा हस्तलिखितांत २ ते १६ अशा आहेत; तर १७, १८, १९, २५, २६. ३० या कथा अनुक्रमें १८, १९, १७, २८, ३० म्हणून दिल्या आहेत. दोन्ही प्रतींत सारख्या असलेल्या कथा एवढ्याच. त्यांच्यांतहि आढळणारा कांहीं तपशिलाचा फरक महत्त्वाचा आहे.

‘ प्रसाद ’ प्रतींतील १६, २०, २१, २२, २३, २४, २७, २८, २९, ३१, ३२ या क्रमांकांच्या कथा हस्तलिखितांत मुळींच नाहींत. तेथील २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २९, ३१, ३२ या कथा सर्वस्वीं भिन्न आहेत. त्यांचें वेगळेंपण पाहिलें पाहिजे.

आणखी एक गोष्ट प्रथम सांगितली पाहिजे. बत्तीस पुतळ्यांचीं नांवें थोड्याफार फरकानें दिलेलीं आढळतात. ‘प्रसाद’ प्रतींत तीं पुढीलप्रमाणें आहेत : जया, विजया, जयन्ती, अपराजिता, अनंगजया, मंजुघोषा, कुरंगनयना,

---

३. ‘ जीर्ण पुस्पलत ग्राम ’ हें ‘ हळे हूबळ्ळी ’ या नांवाचें संस्कृतीकरण होय. ( हळे = जुनी, जीर्ण; हू—बळ्ळी = पुष्पलता. )

जयवंती, कामकारिका, चंद्रिका, मदनमंजिरी, शृंगारकालिका, निरुपमा, नरमोहिनी, मदनसुंदरी, विलासरसिका, कामध्वजा, रतिलीला, मृगाक्षी, चित्रलेखा, रतिप्रिया, प्रियदर्शना, पद्माक्षी, हंसगामिनी, विद्युत्प्रभा, कामशरोन्मादिनी, चित्ररेखा, स्मरजीविनी, भद्रा, लावण्यलहरी, मरालगमना व पद्मिनी. हस्तलिखितांतील नांवें अशीं आहेत : जया, विजया, जयंती, अपराजिता, जयघोषा, लीलावती, मंजुघोषा, जयसेना, मदनसेना, मदनमंजिरी, शृंगारकलिका, नरमोहिनी, भोगानिधी, रतिप्रिया, सुमित्रा, प्रेमावती, सुप्रभा, कुरंगनयना, चंद्रज्योति, चंद्रकांति, सौभाग्यमंजिरी, लावण्यवती, करुणावती, हंसगमना, रूपकांता, देवनंदा, देवांगना, चित्रिणी, सुलोचना, प्रेमावती, गुणप्रिया, चित्रकळा.

कथांतील सारखेपणा व फरक पाहण्यासाठीं एकेक कथा डोळ्यांपुढें ठेवूं.

कथा १ : सिद्धसेन दिवाकराची कथा येथें थोडी भिन्न दिलेली आहे. मुळांत हे जैनांचे प्रसिद्ध आचार्य. त्यांनी दाखविलेल्या चमत्काराची व विक्रमाला दिलेल्या जैन धर्माच्या दीक्षेची हकीकत येथें नाहीं. केवळ 'सिद्धसेन नामा कवि' विक्रमाकडे आला व त्याच्या कवित्वावर प्रसन्न होऊन विक्रमानें त्याला मोठें इनाम दिलें, एवढाच वृत्तान्त येथें आहे.

कथा २ : 'प्रसाद' प्रतींत नसलेली व इतर कांहीं प्रतींत आढळणारी शारदानंदाची गोष्ट येथें आहे.

कथा ५ : देवदत्ताच्या पित्याची कथा येथें नाहीं.

कथा ६ : 'प्रसाद' प्रतींतील 'नावाडी' येथें 'रामदास सावकार' बनला आहे.

कथा ८ : 'धनद' हें नांव 'धनशेट' असें दिलें आहे.

कथा ९ : तळें बांधणाऱ्याचें नांव 'हरिदास सावकार' असें दिलें आहे.

कथा १० : 'प्रसाद' प्रतींतील त्रिविक्रम, चंद्रमौलीश्वर भट्ट व कांची हीं नांवें अनुक्रमें शंकरशर्मा, विमलभट्ट व कांतीपुरी अशीं बदललेलीं आहेत.

कथा १२ : शैवालघोष पर्वत, पळाशनगर व बळी जाणार ब्राह्मण यांचें रूपांतर हस्तलिखितांत सेवाळदेश, उमरखेट व फकीर यांच्यांत झालें आहे.

पलाशनगरासंबंधीं कै. जोगळेकरांनीं टीपेंत म्हटलें आहे. "जैन प्रतींत ही नगरी एका बेटावर वसलेली आहे व हा राक्षस त्या बेटाचा राजा आहे. एका प्रतींत हें स्थान विंध्यपर्वतांत मांडलेलें आहे."[४] जैन प्रतींतील मूळ उल्लेख मीं पाहिलेला नांहीं—पण एक कल्पना मांडावीशी वाटते. येथें 'बेट' पेक्षां 'बेट्ट'[५] हा शब्द अधिक अन्वर्थक ठरेल. डोंगरावरील शहर असा त्या संदर्भाला धरून योग्य अर्थ होईल. जैन प्रतींत 'बेट्ट' हा कन्नड शब्द थोड्या निराळ्या स्वरूपांत येणें शक्य आहे.

कथा १३ : पुरंदराच्या चैनी आयुष्याची हकीकत, धनद नांवाच्या मित्रानें त्याला केलेला उपदेश व कांतिमतीनें विक्रमाली सांगितलेला आपली कथा इतका भाग हस्तलिखित प्रतींत नाहीं.

कथा १४ : हस्तलिखिताप्रमाणें, विक्रम 'गंगातीरीं'न जातां 'कृष्णा-तीरीं' जातो. येथें 'धर्मपूर' हें नांव आढळत नांहीं. ब्राह्मणानें दिलेली 'मुळी' विक्रम ब्रह्मराक्षसाला देतो, ही जैन प्रतींतील माहिती 'प्रसाद' प्रती-प्रमाणेंच हस्तलिखितांत नाहीं.

कथा १५ : 'प्रसाद' प्रतींत विक्रम एका नगरींत येतो व तेथें जगदंबेचें मंदिर असतें व त्याला अवधूतवास नामा योगी भेटतो, असें म्हटलें आहे. हस्तलिखितांत, तो 'आवढ्या नागनाथास'[६] येतो व त्याला योगी भेटतो, असें सांगितलें आहे. योग्यानें सांगितलेल्या कथेंत नांवांचा फरक आहेः नंदिवर्धन नगरी, राजशेखर राजा व एक नगर यांच्याऐवजी जयखंड नगरी, जयशंकर राजा व भद्रावती नगर अशीं नांवें दिलीं आहेत. यक्षानीं राजावर कां उपकार केला, ही कथा 'प्रसाद' प्रतींत नाहीं, म्हणून देण्यासारखी आहे :

---

४. 'सिंहासनबत्तिशी' तळटीप, पृ. ९८.

५. Betta–A big hill, a mountain : 'A Kannada-English Dictionary', p. 1136.

६. औंढ्या नागनाथ : विसोबा खेचरांचे स्थान.

" नंतर[७] यक्षानी आकाशांतुन पाषाणवृष्टी करून परचक्राचा पराभव केला. ते कौतुक पाहून राणी बोलली हे कर्म यक्षावाचून दुसऱ्याचे नव्हे. बरे यवढा उपकार यक्ष अम्हावर का करितात असे बोलत असता तेथें यक्ष येउन म्हणाले अह्मी पूर्वजन्मी काही येक दोषास्तव मत्स्य होउन लाहानशा तळ्यांत पाण्यावाचुन घाबरे होउं लागलो तेव्हा हा तुझा पती कुभार[८] होता. याणे आह्मास मोठ्या सरोवरात नेउने[९] सोडीले तो उपकार स्मरून आह्मी यास राज्य दिले आणि रक्षणहि केले." योग्यानें 'चिंतामणिरत्न' विक्रमाला दिलें—'काश्मीरी शिवलिंग' नव्हे — असें हस्तलिखितांत आहे.

कथा १६ : 'प्रसाद' प्रतींत 'वसुमित्र' हा विक्रम राजाचा पुरोहित असल्याचें सांगितलें आहे. हस्तलिखितात प्रथम त्याचें नांव 'सुमती' असें दिलें असून तो राजाचा मित्र आहे. पुढें त्याचें नांव 'सुमित्र' असें आलें आहे. एवढ्यापुरताच—नांवापुरताच—या कथेचा जैन प्रतीशी संबंध आहे. सुमित्राच्या शकावतारतीर्थ-यात्रेचा, आद्य-जिनपूजेचा निर्देशहि[१०] हस्तलिखितांत नाहीं. येथें 'मदनमंजरी' ही राजकन्या असल्याचें सांगितलें आहे. तर 'प्रसाद' प्रतींत हें नांव 'मन्मथसंजीवनी' असें असून ती शापित अप्सरा आहे. कढईत उडी टाकतांना विक्रमानें वेताळाचें स्मरण केलें व नंतर वेताळानें त्याच्यावर अमृत शिंपलें, हा भाग 'प्रसाद' प्रतींत नाहीं : तेथें मन्मथसंजीवनी अमृत शिंपडते, असें सांगितलें आहे.

कथा १७ : दोन्ही प्रतींत 'विष्णु' हाच बळीचा द्वारपाल आहे : जैन प्रतीप्रमाणें. 'कृष्ण' हा फरक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

कथा १८ : 'चंद्रशेखर' राजाचें नांव हस्तलिखितांत 'चंद्रसेन' असें आढळतें. ६४ योगिनींच्या चक्राची पूजा, दशांश होम, अखेरीस पूर्णाहुति म्हणून शरीर अग्नीस अर्पण करणें, हा कथाभाग येथें नाहीं.

---

७. नंतर. ८. कुंभार. ९. नेऊन.

१०. सिंहासनबात्तिशी, तळटीप, पृ. १२९.

कथा १९ : मणिपूर नगरींतील गोविंदशर्मा व त्याचीं नीतिवचनें हा भाग हस्तलिखितांत नाहीं. ‘उदयाचल’ ऐवजीं ‘विंध्याचल’ असें आहे.

कथा २७ : ‘वाजपेय यज्ञ’ (दुष्काळनिवारणार्थ) केला, असा निर्देश ‘प्रसाद’ प्रतींत नाहीं. हस्तलिखितांत आहे.

कथा २८ : हस्तलिखितांत इंद्राचा मुळींच उल्लेख नाहीं. कामधेनु ही नंतर विक्रमावर प्रसन्न होऊन दिली जाते. यम व वरुण, अनुक्रमें वाघ व गाय यांचीं रूपें घेऊन येतात, अशी येथील कथा आहे. येथें जैन कथेंतील[११] उत्तरार्ध (वाघ व गाय) स्वीकारला असून, पूर्वार्ध (इंद्र) सोडला आहे.

कथा ३० : दोन्ही कथा सारख्याच आहेत.

आतां माझ्याकडील हस्तलिखित प्रतींत ज्या सर्वस्वीं भिन्न कथा आहेत, त्यांची रूपरेषा पाहूं.

कथा २० : माधव नांवाचा एक चतुर, सुंदर व गाणारा ब्राह्मण होता. त्याच्यावर आपल्या स्त्रिया मोहित होतील म्हणून राजे लोक त्याला आपल्या राज्याबाहेर घालवीत. असें पुष्कळ वेळां झालें, म्हणून तो तीर्थयात्रा करीत फिरूं लागला. फिरतां फिरतां तो देवनगरीस कामसेन राजाच्या घरीं आला. राजाकडे कामकंदला नांवाची एक कळावंतीण होती. तिचें नृत्य-गायन चालूं होतें. तें माधवानें दारातून ऐकलें व मृदंग वाजविणाऱ्यास अंगठा नाहीं म्हणून दुरूनच सांगितलें. तें खरें ठरलें म्हणून राजानें त्याला वस्त्रों-भूषणें दिलीं. पण तीं माधवानें कामकंदलेला देऊन टाकलीं. याचा राजाला राग आला. त्यानें माधवास गांवाबाहेर हाकलण्याची आज्ञा दिली. रात्रीं कामकंदलेनें माधवाला घरीं बोलावून आणलें आणि त्याला गाऊन दाखविलें. माधवानेंहि आपल्या गायनानें तिला मोहित केलें. पहांट झाली आणि राजाज्ञेप्रमाणें त्याला गांव सोडावें लागलें. कामकंदलेनें त्याच्याबरोबर येण्याची इच्छा केली. पण तो तिला नेऊं शकला नाहीं. पुढें अवंतीस आल्यावेळीं माधव एका देवळांत वस्तीस

---

११. सिंहासनबत्तिशी, तळटीप, पृ. २०६.

असतां कामंदलेसाठीं शोक करू लागला. त्या वेळीं विक्रम तेथें आला व त्याला सर्व वृत्तांत कळला. त्यानें कामसेनास ' कामकंदला दे, नाहीं तर युद्धास सिद्ध हो ' असा निरोप पाठविला. तत्पूर्वीं कामकंदलेच्या प्रीतीची परीक्षा पाहावी म्हणून विक्रम वैद्याच्या रूपानें तिच्या घरी गेला. तिचें विरहाचें दुखणें असल्याचें निदान त्यानें केलें. त्यावर ती म्हणाली, " याचा उपाय तुजपाशी नाही. " राजानें तिला खोटेंच सांगितलें कीं, माधव मरण पावला. त्या बातमीनें तिला मृत्यु आला. माधवास हें वर्तमान कळतांच तोहि शोकानें मरण पावला. हें पाहून विक्रम अग्निप्रवेश करणार, इतक्यांत वेताळानें प्रकट होऊन राजाला ' अमृतसंजीवनी औषधी ' दिली. विक्रमानें दोघांस जिवंत केलें आणि कामसेनास जिंकून त्याच्या राज्यावर माधवाची स्थापना केली.

कथा २१ : ही कथा, ' शिकवून बुद्धि येते काय ? ' या प्रश्नावर आधारलेली आहे. विक्रमाने अरण्यांत एक बंगला बांधविला आणि तेथें राजपुत्र, प्रधानपुत्र, कोतवालपुत्र व ब्राह्मणपुत्र या चार लहान वयाच्या मुलांना ठेवलें. त्यांच्या कानावर मनुष्याचा शब्दहि येणार नाहीं, अशी काळजी घेतली. पण तेथें एक पुरुष प्रकट झाला व त्यानें मुलांस बोलावयास शिकविलें. बारा वर्षानंतर त्या मुलांना बोलावून आणून विक्रमानें प्रथम आपल्या मुलास विचारलें, " हे पुत्रा, तू सुखी आहेस ना ? " तो म्हणाला, " तुमच्या पुण्याने सुखी आहे." प्रधानपुत्र म्हणाला, " आपल्ये कृपेनें कुशल आहे. " ब्राह्मणपुत्रानें सांगितले, " राजा, ईश्वरावाचून कोणी सुखी नाही. " कोतवालपुत्रानें उत्तर दिले, " हे महाराज, लोक चोरी चहाडी लबाडी करतात त्यास शिक्षा कशी होईल या काळजींत मी आहे. " शेंवटीं विक्रमास दैवच मुख्य कारण होय, हें पटलें.

कथा २२ : विक्रमानें शंखचूड नांवाच्या दुष्ट राजास मारलें व त्याच्या कारभाऱ्यांना घरीं बसविलें. एक दिवस शंखचूडाचा प्रधान नदींत स्नान करीत असतां वरून एक सुंदर फूल वाहात आलें. तें वनांतील असावे व हें दिल्यानें विक्रम आपणांवर प्रसन्न होईल, असें वाटून तें त्यानें विक्रमाला दिलें. फूल पाहतांच विक्रमास पूर्वजन्माची आठवण झाली. विक्रम त्या प्रधानाला म्हणाला,

"या फुलाचा वृक्ष आणून दिलास तर तुला पाहिजे तें देईन. तूं न आणल्यास तुझें सर्वस्व घेऊन गांवाबाहेर घालवीन." प्रधान चिंतेंत पडला. तो नावेंत बसून नदीच्या उगमाच्या दिशेनें निघाला. पुन्हा तसलेंच फूल त्याला दिसलें व पुढें एक मोठें झाड नदीतीरावर दिसलें. त्याच्या एका फांदीवर मांसाची पिंडी होती व त्यांतून एकेक रक्ताचा थेंब प्रवाहांत पडत होत व त्याचीं फुलें होऊन तीं वहात जात होतीं. न्याहाळून पाहतां त्याला त्या झाडावर तसलाच आणखी एक पिंड दिसला, पण त्यांतुन रक्ताचे थेंब पडत नव्हते. परत येऊन प्रधानानें विक्रमाला ही हकीकत सांगितली. विक्रमानें त्याला सांगितलें, "ज्या पिंडापासून फुलें उत्पन्न होतात तो माझा देह आहे व दुसरा माझ्या कारभाऱ्यांचा. पूर्वीच्या उग्र तपानें मला राज्य व माझ्या बरोबरच्यांना वैभव मिळालें. कर्मासारखें फळ मिळतें, हें समजण्यासाठीं मीं तुला तेथें पाठविलें". नंतर विक्रमानें त्याला राजकाम सांगून संतुष्ट केलें.

कथा २३ : एकदां एका सुतारानें विक्रमाकडे फार सुंदर लाकडाचा घोडा आणला. त्याची कळ दाबल्याबरोबर तो पाहिजे तिकडे मनुष्याला वेगानें नेऊं शके. पण त्याला टाच लावली तर आवरत नसे. विक्रमानें सुताराला लाख रुपये दिले. पुढें एक दिवस विक्रमाला त्या घोड्यावर बसावें असें वाटलें. तो बसला पण विसरून त्याला त्यानें टाच लावली. तो उडून आकाशांत धांवूं लागला व शेवटीं एका अरण्यांत उतरला. तेथें एका झाडाजवळ दोन विहिरी व एक बंगला होता. त्या बंगल्यांत एक वानरी पलंगावर बसलेली विक्रमाला दिसली. इतक्यांत तेथें एक जति (यति) आला व त्यानें डाव्या विहिरींतील पाणी काढून वानरीवर शिंपडलें. त्याबरोबर ती स्त्री होऊन त्याच्याबरोबर विलास करूं लागली. नंतर जतीनें उजव्या विहिरींतील पाणी तिच्यावर शिंपडल्यावर ती वानरी झाली. हें पाहून विक्रमास आश्चर्य वाटलें. जति गेल्यावर विक्रमानें तिच्यावर पाणी शिंपडून तिचें स्त्रीत रूपांतर केलें. तिला विचारतां विक्रमाला तिनें आपली अशी हकीकत सांगितली. "लहानपणीं आईबापांची अमर्यादा केल्यानें मला त्यांनीं या

जतीच्या स्वाधीन केलें. तेव्हांपासून तो दुष्ट माझे फार हाल करतो. मला या दु:खांतुन सोडव."

विक्रमाला तिची दया आली व त्यानें वीराचें[१२] स्मरण करतांच तीन वीर उभे राहिले. एकानें तिला व दुसऱ्यानें विक्रमाला आपल्या खांद्यावर घेतलें व तिसऱ्यानें लाकडी घोडा घेतला व विक्रम अवंतीला आला.

कथा २४ : ही एक व्यभिचारनिषेधाची कथा आहे. एकदां एका स्त्रीनें एका सावकारपुत्रास रात्रीं घरीं येण्याची खूण केली. तें विक्रमानें पाहिलें. त्या रात्रीं तो तिच्या घराजवळ गेला व त्यानें खिडकींतुन आंत बारीक खडे टाकले. सावकारपुत्र आला, असें वाटून ती स्त्री त्याच्याबरोबर देशांतरास जाण्याच्या तयारीनें घराबाहेर आली. विक्रम तिच्याबरोबर दूर रानांत गेला व त्यानें तिला व्याभिचारी कर्मानें इहपरलोकीं सुख नाहीं, हें पटवून दिलें. तिलाहि उपरति झाली व ती घरीं परतली.

कथा २५ : एक दिवस विक्रम रंगमहालांत गायन ऐकत असतां त्याची शिवपूजेची वेळ टळली. त्याचा पश्चात्ताप होऊन तो नर्मदातीरीं अरण्यांत तपास गेला. तेथें अनेकजण तप करीत होते. कांहींजण, ईश्वरदर्शन न होतांच मरण पावले. पण विक्रमाच्या तीस वर्षांच्या तपश्चर्येनें महादेवानें प्रसन्न हो न त्याला दर्शन दिलें व वर मागण्यास सांगितलें. विक्रमानें, जे तपस्वी मरण पावले त्यांना जिवंत करून दर्शन द्यावें, अशी प्रार्थना केली. ती मान्य करून महादेवानें विक्रमास एक कमळ दिलें व "हें कोमेजेल तेव्हां आपलें आयुष्य संपलें असें तूं समज," असें सांगितलें.

कथा २६ : एके दिवशीं विक्रमानें आपल्या प्रधानास जी नीति सांगितली ती येथें आहे. येथें केवळ नीत्युपदेश आहे, गोष्ट अशी कोणतीच सांगितलेली नाहीं.

कथा २९ : ही 'शनिमाहात्म्या'ची आठवण करून देणारी कथा आहे. एके रात्रीं विक्रम नगरांत फिरत असतां एका दरिद्री ब्राह्मणदांपत्यांतील संवाद

१२. वीर हा पिशाच्चांचा एक प्रकार आहे.

त्याच्या कानीं आला. दुसऱ्या दिवशीं विक्रमानें त्या ब्राह्मणास बोलावून एक कोहळा दान म्हणून दिला. या कोहळ्यांत त्यानें रत्नें ठेविलीं होतीं. राजा उदार झाला आणि त्यानें कोहळा दान म्हणून दिला असें वाटून खिन्न मनानें तो कोहळा ब्राह्मणानें एका सावकारास चवलाला विकला. हा वृत्तांत राजा त्या रात्रीं ब्राह्मणाच्या घराजवळ फिरत असतांना पतिपत्नींच्या संवादांतून राजास कळला. इतक्यांत ब्राह्मणाच्या घरांत एक पुरुष जाऊं लागला. राजानें त्याला तो कोण, एवढ्या रात्रीं तेथें काय काम आहे, याची त्याकडे चौकशी केली. तो पुरुष म्हणाला, “ मी काळ आहें. मी त्या ब्राह्मणाला छळावयास जात आहें. ” विक्रमानें त्याला नमस्कार करून म्हटलें, “ देवा, त्याच्या वांट्याचें मला छळ. ” काळ म्हणाला, “ बरें, मी तुला एक वर्षपर्यंत पीडा देईन.” दुसऱ्या दिवशी सराफानें कोहळा चिरला, तर त्यांतून रत्नें निघालीं. तीं त्यानें ब्राह्मणाश परत केलीं. ब्राह्मण सुखानें संसार करूं लागला. त्याच रात्रीं राजाच्या राजवाड्यास आग लागली, भांडार-शाळेंत चोरी झाली. विक्रमानें सर्व वर्तमान प्रधानास सांगितलें व तो सेतुबंध-रामेश्वरास जाऊन तेथें देवळांत तप करूं लागला. एके दिवशीं चंदीचंदावरचा राजा तेथें देवदर्शनास आला असतां विक्रमाचें सुंदर रूप पाहून त्यास आनंद झाला. विक्रमाला तो आपल्या पट्टणास घेऊन गेला. पुढें एकदां राजाची स्त्री विक्रमास गोष्टी सांगत असता न्हावयाची वेळ झाली म्हणून उठली. तिनें आपल्या गळ्यांतील नवरत्नांचा हार खुंटीवर ठेवला व ती निघून गेली. विक्रम हाराकडे पाहात बसला आहे इतक्यांत काळानें त्या खुंटींत प्रवेश केला व हार गिळून टाकला. राणीस परत आल्यावर हार दिसेना. विक्रमानें जें घडलें तें सांगितलें, पण तिला व राजालाहि तें खरें वाटेना. राजानें त्याचे हातपाय तोडले. पुढें रस्त्यांत पडलेल्या या थोट्याला एका तेल्यानें पाहिलें व घरीं नेलें. पुढें राजकन्येनें त्याचा दीपराग ऐकला व त्यास पति मानलें. बाकी कथा ‘ शनिमहात्म्या ’ सारखीच.

या कथेंत दोन उपकथा आहेत· पहिली 'तीन सोन्याच्या पुतळ्यां'ची· विलायतच्या राजानें[१३] चंदीचंदावरच्या राजाकडे तीन सारख्याच वजनाच्या व आकाराच्या पुतळ्या पाठविल्या व त्यांतील उत्तम, मध्यम, अधम, कोणती, हें ठरविण्यास सांगितलें· राजानें शहाण्याशहाण्यांना विचारलें· निवाडा होईना· विक्रमाला हें वृत्त कळतांच त्यानें हार गिळणाऱ्या खुंटीखालीं बैठक घालण्यास सांगितलें· व तेथें त्यानें पुतळ्यांची परीक्षा केली· जिच्या कानांत घातलेली काडी तोंडांतुन बाहेर आली ती अधम; जिच्या कानांतून बाहेर आली ती मध्यम व जिच्या पोटांतच राहिली ती उत्तम, असा त्यानें निवाडा दिला·

दुसरी उपकथा लक्ष्मी, बुद्धि, धर्म व काळ यांच्यांत श्रेष्ठ कोण, या निवाड्याची·[१४] विक्रमानें काळ हाच श्रेष्ठ, असा निर्णय दिला तेव्हां काळ पुढें येऊन उभा राहिला· खुंटींत गेलेला हार बाहेर आला·

कथा ३१ : महादेवानें दिलेलें कमळ सुकलें असें पाहून आपला मृत्यु जवळ आला, हें विक्रमानें जाणलें· तो वाई क्षेत्रीं येऊन राहिला· तेथें याचक येऊं लागले· एक दिवस विक्रम कृष्णातीरीं बसला असतां तेथें एक सुवर्णकांतीचें हरिण आलें· विक्रमाच्या पुण्यानें त्याला स्वर्ग मिळणार होता· विक्रमानें त्याला स्वर्ग प्राप्त व्हावा म्हणून पुष्कळ यज्ञदान केलें·

कथा ३२ : विक्रमाच्या अंतसमयीं इंद्रानें विमान पाठविलें व त्यांतून विक्रम स्वर्गास गेला· अवंती नगरींत लोक शोक करूं लागले· नंतर प्रधानानें राजपुत्र जैत्रपाळ यास राज्यावर बसविलें. जैत्रपाळ सिंहासनावर बसूं लागला तों लगेच मूर्छित पडला· रात्रीं जैत्रपाळास दृष्टान्त झाला की, उज्जनी व धारानगरी

---

१३· हा कालविपर्यास मोठा मजेशीर आहे·

१४· 'प्रसाद' प्रतींतील क्र· ३२ ही कथा येथें विचारांत घेण्यासारखी आहे· त्या कथेंत लक्ष्मी, विवेक व सत्त्व यांचें तारतम्य आहे· ही कथा जैन प्रतीवरून घेतली असल्याचें जोगळेकरांनीं सांगितलें आहे· 'सिंहासनबत्तिशी', तळटीप, पृ· २४७·

सोडून आंबावती नगरींत राहा व सिंहासन पुरून टाक. जैत्रपाळानें तसें केलें व तो आंबावतींत येऊन राज्य करूं लागला. हा भाग सर्वस्वीं निराळा आहे. या कथेच्या शेवटीं बत्तीस पुतळ्यांच्या शापाची व त्यांच्या कैलासगमनाची हकीकत आहे. ही हकीकत व आधींची कथा चित्रकळा ही बत्तिसावी पुतळी सांगते. ही निराळी शापकथा अशी : "आह्मी बत्तीसजणी पार्वतीच्या सख्या होतो ऐके दिवसि शिवाचे स्वरूप अत्यात वृद्ध रूड माळानी वेष्टित गजचर्मछादित नागपाशांनी बद्ध चिताभस्माने लिप्त असे पाहुन आम्हास हांसू आले तेव्हा माहादेवाने आह्मास शाप दिला की तुह्मी निर्जीव होउन पृथ्वीवर राहाल." उःशापाची कथा भिन्न नाहीं.

मुळांत नसलेल्या या कथा कोठून घेतल्या, त्या अन्यत्र कोठें कोठें आढळतात, हाहि विचार करण्यासारखा प्रश्न आहे. माझ्याकडील हस्तलिखित प्रतींत बऱ्याच गोष्टींचें मिश्रण आहे. ' सिंहासनबत्तिशी ' च्या ज्या पांच भिन्न प्रती–दाक्षिणात्य, छंदोबद्ध, संक्षिप्त, जैन व वररुचि–त्यांचें कांहींसें मिश्रण या प्रतींत दिसतें. सर्वस्वीं एकाच प्रतीचा ( वा पाठाचा ) अनुवाद येथें केलेला नाहीं. उदाहरणार्थ, जैन प्रतींतील कांहीं भाग येथें कसा घेतला गेला आहे व कांहीं कसा सोडून दिला आहे, तें आपण पाहिलेंच.

तसेंच औढ्या नागनाथ, अंबावती, वाई, कृष्णातीर यांचे निर्देश केवळ स्थलविपर्यासाच्या स्वरूपाचे आहेत काय ? ' सिंहासबत्तिशी ' चें अंतर्याम महाराष्ट्री असावें, या कै. जोगळेकरांच्या अनुमानाला या निर्देशांनीं थोडीशी बळकटी येण्याचा संभव आहे काय ? आपल्या प्रदेशांतील आधींच कांहीं कारणांनीं प्रसिद्ध असलेल्या स्थळांचें माहात्म्य वाढावें म्हणून त्यांचा संबंध प्रसिद्ध व्यक्तींशीं व घटनांशीं जोडण्याची मनोवृत्ति पुष्कळ ठिकाणीं दिसून येते. जैत्रपाळ आणि अंबावती यांच्या निर्देशांमध्यें जयंतपाळ किंवा जैत्रपाळ व अंबानगरी ( अंबेजोगाई ) यांच्या विषयींच्या कथेचें सूत्र असावें. चंदीचंदावरच्या राजाच्या उल्लेखाला एखाद्या दाक्षिण्यात्य दंतकथेचा आधार असणें शक्य आहे. येथें महाराष्ट्री अंतर्याम असलेल्या ( ! ) कथा त्यांच्या प्रवासांत वेगवेगळ्या स्थळांचे

रंग कसे उचलतात, हें दिसून येतें. 'चंदीचंदावर' हें 'तंजावर' चें मराठेशाहींतील रूप.[१५] तंजावरचें राज्य म्हणजे चोल राजाचें राज्य व कथेंतील राजा हा चोल घराण्यांतील असावा, असें समजून चालल्यास संगति लागूं शकेल. परंपरेनें चालत आलेल्या कथांवर स्थलकालानुसार कसे भिन्न भिन्न साज चढतात व त्यामुळें त्यांच्यांत कांहीं वेळां वरवरचे, तर कांहीं वेळां आमूलाग्र बदल कसे होतात, याचें 'सिंहासनबत्तिशी' हें एक चांगलें उदाहरण आहे. स्थलकालाप्रमाणेंच धर्मपंथांचाहि हातभार या कथापरिवर्तनाला लागतो. 'सिंहासनबत्तिशीं'तील कथांना जैन किंवा ब्राम्हणी म्हणतांना आपण हीच गोष्ट सुचवीत असतों. 'सिंहासनबत्तिशी'च्या एका हस्तलिखित प्रतीबद्दलच्या या विवेचनाला अर्धविराम देतांना एक प्रश्न मनांत येतो : या कथा मूलतः शैव आहेत असें म्हणणें योग्य ठरेल काय ?

१५. कै. द. ब. पारसनीस यांनीं हा शब्द असा व्युत्पादिला आहे : जंजाऊर = चंदाऊर = चंजावर = चंदावर = तंजावर. 'चंदी' हें 'जिंजी' चें रूप. —तंजावरचें राजघराणें, पृ. २.

# त्र्यंबककृत 'प्रल्हादचरित्र'

प्रल्हादचरित्र हें मराठी कवींचें आवडतें आख्यान आहे. मुळांतच तें रसाळ आणि आल्हादक. त्यांत महाराष्ट्राच्या भक्तीला बोलकी करण्याचें सामर्थ्य असावें, हें स्वाभाविकच वाटतें. महाराष्ट्राला प्रल्हादाशीं समरस होतां आलें याचें दुसरें एक कारण आहे.

प्रल्हादाप्रमाणेंच महाराष्ट्राचीहि छळणूक व गांजणूक झाली. 'आनंदवन-भुवना'चें स्वप्न साकार झालें असेल तर अल्पकाळच. महाराष्ट्राची आध्यात्मिक ठेवण व भौतिक परिस्थिति यामुळें प्रल्हादचरित्राकडे मराठी कवि अधिकदां वळले असावेत असें मला वाटतें.

" हें गोड आख्यान एकनाथ, तुकारामापासून तों आजपर्यंत दहाबारा निरनिराळ्या कवींनीं गायिलें आहे. पंतांचा तर यावर 'प्रल्हादविजय' नांवाचा स्वतंत्रच ग्रंथ आहे हें मशहूर आहे; " असें भावे सांगतात.[१] या दहाबारा कवींतच आणखी एका कवीचा समावेश केला पाहिजे.

---

१. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. ६०५.

मला उपलब्ध झालेल्या 'प्रल्हादचरित्रा'च्या कवीचें नांव त्र्यंबक असें आहे. त्यानें स्वतःबद्दल आपल्या काव्यांत (कन्नड व हिंदी पदांतहि) कांहीं माहिती दिली आहे. कांहीं चारित्रपर उतारे त्या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेतः—

(१) ऋग्वेदी द्विज त्रियंबक कांट्या कौसिक गोत्रीचा ।
प्रसिद्ध कुळकरणी तो धरणीवरि मांडोगणिचा ॥
ऐका गुरु गोपाळकृष्ण विश्वंभर त्याचा ।
बोलिला तो कारण कौतुक यथार्थ निजवाचा ॥

(२) ऋग्वेदी द्विज त्रियंबक कौसिक गोत्रद वंशिकनू ।
आर्यादेशद[२] मांडोगणदा कुळकरणी अवनू ।
गोपाळन चरणांबुज मनदाळि ध्यानवधरिसिदनू ।
सद्गुरुदयपरिपूर्णादिरिंदा कळिमत हेळिदनू ॥

(३) ऋग्वेदिया द्विज त्रियंबक मंदबुद्धि ।
तो हें हरि कथानक वदे मोक्षसिद्धी ॥
कौसीक गोत्र बरवे उपनाम कांटे ।
मांडोगणास कुलकर्णिक ख्यात मोटे ॥
गोपाळकृष्ण कुळदैवत ज्या घरीं हो ।
त्याचीच भक्ति करिजे मनअंतरींहो ॥
गोपाळ तोचि नरकेसरि जाहला हो ।
तें हें नृसिंह्य हरिकीर्तन आयका हो ॥

---

२. आर्या-देशद म्हणजे महाराष्ट्राचा. कर्नाटकांत 'आर्य' पासून आलेले 'आरेरू' (मराठे), 'आरेमातु' (मराठी) 'आरेनाड्ड' (मराठ्यांचा देश, महाराष्ट्र) असे शब्द रूढ होते. 'आरे अरसु, मुसलमानी सरसु'; या वाक्प्रचारांतहि ही रूढि दिसते. एवढेंच नव्हे तर मैसूर प्रांतांतील मालिंगी येथील शिलालेखांत (स. १२९०) मराठीचा 'आर्य' (भाषा) असा उल्लेख आढळतो.

अनुक्रम ...३८८६६...... दिः ......

क्रमांक ...... दि ......

(४) रुग्वेदी गोत्र कौशीक विप्र सात्वीक ।
उपनामे जाणा भावीक कांट्या त्रियंबक ॥

(५) पांड्या तो मांडोगणाचा काद्रयाबादेचा ।
गोपाळभक्त त्रियंबक हे त्याची वाचा ॥

अशा तऱ्हेच्या अनेक निर्देशांवरून आपणास अशी माहिती मिळते कीं कवीचें नांव ‘ त्र्यंबक ’ व आडनांव ‘ कांटे ’ असें असून तो कौशिक गोत्री ऋग्वेदी ब्राह्मण आहे. त्याच प्रमाणें गोपाळकृष्ण हें त्याचें कुळदैवत असून तो ‘ मांडोगण[१] येथील कुलकर्णी ( व देशपांडेहि ) आहे.

त्र्यंबक हा माध्वसांप्रदायाचा आहे. ‘ गोपाळकृष्ण ’ हें त्याचें कुळदैवत आहे, एवढ्यावरून त्याच्या सांप्रदायाबाबत एखादी कल्पना मनांत डोकावली तरी इतर आधाराखेरीज त्याला माध्व ठरविणें शक्य नव्हतें.

त्याच्या कांहीं कन्नड पदांत असे आधार मिळतात. त्यापैकीं दोन कन्नड उतारे पुरेसे आहेत :—

(१) श्रीरामदूत इंथांता । कोटिब्रह्मांडदोळगिल्ल ।
केळिविख्याता । श्रीभीममध्वमुनिईता ॥ ....
.... त्रीयंबक चरितवु हिरिकोटन कळभीमा ॥

(२) प्रथमनाम हनुमंतगे मंगळा । द्वितिय भीम नामगे मंगळा ।
तृतीय मध्व पूर्णप्रज्ञागे मंगळा । भीमरूपधारिगे मंगळा ।
हिरिय कोटिगिन कळ्ळहनुमंतगे मंगळा । त्रियंबक बेडुव वरमंगळा ॥

ही दोन्हीं पदें हनुमंतावरली आहेत. आणि त्यांत ‘ मध्व ’ असें नांव येतें. माध्व मारुती, भीम व मध्वाचार्य अशी त्रयी मानतात. भीम व मध्व हे

---

१. मांडवगण हें गांव नगर जिल्ह्यांत आहे. कात्राबाज मांडवगण असें नांव जयरामस्वामी वडगांवकरांचें गांव म्हणून भाव्यांनीं दिलें आहे. त्र्यंबक कवीचें गाव तेंच ‘ मांडवगण ’ असावें.

हनुमंताचेच अवतार आहेत; अशी जी माध्वांची श्रद्धा,[४] तिचा आढळ त्र्यंबकाच्या या पदांत होतो.

' त्र्यंबक ' नांवाच्या आणखी एका कवीचा उल्लेख भाव्यानीं केला आहे.[५] त्यानेंहि प्रल्हादचरित्रच लिहिलें आहे. तो मध्वमुनींचा शिष्य असावा किंवा मध्वमुनींचेंच नांव त्र्यंबक असावें; असा तर्क भावे लढवितात. त्यावर कांहीं प्रकाश आमच्या त्र्यंबकाला टाकतां येईल असें वाटत नाहीं.

भाव्यांनीं उल्लेखिलेला त्र्यंबक नाशिक ऊर्फ जनस्थान येथें राहणरा आहे. आमचा त्र्यंबक आणि तो भिन्न आहेत, एवढेंच मला या बाबतींत म्हणतां येईल. ' जनस्थानीं नांदे ' किंवा ' दयाळा म्यां तुझा ' हे श्लोकहि माझ्याकडील ' प्रल्हादचरित्रां ' त नाहींत. किंबहुना जनस्थानाचा किंवा त्या परिसराचा ओझरता उल्लेखहि नाहीं. जनस्थानाहून ' नीराभीमासंगमा ' ला जवळ असलेला हा त्र्यंबक आहे.

' नाशिक ' च्या त्र्यंबकाचें ' प्रल्हादचरित्र ' पाहतां आलें असतें तर अधिक उलगडा होऊं शकला असता. परंतु दोघांच्याहि व्यक्तिनामांत, ग्रंथनामांत व संप्रदायांत फरक नसल्यामुळें गोंधळ होण्यासारखा असला तरी प्रस्तुत त्र्यंबक हा मध्वमुनींचा शिष्य नव्हे; असें मानण्यास जागा आहे.

' मध्व ' हे आपले गुरु आहेत, असा कोठेंहि उल्लेख त्र्यंबक करीत नाहीं. ' गोपाळ ' असें गुरूचें नांव तो ठिकठिकाणीं देतो. आपलें दैवत व गुरु यांत अभेद मानण्याची आपल्या कवींची परंपरा येथेंहि दिसते व नडते. दुसरें कोणतेंहि, मानवी गुरूचें नांव त्र्यंबकानें दिलें नसल्यामुळे त्याच्या देहधारी गुरूचेंहि नांव ' गोपाळ ' हें होतें असें मानलें पाहिजे.

---

४. प्रथमो हनुमन्नामा द्वितीयो भीम एव च । पूर्णप्रज्ञस्तृतीयस्तु भगवद्कार्यसाधकः ॥

५. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. ६०५,

मायबाप बंधु सद्गुरु गोपाळ ।
संतति संपत्ति वैभव सकळ ।
गोपाळावांचूनि कोण करि सांभाळ ।
त्रियंबक लीन त्याचे पायिं केवळ ॥ [६]

असे उद्गार त्यानें काढले आहेत. त्याचप्रमाणें ‘ प्रल्हादचरित्र ’ देखील गुरुनें सांगितलें म्हणून लिहिलें असेंहि त्र्यंबक सांगतो. यावरून ‘ गोपाळ ’ हा त्याचा गुरु आहे.

तो मध्वमुनींचा शिष्य नव्हे, हें स्पष्ट होतें. त्र्यंबक हें नांव माध्व लोकांत आढळणें चमत्कारिक वाटलें तरी त्याचाहि खुलासा होऊं शकतो. प्रथम स्मार्त असलेल्यांनीं नंतर वैष्णवपंथाची दीक्षा घेतल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. सुप्रसिद्ध संतकवि पुरंदरदास हे सुद्धां मूळचे स्मार्त होते व नंतर त्यांनीं व्यासरायां-कडून दीक्षा घेतली. त्र्यंबकाचा सुद्धां असाच प्रकार असावा व त्यामुळें त्याचें पहिलें नांव पंथाशीं विसंगत दिसत असावें.

त्र्यंबक हा कीर्तनकार कवि आहे, हरदास आहे.

(१) सांगे विप्र त्रियंबकाप्रति सुखें श्रीसद्गुरु आपण ।
ठेवूनी हस्तक मस्तकीं मग म्हणे आरंभिजे कीर्तन ।

(२) सांगे त्रियंबक मुखें हरिचें चरित्र ।
प्रल्हाद वैष्णवसिखामणिचें विचित्र ।
जे ऐकती हारिकिथामृत संत श्रोते ।
त्यांचेनि धन्य तरती गुरुदास वक्ते ॥
मागे त्रियंबक मनें अवधान संता ।
वंदूनियां चरणपंकज नित्य माथा ।
ऐका म्हणे सुरस कीर्तन श्रीहरीचें ।
जें कां महाभयनिवारक भाविकांचें ॥

---

६. ‘ गोपाळभक्त त्रियंबक हे त्याची वाचां । ’ ‘ गोपाळन चरणांबुज मनदाळि ध्यानवधरिसिदनू । ’

(३) त्रियंबक करि कीर्तन ।

(४) ऐका हो हरिकीर्तनांत बरवी प्रल्हादलीलागती ।

(५) सांगे त्रियंबक कथा पवित्र । प्रल्हादचरित्र ॥

(६) ऐका पुढें हरिकथा भवनाशनी हे ।

या सर्व उद्‌गारांवरून कवीचा थाट कळून येतो. 'नाचूं कीर्तनाचे रंगी' असें कृतीनें सांगणारा हा भाविक कवि आहे. म्हणूनच कथेला तो पवित्र, पावन, भवनाशनी असें संबोधितो. कथामाहात्म्य त्यानें विस्तारानें सांगितलें आहे,[७] त्यावरून काव्यरचनेचा त्याचा हेतूहि स्पष्ट होण्यासारखा आहे.

खलहि हरिकथेनें निश्रयेंसीं तरेल ।

..................................

सुगम हरिकथेने होत देहीं विदेही ।

त्र्यंबकाचें 'प्रल्हादचरित्र' बरेंच मोठें आहे. त्यामध्यें दोन हजारांहून अधिक श्लोक आहेत. 'सुश्लोक त्र्यंबकाचा' असें म्हणावयास लावणारी त्याची बरीच रचना आहे. श्लोकांबरोबरच पदेंहि त्यानें लिहिलीं आहेत. उपलब्ध झालेल्या हस्तलिखितांत पंचवीसच्या आसपास पदें आहेत. सर्व ग्रंथ मिळाला नाहीं. कांहीं पानें गहाळ झालेलीं आढळलीं. ४१ ते १०१ व ८८९ ते १२५३ हे श्लोक नाहींत. श्लोक १९३० अखेर 'प्रल्हादचरित्र' मिळालें. पुढें एका सुट्या व फाटक्या पानावर १९७७ ते २००० श्लोक आढळले व त्या-पुढेंहि अर्धवट मजकूर आहे. हे श्लोक नसल्यामुळें ग्रंथांत अपुरेपणा आला नाहीं. फक्त ग्रंथाच्या अखेरचा भाग नसल्यामुळें लेखनाच्या कालाबाबतचा अंतर्गत पुरावा मिळूं शकला नाहीं.

पहिला नमनाचा श्लोक, कागद फाटला असल्यानें नीट लागत नाहीं.

---

७. 'प्रल्हादचरित्र', ५२७–५३८ :–असो हे कथा बोलिलों मी कळाया ।
जनांची मती धर्ममार्गीं वळायां ॥ १३७० ॥

....नृसिंह्यराजनगरी नीराभिमासंगमीं[८] |

ब्रह्मेंद्रादिक वंदिती प्रतिदिनीं सर्वार्थ सर्वांग ( मीं ? )

प्रल्हादेश नृसिंह्य दे अभय हो भक्तां जना संभ्रमीं |

तो श्रीईश नृसिंह्य त्र्यंबक मनीं गोपा (ळ कृष्णा ?) नमी || १ ||

हिरण्यकश्यपूच्या वर्णनानें प्रारंभ करून कयाधूला लागलेले डोहाळे सांगून 'प्रल्हादचरित्रा'चा प्रारंभ कवीनें केला आहे.

वृंदावनास जावें अखंड सद्भावें....साधावी विष्णुभक्ति |

असले विलक्षण डोहाळे ऐकून तिच्या साजणींना भय वाटलें :

ईचा पती करिल निश्चित दंड आम्हां |

प्रल्हादाचा जन्म झाला तेव्हां तर,

जननसमयि व्योमीं वाजल्या देवभेरी |

वरुषति घन तोया मंदपीयूष धारीं ||

अगणित सुमनाची वृष्टि संपूर्ण झाली |

उदधिसुख (उ) साळी सत्यलोकास गेली ||

सर्वत्र आनंदीआनंद झाला. 'शर्करा वांटिली.' शिवशक्तीचीं देउळें दीपमालांनीं उजळून निघालीं.

राजानें 'वस्त्रफळधनानें' स्वजनांना गौरविलें.

असुरगुरुकवीनें वर्तिलें जातकर्म |

शुभकर गुण ठेवी सत्य प्रल्हाद नाम || १२० ||

कारण सुत अगदीं 'बत्तिसां लक्षणाचा' होता

'वक्तयालागिं' श्रोत्यांनीं सहज प्रश्न केला कीं—

---

८. भीमा व नीरा यांच्या संगमावर नृसिंहपूर हें क्षेत्र आहे. आणि वैष्णवांचें नृसिंह दैवत आहे.

प्रल्हाद हा कोठिल कोण कैंचा ।
हा अश देवांतिल कोणत्याचा ॥ १२२ ॥

तें पूर्ववृत्त देतांना कवीनें जयविजयांची कथा ( १३०-१३९ ) व मरुद्‌गणाच्या शापाची कथा[१] ( १४३-१५८ ) सांगितली आहे.

प्रल्हाद ' दिसेंदिस ' थोर झाल्यावर त्याला विद्या द्यावी असें राजानें कविगुरूला सांगितलें. गुरूला आनंद झाला. प्रल्हादाला अभ्यंगस्नान घालून, वसनभूषणांनीं शृंगारलें. आणि वाजतगाजत गिरिजापतीच्या नमनास नेलें. पण तेथें राजाला ' विपरित शकुनाची प्राप्ति ' झाली. आकाशवाणीहि गरजली.

होयील पुत्रचरितें नृपती अनर्थ |........
........तूं सावधान अस रे बरवें दिसेना ॥ २१४ ॥

पाटीपूजन झालें. ' लेखणि पूजियेली. ' प्रल्हादानें प्रणवाक्षर लिहिलें. पण गुरूच्या म्हणण्याप्रमाणें तो ' नमः सिद्धं ' लिहीना. उलट तो गुरूला म्हणाला.—

जी सद्‌गुरु न सिकवा मजला नकार ।
ॐकार सार सुखदायक वस्तु थोर ॥ २३७ ॥

प्रल्हाद ' पिसाळला ' असें गुरूला वाटलें तर राजाला अत्यंत क्रोध आला. त्याने मुलांची खूप निर्भर्त्सना केली. एवढेंच नव्हें तर ' असुरनायकें ताडिला

---

१. कोणे येक दिनि सुरेश्वर ऊर्वसीचें । लावण्य देखत कसा भूलला मनाचे । वास्तव्य मोहन दिसें दिसे तिचिये स्वरूपी । कामातुरें बसविली सुरपें समीपीं ॥ १४४ ॥ देवांस देव अधिपें दिधला निरोप इंद्रास बाधित बहू स्मरताप दर्प। घालूनिया करकुचीं अधरोष्टपानीं । जाला उतावीळ जिवें कुण वज्रपाणी ॥ १४५ ॥
—अशा वेळीं मरुद्‌गण आंत आले. म्हणून त्यांना दैत्योदरें जन्म मिळेल असा शाप मिळाला. ' प्रल्हादचरित्रां ' तील हें एक शृंगारिक स्थळ होय.

सुत.' 'वैरीच माझ्या उदरास आला' अशी खात्री होऊन वैरी–वधाचा दोष लागत नसल्यानें प्रल्हादाचा वध करण्याची आज्ञा सेवकांना दिला.

नगरभुवन बीदोबीदिया हिंडवा रे ।
धरुनि खरखलातें त्यावरीं बैसवारे ॥
पाहातिल जनव्राळें त्यां तुम्ही चेतवारे ।
प्रबळ दगड धूळी सेणमारा करा रे ॥ ३४६ ॥

अशी धिंड काढण्यास सांगितलें.

प्रल्हादाला 'पडणि पाडिलें' मदोन्मत्त कुंजरांच्या पायीं दिलें, शस्त्राघात केले, समुद्रांत ढकललें, विष दिलें, अग्नींत फेकलें तरीहि त्याच्या भक्तीनें त्याला तारलें. त्याच्या या छळाच्या वर्णनांत करुणापेक्षां रौद्र व अद्भुत रसाचाच प्रकर्ष आढळतो. हिरण्यकश्यपूच्या क्रोधांत रौद्र, कयाधूच्या वात्सल्यांत करुण व प्रल्हादाच्या भक्तींत भक्तीबरोबरच अद्भुताचा बराच भाग आहे.

प्रल्हादाला 'ऊंच गोत्रावरून' ढकलून दिलें तेव्हां 'हरीनें' 'शिशू झेलिला तत्क्षणीं हस्तपात्रीं.'

गडगडगड गर्जे घोष मोटा गजांचा ।
घणघणघण घोषु थोर घंटारवाचा ।
खणखणखण शुंडी शुंखला वाजवीती ।
जवळि....शब्द तो नायकेती ॥ ४०० ॥

असे हत्ती आल्यावर 'श्रीरंगनादे सकळांत रंगे' असें म्हणून ज्यांच्या पायीं प्रल्हाद निजल्यावर 'केलें पलायन गर्जी'.

घनांत लवती विजुवा प्रचंड ।
शस्त्रें[१०] तसीं झळकतीं........ ॥ ४३० ॥

---

१०. वज्रें गदा तोमर खड्ग दंड । पाशांकुशें मुद्गर चक्रखंड ॥ चंद्रार्ध घंटा आणि गुप्तछूरी । विशाळ भाले बिकटा कटारी ॥ ४३५ ॥ खट्वांग नाना परिचीं निशाणें । कुऱ्हाडियां कंटक लोहपर्णे । कल्हार नाळें कठिणें विशाळें । नखें हरीचीं बहु लोहगोळे ॥ ४३६ ॥

पण हरिनामाचें अभेद्य कवच असल्यामुळें 'अस्त्रें विराली पवनाभ्रन्यायें' आणि सिंधूनें तर त्याला फुलासारखें वर धरलें आणि राजदूतांना चमत्कार दिसला.

येकायकीं बाळक देखियेलें ।
पाण्यावरीं चालत नीट आलें ।
भिजेचिना पाय (राही ?) वरौता ।
मानी असा वारिधि विष्णुभक्ता ॥ ४८२ ॥

प्रल्हादाला कयाधूनें राजाच्या सांगण्यावरून विष दिलें. कारण राजानें 'तुला पुत्र हवा कीं पति हवा ?' असा प्रश्न विचारला. 'कुमर कुटिल जाला रातला वैरियाला' अशी प्रल्हादाबद्दल तक्रारहि केली. तेव्हां कयाधूनेंहि उत्तर दिलें,

तनयचरित दुःखें देखिलीं म्यां स्वनेत्रीं ।
सुत बहुश्रम देतो रातलासे कुपात्रीं ॥ ५२० ॥

राजा 'नकळत विष द्यावें' असें सुचवितो.

प्रल्हाद भेटल्यावर तिनें—

सांगितलें सकलही कुमरास वृत्त ।
तूझा पिता करवितो तुजला अघात ॥ ५५१ ॥

'हरि' सोड; मग वांचसील; असेंहि तिनें मुलाला सांगितलें, पण तो ऐकत नाहीं हें पाहून शोकानें ती मूर्च्छित झाली. तेव्हा,

वारा करी सीतळ पल्लवानें ।
पूसुनियां स्वेद करांबुजानें ।
केली पाहा सावध मायपुत्रें ।
कां वो असि निष्ठुर तूं पवित्रें ॥ ५६० ॥

तिच्या सांत्वनार्थ प्रल्हादानें तिला रुक्मांगदाची व श्रियाळ—चांगुणा यांची कथा सांगितली.

रुक्मांगदाच्या कथेंत थोडासा शृंगार आहे. रुक्मांगद मोहिनीला म्हणतो, 'सांडि पां कामचाळा' तरी ती आग्रह धरते,

मज तरि स्मर पीडा होतसे येच रात्रीं ।
क्षितिपति शमवी ते आपल्या सौख्यगात्रीं ॥ ५१९ ॥

असें या शृंगाराचें स्वरूप. चिलयाचें आख्यान उत्कट करुणामुळे हृदयस्पर्शी झालेलें आहे. आणि पत्नीधर्म पाळण्यासाठीं मला विष दे; असें प्रल्हादानें म्हटल्यावर 'हृदय–उलत माझें' असें माता कयाधु म्हणते.

जैसें पाहा घननिरें सुख चातकासी ।
सत्राविचेनि सुख ज्यापरि योगियासी ॥
चंद्रामृतें हरुष मानिति तें चकोरें ।
प्रल्हाद त्यापरि विषें हरुषें शरीरे ॥ ६५२ ॥

विषपानाचा असा परिणाम झाल्यानें त्याला 'यंत्रालयी' बसवून अग्नींत फेकण्यांत आलें. काष्ठें नभ चुंबितील अशीं रचलीं होतीं. व 'वृषभ महिष हत्ती उंट' याच्यावरून आणलीं गेलीं होतीं. या दिव्यांतूनहि प्रल्हाद पार पडला. तें खरोखर दिव्यच होतें ! कारण त्याचें स्वरूप इतकें भयंकर होतें की,

त्यानंतरें प्रलयपावक मान ज्वाळा ।
अद्भूत हो खवळल्या दहिती भुगोळा ।
हें व्योम निर्मळ तधीहुनि नीळ जालें ।
भेणेचि ऊर्ध्वगतिनें बहु दूर गेलें ॥ ७१३ ॥

येथील अलंकाराचें सौंदर्य न विसरण्यासारखें आहे. अग्निदिव्यासाठीं काष्ठें गोळा करतांना राजदूतांनीं जे नागरिकांवर व नगरांत अत्याचार केले;[११] ते

११. सकळहि सरलीं हो ठेविलीं गुप्त काष्टें । उकलिति ढवलारें मंदिरें भूपचेष्टे ॥ ढकलिति नगरीचीं देउळें कालिकेचीं । गणपति गिरिजेचीं शाकिनीडाकिनीचीं ॥ ६८७ ॥ असुर बहु दुकानें पाडिती वाणियांचीं । अगणित धन ज्याचें भाग्यवंताजनांचीं ॥ यतिमठ ढकलूनी दीधले निष्ठुरेंसी । निपटच परदेशीयांचिया कोंपटासी ॥ ६८८ ॥

वाचून कवि आपल्या काळांतील एखाद्या घटनेचें पर्यायानें वर्णन करीत आहे; असें वाटतें.

प्रल्हाद मरत नाहीं हें पाहून राजानें 'तुझा हरि दाखव' असें त्याला आव्हान दिलें. तेव्हां हरि स्वरूपाचें केलेलें वर्णन पाहण्यासारखें आहे. 'वाचामगोचर मनासहि आकळेना' असें तें स्वरूप असून,

वेदांसही स्वरूप तें नकळे हरीचें ।
ते नेतिनेति म्हणती परतोनि वाचे ।
शेषेंसहस्रवदने हरि वर्णियेला ।
नाहींच अंत कळला मग स्तब्ध जाला ॥ ७८६ ॥
जिव्हा द्विफाळ जाहाली हरिवर्णनेने ।
तै शेष स्तब्ध बसला हरिध्यानमौनें ।
जाला प्रसन्न हरि त्या धरणीधराला ।
अद्यापि शेषशयनी म्हणती हरीला ॥ ७८७ ॥

असा हरि दिसणार कसा ? पण तो सर्वत्र आहे. "या खांबांत हरि आहे काय ?" या प्रश्नाला प्रल्हादानें 'होय' म्हणून उत्तर देऊन हरीला प्रकट होण्याची प्रार्थना केली. तेव्हां त्या खांबाला 'अपरांपराचें तेज' चढलें. 'सभा धवलली.'

गडाडिला भीतरि भीषणेसी ।
कडाडिला काळ विजुस्वरेंसी ।
थरारिला खांब महाभरेंसी ।
अश्वत्थपत्रापरि कंपनेसी ॥ ९४२ ॥

हिरण्यकश्यपू 'करकरकर दाढा खात' उठला व खांबाजवळ जाऊन विष्णूची निंदा करूं लागला,

अखंड असतो घरिं सासुऱ्याच्या । ........
मी येक ईश्वर .... मूर्खत्व थोर हरिचें । ........

व मला शरण ये, असें म्हणूं लागला. त्यानें खांबाला लाथ मारतांच 'कडकडकडकड शब्दें फूटला स्तंभ' आणि नरहरीची गर्जना बाहेर पडली.

खचिति अचल मेरु विंध्य मांदार घोषें ।
रविशशि भुलले हो वाट व्योमांत कैसे ॥
तुटति तटतटां त्या दिव्य नक्षत्रमाळा ।
रिचविति क्षितिगर्भी ज्यापरी पावसाळा ॥ ८७७ ॥

सौदामिनी देखिल 'भ्रमित चकित मूक्या जाहाल्या.' येथें अद्भुत रौद्राच्या सोबतीला आला आहे. नृसिंहानें दैत्यांचा संहार केला त्या वर्णनांत बीभत्साची छटा आहे.[१२]

नृसिंहाशीं दैत्यांनीं जो संग्राम केला त्याचें विस्तृत वर्णन त्र्यंबकानें केलें आहे. ते दैत्य कसे चालून आले यावर कवीनें सुंदर उत्प्रेक्षा केल्या आहेत :—

गमति अचल जाणों फार चालोनि आले ।
वरुष रितुस खगर्भी मेघ किंवा उदेले ॥
दिसति स्थल त्यजूनी लोटले सात अब्धी ।
अभिनव उपमा हे बोलिजे घोर युद्धीं ॥ १२१५ ॥

किंवा कशी धुमश्चक्री उडाली पाहा,

रथेंच रथ भंगिले हय हयेंच संह्वारिलें ।
गजें गज विभांडिलें असुरवीरही मारिलें ॥
बळें कुण झुगारिले पवनचक्र तें दाटलें ॥
खमंडळहि कोंदलें लपति नवग्रहमंडलें ॥ १३ ॥

---

१२. भुतें भक्षिती आवडी मांसगोळा । तयानंतरें प्रीतिनें अंत्रमाला ॥
बळें अस्थि दांतें फोडूनि खाती । तृषा लागल्यानें पाहा रक्त पीती ॥१२७६॥

हिरण्यकश्यपूला सर्वत्र नृसिंह दिसूं लागला. त्याला अपशकुन होऊं लागले.[१३] 'नरहरि असुरेंसी जुझ' 'बहुतादिवस' करीत होता. 'नोहे निशी ना दिन संधिं तैसी' पाहून नरहरि — 'सभाद्वारिच्या उंबऱ्यामाजिं' बसला. मरतांनाहि राजानें त्याला मूर्ख, ठक असे अपशब्द वाहण्यास आणि

तुला येश आलें गमे काकतालें ।
कुपी घातला सिंह्य कोल्हा कुटीलें ॥ १६४६ ॥

असें सांगण्यास कमी केलें नाहीं. हरीनें त्याचें 'हृदयभुवन नखें फाडिलें' तरी त्याचा क्रोध कमी झाला नव्हता.

म्हणून नारदानें प्रल्हादाला बोलावून आणलें. प्रल्हादाच्या भक्तीचें वर्णन काव्यात्मक उतरलें आहे. कांहीं श्लोक असे,—

हरिपदनखचंद्रीं सार सत्राविंयेचें ।
प्राहित मनचकोरा भक्त प्रल्हादजीचें ॥ १७६० ॥
हरिपदांबुज कोशरसामृत ।
मन अलीकुळ त्या जाहाला रत ॥
मधुरसीं बसली जशि मक्षिका ।
हरिपदीं प्रह्राद तसा निका ॥ १७६२ ॥
हरिपदीं प्रह्राद जिव तसा ।
अनुभवी सुखसंभ्रम फारसा ।
परमसीतळ साउलिये तळीं ।
निजतसे सिणली जनमंडळी ॥ १७६९ ॥

---

१३. करतळ सिरपद्मीं नीट ठेऊनि पाहे । दिसत नयनिं मोटा हस्त तो पाहाताहे ॥१४२३॥ न दिसत असुरानें नाकसेंडा स्वचक्षीं ॥१४२४॥ न दिसत सिर नेत्रीं थोंट छाया दिसे ते ॥ १४२५ ॥ झडपिति गिध डोयी मस्तकीं काक बैसे ॥१४३३॥ मिथुन पडत नेत्रीं वायसाचें....॥ प्रकट रडत येता देखिली राजलक्ष्मी ॥

हरिचिंतनानेंच प्रल्हाद 'मनापलिकडे' गेला होता. त्र्यंबकाला मनापलीकडील प्रदेश माहीत आहे. प्रल्हादाच्या उन्मनी अवस्थेचें म्हणूनच त्याला वर्णन करतां आलें.

तें बोलिजेत निजमंदिर उन्मनीचें ।
तेथेंच बोधसुख भोगितसे तियेचें ॥
सायुज्यमुक्ति परिचारिणि रात्रिदीस ।
सेवेसि तिष्ठति निरंतर हो विशेष ॥ १८३९ ॥

हिरण्यकश्यपूलाहि कवीनें मन, बुद्धि, चित्त, अहंपण घर, ब्रह्मरंध्र, येथें फिरवून आणलें आहे. किंबहुना उपमा देतांनाहि तो लिहून जातो, 'जैसें फिरोनि मन ये हृदयालयाला.'

मग प्रल्हादानें हराची स्तुति केली:—

तुझ्याच निजरूपांशें विभूति जग विस्तरे ।
असी श्रुतिवदे देवा । येकांशेन स्थितो जगत् ॥ १८९५ ॥

हरीहि प्रसन्न झाला. येथेंच उपलब्ध झालेला ग्रंथ संपला आहे.

त्र्यंबकाच्या 'प्रल्हादचरित्रा'ला काव्य म्हणूनहि मूल्य कमी नाहीं. मी बोललों तें कविपरंपरेच्या आधारें असें तो म्हणतो[१४] व आपला ग्रंथ कुशल-चतुर लोकांसाठीं आहे असेंहि सांगतो.[१५] कथेला इतरांचा आधार जसा आहे, तसाच कांहीं ठिकाणीं संस्कृत सुभाषितांचा अनुवादहि आढळतो.[१६]

---

१४. पारंपरा कविमती गति योग्यता हें ॥ ७३२ ॥ ग्रंथीं कवी चतुर बोलियेले उदंड । आधार तोचि मजलागुनि ।

१५. कुशल चतुर होती तेचि हा ग्रंथ गाती ॥ ७३८ ॥

१६. कामातुरास भय आणिक लाज नाहीं ॥ १५१ ॥ गगन वरि पडो कां पालथी भूमि हो कां । उदय रविशशीचा पश्चिमांगीं घडो कां ॥ १४८७ ॥

काव्यरचनेचा हेतु 'कांहितरी तरावयां गावें' असा असला तरी काव्यांत रसालंकारांचें हृद्य स्वरूप दिसतें. रसांबद्दल वर लिहिलेंच आहे. त्र्यंबकाला रसनिर्मिति चांगली करितां येते. अलंकारांत उपमा, उत्प्रेक्षा, यमक, ध्वन्यनुकरण व दृष्टान्त हे त्याचे आवडते अलंकार आहेत. पुढील श्लोक त्या दृष्टीनें महत्त्वाचे वाटावेत :—

त्यजुनि मणि अमोल्य कांच इछी दरिद्री ॥ २०१ ॥
बांधो नये पालवि जातवेद ।
होऊं नये आसपणांत भेद ।
पाहों नये भक्षुनि काळकूट ।
तेणें जिवाला मरणांत वाट ॥ ३२७ ॥
हें रोप भासें मजला विषाचें ।
कीं चित्र हें केवल त्या रिपूचें ॥ ३३४ ॥
कीं भौम ये अवनिभेटिस दिव्यरूप ॥ ५४१ ॥
रणाद्भुत नदीतिरीं दिसति रम्य कीर्तिद्रुम ।
तयावरि विहंगम वसति धर्म सत्यागम ।
फुलें सुमन अक्षयी सदय सर्वभूतीं सम ।
जयांस पुरुषोत्तमभजन त्यांहा संभ्रम ॥ १३५५ ॥

अशीं किती तरी अलंकारांचीं उदाहरणें देत येतील. आणि एक कवि म्हणून त्र्यंबकाला मान्यता द्यावी लागेल.

त्र्यंबकाच्या एकंदर काव्यावर वामनपंडिताच्या धाटणीची छाप आहे. त्यामुळें रचनेची सफाई आढळली तरी पाल्हाळ, औचित्याचा अभाव आणि कालविपर्यास हे त्याचे दोष डोळ्यांआड करण्यासारखे नाहींत.

'प्रल्हादचरित्रा'चा विस्तार आणि कांहीं भाग गहाळ होऊनहि न आलेला अपुरेपणा विचारांत घेतला कीं पाल्हाळाचें स्वरूप स्पष्ट होईल. आख्यानांत उपाख्यानें असा त्र्यंबकाचा इरदासी थाट आहे. 'रसाळ पाल्हाळ' असें फार तर त्याचें वर्णन करतां येईल.

प्रल्हादाची हिरण्यकश्यपूनें निर्भर्त्सना केल्यावेळीं कवीनें त्या संदर्भात कुलवधू सोडून दासीशीं रतणाऱ्याचा दृष्टान्त दिला आहे.[१७] प्रल्हादाकरवीं कयाधूला रुक्मांगद—मोहिनीची शृंगारिक कथा सांगितली आहे. प्रल्हादासारख्या भक्तांचें वर्णन,

मळयचंदन वृक्ष सुवासिक । सतत वेष्ठुनियां फणि लुब्धक ।

नुठति तेथुनि ते फणि बोलिजे । सुख तसें हरिच्या चरणांबुजें ॥ १७६४ ॥

असें केलें आहे. येथें औचित्य नाहीं असेंच म्हणावें लागेल.

कालविपर्यासाचीं उदाहरणें फारशीं नाहींत. एकच देण्यासारखें आहे. हिरण्यकश्यपू नृसिंहाला खांबांतून बाहेर ये, शरण ये, असें म्हणत असतांनाच ‘ वृंदावनि विचर तूं निर्भयेंच ’ (८६१) असें सांगतो. नारसिंहावताराआधींच कृष्णावताराची कल्पना आली आहे. हीच चूक ‘ वृंदावनास जावें ’ या कयाधूच्या डोहाळ्यांत आहे.

त्र्यंबकाची भाषा शुद्ध आहे. ‘ प्रहराद ’ सारखें रूप क्वचित्‌च आढळतें.[१८] त्याला संस्कृत, कन्नड व हिंदी या भाषा येत असल्या तरी संस्कृतचाच प्रभाव अधिक आहे.

एकंदर भाषेवर कन्नड व हिंदीचा पगडा नाहीं. चाकाटला, कांटाळला, पालाणियेले, लवडसवडि, भविनला ( भोंवला ), उश्राप, महावत ( माहूत ), आश्चीर्य, बीदी, अतीत ( अतिथि ), विवसी ( वाईट वेळ ), निवटा ( नष्टकरा ), पाहेसिनास, मौनावली, असे कांहीं शब्द[१९] इतर संस्कृत शब्दांत वेगळे वाटतात. त्र्यंबकाला शब्दांचा समज चांगला असला तरी ‘ दिव्यासुधां

---

१७. त्यजुनि कुलवधूचा संग दासीस भोगी ॥ ३०१ ॥

१८. तेसा कयाधुनमना प्रहराद येत ॥ ५४५ ॥

१९. कोडकौतुक करणें, कपाळाला हात लावणें, मनीं ग्रंथ आणणें; या सारखे वाक्प्रचार त्र्यंबक वापरतो. (नाणीत पंडित मनाप्रति ग्रंथ हा रे ॥ हांसोनि भाल सिवती गण मध्यबोटे ॥)

गवसणींतुन शीघ्र काढा, अशा ठिकाणचा ' गवसणी ' सारखा शब्द खटकतो. हरदासाला तलवारीपेक्षां तंबोरा अधिक परिचित ! म्हणून असें घडलें असावें. ' जातो काळ त्वरा हरी न विसरा ध्यानीं धरा श्रीवरा ' सारखी किती तरी यमकप्रचुर व अनुप्रासात्मक रचना त्यानें केली आहे. यावरून त्याचें भाषाप्रभुत्व ध्यानीं यावें.

अशा या कवीचें चरित्र अज्ञातच आहे. त्याचे आई–वडील, त्याचा काळ याबद्दल कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. त्यानें कन्नड व हिंदी पदें, द्रौपदी–दुर्वास आख्यान व श्रीकृष्ण–उद्धव आख्यान अशी अन्य रचना केली आहे.

' प्रल्हादचरित्रां'त अगर त्र्यंबकाच्या अन्य कृतींत काळाचे निदर्शक असे कांहींच उल्लेख नाहींत. त्याचप्रमाणें त्र्यंबकाला अर्वाचीन मानावें, अशाहि कांहीं खुणा नाहींत त्यावरून माझा असा तर्क आहे कीं, त्र्यंबक हा पेशवाई अखेरील कवि आहे. हिंदी पदांत तो स्वतःला ' शाहीर ' म्हणवून घेतो.[२०] शाहीर–युगाला जवळचा असा हा कवि असावा. त्याचें चरित्र अज्ञात असलें तरी ' प्रल्हादचरित्र ' उपलब्ध झालें ' हेंहीं नसें थोडकें ! '

REFBK-0015147

२०. गावे त्रियंबक शाहीर राम्का । जाहीर पाक दिल्का ॥

# शुद्धिपत्र

येथें फक्त महत्वाचीं अशुद्धें शुद्ध केलीं आहेत.

| पृ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १६ | के ला | केलेला |
| ३५ | मुद्गलभट्टांनें | मुद्गलभट्टानें |
| ३७ | झाल | झाला |
| ७३ | 'भावार्थ रामायण' | 'भावार्थरामायणा'चें युद्धकांड |
| १२१ | नांहीं | नाहीं |
| १३३ | माहतीवरून | माहितीवरून |
| १३७ | माझ्याकडालि | माझ्याकडील |
| १८४ | त्याचा त्याचा | त्याचा |
| २०० | 'श्रीम रित्र' | 'श्रीमच्चरित्र' |
| २१५ | भित्र | भिन्न |
| २४२ | बहीष | बहीण |
| | मुलाशीं | मुलीशीं |
| २४३ | सामाधीहि | समाधीहि |
| २४४ | विरतित | विरक्ति |
| | मोत्या | मोठ्या |
| २४५ | चित्रात | चित्राव |
| | म्हणूच | म्हणून |
| | त्याचा | त्याची |
| | भितका | अितकी |
| २४७ | ग्रथांत | ग्रंथांत |
| २४८ | 'गुरुमळिके'तील | 'गुरुमाळिके'तील |

| पृ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| २५० | स्वनाहि | रचनाहि |
| २६४ | ग्रथं | ग्रंथ |
| २६७ | पाप | पाष |
| २७० | सस्कृत | संस्कृत |
| २७५ | विक्रमाली सांगितलेला | विक्रमाला सांगितलेली |
| २८१ | ब्राह्मणाश | ब्राह्मणास |
| २८७ | स्याचें | त्याचें |
| २९२ | करकुचीं अधरोष्टपानीं | कर कुचीं अधरोष्टपानीं |

डॉ. पण्डित आवळीकर

प्राचीन मराठी वाङ्मयांत नवीन कृतींची व माहितीं भर टाकणाऱ्या आजच्या संशोधकांत डॉ. प. आवळीकर हे अग्रेसर आहेत. त्यांचा मनःपिंड जातिवंत वाङ्मयोपासकाचा आहे. त्यांच्या वाङ्मयो-पासनेला काव्यदेवीच्या आराधनेनें प्रारंभ झाला. 'स्वप्नवंती' आणि 'दीपराग' या त्यांच्या काव्यसंग्रहांतून प्रकट झालेली त्यांची कवि-प्रकृति त्यांच्या टीकालेखनांतहि दिसून येते. कवितेपेक्षां टीकेकडे आणि या दोहोंपेक्षां संशोधनाकडे ते अधिक वळले आहेत असें सध्यां दिसतें.

धारवाड येथील कर्नाटक आर्टस् कॉलेजमध्यें मराठी विभागाचे प्रमुख म्हणून काम करणाऱ्या डॉ. आवळीकरांनीं मुख्यतः कर्नाटकांतील जुनें मराठी वाङ्मय शोधण्याचें व अभ्यासण्याचें आपलें कार्य गेलीं कांहीं वर्षें अप्रतिहतपणें चालविलें आहे. त्यांनीं संपादिलेला 'विवेकचिंतामणि' हा ग्रंथ कर्नाटक विश्वविद्यालय व पुणें विद्यापीठ यांच्या तर्फे गतवर्षीं प्रसिद्ध झाला आहे. कै. नरसिंह चिंतामण केळकरांच्या वाङ्मयावरील त्यांचा प्रबंधहि लौकरच प्रकाशांत येत आहे.

'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'नवभारत', 'इंद्रायणी', 'प्रतिष्ठान' इ. नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या डॉ. आवळीकरांच्या कांहीं संशोधनपर लेखांचा संग्रह 'जुनें वाङ्मयः नवें संशोधन' या नांवानें प्रकाशित होत आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत व संशोधनांत डॉ. आवळीकरांनीं घातलेली ही भर मोलाची ठरेल.